
महायोगी
गौतम बुद्ध
डॉ. सुभाष के. देसाई



# महायोगी

# गौतम बुद्ध

**डॉ. सुभाष के. देसाई**

**प्रथमावृत्ती :** दीपावली २००८

**द्वितीयावृत्ती :** बुद्धजयंती ९ मे, २००९.

**लेखक :**
डॉ. सुभाष के. देसाई (एम. ए. पीच. डी.)
१०२, साळोखेनगर, कोल्हापूर (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२३१) २३२४५८३
भ्रमण : ०९४२३०३९९२९
Email : drsubhashdesai@gmail.com.

**प्रकाशक :**
सर्जेराव के. देसाई (बीएस्सी. ॲग्री.)
आमदार गल्ली, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२३२४) २२०२११

**मुद्रक :**
सिंहवाणी प्रिंटर्स,
११ब, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२३१) २६४१६३५

**मुखपृष्ठ :**
अनंत खासबारदार
'निर्मिती', कोल्हापूर.

**अक्षरजुळवणी :**
सौ. सावित्री महाजन, कोल्हापूर.
सौ. पद्मजा गोलिवडेकर, कोल्हापूर.
दिनकर आदाटे, सांगली.

**मूल्य :** २०० रुपये



बालपणापासून, अध्यात्मिक सहप्रवासी / माझा लहान भाऊ

**शिवकुमार उर्फ सर्जेराव यास...**



## ● अनुक्रमणिका ●


| | |
|---|---|
| मनोगत | ५ |
| बुद्ध पवित्ररक्षा | १३ |
| श्रमण संस्कृती | १८ |
| महाराणी माया | २२ |
| बालपण | २५ |
| शिक्षण | ३० |
| तारुण्य | ३८ |
| गृहत्याग | ४६ |
| राजा बिंबिसार | ५३ |
| साक्षात्कार | ६२ |
| धर्मोपदेश करावा की नको | ६७ |
| सात वर्षांनंतर | ८६ |
| नित्यजागृती | ८९ |
| कपिलवस्तूत बुद्ध | १०४ |
| एकांतवास | ११५ |
| पवित्र जीवन आणि समता | १४४ |
| अंत:स्फूर्त उत्तरे | १६२ |
| निर्वाणाच्या वाटेवर | १८५ |
| महानिर्वाण | १८८ |
| संदर्भ ग्रंथ | १९४ |
| संदर्भ शोधण्यासाठी | १९६ |

# मनोगत

फार प्राचीन काळापासून आध्यात्मिक जीवनातील उत्क्रांत साधु-संतांना भगवान (Bhagav) म्हणत. त्यांच्या पवित्र जीवनाविषयीचे ज्ञान जतन करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे गुरुवाणी जतन करणे. त्यांची शिकवण म्हणजेच त्यांच्या जीवनाचे सार.

ज्यांना आत्मसाक्षात्कार झाला आहे, तत्त्वाचे ज्ञान झाले आहे त्याला बुद्ध (Buddha) म्हणून संबोधले जाई.

भगवान बुद्धांच्या महानिर्वाणानंतर ख्रिस्तपूर्व ३८० साली सातशे बुद्ध भिक्खूंनी एका महासभेत तथागतांच्या जन्मापासून निर्वाणापर्यंतच्या घटनांच्या नोंदी केल्या. पाली भाषेतल्या या नोंदींमुळे बुद्धांच्या वेळच्या भारतातील परिस्थितीची कल्पना येते.

त्या काळात सहा महामानव होऊन गेले. त्यांचे सहा पंथ होते. (Nataputta) 'नतपुत्त' हा त्यांपैकी एक. त्याचा उल्लेख जैन पंथात आहे. बुद्धधर्मीयांत बुद्धांचे जे स्थान तेच स्थान नतपुत्तला जैन तीर्थंकर परंपरेत आहे. मात्र बुद्ध किंवा जैन संप्रदायात नतपुत्त कोठे समाधिस्त झाले, याचा उल्लेख करताना 'पावा' शहराचा करतात.

या श्रमण परंपरेप्रमाणेच भगवान बुद्ध आपला संदेश गावागावांतून, शहरा-शहरांतून फिरून पसरवीत गेले. त्यांच्या भोवती चाहत्यांची गर्दी वाढत गेली. आपल्या सोप्या भाषेतला संदेश श्रमण परंपरेतल्या लोकांना आणि ब्राह्मणवर्गालाही ते सांगत होते.

मात्र एक ऐतिहासिक सत्य आहे की, पाली भाषेतून बुद्धांचा धम्म, जीवन आपल्यापुढे आले पण पाली भाषेत बुद्धचरित्र म्हणून काहीही उपलब्ध नाही. त्या प्राचीन काळात चरित्र, आत्मचरित्र या कल्पनाही विकसित झाल्या नव्हत्या. 'बुद्धचरित्र हरवले किंवा नष्ट झाले' असा कोणताही उल्लेख त्रिपिटकात नाही. त्या काळात महापुरुषांच्या वाणीकडे, उपदेशाकडे अधिक लक्ष केंद्रित झाले होते. त्यामुळे वैयक्तिक जीवनातील घटनांना गौणत्व प्राप्त झाले हीच गोष्ट त्यानंतरच्या येशूख्रिस्तांच्याबाबत, ग्रीक परंपरेतील तत्त्वचिंतकांबाबत घडली आहे.ह्या शिकवणुकींच्या नोंदी कालानुरूप नाहीत. पुढे मागे झाल्या आहेत. त्यानंतर पुढे कालांतरान



चरित्र हा प्रकार आला. सॉक्रेटिसची आपला विचार मांडण्याची पद्धत आगळीवेगळी होती; चर्चेतून, प्रश्नोत्तरातून तो आपला संदेश मांडत असे. सॉक्रेटिसच्या नजिकच्या कोणी अनुयायांनी सॉक्रेटिसचे चरित्र लिहिलेले दिसत नाही.

बुद्ध संप्रदायात प्रथम महत्त्व दिले ते बुद्धवाणीला. त्याच्या नोंदी बुद्ध संघाला महत्त्वाच्या होत्या. निःसंशय या नोंदीमुळेच बुद्धांची शिकवण जगाच्या कानाकोपऱ्यात गेली. ती शिकवण बऱ्याच अंशी निर्भेळ नि जशीच्या तशी राहिली.

लोकांना हवे होते तथागत काय म्हणाले? त्यांनी कोणता सद्धर्म सांगितला? बुद्धत्व लाभल्यावर त्यांना कोणते ज्ञान झाले? यापुढे इतर तपशीलांचा विसर पडला व ते गौण ठरले. इतकेच नव्हे, बुद्धत्व प्राप्तीसाठी बुद्धांनी केलेली धडपड, केलेले परिश्रम, केलेला आंतरिक संघर्षही बाजूला पडला. बुद्धांचे बुद्धत्व त्यांच्या ज्ञानात सामावलेले आहे. ते त्यांनी संघर्षाने जिंकले आहे म्हणून ते जिंकणारे आहेत; 'जीन' आहेत.

या आंतरिक संघर्षाला पुढे चरित्रकारांनी, माराशी, आसुरी शक्तींशी बुद्धांनी केलेला संघर्ष असे रूपक रंगवले. मूळ पाली भाषेतील ग्रंथात बुद्धत्व प्राप्तीचे वर्णन करताना कोठेही 'मारा'चा उल्लेख आढळत नाही. माराच्या रूपकात माराच्या मुली म्हणजे वासना, अस्वस्थता, सुखोपभोग याही बुद्धाला त्रास देतात. याचा अर्थ बुद्धाच्या संघर्षाचे स्वरूप, मन, अंतर्मन पातळीवरचे होते.

त्यामुळे रूपककथा, चमत्कार या ढंगांनी खरा बुद्धसंदेश झाकोळला जाणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

भगवान बुद्धांचे मूळ शहर 'कपिलवस्तु' चा उल्लेख विचार करायला लावतो. कपिल हे बुद्धपूर्व काळातील तत्त्वज्ञ. सांख्य तत्त्वज्ञानाचे ते जनक होत. त्यांच्या नास्तिकवादी विचारांचा प्रभाव गौतम बुद्धांवर पडलेला होता. 'कपिलवस्तु' नावाची नगरी त्याकाळी होती असा उल्लेख आढळत नाही. अर्थात मॅक्समुल्लरच्या मते सांख्य तत्त्वज्ञानाचा प्रभाव बुद्धावर झालेला आढळत नाही.

बुद्ध संदेश आणि परंपरा यांविषयी असंख्य ग्रंथ उपलब्ध आहेत. मात्र चरित्रात्मक किंवा आत्मचरित्रात्मक स्वरूपाची मांडणी आढळत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि बुद्धांचा धम्म समजून घेण्यास सुयोग्य भूमी निर्देशित केली आहे ती म्हणजे परिव्राजकावस्था, परित्यागिवृत्ती, अष्टांगमार्गाने वाटचाल करणारी व्यक्ती.

बुद्धाचे आकर्षण नि त्याचा प्रभाव कोणावर नाही? येशू ख्रिस्तापासून अलीकडच्या काळातील अर्ध्या अधिक जगातील मानवांवर, अफगाणिस्तानच्या बामियानपासून जपान, श्रीलंका, चीन, तिबेट, भूतान, म्यानमार, इंडोनेशिया, भारत असा जगभर बुद्धविचार पसरला आहे.

थिऑसॉफिकल स्कूल, स्वामी विवेकानंद, जे कृष्णमूर्ती, आचार्य रजनीश, विपश्यना, महात्मा गांधी या साऱ्यांना बुद्ध जीवन व तत्त्वज्ञानाने भारून टाकले होते.

वयाच्या १४/१५ व्या वर्षी दत्ताबाळ मल्हारराव देसाई नावाच्या एका तरुण आध्यात्मिक साधक व तत्त्वचिंतकाच्या चर्चेत तिबेटचे लामा मिलारेपा यांचे चरित्र मी ऐकले. त्यानंतर काही ध्यान, उपासनाही झाल्या. पुढे लवकरच 'प्रणव' त्रैमासिक नि साप्ताहिक 'सिंहवाणी' प्रसिद्ध करू लागलो. साप्ताहिकाच्या प्रत्येक अंकात बुद्धांच्या जातककथा प्रसिद्ध करीत गेलो. तिबेटमधली कैलास - मानसरोवर यात्रा दोनवेळा केली. दुसऱ्यावेळी कैलास परिक्रमेत लामा मिलारेपांच्या तपस्येच्या जागा पाहिल्या. नॉर्थ सिक्कीम मधल्या रुमटेक मॉनेस्टी ही त्याच परंपरेतील आहे.

हिमाचल प्रदेश मधल्या नाको, संगला, किन्नर कैलास, स्पिती व्हॅलीतील किब्बर, ताबो मॉनेस्ट्री, की मॉनेस्ट्री, लाहुल व्हॅलीतील मॉनेस्ट्रीज व तेथले लामा यांच्या गाठीभेटी घेऊन चर्चा केल्या.

बुद्धगया, सारनाथ येथेही जाऊन आलो. आंध्रप्रदेशमधल्या दक्षिण-पूर्व भागात विजयवाडा, मछलीपटन, अमरावती, जगय्यापेटा, नागार्जुन, धन्यकंटक या बुद्ध स्तूप, महास्तूप स्मारकांना भेटी दिल्या. महाराष्ट्रात तर असंख्य ठिकाणी बुद्ध लेणी आहेत.

बुद्ध विचाराबाबत भारतात जनजागृती होत आहे. ही शुभचिन्हेच होत. नव्या युगाची नांदी आहे. तिची जाणीव या संकलनातून तीव्रतेने करून देण्याचा हा नम्र प्रयत्न आहे. बुद्ध जीवनाबद्दलच्या महत्त्वाच्या नोंदी पश्चिमेकडील व पूर्वेकडील विचारवंतांनी केल्या आहेत. जपान, श्रीलंका येथील विद्वानांनी त्यासाठी खूप परिश्रम घेतले आहेत.

ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात कवी अश्वघोषाने बुद्धकारिकेत बुद्धचरित्राचा समग्र आढावा घेतला आहे. पहिली तेरा प्रकरणे संस्कृतमध्ये व इतर तिबेटी अनुवाद आहे. त्यानुसार भगवान बुद्धांचा कालावधी ५६६ ते ४८६ ख्रिस्तपूर्व असा निश्चित करण्यात आला.

राहुल सांस्कृत्यायन यांनी केलेला विनयपिटकचा हिंदी अनुवाद हा महत्त्वाचा आधार



ठरला. विनय म्हणजे (Discipline) शिस्त, नियम बुद्ध भिक्खु - भिक्खुणींच्यासाठी आचारसंबंधी जे नियम ते अत्यंत सखोल व वास्तववादी, व्यावहारिक होते. भगवान बुद्धांच्या महानिर्वाणानंतर हे नियम मुखोद्गत पद्धतीनेच तीन/चारशे वर्षे चालत आले. साहजिकच भाषेच्या, प्रांताच्या बदलानुसार उच्चारातही फरक पडत गेला.

थिच न्हात हांत (Thich Nhat Hanth) यांचे (Old Path White Clouds) हे पुस्तक समग्र बुद्धचरित्राचे चित्र उभा करते, पण ते प्राचीन भारतीय समाज पद्धतीपेक्षा अधिक प्रमाणात पूर्वेकडच्या देशातील पद्धतीच्या प्रभावाखाली आहे; त्यामुळे काही घटना वेगळ्या कल्पना जगतातील वाटतात.

के. टी. एस. सराओंचे प्राचीन भारतीय बुद्ध धर्म, उद्भव, स्वरूप एवं पतन हे अभ्यासपूर्ण वाटले तर व्हॅन हाईन (Van Hien) यांच्या कॅनडातील सूत्र अनुवाद कमेटीने प्रसिद्ध केलेल्या Glossory of Buddhism या ग्रंथामुळे शब्दांचे मूळ अर्थ स्पष्ट होतात.

सर एडवीन अर्नोल्ड यांच्या लाइट ऑफ एशिया या छोटेखानी पुस्तकाची मोहिनी फार मोठमोठ्या लोकांच्या मनावर पडली. ते पुस्तक त्या उंचीचे आहे. सूत्रबद्ध आहे. अशा अनेक ग्रंथांच्या परिशीलनाचा, चिंतनाचा, उपासना मार्गावर चालण्याचा परिपाक म्हणजे हा छोटा ग्रंथ.

भगवान बुद्ध कोसी-कुरुक्षेत्र, विंध्य-हिमाचल, मध्यप्रदेशच्या बाहेर गेलेले नाहीत असे त्रिपिटीकावरून दिसते. इसवी सनानंतर पहिल्या शतकात सूत्र, विनय, अभिधम्म हे तीन पिटीक (त्रिपिटक) कंठस्थ होते ते लिपिबद्ध झाले. आज त्यालाच पालित्रिपिटक म्हणतात. त्यांचा इतिहास थोडक्यात आढावा घेण्यासारखा आहे.

## महानिर्वाणानंतर

बुद्धांच्या महानिर्वाणानंतर थोड्याच दिवसात भिक्खू नियम आणि धम्म प्रथम संकलित करण्यात आला. महाकश्यपांनी पहिली धर्मसंगिनी आयोजीत केली. मगध सम्राट अजातशत्रूने राजगृहाजवळ असलेल्या सप्तपर्णी गुहेजवळ भव्य मंडप घालून संगिनीची व्यवस्था केली. संघाच्या परवानगीने महाकश्यपांनी अर्हत उपालीना विनयासंबंधी प्रश्न विचारले. त्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे की नाही हे पाचशे अर्हताना विचारले जात असे. सर्वांचे एकमत झाले की पुढचा प्रश्न विचारला जाई. अशा तऱ्हेने विनयाच्या नियमांचे एकत्रीकरण केले गेले. हीच पद्धत वापरून अर्हत आनंदना धम्माविषयी प्रश्न विचारले. परिपूर्ण उत्तर आल्यावर धम्म

संपादित केला. अशा तऱ्हेने पहिल्या धम्म संगितीत विनय आणि धम्म संग्रहित केला गेला. (ख्रि.पूर्व ३८३)

त्या नंतर १०० वर्षांनी विनयातील काही नियमांच्या अर्थाविषयी मतभेद झाल्याने वैशाली येथे ७०० भिक्खूंनी भाग घेतला. ही दुसरी संगिनी आठ महिने चालली. पण ती व्यवस्थित नाही म्हणून वज्जी भिक्खूंनी दुसरीच एक संगिनी बोलावली. त्यात भिक्खू बरोबर उपासकांनी भाग घेतला म्हणून तिला महासंगिका असे नाव देण्यात आले. ही महासंघिकाच पुढे महायान संघाची जननी ठरली.

वैशाली येथे भाग घेणाऱ्या भिक्खूंना स्थविरवादी किंवा थेरवादी असे म्हणण्यात येऊ लागले. कालांतराने महायानी संघातील लोक आपला वेगळेपणा दाखविण्यासाठी थेरवादींना 'हीनयानी' असे म्हणू लागले.

गौतमबुद्धांच्या इ.पू. ४८३ मधल्या महानिर्वाणानंतर २०० वर्षांनी सम्राट अशोकने बुद्धधर्म स्विकारला. त्याच्या काळात तिसरी बौद्ध धम्मसंगिनी मोग्गलीपुत्र तिस्सांच्या अध्यक्षतेखाली पाटलीपुत्र येथे भरली होती. त्यात नऊ महिन्यांच्या काळात त्रिपिटकांचे व्यवस्थित संकलन केले गेले. त्याच काळात त्रिपिटक लिपिबद्ध झाले, कारण लिपीचा सर्वत्र वापर केला गेला ही गोष्ट शिलालेखांवरून दिसून येते.

पालित्रिपिटकांच्या तीन मूळ ग्रंथांत खालील ग्रंथांचा समावेश आहे.

१. सूत्रपिटक  २. विनय पिटक  ३. अभिधम्मपिटक

**I. <u>सूत्रपिटक</u>** - निरनिराळ्या वेळी बुद्धांनी केलेला उपदेश; त्याचे पाच विभाग आहेत-

१) दीघनिकाय - मोठ्या सूत्रांचा संग्रह

२) मज्झिमनिकाय - मध्यम प्रमाणाच्या सूत्रांचा संग्रह

३) संयुक्तनिकाय - लहान लहान सूत्रांचे संच करून त्यांचा संग्रह

४) अंगुत्तरनिकाय - संरचनेप्रमाणे सूत्रांची मांडणी करून त्यांचा केलेला संग्रह

५) सुद्दकानिकाय - लहान लहान प्रकरणांचा संग्रह

सुद्दकानिकाय याचे १५ पोट विभाग:-



सद्दकापाठ / धम्मपद / उदान / इतिवुत्तक / सूत्रनिपात/ विमानवत्थु / घेतवत्थु / थेरगाथा / जातक / निद्देस / पटिसंभिदामग्ग / अपदान / बुद्धवंथ /चरियापिटक

**II. <u>विनय पिटकात</u>** भिक्खू व भिक्खूणी यांच्या संघाच्या वागणुकीचे नियम दिले आहेत. त्याचे पाच भाग -

१) पाराजिक - सुत्तविभंा - भिक्खू व भिक्खूणी यांच्या संघांनी

२) पाचित्रिय - पाळण्याचे नियम.

३) महावग्ग - भिक्खू संघ कसा अस्तित्वात आला - चिवरा विषयी माहिती.

४) चुद्दवग्ग - पिण्यपात, शयनासन, औषधोपचारा विषयी माहिती.

५) परिपार - सिंहलद्वीपातील भिक्खूने रचलेले परिशिष्ट.

**III.** अभिधम्म पिटक - गहन तत्त्वज्ञानविषयक प्रश्नांची चर्चा केलेली आहे. याची ७ प्रकरणे आहेत-

धम्मसंगणि, विभंग, धातुकथा, पुग्गलपंअत्रि, कथावत्थु, यमक, पट्ठान.

हे ग्रंथ पालिभाषेत लिहिले आहेत- या भाषेचे मूळ नाव मागधी. मगध देशातील लोकांची बोली भाषा.

पाली शब्दाचा मूळ अर्थ ओळ : धर्म पुस्तकातील ओळ - मूळ निर्देश पाळी.

पाली सूत्रपिटकातील दीघ निकायात ३४ सूत्रे आहेत

| | |
|---|---|
| माज्झिम निकायात | १५२ सूत्रे आहेत |
| संयुक्त निकायात | ७७६२ सूत्रे आहेत |
| अंगुत्तर निकायात | ९५५७ सूत्रे आहेत |

माज्झिम निकायातचे संस्कृत भाषेत माध्यमिक आगम असे नाव आहे.

**अठ्ठकथा**

पाली त्रिपिटकांचा स्पष्टीकरणात्मक अर्थ सांगणाऱ्या ग्रंथांना अठ्ठकथा (अर्थकथा) असे म्हणतात. जुन्या अठ्ठकथांचा आधार घेऊन बुद्ध घोषाचार्याने इ.स. ४ थ्या, ५ व्या

शतकात त्रिपिटकातील बहुतेक सर्व ग्रंथांवर अठ्ठकथा लिहिल्या.

६ व्या शतकात त्यातील अर्थ अधिक स्पष्ट करण्यासाठी भदंताचार्य धम्मपाल यांनी अठ्ठकथावर टीका ग्रंथ लिहिले. माज्झिम निकायवर एक अठ्ठकथा भदंताचार्य बुद्धघोषांनी लिहिली.

**भगवान बुद्धांनी केलेल्या उपदेशाच्या प्रयोजनाचे चार भाग पडतात.**

१) अत्थज्झासय - म्हणजे स्वतःला वाटले म्हणून केलेला उपदेश.

२) परज्झासय - दुसऱ्यांचा कल ओळखून केलेला उपदेश.

३) पुच्छावसिक - प्रश्नकर्त्यांने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना केलेला उपदेश.

४) ड्ठुपारिक - विशिष्ट प्रसंग किंवा कारण घडले म्हणून केलेला उपदेश.

भगवान बुद्ध श्रोत्यांचा कल, त्यांची आकलन शक्ती, ते ज्या परिस्थितीत वाढले ती परिस्थिती, वातावरण, इतर गोष्टी लक्षात घेऊन त्यांना समजेल अशा भाषेत, उपमा, उत्प्रेक्षांची प्रभावीपणे मांडणी करीत होते.

## बुद्धधर्माचा ऱ्हास

इतिहास असे सांगतो की, मौर्यांचा सेनापती पुष्पमित्राने मौर्य सम्राटाची हत्या केली, त्यानंतर बुद्धधम्माचा ऱ्हास सुरू झाला. अनेक बुद्ध भिक्खू वेगवेगळ्या पर्वतांवर हिमालय, तिबेट, नेपाळ या भागांत विखुरले गेले. त्या नंतरच्या काळात मनुस्मृती, महाभारत संस्करण, यज्ञ, ब्राह्मण धर्म वाढीस लागला. परकीय आक्रमणे वाढू लागली.

कनिष्कांच्या काळात बुद्धांच्यानंतर चार शतकानंतर पहिली बुद्ध प्रतिमा (मूर्ती) बनवली गेली. महायान पंथ मूर्तिपूजा थाटामाटात साजरी करू लागला. बोधिसत्त्व तारादेवी, प्रज्ञा पारमितता मंदिरे बनली. स्तोत्रे रचली गेली. गुप्त साम्राज्याच्या प्रारंभापासून हर्षवर्धनच्या काळापर्यंत कितीतरी तंत्रशास्त्रे निर्माण झाली. ७ व्या शतकापर्यंत भैरवीतंत्र, स्त्री संभोग, मंत्रोचारण हे महायान पंथात आचरले जात होते, पण ते गुप्तपणे. नालंदा हे त्याचे प्रमुख केंद्र बनले.

८ व्या शतकात ओरिसाचा राजा इंद्रभूति व त्याचे गुरू अनंगवज्र - तांत्रिक होते. त्यातून वज्रयान तंत्राचा प्रसार झाला. दार्जिलिंग जवळची रुमटेक मॉनेस्ट्री ही तिबेटमधल्या



प्रसिद्ध तांत्रिक लामा मिलारेपा, लामा मार्पा, तिलोपा, पंडित नरोपा यांच्या कर्दुमपा पंथाची आहे.

जशा साऱ्या नद्या शेवटी सागराला मिळतात त्याप्रमाणे बुद्ध धम्मातील सारे पंथ, प्रवाह शेवटी महायोगी गौतम बुद्धांच्या सागरात विलीन होतात आणि होवोत.

भगवान बुद्ध सामाजिक क्रांतीचे जनक होते, व्यवहारी पण होते, याचा अर्थ त्याशिवाय अधिक काही नव्हते असा नव्हे. त्रिपिटकातच त्यांच्यातील भौतिकापलीकडच्या अतिंद्रिय, क्षमतांचा उल्लेख इतका स्पष्ट आहे की तो कोणाही बुद्धिवाद्याला दृष्टीआड करता येणार नाही. बुद्धांच्या आचार-विचारांतच (पातंजली) योग दर्शनाचा उगम आहे.

भगवान बुद्धांना अनेक परिमाणांच्या, (Dimestions) अनेक मितींच्या या विश्वातील आंतरिक नियम, कार्य-कारणभाव परिचित होता. परंतु त्यावेळच्या परिस्थितीनुरूप, मानवाच्या उत्क्रांतीनुसार त्यांनी ज्ञानाच्या तेवढ्याच पेट्या कमी-जास्त प्रमाणात खुल्या केल्या याचा अर्थ इतर ज्ञान-खजिना नाकारलेला नाही.

माहिती तंत्रज्ञानाच्या लाटेनंतर जैव-तंत्रज्ञानाची लाट येत आहे. मानव व मशिन यांतील जुने द्वैत लय पावत आहे. विज्ञानच स्वतःच्या मर्यादा ओळखून अगम्य प्रश्नांच्या शोधात तत्त्वज्ञानाच्या मूलगामी क्षेत्रात प्रवेश करीत आहे. अशावेळी भगवान बुद्धांच्या दर्शनाचा मागोवा घेणे मला आवश्यक वाटले. कोणाच्या मताचा पुरस्कार करण्यासाठी नव्हे किंवा कोणी केलेले विधान खोडण्यासाठी नव्हे किंवा कोणाचा निष्कर्ष कसा खोटा हे सिद्ध करण्यासाठीही या ग्रंथाची मांडणी केलेली नाही.

जे प्रामाणिकपणे मला भावले, कळले, पचले, अनुभवास आले ते सत्य धाडसाने मांडण्याचा हा नम्र प्रयत्न आहे कारण, त्यामागचा उद्देश बुद्धसंदेशाप्रमाणे, सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ आहे. तो म्हणजेच..... बहुजन हिताय बहुजन सुखाय...!

वैयक्तिक विचारांची अनुभूतीची साकल्याने केलेली ही मांडणी बुद्धांच्या जीवनप्रवाहातून घेतलेल्या ओंजळीचे हे पुन: नवे आवर्तन.

हा छोटा विचारही व्यक्तीगत अनुभूती भवितव्यात एका नव्या विचारप्रवाहात परिणत होईल. आजचे आम्ही उद्याचे बुद्ध बनू, ज्ञानी बनू.

□□□

## भगवान बुद्धांची पवित्र रक्षा

सध्याच्या कोल्हापूर शहराच्या मध्यभागी, टाउन हॉलच्या पूर्वबाजूस सरळ रेषेत, जयंतीनाला जेथे दिशा बदलतो त्या कोपऱ्यात मोठा स्तूप होता व त्यात दि. २७ ऑक्टोबर १८७७ साली भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी, रक्षा शोधली गेली. याविषयीचा भक्कम ऐतिहासिक पुरावा दी जर्नल ऑफ दी बॉंबे ब्रँच ऑफ दी एशियाटिक सोसायटी व्हॉल्यूम १४-१८७८-१८८० मध्ये उपलब्ध आहे. त्यातील ९ व्या प्रकरणाचे नाव आहे 'मेमोरँडम ऑन सम अँटीक्येअरीअन रिमेन्स फाउंड इन माउंड' पृष्ठ १४७.'

**दोन हजार वर्षांपूर्वीचा स्तूप**

त्यावेळी संस्थानचे खासगी कारभारी महादेव वासुदेव बर्वे होते. त्यांनी दि. १६ नोव्हेंबर १८७७ रोजी पोलिटिकल एजंट कर्नल एफ. सचनीदर यांना सविस्तर पत्राद्वारे पवित्र स्तूपाचा शोध कसा लागला हे कळवले. त्याचा शब्दश: अनुवाद पुढीलप्रमाणे : ''मागधी भाषेत (ब्राह्मी लिपी व प्राकृत भाषेत) कोरलेला मजकूर असणारी दगडी पेटी सापडली. त्यात स्फटिक, पारदर्शक दगडाचा करंडा सापडला. ती पेटी खाराळा बागेच्या पूर्व उताऱ्यावर मिळाली. ती तारीख २७ ऑक्टोबर १८७७ होती. (टाउन हॉल, खाराळा बंगला व या वस्तू मिळाल्या ते ठिकाण एकाच रेषेत आढळते. जयंती नाला विल्सन पुलापासून आपली दिशा बदलतो त्याठिकाणी हा शोध लागला.) संस्थानचे खाजगी कारभारी बर्वेनी ब्रिटिश सरकारला रीतसर पंचनामा करून कळवले ''खाराळ्यात बागेत एक छोटा बंगला होता. त्याची डागडुजी करताना, जमीन सपाट करताना, जादा मातीची गरज होती. तुरुंगातील कैद्यांना हे काम सोपवले होते. जवळच जमिनीचा उंचवटा हेता. त्यावर बाभळीचे झाड उगवले होते. ती जागा बंगल्यापासून २५० यार्ड पूर्वेस होती. तो जमिनीचा उंचवटा म्हणजे ऐंशी फूट व्यासाच्या एका विटांच्या बांधकामाच्या गोलाकार इमारतीचे भग्नावशेष होते. सात/आठ फूट उंचीचे ते बांधकाम शिल्लक राहिले होते. त्यावर गवतही वाढले होते.

गवताच्या खाली फूटभर खोदताना कैद्यांना भाजीव विटा लागल्या. त्यामुळे थोडी उत्सुकता वाढली, पण अशा विटा अनेक ठिकाणी आढळतात. कैद्यांना खोदताना दगडाची एक पेटी लागली. पारेने ती त्यांनी उचलली. त्यावर कुदळाचा घाव पडल्याने ती फुटली.





पंचगंगा नदीत आढळणाऱ्या लालसर दगडाची झाकणासह पेटी होती. त्यात पारदर्शक स्फटिकाचा करंडा होता तोही फुटला व त्यातील रक्षा, अस्थी बाहेर फेकली गेली. त्या दगडी पेटीच्या झाकणावर ब्राह्मी लिपीत मजकूर होता. त्याचा ठसा श्री. भगवानलाल पंडित या रॉयल एशियाटिक सोसायटी, बाँबे या ब्राह्मीलिपी तज्ज्ञांकडे पाठवला. त्यांच्या उत्तरानुसार त्यावर ''ब्रह्मस् दानं धर्म गुत्तेन कारितं' असा मजकूर असून ही वस्तू दोन हजार किंवा त्याहीपेक्षा प्राचीन काळातील आहे. त्यातील करंडा व रक्षा या भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थी-रक्षा होत.''

भगवान बुद्धांच्या कुशीनारा येथल्या निर्वाणानंतर २२५ वर्षांनी सम्राट अशोकाने असंख्य स्तूप बांधून त्यात पवित्र रक्षा-अस्थी जतन करून ठेवल्या. येशू ख्रिस्तांच्यापूर्वी ५०० वर्षे अगोदरचा हा काळ होय. काही भाग सोन्याच्या आणि स्फटिक करंडकात ठेवला. भारत व भारताबाहेर तो जतन केला. त्या दगडी पेट्यांवर वीट व मातीचे प्रचंड स्तूप बांधले.

कोल्हापूरला बांधलेला स्तूप ऐंशी फुट व्यासाचा होता व बाहेरील कंपौंड धरून ते शंभर फुट व्यासाचे होते.

श्री. महादेव वासुदेव बर्वेंनी पोलिटिकल एजंटना कळवले की, दगडी पेटी व स्फटिक करंडक कोल्हापूरला व्यवस्थित ठेवले आहे. स्तूपाच्या बांधकामात लक्षपूर्वक शोध घेतला पण अन्य कोणती वस्तू आढळली नाही.

यानंतर दि. १८ डिसेंबर १८७७ ला ॲक्टिंग सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट ऑफ बाँबे जॉन जॉरडाईन यांनी दी सेक्रेटरी बाँबे ब्रँच, दी रॉयल एशियाटिक सोसायटी यांना पत्र लिहिले त्यात दक्षिण मराठा कंट्री नं. ६९५ व उत्खनात सापडलेल्या वस्तू पाठवल्या असा उल्लेख आढळतो.

### सांचीप्रमाणे स्तूपरचना

एशियाटिक सोसायटीच्या निष्कर्षानुसार कोल्हापूरला सापडलेला बुद्ध स्तूप व वस्तू या मणिक्याल (पंजाब), कियूल (बिहार), सोनारी (भिल्या) येथल्या स्तूपांप्रमाणे व वस्तूंप्रमाणेच आढळतात. कियूट येथे सोने व चांदीच्या पेटीत अशी बुद्धरक्षा आढळली. पण सांचीप्रमाणे कोल्हापूरचा स्तूपही प्राचीन म्हणजे दोन हजार किंवा त्याही पूर्वीचा असावा. त्याचप्रमाणे स्तूपाबरोबरच बुद्ध विहार, ध्यान गुंफा त्या परिसरात असाव्यात. जनरल कनिंगहॅम यांना तशा गोष्टी जमल गृह येथे आढळल्या. (आर्किऑलॉजिकल रिपोर्ट, ५ वा खंड, पृष्ठ ४७)

### ब्रह्मपुरीवर बुद्धस्तूप

बुद्धस्तूपाबरोबरच कोल्हापूरच्या ब्रह्मपुरी टेकडीवरील उत्खननात ज्या अनेक गोष्टी





सापडल्या आहेत, त्यात बुद्धिस्ट पूजाविधीच्या वस्तू आहेत. धम्मचक्र, उदबत्तीचे धातूचे फूल, स्तूप किंवा चैत्याची धातूची प्रतिकृती या वस्तू एका धातूच्या भांड्यात होत्या व ते आठ फूट अंतरावरील दोन विटांच्या भिंतीत आढळल्या. इतर ठिकाणी मनिक्वॉल येथे जनरल वेनचुरा याहा विटांची विहीर आढळली, ती १२ फुट रुंदीची होती. ब्रह्मपुरीवरही तशीच विहीर असावी. त्यात काही नाणी आढळली.

**सातवाहन कालीन नाणी**

वरील नाण्यावर धनुष्यबाण एका बाजूला तर भोवती, बाजूला 'रोज गोतमीपुतस विदिवायकुरस' म्हणजे राजा गोतमीपुतस विदिवायकुरा' नाण्याच्या पाठीमागच्या बाजूला स्तूपाचे चित्र कोरलेले आहे. इतर नाण्यांवर वशिष्ठपुत, माधरीपुत्त अशी नावे आहेत. पंडित भगवानलाल आणि थॉमस या पुराणवस्तू शास्त्रज्ञांनी इंडियन अँटिक्वेरीच्या सप्टेंबर १८७७ च्या अंकात म्हटले आहे की, गोतमीपुत्त, वशिष्ठपुत्त व माधरीपुत्त ही सातवाहन वंशातील राजांची नावे असून ती नासिक, कान्हेरी, जुन्नर, नानघाट याठिकाणी उत्खननात आढळतात.

**बुद्धविहार**

कोल्हापूरला पंचगंगा नदीवर पूल बांधताना (पश्चिमेकडे) एका टेकडीचा काही भाग खोदून रस्ता केला, तेव्हा दि. २२ नोव्हेंबर १८७७ ला कास्य धातूची विविध आकारांतील भांडी (जैन मंदिरात पूजेसाठी वापरतात तशी), शिसे व तांब्याची नाणी, सोन्याचे मणी, शुद्ध सोन्याचे दागिने सापडले. यापैकी काही भाग सरकारकडे पाठवला व काही टाउन हॉल म्युझियममध्ये ठेवला.

कोल्हापूर परिसरातील गुंफा, बुद्धविहार अवशेष व बुद्धस्तूप व त्यांतील भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष या साऱ्यांचा अर्थ असा की, कोल्हापूर हे बुद्धानुयायांचे एक महत्त्वाचे ज्ञानपीठ होते. आचार-विचारांचे केंद्र होते. त्याचप्रमाणे जैनपरंपराही या ठिकाणी होती. म्हणजेच श्रमणपरंपरा या ठिकाणी जोपासली गेली आहे. त्यामुळे कोल्हापूरची ऐतिहासिक ओळख दोन हजार वर्षांपूर्वीची बनते. आजही त्या ठिकाणी मोकळी जागा असून त्या जागेवर बुद्ध स्मारक उभा करणे शक्य आहे. त्यामुळे कोल्हापूर हे जागतिक पर्यटन नकाशावर नोंदले जाऊन जगभरचे बुद्धधर्मीय याठिकाणी भेट देऊ शकतील.

□□□



# श्रमणसंस्कृती

सिद्धार्थाच्या जन्मापूर्वी कितीतरी वर्षे अगोदर गंगा-यमुनेच्या खोऱ्यात वैदिक संस्कृती रुजलेली होती. अनेक ब्राह्मण पंडित वेदांच्या ऋचा गात असत. अनेक ठिकाणी विविध प्रकारचे यज्ञ करीत. राज्यात अशा विद्वान ब्राह्मण पंडितांना मानाचे स्थान होते. कोसल आणि मगध राज्यांत त्यांचे यज्ञविधी, धार्मिक विधी चालत.

हे गौर वर्णीय लोक स्वतःला आर्य म्हणत. या भूमीतील मूळ लोक काळ्या रंगाच्या कातडीचे, नियम, कायदे नसलेले आणि त्यांना कोणी देवही नव्हता. नवी संस्कृती मूळ भूमिपुत्रावरचे एक प्रकारचे आक्रमणच होते. ब्राह्मणांकडे ज्ञान आणि शक्ती असते असे त्यांना सांगण्यात आले होते. देवाकडे जाणारे दरवाजे बंद आणि उघडण्याचे सामर्थ्य त्यांना असते. स्वर्गात तुम्हाला मित्र किंवा शत्रू मिळवून देण्याचे काम तेच करतात असेही सांगण्यात आले होते.

हे गुणगान गाणारा जसा वर्ग होता तसा परदेशातून आलेले व येथेच स्थायी झालेले लोक म्हणत 'हा पुजारी वर्ग फार स्वार्थी आहे. भारतीयांच्यातील अदैवी, दुष्टता कोठे पाहायची असेल तर या वर्गात पाहा.'

शाक्य जमात ही स्वतंत्र विचाराची व सुधारणावादी विचारांची होती. विचार आणि कृतीमध्ये कर्मठपणा नव्हता. ब्राह्मणांच्यातील कर्मकांडे नि चातुवर्ण्यपद्धत शाक्यांच्यात नव्हती. त्यामुळे उच्चनीचता नव्हती, सर्वांमध्ये समानता होती. वेदांच्या अभ्यासापेक्षा क्षत्रियांच्या युद्ध कौशल्यांचा अभ्यास करणे, कृषी क्षेत्राचा विकास करणे शाक्यांना महत्त्वाचे वाटत होते. युद्ध नीती माहीत असल्याशिवाय राज्याच्या सीमा सुरक्षित राहत नाहीत असा सार्वत्रिक समज होता.

श्रमण परंपरेचे चाळीस संप्रदाय अस्तित्वात होते. त्यांपैकी पाच प्रमुख प्रभावशाली होते.

१) महावीरांचा निर्ग्रंथ

२) राजा शुद्धोधनांचा शाक्य

३) मंवस, वली गोशालकचे आजीवक

४) तापसचे गैरिक

५) सांख्यांचे परिव्राजक

**जैन श्रमण**

त्यावेळी ज्या श्रमण परंपरा होत्या त्यांत तीर्थंकर होऊन गेलेत. त्या परंपरेने जीवनातील जन्म, जरा, वृद्धत्व व मृत्यू हे दुःखाचे चार प्रकार मानले होते. आपल्या दुःखाला आपणच कारणीभूत आहोत. आपल्या दुःखासाठी दुसऱ्याला दोष देणे हे अज्ञानाचे लक्षण आहे. प्रतिष्ठा, प्रतिस्पर्धा, प्रदर्शन ही दुःखाची तीन कारणे आहेत.

पण यापेक्षा दुःखाचे कोणते कारण असू शकेल? याचा सिद्धार्थ शोध घेत होता.

तीर्थंकाराप्रमाणे सहा ज्ञानी, बुद्धही झाले होते; त्यांपैकी तीन ब्राह्मण कुलोत्पन्न होते तर तीन क्षत्रिय कुलोत्पन्न होते; त्यांच्या उपदेशातही दुःखाचे मूळ कारण सिद्धार्थला मिळत नव्हते.

शरीर क्लेशावर भर देऊन स्वतःच्याच तपोबलाने मोक्ष मिळवू पाहणारी जी श्रमण परंपरा होती, त्याचा अंगीकार जैन साधू करीत त्याचे सिद्धार्थला मोठे आकर्षण वाटत होते.

जैन श्रमण मानीत की -

| **दुःखाचे कारण** | **सुखाचे कारण** |
|---|---|
| १) घरात भांडण | १) निरोगी काया |
| २) मुलगा वेगळा रहातो. | २) घरात प्रेम |
| ३) अंगणात बोराचे झाड | ३) प्रिय वाणीची पत्नी |
| ४) शेजारी चोर | ४) आज्ञाधारी पुत्र |
| ५) धनुष्यातून सुटलेला बाण | ५) सुस्थानी निवास |
| ६) मूर्खाबरोबर सहवास | ६) राजाश्रय |
| ७) दुसऱ्याचा तराजू | ७) मोक्ष |
| ८) धूम्रपानाचे व्यसन | ८) निर्व्यसन |

सिद्धार्थ पेक्षा वयाने ज्येष्ठ असणारा एक क्षत्रिय राजपुत्र वर्धमान हा कुण्डुपुरात जन्मला होता. त्याला लोक तीर्थंकर म्हणत. तीर्थंकर म्हणजे मार्ग दाखवणारा. वर्धमानाच्यापूर्वी २५० वर्षांची तीर्थंकारांची परंपरा होती. पहिले तीर्थंकर वृषभदेव होते. पण यांपैकी कोणीही



स्वतःला धर्मसंस्थापक मानीत नव्हते. अहिंसा हा त्यांच्या विचारांचा प्राण होता.

वर्धमान महावीरांच्या अगोदर २५० वर्षे काशी नरेश अश्वयेनचे पुत्र, तीर्थंकर पार्श्वनाथ होऊन गेले. त्यांच्याबद्दल समाजात आदर होता. अहिंसा आणि सत्याची साधना यांवर त्यांचा भर होता. त्यांनी अहिंसा तत्त्वाचा जो प्रचार केला त्यामुळे ते प्रसिद्ध पावले. त्यांना शंभर वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांनी सम्मेदशिखर (पारसनाथ) पहाडावर परिनिर्वाण घेतले.

पार्श्वनाथांचा संदेश अगदी साधा-सोपा होता. हिंसा, असत्य, परिग्रह, व्यभिचार या चार गोष्टींचा त्याग करा असे ते सांगत. अहिंसेच्या मार्गाला एक उपदेशाचे स्वरूप देण्याचा हा प्राथमिक प्रयत्न होता. पण जी अहिंसा फक्त ऋषी मुनींच्या आश्रमापुरती मर्यादित होती त्याला सर्वसामान्य समाजात काही स्थान नव्हते, ती अहिंसा आता जनतेच्या व्यवहारात उतरली होती. ती सामाजिक बाब बनली होती.

पार्श्वनाथमुनींनी आपल्या नव विचारांच्या प्रसारासाठी संघ बनवले होते. जे संघ अस्तित्वात होते, त्यांमध्ये जैन साधू आणि साध्वींची, राजांची संख्या सर्वांत अधिक होती.

त्यावेळी यज्ञयागाला अती महत्त्व दिले गेले होते. त्याचा अतिरेक ज्याना पसंत नव्हता ते जंगलात निघून गेले, तेथे ते तपस्या करीत.

वर्धमान महावीर विदेह मधल्या कुंडपुरात जन्मले त्यावेळी कुंडपुरात दोन भाग होते, एक क्षत्रिय आणि दुसरा ब्राह्मण. महावीर वर्धमान नाग नावाच्या क्षत्रिय कुलात जन्मले. त्यामुळे त्यांना नागपुत्रही म्हणत. त्यांनी जी कठोर तपस्या केली त्याचा परिणाम शरीरावर झाला. तिसाव्या वर्षी ते श्रमण बनले. १२॥ वर्षे तपस्वी जीवन घालवले व पुढे तीस वर्षे धर्मोपदेश केला. त्यांनी काशी, कौशट, पंचाल, कलिंग, कंबोज, कुरु-मांगल, बाहींक, गांधार, सिंधू सौवीर या देशात संचार केला. पावापूर मध्ये कार्तिक कृष्ण अमावस्याला त्यानी निर्वाण घेतले - (ई.पू. ५२७). त्यावेळी चार समवसरण (संप्रदाय) प्रमुख होते. त्यांतले क्रियावादी, धर्मनिष्ठ, आत्मा, पुनर्जन्म, कर्मनियम मानायचे तर अक्रियावादी-नैतिक निष्ठेवर भर देत.

ते पुर्नजन्म मानीत नव्हते नि मोक्षालाही स्थान नव्हते. 'विनयवादी समवरण अहं' हेच साऱ्या दुःखाचे मूल होते. अहंचे विसर्जन व समर्पण या मूल्यांना महत्त्व होते. अज्ञानवादी समवसरण अज्ञान हेच दुःखाचे मूळ कारण मानीत. अज्ञानी मनुष्य जितका सुखी तितका ज्ञानी सुखी असत नाही. वर्धमान महावीरांनी क्रियावादाचा पुरस्कार केला होता. त्यांनी नवा धर्म स्थापन केला नाही. ते उन्मायक होते. त्यांनी प्राचीन परंपरापुढे चालवली. अनेक विचारांचा परामर्श घेतला.

पुढे सिद्धार्थ परिव्राजक बनल्यावर या विचारांचा त्याच्यावर गहरा प्रभाव पडला असावा त्यामुळेच काही साधना त्यांच्या पद्धतीने करण्याचा विचार त्याच्या मनात रुजला असावा.

त्यावेळच्या 'पाली' या बोली भाषेत वर्धमान महावीराच्या परंपरेला 'समन' परंपरा म्हणत. पुढे काहीजण 'शमन' किंवा 'श्रमण'ही म्हणत. श्रम करणारा म्हणून श्रमण आणि शांत करणारा म्हणून शमन. श्रम म्हणजे शारीरिक कष्ट, प्रयत्न, विद्यमान जीवन अधिक उन्नत करण्यासाठी धडपडतो म्हणून श्रमण तर विकाराना शांत करणारा, अनिष्ट गोष्टींना दूर ठेवणारा शमन या साऱ्याचा अर्थ होता जीवन निर्मळ बनवणारा.

त्या अर्थाने सिद्धार्थला कोणी देवतेने आकाशातून उतरून धर्मज्ञान द्यावे असे कधीच वाटले नाही. त्याचबरोबर सारे काही ज्ञान चित्रगुप्ताने लिहिलेल्या नियतीत आहे असेही समजत नव्हता. ज्ञान हा काही चमत्कार नाही किंवा अचानक झालेला साक्षात्कारही नाही. मानवाने आपल्या शरीर मनात एक संतुलन साधून गाठलेली ज्ञानाची सर्वोच्च अवस्था म्हणजेच ज्ञान आहे.

□□□



# महाराणी माया

'माया' याचा अर्थच चमत्कार करण्याची शक्ती. काही म्हणतात सूर्योदयापूर्वीचे धुके म्हणजे माया. सूर्योदय होताच ते अदृश्य होते. कपिल मुनींच्या सांख्य दर्शनात माया म्हणजे वैश्विक शक्ती, मायेची शक्ती. पण सिद्धार्थसाठी तिची माया, तिचं मातृप्रेम अमृत बनले होते. ते किती अल्पकाळ होते याला महत्त्व नव्हते. परिसाचा लोहाला झालेला क्षणमात्र स्पर्शही सुवर्णात रूपांतर करतो. सिद्धार्थच्या हृदयात त्याच्या मातेने प्रेमाचे बीज रोवले असावे त्याचाच पुढे वटवृक्ष बनला. तिच्याविषयी सिद्धार्थला सांगण्यात आले की, शाक्य लोकांत आषाढ महिन्यात एक सण साजरा करण्याची पद्धत होती. अबाल-वृद्ध, गरीब-श्रीमंत सारे त्यात सामील होत. महाराणी मायाने तो मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचे योजले. एक गोष्ट ती कटाक्षाने साऱ्यांना बजावीत असे, ती म्हणजे उत्तेजक द्रव वा वस्तू कोणीही सेवन करायच्या नाहीत. ती खूप दानशूर होती. अन्नदान, द्रव्यदान मोठ्या प्रमाणात करीत असे.

तिला एक स्वप्नदर्शन झाले की, चार दिशा संरक्षकांनी (दिक्पालांनी) तिला मंचकासह उचलले व आकाशमार्गे हिमालयाच्या माथ्यावर नेऊन ठेवले. एका प्रचंड मोठ्या, विशाल अशा शाल वृक्षाखाली तो मंच ठेवला नि ते दिक्पाल बाजूला उभे राहिले. तो परिसर तिबेटमधला कैलास-मानसरोवरचा होता. त्या पवित्र ठिकाणी जैन श्रमण वृषभेदव तीर्थंकाराने निर्वाण प्राप्त केले होते. चतुर्दिक्पालांच्या स्त्रियांनी सिद्धार्थच्या मातोश्रीला मानसरोवराकडे नेले. त्या स्फटिकवत जलाशयात तिला अभ्यंगस्नान घालून तिची वेशभूषा केली. तिला सुगंधी द्रव्ये लावून फुलांनी असे सजवले की जणू ती एका दिव्यशक्तीचे स्वागत करण्यास तयार झाली आहे.

मानसरोवराचा परिसर म्हणजे स्वर्गभूमीच! अनेक श्रमणांनी तेथे तपश्चर्या केलेली पुण्यभूमी आहे. स्वप्नदर्शनात माता महामायेला सुमेध नावाचा श्रमण दिसला. तो म्हणाला, ''मी माझा शेवटचा जन्म पृथ्वीवर घेण्याचे ठरवले आहे. मी तुझ्या पोटी जन्म घ्यावा अशी माझी इच्छा आहे. तू माझी माता व्हावीस म्हणून माझी प्रार्थना आहे.'' मातेने आनंदाने होकार दिला.

तिने हा स्वप्न-दृष्टांत राजा शुद्धोधनांना सांगितले, पण त्याचा त्यांना अर्थबोध होईना.

मग त्यांनी स्वप्न दृष्टांताचा अर्थ समजणाऱ्या आठ ब्राह्मणांना निमंत्रण दिले. त्यांची नावे राम, धन, लख्खण, मंती, यण्ण, सुयाम, भोग व सुदत्त होती. त्यांचा राजाने यथोचित सत्कार केला. त्यांना सुग्रास भोजन व नवी वस्त्रे, गायी, दागिने, दक्षिणा देऊन संतुष्ट केले. मग स्वप्न सांगितले व त्याचा अर्थ विचारला.

ते म्हणाले, ''राजा! तुला असा पुत्र होईल की तो चक्रवर्ती होईल. पण?''

राजा शुद्धोधनाने मध्येच बोलायचे थांबलेल्या ब्राह्मणांना विनंती केली, ''पण काय? जरी अशुभ भविष्य असेल तरी सांगा! माझे मन निश्चल ठेवण्याचा प्रयत्न करीन.''

त्यांतला एक वयोवृद्ध ब्राह्मण हात जोडून म्हणाला, ''राजा अशुभ काहीही नाही, पण कदाचित तुझा अपेक्षाभंग होईल. तू निराश होशील. पण तुझ्या प्रजेलाच नव्हे तर पृथ्वीवरच्या साऱ्या मानवजातीला तो ज्ञानाचा दीपस्तंभ बनेल. तो ज्ञानी बुद्ध बनेल.''

सिद्धार्थची माता महामाया कोलिय वंशातील होती आणि त्याचे आजोबा अंजन व आजी सुलक्षणा देवदह नावाच्या गावी राहत. त्याच्या आईची इच्छा होती की प्रसूतीसाठी आपण माहेरी जावे. ते गावही अतिशय निसर्ग सौंदर्याने भरलेले होते. तिकडे जाताना फळा-फुलांनी बहरलेल्या गर्द वनराईतून जावे लागते. त्या वनराईलाच लुंबिनी वन म्हणतात. त्यात विविध पक्षीगण मंजुळ स्वरालाप काढतात, तर विविध रंगी फुलपाखरे बागडतात, भ्रमरांचा गुंजारव सुरू असे.

राजा शुद्धोधनांनी राणीच्या इच्छेनुसार माहेरी पाठवण्याची व्यवस्था केली. लुंबिनी वनात थोडा वेळ विश्रांतीसाठी सारा लवाजमा थांबला. पालखीतून राणी महामाया हलकेच खाली उतरली. त्या सुंदर वनात तिचं मन अगदी प्रसन्न होते. आनंदी चित्ताने ती फिरत होती. ती एका सुंदर शालवृक्षाखाली विश्राम करीत असतानाच तिला प्रसूती वेदना सुरू झाल्या. आणि सिद्धार्थाचा जन्म झाला. तो दिवस वैशाखी पौर्णिमेचा होता. जेव्हा राजा शुद्धोधन आणि राजपरिवाराला ही वार्ता दूतांनी सांगितली तेव्हा त्या दूताच्या गळ्यात राजाने आपला मौल्यवान मोत्याचा हार घालून त्याला शुभवार्तेचे बक्षिस दिले. सर्व शाक्य परिवारात पुत्रजन्माचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा झाला. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे, गणतंत्रात राज्यपद हे शौर्यवान, शीलवंत, गुणवंत अशा चारित्र्यसंपन्न शाक्याकडे जात असे. त्याप्रमाणे राज्यपद नुकतेच शुद्धोदनाकडे आले होते.

राज्याला राजपुत्र मिळाला. राजाला वारस मिळाला. पण राजा वर वर साऱ्यांना प्रसन्न हसतमुख वाटत असला तरी आतून पुत्राच्या भवितव्याविषयी साशंक होता. चक्रवर्ती होणार की संन्याशी हे कोडे त्याला सुटत नव्हते. रात्र-रात्र जागून विचार करूनही त्यावर उत्तर सुचत



नव्हते.

पाचव्या दिवशी बाळाचे ''सिद्धार्थ'' असे नामकरण झाले. सिद्धार्थचे गोत्रनाम गौतम होते त्यामुळे तो आता सिद्धार्थ गौतम बनला. दुर्दैव एखाद्या जंगली श्वापदाप्रमाणे सिद्धार्थचा पाठलाग करीत होते. राणी अचानक आजारी पडली. इकडे नामकरण समारंभासाठी जमलेल्यांना वाटले की, अती परिश्रमाने तिला अशक्तपणा वाटत असावा पण, क्षणाक्षणाला तिची प्रकृती बिघडायला लागली.

तिला जाणवले की, आता आपला अंतःकाळ जवळ आला आहे. तेव्हा तिने राजा व आपली बहीण महाप्रजापती यांना बोलावणे पाठवले. ते दोघेही रुग्णशय्येजवळ आले व दोघांनीही राणीच्या डोळ्यात मृत्यू पाहिला, पण सर्वांत आश्चर्य म्हणजे तिला असह्य वेदना होत असतानाही तिच्या चेहऱ्यावर दुःखाचा लवलेशही नव्हता. त्यावेळी तिने राजाला आठवण करून दिली की, असित मुनी या बाळासाठी रडत होते. तेव्हा ते म्हणाले होते, ''मी रडतो आहे ते बाळासाठी नाही. त्याच्या भविष्याच्या चिंतेतही नाही. मी रडतो ते स्वतःबद्दल. या अलौकिक बालकाला परमोच्च संबोधी प्राप्त होईल. तो अभूतपूर्व धम्मचक्रप्रवर्तन करेल. पण माझं आयुष्य संपलेलं आहे. मी ते पाहायला जिवंत असणार नाही. याचे मला वाईट वाटते म्हणून रडत आहे.''

असितमुनी प्रमाणे मीही माझ्या सिद्धार्थाचे भविष्य पाहायला असणार नाही, पण मला चिंता नाही. प्रजापती मी माझं बाळ तुझ्या स्वाधीन करते. ह्याच्या जन्मदात्रीपेक्षाही तू ह्याचा चांगला सांभाळ करशील याबद्दल मला मुळीच काळजी वाटत नाही.

तिने राजा शुद्धोधनाकडे अश्रुपूर्ण नजरेने पाहत आपले दोन्ही हात जोडले, ''महाराज कष्टी होऊ नका. देवाचं बोलावणं आहे. इहलोक सोडण्याची परवानगी द्यावी.'' राजा शुद्धोधनाने तिचा हात हातात घेऊन आपला एक हात तिच्या कपाळावर ठेवला नि तिने प्राण सोडला. त्यावेळी पृथ्वीवर येऊन सिद्धार्थला फक्त सातच दिवस झाले होते.''

□□□

## बालपण

राजाबरोबर सिद्धार्थला अनेक धार्मिक विधींना उपस्थित राहावे लागे. असे धार्मिक संस्कार त्याला अंतर्मुख करीत होते. त्याच्या मनात नव्या प्रश्नांची वादळे उमटवीत होते. तो शब्द ऐकत होता, त्यांचा अर्थ शोधत होता. काही शंका घेऊन प्रश्न विचारीत होता. त्याने एकदा विचारले, ''हे ब्रह्म जाणणाऱ्या आदरणीय साधो! तुम्ही ज्या स्वर्गप्राप्तीसाठी पूजा, होम करता तो स्वतः पाहिला आहात काय?'' त्यांनी सांगितले 'नाही'. पुन्हा त्याने विचारले, ''तुमच्या पिताजींनी, आजोबांनी तरी पाहिला आहे काय?'' त्यावेळी पण उत्तर नकारार्थीच होते. मात्र ते सत्यपूर्ण नि प्रामाणिक असल्याने त्याला ते आवडले.

एका यज्ञ समारंभाला तो उपस्थित होता. यज्ञवेदी बांधलेली होती. आठ ब्राह्मण तूप, चरू, विविध वृक्षांच्या समिधा, चंदन, धूप, सुगंधी द्रव्ये अग्निकुंडात अर्पण करीत होते. वेदातील ऋचांचे जोरजोरात पठण चालले होते. जवळच एका लाकडी खांबाला पशू बांधलेला होता.

अग्नीमिळे पुरोहितम्.....

देवगण पितरोपासते.....

यज्ञेन यज्ञमयजंत्य देवा,.....

पूर्णात पूर्ण मुदच्चते।.....

शांती ब्रह्म शांती ही !.....

असे अनेक श्लोक कानी पडत होते. मंद सुगंध वातावरणात पसरलेला होता. त्याच्या मनाला प्रसन्न वाटत होते.

पण एक गोष्ट त्याच्या बालमनाला कळत नव्हती. तो मूक नायक खांबाला का बांधला होता? त्याच्या गळ्यात फुलांच्या माळा होत्या नि त्याला पंचामृताने स्नान घातले होते ते का?

यज्ञविधी सपंल्यानंतर त्याला ते कोडे सुटले. एकजण पुढे आला. त्याच्या हातात धारधार शस्त्र होते. त्याची पूजा केली गेली. त्यावेळी सिद्धार्थने त्याच्या शेजारच्या तरुणाला



हे काय चालले आहे म्हणून विचारले. तेव्हा तो म्हणाला, 'आता एका घावात त्या पशूचे शीर तुटून पडेल मग त्याचा प्रसाद साऱ्यांना वाटला जाईल.'

'पण त्याचा बळी का?'

'तो देवाला प्रिय आहे.'

'पण त्याला मरताना वेदना होत नाहीत काय?'

'नाहीत.'

'ते कसे शक्य आहे?'

'तो आता पशू योनीतून मनुष्य योनीत जाणार याचा त्याला आनंदच झाला आहे.'

थोड्याच वेळात त्याच्या समोर त्या पशूचा बळी दिला गेला. रक्ताचा पाट वाहत होता. त्या पशूचे धड तडफडत होते. नि इकडे सिद्धार्थाचे मन तडफडू लागले. तो खचला होता. निराश झाला होता.

जो स्वर्गच कोणी पाहिला नाही त्यासाठी एखाद्या सजीवाला जिवंतपणीच नरक अनुभवावा लागतो याचे त्याला वाईट वाटत होते.

तो तडक राजवाड्यात पिताश्री राजा शुद्धोधनांच्याकडे गेला. त्याने प्रार्थना केली, 'हे तुम्ही थांबवा. पशू हत्या थांबवा.' पण ते थांबवू शकत नव्हते.

वेदांपैकी ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांनी याज्ञेय कल्पनेला व क्रियाकर्मांना जन्म दिला होता. उद्योग, हवी, सेवा व जप या यज्ञाच्या चार प्रकारांपैकी शाक्यांना यज्ञाचा संकल्प सोडावा लागे. साहित्य व शरीरकष्ट वैश्य व शूद्र करीत. तर जप करणारे ब्राह्मण पौरोहित्य करीत. सारा समाजच यज्ञाचे स्तोम वाजवू लागला होता. काल्पनिक स्वर्ग व त्यातील सुखाची लालूच दाखवून देवदेवतांची कृपा संपादन करण्यासाठी कर्मकांडे वाढली होती.

होमकुंडात पशू, पक्षी यांचे बळी देण्याचे स्तोम प्रचंड माजले होते. होमकुंडात गायी ढकलताना त्या मुक्या प्राण्यांची तडफड आणि लाहीलाही होताना पाहवत नव्हती.

हे सारे पाहून, पुरोहितांची निर्दयी मन-ह्रदये पाहून त्याचे मन संतापाने पेटून उठे. या यज्ञीय हिंसेविरुद्ध त्याचे मन बंड करून उठत होते.

पण राजा शुद्धोधनांना सांगूनही काही उपयोग नव्हता. समाज मनच जागं झालं नव्हतं. खरी हिंसा मनामनात होती. त्या नाहीशा झाल्या खेरीज ही हिंसा थांबेल कशी? मनात ठाण मांडून बसलेल्या हिंसेचे विसर्जन कसे होईल? यावर काय उपाय? हे नवे प्रश्न त्याला भेडसावत होते.

'सिद्धार्थ' याचा अर्थ ध्येयपूर्ती आणि आडनाव गौतम. उत्तर भारतात एक नवी संस्कृती उदयाला येत होती. शाक्य या क्षत्रियांच्या जमातीत अनेक लोक अशिक्षित अडाणी होते. छोट्या-छोट्या टोळ्या होत्या. पण त्यांतही एक प्रगत सामूहिक विचार रुजला होता. त्यात एकाचा हुकूम चालत नव्हता की एकाधिकारही चालत नव्हता, लोकतंत्र होते. समूहात सर्वानुमते जे ठरेल तो कायदा, तो नियम. त्यातही ज्येष्ठ लोकांना मान होता. पंचायत ठरवेल त्यानुसार साऱ्यांनी वागायचे. शिक्षेचा अधिकारही त्या निवडक मंडळाला होता. या मंडळातील विद्वान, शूर, चारित्र्यसंपन्न व्यक्तीकडे नेतृत्व जाई. अशा नेत्याचा मान राजा शुद्धोधनाकडे आला होता. त्या हिमालयाच्या पायथ्याशी असणाऱ्या राज्यांचा सर्वोच्च नेता मगधराज सम्राट बिंबीसार होता.

नेत्यांचा मुलगा म्हणून शाक्यांच्यात सिद्धार्थला मान होता. पण समूहाचे नियम पाळणे त्याच्यावरही बंधनकारक होते.

## <u>राजहंस आणि देवदत्त</u>

त्यावेळी तो नऊ वर्षाचा होता. बागेमध्ये एके रात्री फिरत असताना अचानक एक शुभ्र राजहंस पक्षी आकाशातून धडपडत आला नि चित्कारत समोरच जमिनीवर कोसळला. तो वेदनेने विव्हळत होता. त्याचे ओरडणे, त्याची नजरच सांगत होती की त्याला मदतीची गरज आहे. सिद्धार्थ त्याच्या दिशेने धावतच गेला. त्याला उचलण्याचा प्रयत्न करतानाच त्याला आढळले की राजहंसाच्या एका पंखात एक बाण खोलवर घुसला आहे. त्याने बाणाच्या पात्याला एका हाताने घट्ट पकडले नि दुसऱ्या हाताने पंखाला धरले. बाण जोराने ओढून बाहेर काढला. तो काढताना राजहंस जोराने ओरडला. बाणाबरोबरच रक्ताची धार लागली. त्याने बोटाने जखम दाबून धरली नि पक्षाला घेऊन राजवाड्यात आला. तेथे राणी सुंदरी उभी होती. त्याने तिला विनंती केली त्यानुसार तिने बागेतून औषधी वनस्पतींची पाने आणली. ती खलबत्यात कुटली. त्याचा रस व पाला पक्ष्याच्या जखमेवर बांधला. पक्षी मुळात घाबरलेला; त्यात जखमेवर बांधलेला पाला चुरचुरत होता. त्यामुळे तो भीतीने व थंडीने कापत होता. सिद्धार्थने अंगातील उबदार बंडी काढली नि त्याच्या भोवती गुंडाळली. मग त्या पक्ष्याला स्वयंपाक घरातल्या चुलीजवळ उबदार जागेत ठेवले. त्याच्यासाठी थोडा शिजवलेला भात आणायला सांगितले. तो दुसऱ्या खोलीत गेला तर अचानक त्याचा आठ वर्षे वयाचा चुलत भाऊ पळत पळत आला. त्याच्या एका हातात धनुष्य व दुसऱ्या हातात बाण होता. त्याने विचारले, ''अरे सिद्धार्थ! इथे आसपास पांढरा राजहंस पडलेला तुला दिसला का?''



त्याला काही उत्तर देण्यापूर्वीच त्याला चुलीजवळ ठेवलेला राजहंस दिसला. तो तिकडे पळाला. सिद्धार्थने त्याला थांबवले, ''मी तुला तो देणार नाही.'' असे म्हणताच देवदत्त ओरडून म्हणाला, 'का? मी त्याची शिकार केली आहे, त्यामुळे तो माझा आहे.'

सिद्धार्थ देवदत्त नि राजहंसाच्यामध्ये उभा राहिला. त्याने ठामपणे त्याला सांगितले, 'नाही, तो पक्षी जखमी झाला आहे. मी त्याला संरक्षण दिले आहे. त्याला इथेच राहू द्या.'

देवदत्तही आपल्या मताशी ठाम होता. तो म्हणाला, 'हे बघ सिद्धार्थ! तो पक्षी आकाशातून उडत होता तेव्हा तो तुझाही नव्हता, माझाही नव्हता. मी त्याला बाण मारून रोखले, त्यामुळे नियमानुसार तो माझ्या मालकीचा बनला आहे.'

वर वर पाहता देवदत्तचा मुद्दा तर्कशुद्ध वाटत होता. सिद्धार्थला त्यावर काय बोलावे हेच सुचेना. तो गप्प उभा राहिला. एक वेळ वाटले, देवदत्तला ठोसा लगवावा पण अचानक त्याला विचार सुचला तो म्हणाला,

''हे पहा देवदत्त! ज्यांचे एकमेकावर प्रेम असते तेच एकत्र राहतात. जे एकमेकांशी शत्रुत्व करतात ते दूर राहतात. तू पक्षाचा जीव घ्यायचा प्रयत्न केलास म्हणजे तुम्ही दोघे शत्रू आहात. मी त्याचा जीव वाचवला म्हणजे मी पक्षाचा मित्र झालो. त्यामुळे पक्षाला मित्राची गरज आहे. शत्रूची नाही.''

त्यांचे एकमत होईना. त्याचदिवशी राजवाड्यात दरबार भरलेला होता. आम्ही दोघांनी या वादावर ज्येष्ठ मंडळी काय निवाडा देतात पाहण्याचे ठरवले. सिद्धार्थने राजहंसाला घेतले तर देवदत्तने धनुष्यबाण घेतले. प्रथम त्याचे मत साऱ्यांनी ऐकून घेतले, मग सिद्धार्थचे!

साऱ्या मंत्र्यांनी सिद्धार्थच्या बाजूने न्याय दिला. पक्षी त्याला मिळाला, पण त्याचा त्याला आनंद झाला नाही; कारण साऱ्या मंत्र्यांना राजाला खूष करायचे होते. निदान पक्षी वाचला, त्याचा जीव वाचला; नाहीतर त्याला मारून स्वयंपाकाच्या भांड्यात साऱ्यांनी शिजवले असते!

तसे पाहिले तर सिद्धार्थ राजपुत्र नसता तर करुणा, दया, अहिंसा यापेक्षा अधिकतर लोकांनी देवदत्तचीच बाजू घेतली असती. समाजात नेहमीच बळी तो कान पिळी. शक्तिशाली माणूस नेहमीच दुर्बलांचे शोषण करीत राहतो. सत्याच्या बाजूने ठामपणे उभा रहायलाही धाडस लागते, हे मात्र खरे!

चार-पाच दिवसानंतर जखम बरी झाली नि पक्षाच्या पंखांत उडायचे बळ आले. मग त्याला दूर जंगलात सोडून दिले. इतके दूर सोडले की देवदत्तचा बाण त्याच्यापर्यंत कधीच पोहोचणार नव्हता.

कपिलवस्तू जवळचा निसर्ग हिरवागार होता. भाताची हिरवीगार शेती, बारमाही वाहणारे ओढे, पक्ष्यांचा किलबिलाट नि गाय-वासरांचे तांडे; त्यांच्यामागून धावणारे गुराखी. हिमालयाच्या पायथ्याच्या छोट्या-छोट्या वाड्यावस्तींतून दिसणारे हे दृश्यं. सिद्धार्थला ते फार आवडायचे व निसर्गाची ओढ लागायची.

भाताच्या पेरणीचे दिवस होते. शेतजमीन नांगरून झाली की जमिनीची मशागत सुरू व्हायची. पावसाळ्याच्या अगोदर जमिनी खते पसरून पेरणीला सज्ज ठेवल्या जात. सगळ्यांचा प्रमुख म्हणून जमीन नांगरताना पहिला नांगर धरण्याचा मान शाक्य कुटुंबीयांना होता. तसाच कुरीने धान्य पेरताना राजाला शेतात जावे लागे. बैलाना सजवले जाई, वाद्यांचा गजर सुरू होई गजरातच पेरणी होऊन, शेतात बसून प्रत्येकांनी आणलेल्या विविध मिष्ठान्नाचा बेत होत असे. काही वेळा वडिलांच्याबरोबर शेतात फेरफटका मारताना शेताच्या बांधावरून चालत चालत सिद्धार्थ व भावंडे फळझाडांकडे जात. काही वेळा जांभळे, आंबे या झाडांवर चढण्याच्या चढाओढी लागत. झाडांवरच जांभळे खाताना नि पिकलेले आंबे चोखताना, झालेला आनंद अभूतपूर्व होता. निसर्गाने निष्पाप, निरागस बालपणाला दिलेली ही आनंदाची देणगी अभूतपूर्व म्हणायला हवी.

बालकाचे निरागसपण जिथे संपते तिथे वासना जन्मते नि मग आनंदाची जागा दुःख घेते.

□□□



## शिक्षण

सिद्धार्थच्या जन्मदात्या आईला त्याच्या जीवनाविषयी पडलेल्या स्वप्नाचा अर्थ सांगणाऱ्या आठ ब्राह्मणांना राजा शुद्धोधनांनी पुन्हा पाचारण केले. त्यांना त्याला प्रारंभीचे शिक्षण देण्यास सांगितले. त्यांनी प्राथमिक शिक्षण दिले.

शेजारीच उदिच्य देश होता. तेथे उच्च कुळात जन्मलेला सल्बामित नावाचा भारतीय दर्शन शास्त्रात पारंगत असलेला पंडित होता.

राजा शुद्धोधनाने त्याला निमंत्रित केले. तो भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र, वेद, सांख्य, जैन, चार्वाक या दर्शनात पारंगत होता. राजवाड्यात सल्बमितच्या हातावर सुवर्ण कलशातून उदक सोडून अध्ययनासाठी सिद्धार्थला त्याच्या स्वाधीन केले.

त्यांची शिकवण्याची पद्धत सिद्धार्थला आवडायची. मुखोद्‌गत केलेले सुविचार ते सांगत. प्रश्नोत्तर स्वरूपाचे, चर्चात्मक स्वरूपातले ज्ञान मिळत असे. जीवनाचा विचार करण्याचे पहिले पाऊल त्याने आता टाकले होते. त्या काळातच जवळच्या नातलगाचा मृत्यू झाला. प्रियजनांचा वियोग किती दुःखकारक असतो हे नातेवाईकांच्या आक्रोशामुळे त्याला समजत गेले.

गुरू सल्बमितनी चर्चा करताना त्याला समजून सांगितले, ''हे पहा सिद्धार्थ ! जीवन हे क्षणिक असते. क्षण, दोन क्षणाच्या पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे. तरीही सुखदुःखाच्या मायाजालात फसल्याने चांगले-वाईट कर्म आपण करीत राहतो.

वैभव आणि संपत्ती यांची अनित्यता जर माणसाला कळली तर माणसा-माणसांतील संघर्ष कमी होतील. क्षणिक सुखामुळे द्वेषभावना निर्माण होते. एकमेकाचा द्वेष-राग करीत करीतच माणसाचं आयुष्यच संपून जाते.''

यावर चिंतन करता करता त्याला समजत गेले की, दुःख कोठून बाहेरून येत नाही. ते आपल्याच इच्छेतून व तृष्णेतून येते. सुखाचे उगमस्थानही मनच असते नि दुःखाचेही उगमस्थानही तेच आहे.

सिद्धार्थ सल्बमितला प्रश्न विचारून भंडावून सोडत असे. त्याने त्याला विचारले,

‘‘अहिंसा म्हणजे हत्या न करणे एवढेच की दुसऱ्या जीवावर प्रेम करणे, मन उदार करणे?’’ यावर तो पंडित म्हणायचा, ‘‘तुझे विचार योग्य दिशेने चाललेत.’’

भविष्याच्या केवल-स्थितीत जीवाच्या मूळच्या अनंत सुखाचाही अनुभव येतो. संसारी अवस्थेत धन, मान, पुत्र, कांता इत्यादींमुळे जे सुख लाभते ते त्या मूळच्या अनंत सुखाच्या अंशमात्रच असते. अनंतदर्शन, अनंतज्ञान, अनंतवीर्य व अनंतसुख याला जैनदर्शनात महत्त्व प्राप्त झाले होते.

पंडित सल्बमितला सिद्धार्थने विचारले ‘‘धन, मान, पुत्र, कांता यांचा त्याग केल्याने अनंतसुख मिळते का?’’

यावर तो हसून म्हणाला ‘‘मला फक्त शब्दार्थ माहीत आहे. प्रत्यक्ष अनुभव नाही. राजपुत्र सिद्धार्था! तूच पुढे केव्हातरी मला सांग की, हा सिद्धांत, हे तत्त्वचिंतन खरे आहे की खोटे?’’ मग या उत्तरावर गुरू-शिष्य दोघेही मनमुराद हसत राहिले.

पंडित सल्बमितला एकदा त्याने तत्त्वचिंतन करताना विचारले, ‘‘हे पंडित, तुम्ही ईश्वर मानता पण त्या बुद्धिमान ईश्वराने जग कशासाठी निर्माण केले हे तर सांगा? केवळ लहर म्हणून? तर मग विश्वात एवढी सुसंबद्धता कशी? मग जगात दुःख कसे? दुःख कर्माच्या नियमांनी उत्पन्न होते असे म्हणता? मग ईश्वरावर कर्मनियमांचे बंधन आले त्याला स्वतंत्र म्हणता येत नाही. केवल लीला म्हणून ईश्वराने जग निर्माण केले असे म्हटले तर ईश्वर पोरकट ठरेल. ईश्वराला जग निर्माण कर्ता मानावे तर तो एकच कशावरून? शाक्य आणि कौसल नागरिक पाण्यावरून भांडतात तसे अनेक ईश्वर भांडत बसले असते.

असे अनेक प्रश्न पाहून सल्बमित राजा शुद्धोधनला म्हणाला, ‘‘युवराजांची बुद्धी त्यांना नास्तिकतेच्या वाटेवरून नेणारी आहे असे मला वाटते. त्यांना रोखण्याचे सामर्थ्य माझ्या तर्कबुद्धीत, वैदिक विचारात नाही.’’

राजा शुद्धोधन हसून म्हणाले, ‘‘ठीक आहे. काय हे समजून सांगा. पुढचे एखादे दर्शन म्हणजे त्याला कपिलाचे सांख्यदर्शन शिकवा. पंडित सल्बमिताने राजाज्ञेप्रमाणे कपिल ऋषींचे तत्त्वविचार शिकवायला सुरू केले. तो म्हणाला. ‘‘राजपुत्र सिद्धार्था ! आपण ज्या कपिल वस्तुनगरात राहतो ते नाव कपिल ऋषींच्या वास्तव्यामुळे लाभले आहे. तो एक निष्णात पंडित होता नि त्याच्या तत्त्वचिंतनाला सांख्यदर्शन म्हणतात. त्याचे विचार असे आहेत-

*दुःखत्रयाभिघातज् जिज्ञासा तद्पघातके हेतौ।*
*दृष्टे सापार्था चेन्नैकान्तात्यन्तोऽभावात्॥*



तीन प्रकारच्या दुःखांचा प्रादुर्भाव होत असतो. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा तीन प्रकारच्या दुःखांनी आपण नेहमीच संत्रस्त झालेले असतो.

१. आधिभौतिक दुःखे म्हणजे सर्प, व्याघ्र, चोर, शस्त्र इत्यादी पृथ्वीवरील पदार्थापासून निर्माण होणारी दुःखे.

२. आधिदैविक म्हणजे आकाशातील (दिव् = आकाश) पर्जन्य, महापूर, भूकंप, वारा, गारा पडणे, वीज पडणे अशा सारख्या सृष्टिव्यापारापासून उद्‌भवणारी दुःखे.

३. आध्यात्मिक म्हणजे शरीरांतर्गत कारणापासून निर्माण होणारी मानसिक किंवा शारीरिक व्याधिरूप दुःखे. या दुःखाचे निवारण करण्याची अन्न, औषधी इत्यादी जी साधने उपलब्ध आहेत त्यांपैकी एकही असे नाही की ज्याच्या योगाने निश्चित दुःखनिवारण, दुःखनिवृत्ती कायमची होईल.

कपिल मुनींचा विचार त्याला पटला. पण दुःखाचा संपूर्ण व कायमचा उपशम होण्याचा त्यांचा एकमेव उपाय मात्र पटत नव्हता. कपिलमुनी म्हणत तो उपाय म्हणजे आत्मज्ञान. या दुःखमय संसारापासून म्हणजे सगुण सृष्टीपासून सर्वस्वी अलिप्त आहे याचे ज्ञान करून घेणे.

तो आत्मा सुखीही नाही व दुःखीही नाही. तो सर्वस्वी निर्लेप आहे कारण तो सृष्टीच्या पसाऱ्यापासून अलग आहे. तो एकटा आहे. त्याचा साक्षात अनुभव घेणे म्हणजेच सर्व सांसारिक दुःखापासून मोक्ष होय.

यावर चर्चा करताना पंडित साल्बमितला त्याने म्हटले, ‘‘पण कपिलमुनींचा ‘पुरुष’ किंवा आत्मा याचा कोणी अनुभव घेत नाही, पाहत नाही मग आत्मा नाकारल्याने काय होईल? काल्पनिक ‘आत्मा’ मानवी दुःख निवारण्याचा उपाय होऊ शकत नाही!’’

यावर पंडित साल्बमित म्हणाला, ‘‘राजपुत्र सिद्धार्था! कदाचित तोच उपाय शोधण्याचा तुझ्या जीवनाचा उद्देश असू शकेल.’’

सल्बामित नगरातून फेरफटका मारताना रस्त्यावरून काठी टेकत चालणाऱ्या एका वृद्धाकडे बोट करून म्हणाला, ‘‘सिद्धार्थ हा वाकलेला, कृष शरीराचा वयोवद्ध माणूस पाहिला तरी तुझ्यासारख्या तरुणाच्या अंगावर शहारे उमटतात. बालपणापासून वृद्धत्व केव्हा येते याचा पत्ताही लागत नाही. बालपणी ज्ञानासाठी संघर्ष, तारुण्यात व्यवसाय व परिवारासाठी संघर्ष आणि वृद्धापकाळी आपला स्वतःशीच संघर्ष हा प्रत्येकाला करावाच लागतो’’.

नगरात फिरताना प्रथमच राजपुत्राला जाणीव झाली की, ज्यांना आम्ही वयोवृद्ध जन म्हणतो त्यांपैकी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू उभे होते. त्यांना दुःख, वेदनेने ग्रासलेले होते. काहींच्या डोळ्यात लाचारी होती तर काहींच्या डोळ्यात उदासिनता. साऱ्याप्रकारची मानसिक

अशांती जाणवत होती. काही वृद्धांच्यात, कोणाचा पती वारलेला होता तर कोणाची पत्नी. जीवनसाथी हरवल्याचे दुःख त्यांना सहन होत नव्हते.

वृद्धत्व हा जणू त्यांच्यासाठी शाप बनलेला होता. त्याप्रमाणे आपले आचरण, व्यवहार किंवा जीवनशैली ते बदलू शकत नव्हते आणि तरुण त्यांच्या कर्तव्याला विसरले होते. साहजिकच समाजात संघर्ष वाढतच जात होता. यातून निर्माण होणारे दुःख कसे नाहीसे होईल हा सिद्धार्थच्या चिंतनाचा विषय बनला होता.

काही वेळा त्याला वाटत होते की, ज्याने जन्म घेतला त्याला मृत्यू अटळ आहे. मृत्यूचे भय हे देखिल मानवाच्या दुःखाचे कारण बनू शकते. तो अटळच असेल तर त्याच्या आठवणीने आजचा वर्तमान बिघडण्याची काय जरुरी? जीवनात बेसावधपणाचे एक पाऊलही जीवन मृतवत बनवते. थोड्याशा असंयमाने पराजय होतो.

त्यावेळी त्याला जन्म व मृत्यूतला फरक समजला. जन्म निसर्गामुळे मिळतो पण मृत्यू स्वतःहून येतो.

त्यासाठी जाणारा प्रत्येक क्षण म्हणजे मृत्यू आणि येणारा प्रत्येक क्षण जीवन आहे असे मानले तर आपण मृत्युंजय होऊ शकू का? मरणाच भय, जे मानवाला दुःखाचे कारण होते त्यावर विजय मिळवता येईल काय?

प्रश्नच... प्रश्न... उत्तर सापडण्यासाठी मात्र सतत चिंतन चिंतन... एका प्रश्नातून नवा प्रश्न निर्माण होत होता. काल प्रवाही आहे? भूतकाळातून-वर्तमान, वर्तमानातून भविष्यकाळ? काल हा एकच प्रवाह आहे नि चित्त त्याचे भेद करते? का भूतकाळ वर्तमानात परिवर्तन पावतो नि वर्तमान भविष्यात रूपांतरीत होतो?

सिद्धार्थचा शास्त्रांचा अभ्यास जसा वाढत होता तस तसा तर्कवितर्काच्या जंजाळात त्याचे मन अधिकाधिक गुंतत चालले होते; अस्वस्थता वाढत चालली होती.

## <u>दागिन्याचे ओझे!</u>

तो राजवाड्याच्या प्रांगणात आपल्या बालमित्राबरोबर खेळत होता. त्यात देवदत व किंबीलिआ, कालुंदयी ही सारी जवळचीच राजघराण्यातील मुले होती. राजवाड्याच्या खिडकीतून राणी गौतमी त्याला पाहत होती. त्याला त्याची कल्पना नव्हती. खेळून परत आल्यावर त्याने स्नान केले. नवी वस्त्रे घातली. त्यावेळी माता गौतमी दासींना बरोबर घेऊन आली. तिने दागिन्याच्या पेट्यातून विविध हिरे, माणके, पाचू, मोती यांनी बनवलेले अलंकार आणले होते. ते तिने त्याच्या अंगावर घातले, पण मातेला बरे वाटावे म्हणून त्याने थोडावेळ



अंगावर घातले. आईला वंदन केले. तिने प्रेमाने त्याला जवळ घेतले. 'माझा सिद्धार्थ किती सुंदर दिसतो!'

थोड्या वेळाने त्या दागिन्यांचे ओझे सिद्धार्थला अस्वस्थ करू लागले. त्याने अंगठी, माळा सारे उतरून ठेवले. आई नाराज झाली. आणि राजाच्या खजिन्यात ते तिने परत पाठवले. या विषयी तिचे रात्री राजा शुद्धोधनाशी बोलणे झाले असावे. सकाळी सकाळी ते सिद्धार्थाच्या दालनात आले. ते दागिन्याचा विषय काढतील असे वाटले पण त्यानी तो विषयच काढला नाही.

## <u>युद्ध शास्त्राचे शिक्षण</u>

राणी गौतमीला एक पुत्ररत्न झाले. त्याचे नाव नंद ठेवण्यात आले. राजवाड्यातील सारी भावंडे खूप आनंदली. राजवाड्यात पुन्हा आनंदोत्सव साजरा झाला. त्याला आता छोटा भाऊ मिळाला होता. अभ्यास झाला की तो पळत पळतच नंदाजवळ येत असे. त्याला छोट्या बाळाला घेऊन देवदत्तबरोबर इकडे-तिकडे फिरण्यात मजा वाटायची. कधीकधी इतर समवयस्क भांवडे महानामा, बधिया आणि किंबिलाही खेळायला एकत्र येत होते.

महाराणी गौतमी एका झोपाळ्यावर बसून त्यांच्या खेळाकडे लक्षपूर्वक पाहत असे. अनेक वेळा ती दासींना सांगून त्यांना खायला प्यायला देत असे. अशी वर्षांमागून वर्षे जात होती.

आता राजा शुद्धोधनने ठरवले की, शारीरिक आणि बौद्धिक विकासाबरोबरच क्षत्रियांना आवश्यक असणाऱ्या युद्धशास्त्रातही ही सारी मुले तरबेज व्हायला हवीत. त्यांचा मानसिक विकास करताना, त्यांच्या पौरुषत्वाच्या विकासाकडे दुर्लक्ष करण्याची चूक आपल्या हातून होऊ नये याची दक्षता ते घेत होते.

देवदत्त सर्वात बलदंड होता. मात्र धनुष्यबाण, भाला फेक, अश्वारोहण या परीक्षेत सिद्धार्थ त्याच्यापेक्षा अधिक गुण मिळवीत असे. त्याला जाता जाता सहजतेने जे लाभायचे ते देवदत्तला कष्टप्रद बनत होते. अधिक जागृतपणे आणि चपळतेने त्याने सारे युद्धशास्त्र शिकून घेतले. एकदा राजा शुद्धोदन देवदत्तला सर्वांसमोर बोलले, 'तू अधिक लक्ष द्यायला हवेस. सिद्धार्थ जवळ जवळ सर्व युद्धशास्त्रात प्रवीण बनला आहे.'

त्या दिवसापासून मात्र देवदत्तच्या वागण्यात फरक जाणवायला लागला. सिद्धार्थची स्तुती, कौतुक देवदत्तच्या दुःखाचे कारण बनू लागले. सिद्धार्थ त्याची वेळोवेळी समजूत काढीत होता, पण त्याला तेही आवडत नव्हते. त्याने गणित विषयातही खूपच प्रगती केली

तर संगीत हा त्याचा खास आवडीचा विषय. संगीताच्या शिक्षकाने सिद्धार्थाला एक छानशी बासरी भेट दिली. मग तो बागेमध्ये एखाद्या गर्द झाडाखाली बसून तिच्यातून मधुर धून काढीत असे. त्याच्या बासरी वादनाने राणी गौतमीचे हृदय आनंद नि समाधानाने भरून जाई.

त्याने धनुर्विद्येचे शिक्षण घेतले. त्यात प्राविण्य मिळवले. इतर अस्त्रेही तो उत्तम प्रकारे चालवीत होता. पण मानव, पशू, पक्षी यांना निष्कारण इजा करणे त्याला आवडत नसे. त्याला भावंडे शिकारीला जाण्यासाठी बोलवीत पण तो ते टाळत असे. त्यांना वाटे की, वाघ, सिंहासारख्या हिंस्त्र श्वापदाला सिद्धार्थ भितो, पण तो त्यांना घाबरत नव्हता. त्याला माहीत होते की ते वाघ-सिंहाबरोबर लढत नाहीत तर ससे, हरणे, भेकर यांसारख्या निरुपद्रवी प्राण्यांना मारतात आणि ते पाहणेही त्याला आवडत नव्हते.

सिद्धार्थची आई राणी गौतमीच्या कानावर या गोष्टी गेल्या की ती खिन्न होऊन बसे. मग एखादी योग्य वेळ साधून त्याची समजूत घालताना सांगे, 'बेटा तू विसरतोस, तू क्षत्रिय आहेस. लढणे हा तुझा धर्म आहे. शिकार करण्यामुळे क्षत्रिय तरुण युद्धशास्त्रात पारंगत होतात. शिकारीमुळेच अचूक नेमबाजी तुला शिकता येईल.'

मग तो आईला विचारत असे, 'आई क्षत्रियांना लढावे तरी का लागते ?' ती म्हणे, 'स्वतःचे संरक्षण करण्यासाठी, जमीन, पाणी यांच्यावर ताबा ठेवण्यासाठी.'

मग त्याने तिला विचारले, 'आई युद्ध हा क्षत्रियांचा धर्म म्हणतेस, मग एका माणसाने दुसऱ्या माणसाला मारणे हा माणसाचा धर्म कसा होऊ शकतो?'

यावर आई सांगे, 'हे पाहा क्षत्रिय जर लढले नाहीत तर त्यांचे, त्यांच्या प्रजेचे, प्राणिमात्र, जमीन-जुमला, धन-धान्य यांचे संरक्षण कोण करेल?'

त्याने यावर उपाय काढला तो म्हणाला, 'आई जर सारे क्षत्रिय एकमेकांवर प्रेम करू लागले तर हिंसा न करता ते आपापले राज्य सुरक्षित ठेवू शकतात.'

यावर आई म्हणाली 'ही वाक्ये संन्याशाच्या तोंडी शोभतात. तुझ्यासारख्या क्षत्रिय राजपुत्राच्या तोंडी नाही.' मग ही चर्चा तेथेच थांबे.

राजकारभारात लक्ष देता देता सिद्धार्थला ज्या गोष्टी राजवाडा, राजपरिवार यामुळे दिसत नव्हत्या, माहीत नव्हत्या त्या समजू लागल्या. त्याचं जग आणि वास्तवातील जग यातले अंतरही तो अनुभवू लागला. भोवती वावरणाऱ्या तरुण सहकाऱ्यांमुळे वार्धक्य, आजारपण, मृत्यू या गोष्टींकडे कधी लक्षही गेल नव्हतं. पण हळूहळू जीवनातील सुख-दुःख तो अनुभवू लागला.



तो एकदा आजारी पडला. गलितमात्र होऊन अंथरुणात पडला होता. ज्वर वाढला होता. राजवैद्याने औषधोपचार सुरू केले. त्यानंतर तो बरा झाला, पण तो त्याच्या चिंतनाचा विषय बनला. ''मला असे काय झाले? माझ्या शरीरात काय बदल झाले? औषधाच्या मात्रेने मी पूर्ववत निरोगी झालो म्हणजे काय झाले?'' या प्रश्नांचे उत्तर तो शोधू लागला. राजवैद्याशीही चर्चा केली. तो म्हणायचा, 'राजपुत्रा ! तो गहन शास्त्राचा विषय आहे. तुमच्या शरीरात असंतुलन निर्माण झाले की आजार होतो. औषधाच्या मात्रेने पुन्हा संतुलन निर्माण झाले की माणूस निरोगी बनतो. हीच गोष्ट महामृत्युंजय मंत्राच्या प्रभावानेही होऊ शकते. एखाद्या मुनीच्या प्राणशक्तीनेही होऊ शकते.'

राजवाड्यात एके रात्री काही दिव्यांची ज्योत बारीक होत गेली नि ते विझले, त्यांतून धूर येऊ लागला. सिद्धार्थने चाकराला विचारले, 'काय झाले?' तो म्हणाला, 'महाराज दिव्यातले तेल संपले आहे.'

या त्याच्या एका वाक्यावर चिंतन सुरू झाले. मानवी जीवन आणि तेलाचा दिवा! विलक्षण साम्य वाटले. दिव्यातील तेल संपले की ज्योत विझते नि अंधार पसरतो. मानवी जीवन एक स्फुल्लिंग! त्यातील नेमके काय संपल्यावर अंधार होतो? विचार करताना आठवले, वेदात त्याला आत्मा मानले असावे. पण आत्म अस्तित्व नाकारून त्याला चैतन्य म्हटले तर? रात्रभर त्याचे चिंतन चालू होते. पण एक खरे, आजार मग तो शरीराचा असो वा मनाचा वेदनादायकच असतो, दिव्यातील तेल संपणे हेही दुःखदायक आहे.

तो काही राजवाड्याच्या चार भिंतींत कोंडलेला नव्हता. राज्यकारभार पाहताना दारिद्र्य काय आहे, आजारपण काय आहे, पुराच्या पाण्यात नि कडाक्याच्या थंडीने तसेच वीज पडून मेलेले प्रजाजन तो पाहतच होता. मरणाऱ्यांच्या घरच्या लोकांचा आक्रोश त्याच्या हृदयापर्यंत पोहतच होता.

## ध्यान धारणेचा अभ्यास

आलारकालामचा शिष्य भारद्वाज यांचा आश्रम कपिलवस्तू येथे होता. सिद्धार्थला आता केवळ शुष्क पांडित्य नको होते. बौद्धिक काथ्याकूट, तर्कवितर्क, खंडनमंडन यांमुळे खरी जीवनानुभूती येत नाही, त्यासाठी मानवी चित्तात बदल करायला हवा. तो करण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यांपैकी तपस्या, ध्यान, धारणा, तंत्रमार्ग असे पर्याय त्याच्यापुढे खुले होते. त्याने ठरवले की, जे विविध शास्त्रांत सांगितले ते खरे की खोटे स्वतः तपासून पाहू. त्यासाठी तो ध्यान धारणेचा अभ्यास करू लागला.

भारद्वाजांनी काही साधी सोपी आसने त्याला शिकवली. त्याने नासिकाग्रावर सारे लक्ष केंद्रित करण्याचा अभ्यास काही दिवस केला. मन थोडे फार एकाग्र होत होते पण चित्तवृत्तींचे आंदोलन सुरूच होते. काही दिवस तो उगवत्या सूर्यावर एकटक नजर रोखून पाहत होता. भारद्वाज ऋषी त्याला त्राटकाचा अभ्यास म्हणत. सिद्धार्थ सूर्याप्रमाणे चंद्रावरही त्राटक करु लागला. पण त्यामुळे चित्तवृत्ती लोप पावत नव्हत्या. सायंकाळी टेकडीवर जाऊन मावळत्या सूर्यबिंबाकडे पाहता पाहता त्याचे मनही सुवर्णप्रकाशाने न्हाऊन निघत होते. एका अननूभूत आनंदाचा लाभ होत होता.

वडिलांच्याबरोबर शेतावर जात असे, पण तेथे त्याला शरीर श्रमाचे कोणतेच काम नसे. वडील शेतावर काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांना कामाविषयी सूचना देत. अशावेळी एखाद्या डेरेदार वृक्षाच्या सावलीत एकांत स्थळी तो ध्यान धारणेसाठी बसत असे. निळ्या आकाशात काळ्याभोर ढगांच्या पार्श्वभूमीवर उडणारा पांढऱ्या शुभ्र बगळ्यांचा थवा पाहता पाहता त्याचे मन चित्ताकाशात विहार करू लागे. अशावेळी त्याला ना शरीराचे भान ना सभोवतालचे भान असे. मनाच्या खोल खोल गुहेत तो शिरलेला असे. त्याला खूप वेळ हळुवार जागे करण्याचा प्रयत्न करणारे वडील शुद्धोधन म्हणत. ''बेटा सिद्धार्थ तू शेतात चालल्याने थकलास काय? तुला झोप लागली होती काय? मग नीट विश्रांती घे!''

पण त्याला पूर्णपणे माहीत होते की, ती निद्रा नव्हती; उलट उत्तम प्रकारची खरी जागृती होती. कदाचित ती भावसमाधी असावी. झोपेतून उठणाऱ्याला येणारी शरीरसुस्ती, जाड्य त्याच्यात मुळीच नसे. वडील घरी जाताना म्हणत, ''सिद्धार्थ! तू थकला आहेस असे म्हणावे तर तुझ्या चेहऱ्यावर विलक्षण तेज नि आनंदी भाव कसे?''

यावर तो म्हणत असे, 'ऋषी भारद्वाजांची कृपा!'

□□□



# तारुण्य (शाक्य संघ)

शाक्य जमातीचा एक संघ होता. प्रत्येक तरुण वीस वर्षांचा झाला की तो संघाचा सदस्य बनत असे. ही अत्यावश्यक गोष्ट मानली जात होती. संघाचे संथागार (सभागृह) कपिलवस्तू नगरात होते. संघाच्या बैठका तेथे होत. सिद्धार्थला संघाचा सभासद व्हावे लागले. संघाचा सभासद होण्यासाठी साऱ्यांची अनुमती लागते. कोणाचा विरोध असेल तर तो जाहीरपणे सर्वांसमोर विरोध प्रकट करीत असत. या संदर्भात तीन वेळा आवाहन केले जाई व सर्वांच्या सम्मतीने संघाचा सभासद झाल्याचे जाहीर केले जात असे. त्याचवेळी संघाच्या सभासदांची कर्तव्ये कोणती व ती पाळली नाही तर शिक्षा कोणती दिली जाते याचीही सविस्तर माहिति दिली जात असे. सभासदत्व रद्द होण्यामागच्या कारणांत, बैठकीस गैरहजेरी, बलात्कार, खून, चोरी, खोटी साक्ष यांपैकी कोणताही आरोप सिद्ध झाल्यास सभासदत्व रद्द होते असे. याची सिद्धार्थला संघाचा सभासद होताना समज दिली गेली व संघाशी एकनिष्ठ राहण्याची सिद्धार्थने शपथ घेतली.

शाक्य संघाच्या शिस्तपालनाचे नियम समजून सांगितल्याबद्दल त्याने सर्वांचे आभार मानले नि कृतज्ञता व्यक्त केली. शाक्यसंघाचा सभासद झाल्यामुळे राजा शुद्धोधनाचा वारस म्हणून त्याचा पुढील मार्ग मोकळा झाला होता.

अशीच आठ वर्षे लोटली. भावी राजा अशीच त्याची प्रतिमा शाक्य संघात नि प्रजेत निर्माण झाली होती. तो संघाचा निष्ठावंत कार्यकर्ता होता. तो आता २८ वर्षांचा झाला होता. या काळात त्याच्या जीवन प्रवासात अनपेक्षित वळण आले.

कोलिय नि शाक्य यांच्या देशामधून रोहिणी नदी वाहते. या नदीचे पाणी दोन्ही देश शेतीसाठी वापरत असत; पावसाळ्यानंतर नदीला ठिकठिकाणी बांध घातले जात. पाणी वाटपावरून दोन्ही किनाऱ्यावरच्या शेतकऱ्यांत वाद होत. काही प्रसंगी लाठ्या-काठ्यांचा वापर तर काहीवेळा तलवार भाल्यांचा वापर होऊन हिंसाचार घडत होता.

या संघर्षामुळे दोन जमातीत युद्धाची ठिणगी केव्हाही पेटेल असे वातावरण निर्माण झाले. कोलियाशी युद्ध पुकारायचे की नाही या प्रश्नावर विचार विनिमय करण्यासाठी संघाची एक बैठक बोलावण्यात आली. कोलियांच्याविरुद्ध युद्ध करावे असा ठराव सार्वमतासाठी

ठेवण्यात आला. त्याच्यावर उलट-सुलट चर्चा झाली व मते आली.

**सिद्धार्थ राजकारभारात लक्ष देऊ लागला.**

या काळात राजा शुद्धोधनांनी बोलताना अशी इच्छा प्रगट केली की, सिद्धार्थने त्यांच्याबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवावा. त्यामागचा त्यांचा उद्देश होता की ध्यान धारणेपेक्षा राजकारणात अधिक लक्ष द्यावे. राज्याचे प्रश्न, न्यायदान, शेती, पाणीपुरवठा, अन्नपुरवठा, नैसर्गिक आपत्ती, साथीचे आजार, शिक्षण अशा विविध बाबींची माहिती त्याला करून द्यावी.

त्यामुळे काही वेळा मंत्रिमंडळाच्या विविध विषयांवरील बैठकांना तो उपस्थित राहत असे. राजा शुद्धोधन व सिद्धार्थ दरबारी वेषात सभागृहात सिंहासनावर बसत असत. त्याचे आसन राजाच्या उजव्या बाजूला व कमी उंचीचे असे. तर काही बैठका राजा नि तो दोघांतच होत असत.

राजकारभारात तो जसजसे लक्ष देऊ लागला तशा काही भयानक सत्य घटना त्याला स्पष्ट दिसू लागल्या. त्याने राज्यातील भ्रष्ट अधिकारी पाहिले. गोरगरीबांचे शोषण करून श्रीमंत होणारे लोक पाहिले. लोकांना निकृष्ट माल देऊन त्यांना लुबाडणारे व्यापारी पाहिले. या सर्वांचा विचार करताना प्रथम त्याला खूप दुःख झाले, वाईट वाटले, पण जेव्हा राजपुत्र म्हणून त्याला अधिकाराची जाणीव झाली तेव्हा मला शिक्षेचेही अधिकार आहेत हे त्याच्या लक्षात आले. पण त्याचा परिणाम असा झाला की, त्याच्या मनात त्या भ्रष्ट लोकांबद्दल, अन्याय करणाऱ्यांबद्दल क्रोध निर्माण होऊ लागला.

दरबार संपल्यावर राजा शुद्धोधनने त्याला विचारले, ''राजपुत्र सिद्धार्थ ! तुम्ही दरबारात तुमची कोणतीच प्रतिक्रिया, मत व्यक्त का करीत नाही? शांतपणे का बसून राहता?''

तो नम्रतेने म्हणाला, ''पिताजी ! माझ्याजवळ विचार नाहीत असे नाही, पण ते दरबारात व्यक्त करणे निरर्थक आहे. मला सगळीकडे समाजमनाचा आजार दिसतो, पण त्यावरचे औषध मला सापडले नाही. दरबारी मंडळीचा स्वार्थ इतका पराकोटीचा आजार आहे की त्यावर उपाय काय करावा हे सुचत नाही.''

''वेसामित्ता या दरबारी माणसाकडे पाह तुम्हाला माहीत आहे की तो भ्रष्टाचारी आहे. तरीपण कोर्टात त्याच्या हाती मोठी सत्ता आहे. तुमच्या अधिकारावरही त्याने काही वेळा अतिक्रमणही केले आहे, पण तुम्ही गप्पच राहता, कारण त्याच्याशिवाय राज्यकारभारातील विशिष्ट कामे थांबतील असे तुम्हाला वाटते.''



हे सांगताना राजा शुद्धोधन एकटक नजरेने, कौतुकाने त्याच्या कडे पाहत होते. ते म्हणाले, 'सिद्धार्थ तुला माहीत आहे की, राज्यकारभार करताना काही गोष्टी सहन कराव्या लागतात. एखाद्या मांडलिक राजा सारख्या माझ्या अधिकाराला मर्यादा आहेत, पण मला खात्री आहे जर तू राज्याची सूत्रे हाती घेशील तर माझ्यापेक्षाही उत्तम राज्यकारभार करू शकशील. तुझ्याकडे कौशल्य आहे; त्याने भ्रष्टाचार रोखशील, गोरगरीबांना न्याय देशील.'
तो म्हणाला, ''प्रश्न कौशल्याचा नाही. खरा प्रश्न आपले हृदय नि मन स्वतंत्र करण्याचा आहे. मी देखील क्रोध, मत्सर, भीतीसारख्या इच्छांनी, भावनांनी बांधला गेलेलो आहे.''

राजा शुद्धोधन म्हणायचे की, माझ्या पुत्राकडे अद्वितीय अशी राज्यकारभाराची दृष्टी आहे. प्रजाजनाकडे पाहण्याच्या माझ्या नि त्याच्या दृष्टिकोनात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. त्यामुळे तो केव्हा राज्याची सूत्रे हाती घेईल याकडे लक्ष लागले आहे.

**यशोधरा**

देवदत्त आणि आनंदचे वडील द्रोनोदेन राजा यांच्याशी बोलताना राजा शुद्धोधनांनी त्याच्याबाबत वाटणारी काळजी व्यक्त केली. कलदेवेलचे असित मुनींची भविष्यवाणी त्यांना सतावत होती. त्यांना भीती वाटू लागली की एक दिवस तो साधू-संन्याशी बनून वनात निघून जाणार! तो गेला की त्याच्या पाठोपाठ देवदत्तही जाईल नि आनंदही जाईल!

राजा द्रोनादननाही याचा धक्का बसला. त्यांनी राजा शुद्धोधनाशी कानगोष्टी केल्या. ''आता या पोरांचा विचार आपण करूया. संसाराची बेडी यांच्या पायात अडकवली की आपोआपच क्षत्रियांचे राजपुत्र म्हणून वागू लागतील. मग आपली जबाबदारी संपली!''

राजा शुद्धोधनाने तत्काळ होकार दिला. शुद्धोधनांची छोटी बहीण राणी पमिता, कोलियाचे राजे दंडपाणी यांची पत्नी. ते दोघेही काहीवेळा रामगाम या कोलियाच्या राजधानीत रहात आणि काहीवेळा कपिलवस्तूत राहत.

शाक्य आणि कोलिय यांची सीमारेषा म्हणजे रोहिणी नदी. या दोन्ही राज्यात रोटीबेटी व्यवहार गेली कित्येक शतके चालत आलेला होता. दोन्ही देशांच्या राजधानीची ठिकाणे म्हणजे पायी एक दिवसाचा रस्ता होता.

एक दिवशी कुनाऊ तळ्याच्या काठच्या मैदानावर तरुण मुलांसाठी एक लढाऊ खेळांची जंगी स्पर्धा भरवण्यात आली. दोन्ही राज्यांतील तरुणांच्यात युद्धकौशल्य वाढावे हा त्यामागचा हेतू, गावागावातून दवंडी पिटविण्यात आली. या स्पर्धेत मुलींनी भाग घेतला नव्हता. त्या प्रोत्साहन देण्याचे काम करीत होत्या. राजा दंडपाणी आणि राणी पमिता यांची कन्या यशोधरेकडे साऱ्या पाहुण्यांच्या स्वागताची जबाबदारी सोपवली होती.

तेथे अनेक स्पर्धा संपन्न झाल्या. त्यात धनुष्यबाण, तलवार, अश्वारोहण, वजन उचलणे, कुस्ती अशा अनेक खेळांचा समावेश होता.

सिद्धार्थच्या आध्यात्मिक वृत्तीमुळे या स्पर्धेत त्याची कामगिरी कशी असेल याविषयी सारेच साशंक होते.

**स्वयंवर**

त्याची आध्यात्मिक वृत्ती नि चिंतनप्रियता, त्याच्या नातेवाईकांनाही माहीत झालेली होती. तो त्यांच्यात फारसा मिसळत नव्हता. कौटुंबिक सोहळ्यात त्याला फारसा रसही नव्हता. त्यामुळे त्याला एकांत प्रिय होता. पण नेमकी हीच गोष्ट अनेकांच्या मनात त्याच्या भावी जीवनाविषयी आडाखे बांधताना महत्त्वाची बनत होती. त्याला नुकतीच सोळा वर्षे पूर्ण झाली होती.

एके सायंकाळी त्याला माता-पित्यांकडून निरोप आला. तो त्यांना भेटायला गेला. त्यांनी हळुवारपणे त्याच्या विवाहाचा विषय काढला व सिद्धार्थची प्रतिक्रिया अजमावली.

मातोश्रींनी सांगितले,''बेटा, सिद्धार्थ! दंडपाणी या शाक्यांनी तुला निमंत्रित केले आहे. त्याला यशोधरा नावाची गुणी मुलगी आहे. ती प्रसिद्ध आहे. पंचक्रोशीत तिच्याइतकी देखणी मुलगी शोधूनही सापडणार नाही. त्यांनी तिच्या विवाहासाठी स्वयंवर योजले आहे. तरी तू आमच्या इच्छेला मान देऊन स्वयंवराला जावेस असे वाटते.''

तो टाळण्याचा विचार करीत होता. तो म्हणाला, ''तुमच्या आज्ञेनुसारच वागेन. बरे तशा सौंदर्यसंपन्न मुली आपल्या राज्यात नाहीतच का?''

यावर मातोश्री म्हणाल्या,''बाळ ती मुलगी केवळ सुंदर नाही. तू म्हणतोस तशा अन्य मुली सुंदर असतीलही, पण हिच्याविषयी सारी माहिती मी गोळा केली आहे. ती सुंदरही आहे नि चारित्र्यसंपन्नही आहे.''

यावर त्याने मौनच पाळले. स्वयंवरास सधन कुटुंबातील अनेक शाक्य तरुणही जमले होते. पण जमलेल्या तरुणातून यशोधरेने सिद्धार्थला वरले.

ती खरोखर सुंदर होती. पण या अनपेक्षित निवडीमुळे इतर तरुण नाराज झाले, ते साहजिकच होते. पण वधूपित्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता मुळीच दिसली नाही.

सिद्धार्थचा सारथी छन्नू त्याच्या बरोबर होता. साऱ्या घटनांचा तो साक्षी होता. त्याने सांगितले की साऱ्या युवकांची नि वधूपित्याची अशी इच्छा आहे की, धनुर्विद्येचे कौशल्य



दाखवण्याची परीक्षा घेतली जावी.

प्रारंभी त्याला ते अमान्य होते. इतरांपेक्षा त्याची विचारसरणी वेगळीच होती. तो स्पर्धेत भाग घ्यायला तयारही नव्हता. पण छन्नूने जेव्हा सांगितले की, तसे करण्याने शाक्य राजा शुद्धोधन व कुळाला कमीपणा येईल. त्याही व्यतिरिक्त ज्या यशोधरेने तुम्हाला वरले आहे तिला लाजेने मान खाली घालावी लागेल. हे ऐकल्यावर मात्र तो स्पर्धेत भाग घ्यायला तयार झाला. स्पर्धेत साऱ्या तरुणांनी आपापले कौशल्य दाखवले. तो सर्वांत शेवटी होता. त्याने चित्त एकाग्र केले नि धनुर्विद्येचे कौशल्य दाखवले. त्यात तो सर्वश्रेष्ठ ठरला. माता-पिता, शाक्य कुळ आणि यशोधरा साऱ्यांनाच याचा आनंद झाला नि अभिमानही वाटला. वधूपित्याचे मनही नि:शंक बनले. विवाहामुळे, सांसारिक जीवनात प्रवेश केल्यामुळे राजा शुद्धोधन स्वतःच्या निवृत्तीचा विचार करू लागला, पण कालप्रवाह साऱ्यांना दुसऱ्याच किनाऱ्याकडे नेत होता.

सिद्धार्थचा विवाह संपन्न झाला. तो जगरहाटीप्रमाणे संसाराच्या पाशात जखडला गेला. तारुण्य, राजवैभव आणि अतिसुंदर युवतींनी युक्त असे अंतःपुर ज्यामुळे वासनेला अग्नी का म्हणतात हे त्याला समजले. अकृत्रिम लावण्याने ज्यांच्या ठायी थोडी फार वासना शिल्लक राहिलेली नाही अशा योग्यांचेसुद्धा स्त्रिया चित्त अस्वस्थ करू शकतात. त्यामुळे त्याच्यासारख्या राजपुत्राला प्रेमरज्जूने बांधून अंकित करुन घेण्याचा प्रयत्न कितीतरी सौंदर्यवती करीत होत्या यात काही वेगळे नव्हते. त्याचे यौवनपुष्प प्रथमतः उमलत होते. त्याला विलासी जीवनाला उत्तेजक अशा वातावरणात राजा शुद्धोधनांनी ठेवले होते.

अंतःपुरातील स्त्रियांच्यामध्ये तर त्याला मोहित करण्याचे नाना प्रयोग होत होते. कोणी संभाषण चतुर होती तर कोणी मदनाची भाषा बोलण्यात हुशार होती. कोणी सुंदर गात असे, तर कोणी नेत्र कटाक्षाने बोलत होती.

पण या साऱ्या गोष्टी त्याच्या आत्मसंयमापुढे निष्प्रभ ठरत होत्या. त्याला त्याचा आनंदही होत नव्हता आणि तो हसून प्रतिसादही देत नव्हता. तो आता विवाहित आहे याचे भान त्याने जागृत ठेवले होते. तो एकपत्नीव्रताचे पालन करीत होता.

राजाला असितमुनींच्या भविष्याची चिंता होती. तो परिव्राजक होईल ही भीती होती. त्या मार्गापासून त्याला परावृत्त करण्याची त्यांची घाई होती.

तो तटस्थतेने अंतःपुरात वावरत होता. काही महिने गेले, वर्षे गेली. तो एकाग्र मनाने विचार करु लागला. ''या सौंदर्यवतींना एवढेही कळू नये की त्या आज आहेत, उद्या नाहीत. यौवन हे चंचल आहे. कारण वार्धक्य तारुण्यातल्या सौंदर्यात जे जे असते ते सारे नष्ट करते.

दिवसेंदिवस सिद्धार्थचे अनासक्त मन हा महाराजांचा नि महामंत्र्याच्या चर्चेचा विषय बनलेला होता. मदिरा, मदिराक्षीच्या जाळ्यात तो ओढला जात नाही हे पाहून त्याच्या तर्कबुद्धीला आवाहन करण्याचे महामंत्र्याने ठरवले.

त्यानुसार राज्यकाराभारातून थोडा निवांत वेळ मिळाला की महामंत्री त्याचे प्रबोधन करावे, म्हणून सांगत, ''मी तुझा मित्र आहे. तुझा हितचिंतक आहे. तू पुरुषार्थापासून दूर जाताना बघून मला नि राजा शुद्धोधनांना काळजी वाटू लागली आहे. हे राजपुत्रा तुझ्या सौंदर्याला साजेशा शालीनतेने तू अंतःपुरातील स्त्रियांना प्रसन्न करण्याचा का प्रयत्न करीत नाहीस? नशिबाने तुला सौंदर्य, राजवैभव, अंतःपुर लाभले आहे त्याचा उपभोग न घेता तू तिरस्कार का करतोस? काम हाच सर्वप्रथम पुरुषार्थ आहे. सर्व जग सुखाच्या अधीन आहे. त्या सुखाची उपेक्षा करावी हे आश्चर्य आहे.''

महामंत्र्याचे स्नेहभाव व्यक्त करणारी भाषा त्याला समजत होती. तो ऐहिक विषयांची अवहेलनाही करीत नव्हता. सर्व मानव मात्र त्यात गुरफटलेले तो पाहत होता. जग हे अनित्य आहे ही जाणीव स्थिरावल्याने त्यात मन रमत नव्हते. बरे! स्त्रियांचे सौंदर्य सतत समोर राहिले तरी विषयोपभोगातच आनंद असतो असे तो मानीत नव्हता. मनापासून व स्त्रीशी नैसर्गिक मिलन तो समजू शकला. पण तेच जीवनाचे सर्वस्व आहे हा भोगाचा कुमार्ग झाला. या भूमिकेमुळे त्याचे मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न प्रधान महामंत्र्याने नि राजाने सोडून दिला.

यशोधरा त्याच्यावर विलक्षण तीव्रतेने प्रेम करीत होती. ती त्याची सखी, भार्या होती. त्याच्या सुख-दुःखात सहभागी तर होत होती पण आंतरिक प्रेरणा त्याला कोणत्या दिशेने नेत आहेत, याची जाणही तिला होती.

एकांतात ती त्याला बिलगली नि तिच्या डोळ्यांची गंगा-यमुना थांबेना. तोही भारावला. 'यशोधरा! तुला काही दुःख आहे का? काही समस्या आहे का?' ती काहीच बोलली नाही.

थोड्या वेळाने ती म्हणाली, ''मला माहीत आहे महाराज! तुमचा जीव संसार, राज्यकारभार यात रमणारा नाही. तुम्ही मुक्त राजहंस आहात. राजवाड्याच्या भिंती तुम्हाला फार काळ कोंडून ठेवू शकणार नाहीत नि माझे प्रेमपाश तुम्हाला रोखू शकणार नाहीत. तुम्ही आम्हा राजकुटुंबासाठी जन्माला आला नाही. हे विश्वच तुमचे कुटुंब आहे मग आम्ही त्यावर स्वामित्व लादून कसे चालेल? माझी तुम्हाला प्रार्थना आहे, तुम्ही ज्या मार्गावरून हळूहळू चालला आहात, त्यात मलाही बरोबर न्या. मला तुमची जीवनसाथी म्हणून आतापासून मी काय करायला हवे ते शिकवा.''

सिद्धार्थने तिला विचारले, ''यशोधरा माझ्याबरोबर ध्यानाला बसशील?'' तिने तत्काळ



होकार दिला. ''या अभ्यासाने तुझ्या मनाला नि हृदयाला शांती लाभेल.''

त्यानंतर ती ध्यानासाठी वेळ काढे. कितीही काम असले तरी तिला साधनाभ्यासासाठी वेळ देण्यात आनंद वाटायचा. काही वेळा दोघेही ध्यानाला बसत. पतीवर यशोधरेची श्रद्धा होती. तिला मार्गदर्शन हवे होते पण तोच नव्या मार्गाच्या शोधात होता. त्याला खात्री होती, एक ना एक दिवस मार्ग नक्कीच सापडणार.

यशोधरेने एकदा अनपेक्षितपणे विचारले, ''तुम्हाला मुलगा आवडेल का मुलगी?'' तो चमकला.

ती लाजून म्हणाली, ''मी खूप आनंदात आहे. तुमच्या प्रेमाचे फळ मी बाळगते आहे. मला तर मुलगा हवा. अगदी तुमच्यासारखा, तुमच्या इतकाच बुद्धिमान, शिलवान, प्रेमळ !''

तो म्हणाला, ''यशोधरा! मुलगा, मुलगी मला काही फरक पडत नाही आणि समज तुझ्यासारखी प्रेमळ आणि सुंदर, समजूतदार मुलगी जन्मली तरी आनंद आहे.''

''पण! राज्याला वारस हवा तो मुलगाच.''

''समज मी परिव्राजक बनलो नि पुढे मुलगाही बनला तर?''

यावर यशोधरेने त्याच्या तोंडावर हात ठेवला.

सिद्धार्थ नि:शब्द झाला. पण त्याच्या मुखातून नियतीचेच शब्द बाहेर पडले होते. ज्वालामुखीसारखे, ते कोण थोपवणार?

यशोधरेने मध्य रात्रीनंतर त्याला हाक मारली. तो जागाच होता. तो उठून बसला. ''का घाबरलीस? काही स्वप्न तर नाही बघितलेस?''

आंवढा गिळत तिने मानेनेच होकार दिला. मग पाणी पिऊन स्वप्न सांगू लागली. पहिल्या स्वप्नात तिने पांढरी शुभ्र गाय पाहिली. तिच्या डोक्यावर चमकणारा हिरा होता. आकाशात उत्तरेला दिसणाऱ्या ध्रुव ताऱ्यासारखा तो लक्ष वेधून घेत होता. साऱ्या कपिलवस्तू नगरीतून ती गाय फिरत फिरत वेशीजवळ गेली. त्यावेळी आकाशवाणी झाली. इंद्रदेव गर्जले, ''जर तुम्हा कपिलवस्तूतल्या लोकांना ही गाय सांभाळता येत नसेल तर राजधानीतला प्रकाश निघून जाईल.'' हे ऐकून नगरातला प्रत्येकजण त्या गायीच्यामागे धावू लागला. पण कोणी गायीला नगराबाहेर जाण्यापासून रोखू शकले नाही. ती नगराच्या कमानीतून बाहेर गेली आणि साऱ्यांच्या नजरेआड झाली.

दुसऱ्या स्वप्नात यशोधरेने आकाशात चार देव जमलेले पाहिले. कैलास पर्वतावर ते

आले, तेथून त्यांनी कपिलवस्तू नगरीवर प्रकाशझोत टाकला. इंद्राच्या रथावरचा ध्वज जोरदार वादळाने खाली कोसळला. आकाशातून पुष्पवृष्टी झाली. अवकाशातून स्वर्गीय संगीत ऐकू येऊ लागले.

तिसऱ्या स्वप्नात जमीन आणि आकाशाचा थरकाप उडवणारा आवाज आला. ''आता ती वेळ आली आहे! ती वेळ आली आहे.'' यशोधरेने घाबरून दरबारात तो बसत होता त्या सिंहासनाकडे धाव घेतली तर ते रिकामेच होते. त्यावर त्याचे दागिने व दरबारी वेष होता. तो बघता बघता सापामध्ये रूपांतर झाला नि राजवाड्याच्या दरवाजातून निघून गेला.

ही तीन स्वप्ने सांगताना यशोधरा घामाने डबडबली होती. ती त्याला बिलगली नि हुंदके देऊ लागली. तिने त्याच्या नजरेला नजर देऊन विचारले, ''याचा अर्थ तुम्ही आम्हाला सोडून जाण्याचा निर्णय घेतला आहात काय?'' तिचे सांत्वन करण्याच्या केविलवाणा प्रयत्न त्याने केला. यशोधरेला सांगितले, ''तू अत्यंत संवेदनशील तशीच सखोल जाण असणारी आहेस. तू माझी जीवनसाथी आहेस. तुझ्याइतके मला कोण ओळखत नाही. माझी इच्छा पूर्ण करण्यास तुझ्याशिवाय मला कोण मदत करणार? आणि समज मी तुझ्यापासून दूर निघून गेलो तरी तू राजपुत्र राहुलचे सर्वोत्तम संगोपन करशील. माझं तुझ्यावरच प्रेम तिळमात्र कमी होणार नाही आणि जेव्हा मला या दुःखांच्या प्रश्नांवर उपाय सापडेल, नवामार्ग दिसेल तेव्हा नव्या प्रकाशित, उजळलेल्या जाणिवा घेऊन मी पुन्हा तुला नि राहुलला भेटायला येईन. थोडा धीर धर.'' यशोधरेने डोळे मिटले. ती शांत झाली नि झोपी गेली.

□□□



# गृहत्याग

सिद्धार्थने त्याच रात्री गृहत्याग करून संन्यास घेऊन निर्वाणाच्या शोधामध्ये निघून जायचे ठरवले. इकडे कृषा गौतमी नावाच्या क्षत्रिय कन्येने सिद्धार्थ रथातून नगर प्रदक्षिणा करताना पाहून एक गीत गायले.

परम शांत माता सोई, परम शांत पितू सोय !
परम शांत नारी सोई, जासू पति अस होई !!

सिद्धार्थला त्याचा अर्थ समजला. ''अशा प्रकारचे रूप पाहून आईचे हृदय परम शांत होते, पित्याचे हृदय परम शांत होते. पत्नीचे हृदय शांत होते. हृदयाची परम शांती मिळते. तेव्हा राग, द्वेष, मोह, अभिमान, असे सर्व चित्ताचे मल शांत झाल्यावर विरक्त हृदय परम शांत होते.'' कृषा गौतमीच्या गाण्यातून त्याच्या विचारात एक परिवर्तन झाले आणि त्याने गृहत्याग करून संन्यस्थ होण्याचा ठोस निर्णय घेतला. निर्वाणाच्या वाटेवर जाण्याचा दृढनिश्चय केला. जणू ती गायिका त्याला प्रेरणा देणारी गुरूच ठरली म्हणून त्याने गुरुदक्षिणा समजून गळ्यातला एक मौल्यवान हार काढून सेवकांकरवी कृषा गौतमीकडे पाठवून दिला. तो हार पाहून ती खूपच प्रसन्न झाली आणि सेवकाला म्हणाली, ''सिद्धार्थ गौतम माझ्या प्रेमात पडलाय म्हणून त्याने ही भेट पाठवलेली दिसते.''

महालामध्ये प्रसन्न चित्ताने सुंदर पलंगावर तो जाऊन पहुडला. त्यावेळी त्याला खूष करण्यासाठी नृत्यगायन यामध्ये तज्ज्ञ असणाऱ्या अनेक सुंदर स्त्रियांनी वाद्य, नृत्य व गीत सुरु केले. पण त्याला त्यामध्ये रस नव्हता, त्याचे चित्त विरक्त झाल्याने तो लौकरच निद्राधीन झाला. तेव्हा आता कोणासाठी गायचे म्हणून त्या स्त्रियाही झोपी गेल्या. मध्यरात्री तो जेव्हा जागा झाला तेव्हा प्रेतासमान पडलेल्या त्या स्त्रिया पाहिल्या. त्याला एक क्षणभंगुर जग पाहून गृहत्यागाची योग्य वेळ जवळ आल्याचे जाणवले.

सिद्धार्थ पलंगावरून उठला आणि उत्तरेकडेच्या द्वाराजवळ जाऊन त्याने सेवकाला बोलावले, 'कोण आहे रे तिकडे?' उत्तर आले ''आर्य पुत्र! मी छन्न आहे.'' सिद्धार्थने त्याला प्रवासासाठी एक घोडा तयार करण्यास सांगितले. छन्नने थोड्याच वेळात त्याचा आवडता घोडा कंठक तयार केला.

सिद्धार्थने जाण्यापूर्वी पुत्राचे मुख पाहून जावे म्हणून तो यशोधरेच्या शयनकक्षेकडे

गेला. दरवाजा लोटला तर आत सुगंधी तेलाचे प्रदीप जळत होते. यशोधरेचा एक हात पुत्र राहुलच्या मस्तकावर होता. त्याने उभ्या उभ्याच विचार केला, यशोधरेचा हात हटवून पुत्राला जवळ घ्यायचे तर ती जागी होईल आणि मग गृहत्यागामध्ये अडथळा निर्माण होईल. म्हणून त्याने असे ठरवले की, बुद्धत्व प्राप्त झाल्यानंतर पुत्राला भेटावे. या विचाराने महालातून बाहेर आला. कंठक घोड्याला थोपटले आणि म्हटले, 'आज एक दिवस तू मला मार्गक्रमण करायला मदत कर. एक रात्र तार, त्यानंतर बुद्ध झाल्यानंतर देवतासहित साऱ्या लोकांना मी तारेन.' व तो कंठकावर स्वार होऊन मार्गक्रमण करू लागला. कंठक हा शुभ्र रंगाचा महाकाय, बल, वेग संपन्न घोडा होता. ते नगरद्वारातून बाहेर पडले. जर द्वार उघडले नसते तर 'छन्न' आणि 'त्याने' कंठकावर स्वार होऊन नगराच्या संरक्षक भिंतीवरून झेपावण्याचे ठरवले होते.

ती आषाढ पौर्णिमेची उत्तर रात्र होती. त्याला पाठीमागे वळून नगर पाहण्याची इच्छा झाली. त्या वेळी ते शाक्य, कौलिय आणि रामग्राम या राज्यांची सीमा पार करुन तीस योजन पुढे आले होते. एका नदीकाठी आल्यावर छन्नला त्याने विचारले, 'छन्न ही कोणती नदी आहे?' त्यावेळी छन्नने सांगितले, 'ओनामा नदी.' नदी ओलांडली. घोड्यावरून उतरला, नदी किनाऱ्यावरील मुलायम वाळूमध्ये पाय रोवून खंबीरपणे उभा राहून सिद्धार्थने छन्नला सांगितले, ''यापुढे मी संन्यासी होणार आहे. प्रबजित होणार आहे. त्यामुळे माझे वस्त्रालंकार आणि कंठक घेऊन तू परत जा.'' यावर छन्न म्हणाला, ''मीही संन्यास घेतो. मला पण आपल्या बरोबर न्या.'' पण छन्नला त्याने समजून सांगितले, ''तू परत जा. आई-वडिलांना माझी खुशाली कळव.'' कंठक प्राणी असूनसुद्धा त्याला सिद्धार्थचे बोल व भावना समजत होत्या. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. छन्नाला पुन्हा सांगितले, तुझ्या स्वामीभक्तीने मी प्रसन्न आहे. तू माझे हृदय जिंकले आहेस. तू निःस्वार्थ निरपेक्ष माझ्यावर प्रेम केलेस. शुद्धोधन महाराजांना सांग की, मी त्यांना सोडून आलो ते स्वर्ग प्राप्तीच्या आशेने नव्हे. माझ्याविषयी त्यांनी त्रास करून घेऊ नये. सहवास हा कितीही दीर्घकाळ टिकला तरी कालावधीने त्याचा शेवट हा होतोच. माझ्या मातेलाही सांग की माता-पित्यांची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले नाही पण कर्तव्यासाठी कधीच अयोग्य वेळ नसते. तिच्या वात्सल्य प्रेमाला मी अपात्र ठरलो. ती फार मोठी स्त्री आहे. तिची थोरवी शब्दाने सांगता येत नाही.''

हे बोल ऐकून छन्न हात जोडून शोकाकुल अवस्थेत उभा होता. तो म्हणाला, ''स्वामी चिखलाने भरलेल्या नदीच्या पात्रात हत्ती जसा रुतून बसावा तसा तुमच्या वियोगाच्या शोकामुळे मी बनलो आहे.''

सिद्धार्थ पेक्षा वयाने पंचवीस वर्षे ज्येष्ठ असणाऱ्या क्षत्रिय राजपुत्र वर्धमानाने प्ररिव्रजा घेतलेली ऐकले होते. छन्न आणि कंठक गेल्यानंतर त्याने वाटचाल सुरू केली. वाटेत सिद्धार्थला परमऋषी भारद्वाजने परिव्राजकाची दीक्षा दिली. संस्कारविधी केले. त्याने भिक्षापात्र हाती



घेतले नि राजगृहाच्या वाटेने चालू लागला. वाटेमध्ये अनुपिया नावाच्या नगरात एक आमराई होती. तेथे एक आठवडाभर थांबून एक दिवसात ३० योजन पायी चालून राजगृहाला पोहोचला आणि नगरामध्ये भिक्षेसाठी चालू लागला. एक गोष्ट लक्षात आली की तो चालत असताना जिज्ञासेपोटी आबालवृद्ध त्याच्याभोवती गर्दी करत होते. राजाचे सैनिक अशा नजरेने पाहत होते जणू तो परराज्यातील गुप्तहेरच आहे. त्याच्या आगमनाची वार्ता तेथल्या राजाच्या कानावर गेली.

**परिव्राजक अवस्थेत**

राजवैभवाचा, सुखवस्तू जीवनाचा त्याग केल्याने तो असंग्रही बनला होता. हेमंत ऋतू होता. त्याच्या अंगावर पुरेसे कपडेही नव्हते. त्यामुळे थंडीची तीव्रता जाणवत होती. शरीर कष्टाची या पूर्वी अशी सवयही नव्हती. पण त्याने ध्यानाचा अभ्यास वाढवला होता. तासन् तास एखाद्या लक्ष्यावर दृष्टी खिळवून एकाग्रतेचा अभ्यास चालू केला होता. काही वेळा आजूबाजूच्या खेड्यांतील गुराखी मुले त्या भागात येत. त्यांच्या खेळण्या-बागडण्याचा, आरडा-ओरडीचा त्रास होई. पण त्याचे मन ध्यान लीन असे.

काही वेळा सुंदर स्त्रिया औत्सुक्याने आजूबाजूला फिरकत तर काही गृहस्थ प्रश्नांचा भडीमार करीत. त्याने ठरवले एकांतवास आणि मौन आवश्यक आहे. विचार करता करता असे लक्षात आले की, आपण वायफळ बोलण्यात आयुष्याचा मौल्यवान वेळ वाया घालवतो. त्याऐवजी मौन पाळावे हे उत्तम!

विचारल्यावरही तो बोलत नाही, उत्तर देत नाही म्हटल्यावर त्याचा लोकांना राग येई. पण त्यांनी रागावले वा शिव्याशाप दिले तरी त्याच्या ध्यानात काही फरक पडत नव्हता. हळूहळू राग-लोभाच्या पलीकडे जाण्याचा सिद्धार्थ प्रयत्न करीत होता.

व्यावहारिकदृष्ट्या त्याचे जीवन नीरस होते. त्याला डोंगराळ भागातले काही आदिवासी ओळखत होते. त्यांपैकी काहीजण नृत्य, गायन, विवाह समारंभाला निमंत्रण देत. त्यात आदर होता, प्रेम होते. त्यांचा अवमान करण्याचा कोणताही हेतू नव्हता. परंतु त्याला जाणे म्हणजे कालाचा अपव्यय वाटत होता. शिवाय त्यात रुची नव्हती. काही काही वेळा कुस्ती, युद्धकला स्पर्धा भरवल्या जात. त्या पाहण्यासाठी निमंत्रण देत, पण त्यासाठीही तो उत्सुक नव्हता.

काही गावांत, श्रावणात भगवत कथा, पुराण कथा, भक्ती कथा, देश कथा सांगितल्या जात. त्या ऐकण्यासाठी आग्रह होत असे. त्यास तो नकार देत नव्हता. पण भक्ती मार्गाचा अवमानही करीत नव्हता. प्रत्येकाच्या आवडी-निवडीनुसार ईश्वरप्राप्तीचा मार्ग चोखाळतात

याची त्याला जाणीव होती. त्याचे ध्येय निश्चित होते. त्यापासून विचलित होणारी कोणतीही गोष्ट त्याला नको होती. आसक्तीचे बंध बांधू शकत नव्हते. एवढा मनावर संयम प्राप्त झाला होता. क्रोध, मान-सन्मान, माया, लोभ ह्या मनातील ज्वालाच असतात. त्या हळूहळू शांत झाल्या होत्या. त्यामुळे तो जीवनाकडे अधिक पारदर्शक पद्धतीने पाहू शकत होता. आता निसर्ग हा मृत वाटत नव्हता, निर्जन वाटत नव्हता. माती असो, पाणी असो, अग्नी असो वा वनस्पती जगत असो. त्या प्रत्येकात चैतन्य भरलेले आहे असा साक्षात्कार झाला होता. आता एक दैवी एकत्व, समानता तो अनुभवत होता. कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ नव्हता; सारेच चैतन्याचा आविष्कार होते.

अहिंसा आणि ब्रह्मचर्य ही तर जीवनाची आधारभूत तत्त्वे होती. कोणाशी वैर नाही त्यामुळे हिंसेचा अभाव निर्माण होतो. तर ब्रह्मचर्यामुळे जीवनात पावित्र्य येते. त्याशिवाय प्रगती होत नाही. अहिंसा-पावित्र्य ही तत्त्वेच योग्य मार्गाने जाण्यास मार्गदर्शन करतात. यावर तो चिंतन करीत बसत असे.

या दोन व्रतांसाठी आहारावर नियंत्रण हवे म्हणून त्याने कठोर उपवास सुरू केले. अहिंसेच्या किंवा ब्रह्मचर्याच्या पालनात आहार फार महत्त्वाचा ठरतो. जर तो दोषपूर्ण असेल तर साधकाला त्रासच होतो. अहिंसेच्या विशुद्धीनंतर ब्रह्मचर्याची विशुद्धी होते. आहार इतकाच घेत होता की, शरीराची हालचाल राहील. काहीवेळा स्नानासाठी जलाशयाजवळ गेल्यावर त्याने स्वतःचे प्रतिबिंब पाहिले. तो खूपच कृश झाला होता. त्याचे पोट पाटीला चिकटले होते. हाता-पायाचा अस्थिपंजर राहिला होता. एखाद्या चंद्रमौळी झोपडीच्या छताच्या काड्यासारख्या छातीच्या बरगड्या दिसत होत्या. डोळे खोबणीत इतके खोल गेले होते की पाण्यात नक्षत्रांचे प्रतिबिंब पडते तसे खोल-खोल दिसत होते.

दृष्टीवरही चांगला संयम आला होता. चालताना तो इकडे-तिकडे पाहत नव्हता, पाठीमागेही पाहत नव्हता. कोणी बोलावले तरी बोलत नव्हता. फक्त रस्ता पाहत पुढे पुढे चालत राहत होता.

वाटेत अंधार पडू लागला की, झोपडी, धर्मशाळा, वृक्षाच्या मुळाशी किंवा स्मशानातही मुक्काम करीत असे. तो त्याच्यातच सामावून राहिला होता. स्मशान साधना करताना 'सर्वम् क्षणिकम्' सारं काही क्षणभंगूर आहे, हे समजले होते. अनासक्तीकडे वळायला स्मशानध्यानही उपयोगी पडले होते. मनातील भय हा एक प्रगतीतला अडथळा असतो. विविध रूपातले भय ध्येयापासून विचलित करते. मग चोरीचे भय असो, आजारपणाचे असो किंवा वार्धक्य आणि साक्षात मृत्यूचे भय असो भय हे भयच असते. भय आणि दोषयुक्त मनाच्या प्रवृत्तीपासून



मुक्तता माणसाला खरे स्वातंत्र्य देते असे त्याला वाटू लागले. अर्थात त्यासाठी सतत जागृतीची साधना एवढ्यावर संपत नाही. त्यामार्गाने दिवसांमागून दिवस, सप्ताहांमागून सप्ताह, मास, वर्ष, चालावे लागते. येथे कष्ट येत नसतात त्यांना साधकच निमंत्रण देत असतो. साधना मंदिराचे ते भरभक्कम स्तंभच बनतात. थंडी, ऊन, वारा, पाऊस ही निसर्गाची रुपे. त्यांना सामोरे जाणे सहजसाध्य गोष्ट नव्हती, तीही प्रयत्नपूर्वक त्याला साध्य झाली.

साधना ही एक कसोटी असते. गावातून जाताना काही वेळा त्याला श्वानांचा त्रास होई. अनेक श्वान सर्वबाजूंनी घेरून टाकत. अशावेळी कोणीतरी खेडूत धावून येई. त्या सर्व कुत्र्यांना पिटाळून देई. जंगली श्वापदेही रानावनात भेटत. किड्या-मुंग्या, माकडे यांचा त्रास काही कमी नव्हता. शरीर प्रकृतीत काही बिघाड झाला तर तो उपवास करीत असे. अन्न-पाण्यावाचून दोन दोन दिवस तो राहू शकत होता.

आजूबाजूच्या परिसरातील लोक त्याला ओळखत होते. काही ब्राह्मण तपस्वींनां त्याच्याबद्दल आदर वाटायचा. काही वेळा ते त्याची सेवाही करीत. त्याचे बोलणे, चालणे, वागणे सारे मुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत होते.

## जपजाप्य

वेदप्रामाण्य मानणारे लोक यज्ञाप्रमाणे जपजाप्य यावर भर देत होते. त्या मार्गानेही चित्तात काय बदल होतात. हे जाणून घेण्याची त्याला उत्सुकता होती. विश्वामित्र ऋषींना स्फुरलेला गायत्री मंत्र जप करण्याचे सिद्धार्थने ठरवले.

निरंजना नदीकाठी सूर्योदयापूर्वी उठून तो गायत्री कवच आणि मग सूर्याचा मंत्र म्हणत असे. सायंकाळीही तो जप करीत असे. गायत्री मंत्र हा सावित्री मंत्र म्हणून त्यावेळी ब्राह्मण वर्गात म्हटला जायचा.

या मंत्राच्या अर्थाप्रमाणे भू, भूव, स्वः या तिन्ही जगाला उजवळणाऱ्या सूर्याची प्रार्थना होती. त्याला जप करताना प्रश्न पडायचा की हा समोर दिसणारा सूर्य या तिन्ही जगाला कसा काय प्रकाशित करू शकेल? मग समजले की तो आंतरिक सूर्य आहे, हिरण्यगर्भ आहे.

या मंत्राच्या जपामुळे त्याचे सारे शरीर स्वर्णित झाले होते, मनही उजळले होते, जगात चार प्रकारच्या आभा असतात-चंद्राची, सूर्याची, अग्नीची आणि प्रज्ञेची आभा. त्यामध्ये प्रज्ञेची आभा श्रेष्ठ असते. सूर्य दिवसा प्रकाशतो, चंद्र रात्री, अग्नी वेगवेगळ्या ठिकाणी दिवसा किंवा रात्री प्रकाशतो, पण ''प्रज्ञा सर्व ठिकाणी सर्व वेळी प्रकाशते.''

मंत्र जप करता करता, काही वेळा त्याच्या हाताच्या वेगवेगळ्या मुद्रा होत. प्रत्येक मुद्रेबरोबर चित्तातून विशिष्ट भाव प्रगट होई. त्यामुळे मुद्रा नि भावनांचे नाते त्याला समजत गेले. ज्ञान प्राप्तीनंतरची सहज नि अर्थपूर्ण अशी लाभली ती भूमी स्पर्श मुद्रा, नमस्कार हीही मुद्राच. शांत भावाचीही मुद्रा, अभय देणारी हातांची रचना हीही मुद्राच.

सिद्धार्थला प्राणशक्ती आणि श्वासोच्छवासाचं नातं असंच उमगत गेलं. त्यामध्ये बाह्य कुंभकाची स्थिती सर्वांत महत्त्वाची वाटली. तर खेचरी मुद्रेचा अभ्यास करताना टाळूतून होणारा अमृतस्राव ध्यानावस्थेतील ब्रह्मानंदाचा अनुभव देऊन गेला. त्याला तो प्रीतिसुख म्हणत असे. काहीजण त्याला ध्यान सुख म्हणत. एकदा सिद्धार्थ खेचरी मुद्रा लावून निर्विकल्प समाधी अवस्थेत काही प्रहर बसला होता. श्वासोच्छवास जवळजवळ थांबलेला होता, शरीर काष्टासारखे बनले होते. तेव्हा भेटायला आलेल्या काहींना वाटले शाक्यमुनी मरण पावला आहे. ती वार्ता ऐकून तेथे काही मुनी आले. त्यांनी त्याची शरीर नि चित्ताची अवस्था पाहिली. नाकपुडीजवळ कापूस धरून पाहिला नि सांगितले की, गौतम समाधी अवस्थेत आहे. तो मरण पावलेला नाही, अरहंताचा विहार हा असाच असतो. त्याला त्रास होईल असा आवाज, गडबड करू नका. शरीराचे जंगली श्वापदांपासून संरक्षण करा.

अशी अवस्था सिद्धार्थला वारंवार प्राप्त होऊ लागली. आता त्याच्या सहकाऱ्यांना त्याची चांगलीच जाणीव झाली होती.

## तांत्रिक उपासना

बंग देशाच्या बाजूला काली नि कामाख्या येथे अनेक तांत्रिक होते. काळ्या जादूचे ते प्रयोग करीत. भूत, पिशाच्च योनीवर त्यांचा विश्वास होता. चिता भस्म, स्मशान साधना, जादू टोणा, जारण मारण, शत्रू उच्चाटन अशा गोष्टींच्या चर्चेतच त्यांच्या आयुष्याचा बराचसा काळ निघून जायचा, त्यांतील काहीजण मानवी कवटी, नरमुंड, नवमुंडी आसन याचा आग्रह धरीत तर काही पंच मकार साधना करीत. त्यांतील बहुतांशी शीलभ्रष्ट बनलेले होते. काही तांत्रिक विविध यंत्रांची पूजा करीत. त्यांना वाटे की, तंत्रपूजा विविध देवतांना संतुष्ट करते व त्या योगे धन-धान्य, पशू, सौंदर्य, स्त्रिया यांचा लाभ होतो.

'श्री' यंत्रासारख्या यंत्राची पूजा करून वैदिक लोक धनधान्य समृद्धी मिळवतात. असा प्रचार झाला होता. वैदिक पुजाऱ्यांनी समाजात त्याद्वारे आपले स्थान बळकट केले होते.

सिद्धार्थाचा मार्ग तांत्रिक नव्हता, शीलभ्रष्ट माणूस धार्मिक असू शकत नाही अशी



त्याची पक्की धारणा होती. शिवाय भूत, प्रेम, स्वर्ग-नरक, भौतिक सुखे हे विषय त्याला चर्चेसाठीही आवश्यक वाटत नव्हते. शिखर गाठण्याच्या प्रवासात जवळचा मार्ग म्हणून तांत्रिक मार्गाने जाणाऱ्यांचे अधःपतन झालेले त्याने पाहिले होते.

माणसाचं मन आरशासारखं हवं. आरसा कशाचाही स्वीकार करीत नाही, कशाचाही तिरस्कार करीत नाही; तो ग्रहण करतो, पण संग्रह करीत नाही. मन असं असावं म्हणजे दुःखाचा मळ त्यावर साचत नाही.

□□□

# राजा बिंबिसार

गंगेचे विशाल पात्र ओलांडून त्याने मगध देशात प्रथमच पाऊल टाकले. या देशात अनेक साधू, संत, योगी, मुनी होऊन गेले आहेत. त्यांच्यामुळे ही भूमी पावन झाली होती. जन्म-मृत्यूचे रहस्य कोणा साधूकडून जाणून घेण्यासाठी तो या देशात फिरत होता. ऊन-पावसात, दऱ्या-खोऱ्यांत त्याची भटकंती सुरू होती.

त्याला काही दिगंबर जैन मुनी भेटले तर काही शुभ्र वेषधारी तपस्वी भेटले. काहीजण शिजवलेले अन्न भिक्षा म्हणून स्वीकारत नव्हते. तर काही फक्त फलाहार घेत होते. जंगलातल्या कंदमुळांवर त्यांची उपजीविका चालत होती. त्यांचे शरीरकष्ट, कडकडीत वैराग्य पाहून तो त्यांना विचारत असे, 'का हे सारे कशासाठी करता?' तेव्हा त्यांतल्या अनेकांचा सूर होता की, 'मृत्यूनंतर त्यांना स्वर्गाची सारी सुखे लाभणार आहेत.'

त्यापैकी एकाला त्याने म्हटले, 'जरी तुमचा पुढचा जन्म स्वर्गात झाला तरी पृथ्वीवरची दुःखे संपणार नाहीत. ती तशीच वर्षानुवर्षे चालू राहतील. या दुःख निवारणासाठी तुम्हाला काही उपाय सापडला आहे का? स्वर्गप्राप्ती हे पलायन ठरेल. शरीराचे अतिभोग जसे अयोग्य तसे शरीराचे अती कष्ट हेही निरुपयोगी ठरतात.'

वेगवेगळ्या आश्रमांत अभ्यास करीत करीत त्याची एकाग्रतेची क्षमता वाढत चालली होती. महिन्यांमागून महिने जात होते. काही वेळेला ध्यानावस्थेत राजा शुद्धोधन, माता गौतमी, यशोधरा, राहुल यांच्या प्रतिमा जिवंत बनत! राजवाडा सोडून, या साऱ्या आप्तांना सोडून आता तीन वर्षे झाली होती. परत गेलो तर राहुल तरी ओळखेल का? मुळीच नाही. कधीच नाही. काही वेळ या स्मृतीमुळे त्याचं मानवी मन अस्वस्थ बनत होते. पण लगेच तो सावरत होता. त्याला खात्री होती. मानसिक, वैयक्तिक नि सामाजिक समस्येवरचा उपाय त्याला निश्चित सापडणार आहे.

राजगृहापासून जवळच्या एका टेकडीवर तो राहत होता. नेहमीच्या प्रथेप्रमाणे भिक्षापात्र घेऊन तो गावातून शांतपणे चिंतन करीत करीत संथपणे चालला होता. पण रस्त्याच्या दोन्ही बाजूचे लोक मोठ्या औत्सुक्याने त्याला न्याहाळीत होते. त्याच दरम्यान एक सजवलेला रथ



रस्त्यावरून पुढे आला. कोणी सांगण्याची आवश्यकता नव्हती, सिद्धार्थने ओळखले मगध देशाचा राजा बिंबिसार जात आहे. राजाने सारथ्याला रथ थांबवण्यास सांगितले. दोघांनी एकमेकांना पाहिले व स्मित हास्य केले. त्यांनी रथाबरोबर चालणाऱ्या नोकराला फळे, ताजे अन्न आणि पाणी सिद्धार्थला देण्यास सांगितले व निघून गेले.

त्या दिवशी तो नोकर सिद्धार्थच्या पाठोपाठ टेकडीवर आला नि वंदन करून परत फिरला. दुसऱ्या दिवशी दुपारी रथ टेकडीच्या पायथ्याला ठेऊन स्वतः राजा बिंबिसार टेकडी चढून वर आले. त्यांचा लवाजमा खालीच होता. फक्त एका नोकराला घेऊन ते वरती आले. त्यांना समोरून येताना पाहून सिद्धार्थ उभा राहिला नि हात जोडून स्वागत केले. जवळच्या एका मोठ्या शिळेवर त्यांना बसायला आसन दिले नि तो दुसऱ्या शिळेवर समोरच बसला.

राजा बिंबिसारनी त्यांना विनंती केली, ''हे शाक्यमुनी, तुम्ही माझ्या राजवाड्यात यावे आणि माझ्या शेजारी आसनस्थ व्हावे. तुमच्या पावनस्पर्शाने माझ्या राज्यात शांतता नि समृद्धी पसरेल.''

तो म्हणाला, ''हे महान राजा! आता गेले कित्येक वर्षे मला जंगलात राहण्याची सवय झाली आहे.''

राजा म्हणाला, ''नाही! नाही! हे आयुष्य तुमच्यासाठी फारच खडतर आहे. येथे तुम्हाला चांगली शय्या नाही की कोणी मदतनीस नाही. तुम्ही माझ्या बरोबर चला. तुमची उत्तम व्यवस्था करतो. तुमच्या कुटुंबाशी माझी दृढ मैत्री आहे, ती आजची नव्हे, वंशपरंपरागत असून तिची दृढता सिद्ध झालेली आहे. तुमचा वंश सूर्यवंश. या तरुण वयात राज्य कारभार करायचा सोडून संन्याशी होण्याचा कोणी सल्ला दिला? आणि समजा तुम्हाला तुमच्या वडिलांचे राजा शुद्धोधनाचे राज्य नको असेल तर माझ्या राज्याचा अर्धा भाग देतो; तो औदार्याने स्वीकारा. धर्म, संपत्ती आणि सुख या नियमांना अनुसरून वागा. त्यामुळेच मानवी जीवनाचा हेतू पूर्ण होईल व तुमचे आप्त व प्रजाजन दुःखापासून मुक्त होतील. सुखे तुम्हा तरुणांसाठी आहेत. संपत्ती मध्यम वयस्कर लोकांसाठी नि धर्म आम्हा वृद्धांसाठी आहे.''

यातून राजा बिंबिसारांचे सिद्धार्थावर पुत्रवत प्रेमच प्रगट होत होते. त्यांचे विचार त्यांच्या मनासारखेच विशाल होते. नाही तर कोण आपल्या अर्ध्या राज्याचा त्याग करायला तयार होईल? सिद्धार्थने त्यांना नम्रतेने आपली भूमिका स्पष्ट केली. तो म्हणाला ''महाराज, आपली सूचना मैत्रीपूर्ण आणि औदार्याची आहे त्याबाबत मला तिळमात्र शंका नाही. मात्र मला जंगली श्वापदांची किंवा नैसर्गिक आपत्तीची, थंडी, वारा, ऊन, वीज यांपेक्षाही ऐहिक वस्तूंची भीती वाटते, सुखोपभोगांची वाटते. ही क्षणभंगुर सुखे खरा आनंद आणि शांती यांना

ग्रासून टाकतात.

अग्नीमध्ये कितीही इंधन टाका तो अतृप्तच राहतो त्याप्रमाणे कितीही भौतिक सुखे मिळाली तरी माणूस कधी तृप्त होत नाही. इच्छिलेली सुखे जर एखाद्याला मिळाली तर तो उन्मत्त होतो. शेवटी त्याचा अधःपात होतो. त्याच्यावर अनेक बाजूंनी संकटे कोसळतात.

बाह्य उपचार म्हणजे दुःख निवारण्याची साधने असतात. अन्न, वस्त्र, निवारा, आसन, स्नान ही ती साधने आहेत. पण त्यापासून खरा आनंद मिळत नाही. मी गृहत्याग केला, राजवैभव सोडले ते रागापोटी नव्हे. जगातील कलहामुळे मी व्यथित झालो आहे. त्यासाठी शांतता मिळवण्याचा मार्ग शोधत आहे. त्यापुढे मला पृथ्वीचेच काय स्वर्गाच्याही राज्याची अपेक्षा नाही. आत्मसंयमन, नैतिक आचरण आणि वासनेचा अभाव हा धर्म मी पालन करायचा निश्चय केला आहे.''

यावर राजा बिंबिसारांचे मन शांत झाले. त्यांनी सिद्धार्थची इच्छा पूर्ण व्हावी असा वडीलधारी म्हणून आशीर्वाद दिला व ज्ञानप्राप्तीनंतर भेटण्याबद्दल विनंती केली नि ते निघून गेले.

## ऋषी रामपुत्त यांच्या आश्रमात

त्याने ठरवले की दुसऱ्यादिवशी ही जागा सोडायची. कारण राजा बिंबिसार पुनःपुन्हा येतील, काही भेटवस्तू देतील. त्यामुळे त्याने उत्तरेकडे जाण्याचे ठरवले. त्या दिशेला एक उदक रामपुत्र राहतात असे कानावर आले होते. त्यांनी अध्यात्मात फारच प्रगती केली आहे व त्यांच्या आश्रमात तीनशेहून अधिक शिष्यगण राहतात अशी त्यांची कीर्ती पसरली होती. त्यावेळी त्यांचे वय ७५ वर्षांचे होते. त्यांना दैवी पुरुष म्हणून अनेकजण पूजत होते.

त्यांच्याकडे ध्यानप्रक्रिया शिकण्याच्या हेतूने त्याने प्रवेश मिळवला. तेव्हा त्यांच्या पद्धतीनुसार नव्याने दाखल होणाऱ्या साधकाला ध्यानाचे प्राथमिक धडे घ्यावे लागतात. काही आठवड्यांतच ध्यान-धारणेत प्राणायमाच्या साहाय्याने केलेली प्रगती पाहून ऋषी रामपुत्र त्याच्यावर खूप संतुष्ट झाले. निर्विचार मनाची अवस्था त्याला केव्हाच लाभली होती.

आता ऋषी रामपुत्तांनी त्याला पुढच्या आध्यात्मिक अवस्थेत जाण्यासाठी मार्गदर्शन केले. केवळ पंधरा दिवसांतच समाधी अवस्थेपर्यंत त्याला स्थिरावता आले. तो जेव्हा समाधी अवस्थेतून बाहेर आला तेव्हा त्याला जागृती आणि आध्यात्मिक आनंद, शांती अनुभवास आली, पण...!



पण जन्म-मृत्यू आणि त्यातील दुःख निवृत्तीचा मार्ग सापडला नव्हता. ती अनुभूति स्वात्मसुखाय होती. त्याला त्याच्या प्रश्नांची उत्तरे देणारी गुरुकिल्ली नव्हती.

तो या अनुभवानंतर ऋषी उदक रामपुत्रांचे दर्शन घेण्यास गेला तेव्हा त्यांनी त्याचा हात आपल्या हातात धरून म्हटले, ''हे साधू गौतमा! तू माझ्या आजपर्यंतच्या शिष्यातील सर्वश्रेष्ठ नि सर्वोत्तम शिष्य आहेस. मला जी सर्वोच्च आध्यात्मिक अवस्था लाभली ती तुलाही लाभली आहे. मी आता वयोवृद्ध झालो आहे. जर तू येथे माझ्यासोबत राहिलास तर या विशाल शिष्यवृंदांना आपण दोघे मार्गदर्शन करू. मी समाधीस्त झाल्यावर तू या आश्रमाचा प्रमुख म्हणून ही परंपरा चालवावीस अशी माझी इच्छा आहे.

त्याला नकार देणे फार जड जात होते. पण अत्यंत नम्र भाषेत त्यांच्या या उदात्त मनाने देऊ केलेला मान आणि प्रमुख पदाचा स्वीकार करण्यास त्याने नकार दिला. त्यांच्याबद्दल आश्रमवासीयांच्याबद्दल हृदयापासून कृतज्ञता व्यक्त करुन सिद्धार्थने त्यांचा निरोप घेतला.

त्या आश्रमात कोंडाना हा एक गुरुबंधू त्याच्यावर खूप प्रेम करीत होता, सेवाही करीत होता. त्याच्या जाण्याच्या निर्णयामुळे त्याला खूप वाईट वाटले. तो डोंगरावरून पायथ्यापर्यंत सिद्धार्थला पोहचवायला आला होता.

या भागातल्या सर्वोत्तम ऋषींच्या आश्रमात सिद्धार्थने विविध साधना पूर्ण केल्या. पण हृदयातला विचारांचा अग्नी विझलेला नव्हता. त्याला वाटायला लागले की ''आता आपल्या समस्येचे उत्तर आपल्यालाच शोधायला हवे.''

## उग्र तपश्चर्या

मग तो पश्चिमेकडे निघाला. भाताची शेती आणि चिखलाने भरलेली शेतजमीन, मधून वाहणारे पाण्याचे प्रवाह ओलांडत निरंजन नदीच्या काठावर आला. नदी ओलांडून डोंगसारी डोंगराच्या पायथ्याला आला. उरुवेला खेड्यापासून हा अर्ध्या दिवसाचा पायी रस्ता होता. तेथून पुढे खडा चढ लागतो. मोठमोठ्या शिळा पसरल्या होत्या. हत्तीच्या सुळ्याप्रमाणे उंच शिखरे होती, नि या डोंगराच्या वरच्या भागात अनेक गुहा होत्या. प्रचंड आकाराच्या शिळा म्हणजे खेड्यातील गरीबाची चंद्रमौळी झोपडीच होती. त्याला ही जागा पसंत पडली. जवळ पाण्याचा नितळ झरा होता. खोल दरीत दूरवर परिसर दिसत होता. निळे आकाश आणि सूर्योदय, सूर्यास्त स्पष्ट दिसत होता. मुक्तीचा मार्ग सापडेपर्यंत आपण ही जागा सोडायची नाही असा निश्चय केला. हे करताना कोणतेही कष्ट पडोत, कितीही शरीर

पीडा होवो, शरीर त्याग करावा लागला तरी चालेल असा दृढ निश्चय त्याने केला.

मग तो एका प्रशस्त गुंफेत ध्यानाला बसला. प्रथम त्याच्या डोळ्यांसमोरून त्याचा भूतकाळ जलदगतीने चित्रमय रूपात झरझरत गेला. त्यात मानवी नाते संबंध वा व्यक्ती नव्हत्या. परिव्राजक बनल्यापासून त्याने केलेला साधना अभ्यास नजरेसमोर येत होता. गेल्या पाच वर्षांचा तो आढावा घेत होता. आता त्याला वाटू लागले की, भिजलेल्या मऊ लाकडापासून अग्नी निर्माण होणार नाही. शरीराचे तसेच आहे. शारीरिक इच्छा, वासना यावर संयम साधता आला नाही तर साक्षात्कार होणार नाही. मोक्ष प्राप्तीसाठी कडकडीत, तपाचरण करायला हवे. शरीराचे चोचले करून चालणार नाही. कडक वैराग्यावाचून मोक्ष प्राप्ती नाही या भावनेने त्याने कठोर तपश्चर्या सुरू केली.

अमावस्येच्या दिवशी निबिड अरण्यात घनदाट काळोखात तो मुद्दाम शिरत असे. अशा अंधारात एखाद्याच्या अंगावर रोमांच उभे राहत तर भीतीने ते लटपट कापू लागे. त्याला भय नव्हते असे नाही, पण मनाला तो शिकवण देत होता. निर्भयत्व लाभण्याचा तो प्रयत्न करीत होता. रात्रीच्या अंधारात एखादे हरीण समोरून पळत जाई त्यावरून त्याला समजत असे की त्या पाठोपाठ वाघ झेपावत येत आहे. एखाद्या सशाचे जीवाच्या आकांताने ओरडणे सुरू झाले की कळायचे की, एखाद्या अजगराने त्याला गिळायला सुरू केली आहे. लाल मुंग्यांच्या रांगेप्रमाणे भीती नसानसांतून फिरत होती. तरीपण भीतीवर ताबा मिळवायचा होता. शरीराच्या सर्व प्रकारच्या भीतीवर विजय मिळवायचा होता. शरीर हे भीतीचे गुलाम बनलेले असते. त्या गुलामगिरीतून शरीर मुक्त झाले की, मी विजयी झालो अशी त्यावेळची त्याची भावना होती. त्यामुळे मनाची दुःख शृंखला भंग पावेल असे त्याला वाटे.

ध्यानाला बसल्यावर, त्याने प्राणायमाचा सखोल अभ्यास केला होता, तो खेचरी मुद्रा लावून बसत होता. कडाक्याच्या थंडीत शरीर थरथरताना आसन सोडले नाही आणि कडक उन्हाळ्यात घामाने ओला चिंब झाला तरी एकाग्रता भंग पावली नाही, शरीरात पोट, डोके, पाय यांत तीव्र वेदना अनुभवत होता. तो दुःखदायक अनुभव होता. एक प्रकारे तो नव्या शारीरिक, मानसिक दुःखांची निर्मिती करू लागला होता. हृदय अशांतच होते. अशा एकांतात तीन महिने गेले. अचानक एके दिवशी सिद्धार्थचा पत्ता शोधत शोधत ऋषी उदक रामपुत्र यांच्या पाच शिष्यांनी त्याच्या गुहेत प्रवेश केला. त्यात गुरुबंधू कोंडाना होता. कोंडाना आनंदाने त्याला भेटला. दोघांनाही खूप बरे वाटले. तो सांगत होता ‘‘तू निघून गेल्यावर महिनाभरातच मला समाधीचा अनुभव आला. मग गुरूंच्या परवानगीने आश्रम सोडला नि तुझा ठावठिकाणा शोधत येथपर्यंत आलो.’’



कोंडानाबरोबर बाप्पा, भादिया, असाजी आणि महानामा आले होते. कित्येक आठवडे ते सिद्धार्थला दऱ्या-खोऱ्यांत अनेक आश्रमांत शोधत होते. सध्या आचरत असलेल्या कडक वैराग्यामागची भूमिका त्यांना समजून सांगितली. त्यांनी विनंती केली की तेही या डोंगरावर राहतील आणि तेही वैराग्याचा मार्ग आचरतील. सिद्धार्थने त्याना होकार दिला.

मग प्रत्येक साधूने आपापली स्वतंत्र गुहा शोधली. त्या एकमेकांपासून दूर नव्हत्या. मग त्या पाच जणांपैकी पाळीपाळीने एकजण भिक्षेसाठी डोंगरावरून खाली उतरून गावात जात असे. तो परत आल्यावर मिळालेल्या भिक्षेचे सहा भाग केले जात. ते अन्न प्रत्येकाला पुरेसे नव्हते पण शरीर जगवण्यापुरते मिळत होते.

असेच सहा महिने भरभर निघून गेले. मग सारेजण पूर्वेच्या दिशेने डोंगरावरून खाली उतरले. उरूवेला गावाजवळ निरंजना नदीकाठी ते आले. गुंफेमध्ये जशी ध्यानधारणा करीत होते. त्याच पद्धतीने येथेही तपश्चर्या चालू ठेवली.

सिद्धार्थची तपश्चर्या आणखी कडक झाली. एक दिवस कोंडाना म्हणाला, ‘‘शाक्यमुनी, तुझी तपश्चर्या आम्हाला जमणार नाही. शिवाय तुझी आम्हाला काळजी वाटायला लागली आहे.’’ सिद्धार्थ काही वेळा अन्नत्याग करू लागला. निरंजना नदीत स्नान करण्याचे त्याने सोडून दिले. एक प्रकारचे गवत नि झाडपाला खाऊन राहू लागला. त्याचे सारे लक्ष ध्यानाकडे होते. स्नानासाठी आणि अन्नग्रहण करण्यासाठी लागणारा वेळ वाया घालवायला तो तयार नव्हता. पाच सहकारी अहोरात्र त्याची काळजी घेत होते. तो आता फक्त अस्थिपंजर बनला होता. हाडांच्या सांगाड्यावर मांसाचा गोळा लटकत होता. दाढी वाढली होती. डोक्यात जटा झाल्या होत्या. त्याने एकदा डोके हाताने घासले तर केस गळून पडले. डोक्याची त्वचाही कोरडी, निस्तेज बनली होती.

काहीवेळा तो स्मशानात ध्यानाला बसत होता. पेटत्या चितेवर ध्यान करताना मनाला समजून सांगत होता की बघ जग नश्वर आहे, क्षणभंगुर आहे. दिवसभर उन्हाच्या तीव्र झळा नि समोर चितेचा पेटता अग्नी! त्यामुळे तो भाजून निघत होता. इतक्यात नदीच्या पात्राकडून एक थंडगार हवेची झुळूक आली. साऱ्या शरीराला त्याचा झालेला स्पर्श त्याला विलक्षण आनंद देऊन गेला नि क्षणार्धात एक ज्ञानशलाखा मनाला उजळून गेली नि समजले की, शरीर नि मनाचे अद्वैत आहे. त्यांचे सख्य आहे यांपैकी एकाला अपार कष्ट देणे चुकीचे आहे. या मार्गाने जे साध्य करायचे ते होणार नाही. मार्ग चुकतो आहे. शरीराला नाकारणे म्हणजे मनाला नाकारणे. त्याला आठवले बालपण.

तो नऊ वर्षांचा असताना वडिलांच्याबरोबर शेतात गेला होता. जांभळाच्या

झाडाखाली बसला होता. वडील शेत नांगरत होते. त्यावेळी त्याचे लागलेले ध्यान किती सहज नि सुखदायक होते. याची आठवण आली. छन्ना नोकर गेल्यावरचे पहिले ध्यान, ऋषी आलारकालाम यांच्याबरोबरचे ध्यान, निर्विकल्प समाधीचा आलेला अनुभव आठवला. शरीर व मनाचे योग्य, संतुलित संवर्धन साक्षात्काराकडे नेण्यास साधनभूत होते हे त्याला पटले. आता शारंग आणि श्रमण परंपरेतील मुनींच्या मनाप्रमाणे चालण्याचा प्रयत्न सोडून देऊन तोच त्यांचा गुरू बनला. दुसऱ्या दिवशी भिक्षेसाठी जायचे ठरविले. पौर्णिमेचा चंद्र निरभ्र आकाशात उगवला होता. तो गाढ झोपी गेला. पहाटे जागा झाला तो पक्ष्यांच्या किलबिलाटाने.

**<u>आसक्तीचा महापूर विनाशाकडे नेतो</u>**

हिमालयात प्रवास करताना तो नदीच्या काठाने जात होता. एक रम्य ठिकाण पाहून तो थांबला. अतिशय शांत अशा त्या दरीमध्ये काली नदीच्या प्रवाहाचा रौद्र आवाज घुमत होता. त्या काठावर चित्ताची एकाग्र अवस्था फार लवकर साधली. पुन्हा दुसऱ्या दिवशी तो पुढे उंच उंच पहाडाकडे निघाला होता. काही दिवसानंतर परतला तर ज्या मालपा या ठिकाणी तो थांबला होता, तो परिसर होता की नव्हता असा बनलेला होता. ज्या ठिकाणी पाण्याचा प्रवाह खळाळत काली नदीला भेटत होता, त्याठिकाणी मोठमोठ्या दगडांच्या राशी होत्या. वरच्या डोंगराचा मोठा भाग वृक्षासह खाली कोसळला होता.

चौकशी करताना खालच्या भागातील लोकांनी सांगितले की, तो निघून गेल्यावर चार पाच दिवसांनी पहाडातील लोक एका वनदेवतेच्या पूजेच्या निमित्ताने जमले होते. तेथे नाचगाण्याचा कार्यक्रम झाला. छांग नावची दारू जवळजवळ साऱ्यांनी घेतली होती. जेवण-खाण, नृत्य गायनानंतर मध्यरात्री सारे निद्राधीन झाले होते, यात घोडेवाले होते, स्त्री-पुरुष, लहान मुले होती. अशा थकलेल्या, बेहोषावस्थेत कोणाला जाग असणार? त्याच वेळी पहाडावरची एक दरड कोसळली नि त्याचा मोठा बांध तयार झाला. वरून येणारा जलप्रवाह तेथे अडून राहिला. त्या रात्री जोरदार पाऊस कोसळला. ढगफुटीसारखी स्थिती झाली नि अचानक बांध फुटून पाण्याचा लोंढा झोपी गेलेल्या साऱ्यांना स्वतःबरोबर काली नदीत वाहून घेऊन गेला. जीवन किती क्षणभंगुर आहे याचा हा अविस्मरणीय अनुभव होता.

ही घटना ऐकल्यानंतर सिध्दार्थने सहकाऱ्यांना सांगितले,

पुप्फानिहेव पचिनन्तं
व्यासत्तमानसं नरं।



सुत्तं गामं महोधोव
मच्चुआदाय गच्छति!

'ज्याप्रमाणे पाण्याचा प्रवाह, महापूर गावच्या झोपी गेलेल्या लोकांना स्वतःबरोबर वाहून नेतो आणि ज्याप्रमाणे अनेक प्रकारच्या फुलांनी भरलेल्या बागेतील फुले माळी निवडतो त्याप्रमाणे विषय वासनेत आसक्त झालेल्यांना यमराज नरकाकडे घेऊन जातो.'

रात्री गाढ झोप झाली. सकाळी ताजातवाना झाल्यावर तो निरंजना नदीकाठी गेला बरेच दिवसात स्नान केले नव्हते. वाटेत स्मशान लागले. चार पाच दिवसांपूर्वी एक प्रेत तेथे जाळायला आणले होते. ते प्रेत झाकलेले वस्त्र शेजारी एका झुडुपावर पडले होते. ते उचलले. नदीकाठावर ते स्वच्छ धुतले नि वाळत टाकले. पाण्यात स्नानासाठी उतरला. पाणी थंडगार होते. त्याला एकदम तरतरी आली, उत्साह वाटू लागला. कातडीला पाण्याचा स्पर्श आनंददायी वाटला. दगडाच्या कपरीने सर्वांग घासून काढले. सर्व मळ निघून गेला शरीराचा नि मनाचाही. नवे वस्त्र तोपर्यंत वाळले होते. ते अंगाभोवती लपेटले; जुने वस्त्र पाण्याच्या प्रवाहात सोडून दिले.

नदीच्या काठावर चढताना तो अशक्तपणाने कोसळला. स्नानविधी बरा वाटला. पण त्यासाठी आवश्यक असणारी ताकद राहिली नव्हती. कसाबसा उठला नि नेहमीच्या झाडाखाली येऊन ध्यानाला बसला. चिंतन करताना त्याला प्रश्न पडला की, शरीर क्लेशाला धर्म म्हणायचे का? ज्याची शक्ती नष्ट झाली आहे, भूक तहान आणि थकवा यांनी जो गळून गेला आहे, थकव्यामुळे ज्याचे मन शांत राहिलेले नाही त्याला नवा प्रकाश कसा प्राप्त होईल? मनाच्या मदतीने ध्येय साध्य करायचे असेल तर अशांत शरीर नि मन ते कसे साध्य करू शकेल? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी होती.

**<u>सुजाता</u>**

त्यादिवशी एक वेगळी गोष्ट घडली. उरुवेला येथे सेनानी नावाचा एक गृहस्थ होता. त्याला सुजाता नावाची एक मुलगी होती. तिने वटवृक्षाला एक नवस केला होता. तिची इच्छा पूर्ण झाल्यावर तो नवस फेडण्यासाठी वनात योग्य जागा शोधण्यासाठी तिने पन्ना नावाच्या दासीला पाठवले. नदीजवळच्या एका वटवृक्षाखाली बसलेला तपस्वी तिने पाहिला नि ती सुजाताकडे परत गेली. तिने सांगितले की 'वनदेवता वृक्षाखाली अवतरली आहे.'

सुजाता आली आणि तिने स्वतः दुधात शिजवलेली भाताची खीर, कमळाची फुले आणि गोड पदार्थ आणला होता. सुजाताने डोळे उघडे पर्यंत वाट पाहिली. डोळे उघडल्यावर

सोन्याच्या पात्रातून त्याला खीर खायला दिली. ती त्याने घेतली, पुन्हा तिने त्या पात्रात खीर ओतली. त्याला थोड्या वेळाने उत्साह वाटला, शक्ती आली. गोड पदार्थही त्याने खाल्ला. थोडे पाणी प्याला. त्यापूर्वी बोलायलाही त्राण नव्हते. आता काही वेळानंतर तो सुजाताशी बोलला. तिला सांगितले, ''मी माणूसच आहे कोणी वनदेवता नाही.'' तिचे आभार मानले. आशीर्वचन बोलला.

त्यानंतर सुजाता कधी कधी त्याच्यासाठी अन्न घेऊन येई. एकदा तिने गावातला न्हावी पाठवला. तो स्वच्छ झाला. आता त्याने थोडा दिनक्रम बदलला. दररोज निरंजना नदीत तो स्नान करू लागला. वेदांनी, शास्त्रांनी घातलेले दंडक त्याने मोडले. स्वतःच सत्याचा शोध घ्यायचा निर्णय घेतला. स्वतःच्या अनुभवातून आलेल्या यशा-अपयशाचा शोध घेतला. शरीर आणि मनाच्या संगोपनातून ध्यान अधिक शांतिपूर्ण बनत गेले. भावनापासून पळून जाण्याचा प्रयत्न सोडून दिला. पिंडी ते ब्रम्हांडी म्हणजे काय हे समजू लागला. वेदांनी सांगितलेले आत्म अस्तित्व हा भ्रम आहे हेही समजले. नव्या जाणिवा प्रगट होऊ लागल्या. आंतरिक जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. वीज आकाशात चमकावी तसे नवे विचार मनाच्या आकाशात चमकले.

इकडे त्याच्या पाच सहकाऱ्यांनी नदीकाठी अन्न ग्रहण करताना त्याला पाहिले. त्याची प्रकृती थोडी सुधारल्याचे त्यांच्या लक्षात आले. सुजाता सारख्या तरुण मुलीबरोबर बोलताना पाहून त्यांच्या कपाळाला आठ्या पडल्या. कोंडानाने त्याला ऐकू येईल अशा आवाजात इतरांना सांगितले, ''अरेरे गौतम पदभ्रष्ट झाला! त्याने वैराग्याचा त्याग केला. मोक्षाचा मार्ग वाटेतच सोडला. आता तो भिक्षेवर शरीर पोसायला लागला आहे. आता त्याच्याबरोबर राहाण्यात मजा नाही. आपण येथून निघून जाऊ. त्याने आमची घोर निराशा केली आहे.''

सिद्धार्थला त्याचे वाईट वाटले. पण त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला नाही. त्याने विचार केला 'मी मार्ग सोडलेला नाही. मला ज्ञानप्राप्ती झाल्यावर तो अनुभव त्यांना सांगेन.' नव्या खजिन्याची किल्ली आता त्याला गवसली होती. सिद्धार्थ स्वःताशी ठाम होता.

एके दिवशी सुजाताने खीर आणलेले पात्र निरांजना नदीत फेकून तो म्हणाला, ''जर मला ज्ञानप्राप्ती होणार असेल तर हे पात्र प्रवाहाच्या वरच्या दिशेने जाऊ दे! नसेल तर खालच्या दिशेने जाऊ दे!'' आणि ते पात्र प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वाहू लागले आणि काळ नावाच्या नागराजाच्या निवास स्थानाजवळ ते बुडाले. सिद्धार्थने त्याचा अर्थ असा काढला की, ''आजपर्यंत चालत आलेल्या रूढ धर्म प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने आपल्याला ज्ञानप्राप्तीनंतर कार्य करावे लागेल.''

□□□



## साक्षात्कार

त्याच्या सोबत राहणाऱ्या पाच सहकाऱ्यांनी साथ सोडली होती. जागृतीची पहाट आली होती. आता नवे सहकारी बनले होते. जंगल, नदी, पक्षी, पृथ्वीवर राहणारे हजारो-लाखो जीव हे त्याचे सख्खे सोबती बनले होते. पिंपळ वृक्ष हा त्याचा सांगाती होता. सूर्यास्तानंतर दिसणारी शुक्राची चांदणी परिचित बनली होती. रोज रात्री एक जागृती अनुभवत होता. त्यातच त्याला दृष्टांत झाला. ते नेहमीसाखे स्वप्न नव्हते.

एका स्वप्नात तो एका कुशीवर पहुडला होता. त्याचे गुडघे हिमालयाशी घासत होते. त्याचा डावा हात पूर्व समुद्राला स्पर्श करीत होता. उजवा हात पश्चिम समुद्राला स्पर्श करीत होता. दक्षिण समुद्राला त्याच्या दोन्ही पायाची बोटे स्पर्श करीत होती.

दुसऱ्या स्वप्नात बैलगाडीच्या चाकाएवढे कमळ त्याच्या नाभीतून निघून विस्तारत गेले. ते इतके उंच आकाशात गेले की, आकाशात सर्वांत उंच अंतरावरून वाहणाऱ्या ढगांना ते स्पर्श करीत होते.

तिसऱ्या स्वप्नात रंगीबेरंगी, असंख्य पक्षी सर्व दिशांनी त्याच्या बाजूने उडत आले.

ही सारी स्वप्ने त्याला सुचिन्ह वाटत होती. महाजागृतीची ती पहाट होती. ज्या क्षणाची वाट तो पाहत होता, तो नजीक आला होता. तो पद्मासनात बसला होता. दूरवर संथपणे वाहणारी नदी दिसत होती. तिच्या काठच्या गवतातून गार वारे वाहत होते. वाऱ्यामुळे गवताची पाती डोलत होती. जंगल शांत होते. पण त्यात सजीवता होती. रातकिड्यांचा आवाज घुमत होता नि सर्वत्र काजवे चमचमत होते.

त्याने चित्त अंतर्मुख केले. डोळे मिटले नि तो अंतरंगाच्या गुहेत खोल- खोल बुडून गेला. त्याचवेळी त्याची जाणीव विस्तारली होती. तिने आता आपल्या कवेत सजीव, निर्जीव साऱ्या-साऱ्यांना सामावून घेतले होते. त्याच्या श्वासोच्छ्वासात सारे वितळून गेले होते. भूत नि भविष्य दोन्ही काळांच्या जाणीवा वर्तमानात वितळल्या होत्या. त्याचे मागील सारे जन्म क्षणमात्रात त्याला कळून चुकले. अनेक जन्म, अनेक मृत्यूंचा चित्रपटच समोर उभा ठाकला. त्या जीवनातील सुख-दुःखांची अनुभूती तो घेऊ लागला. असे एक सारे ब्रह्मांड सामावलेले, स्थल-काल वितळलेला विलक्षण वर्तमान त्याने अनुभवला!

हे सारे विश्वरूप दर्शन होते. पण त्याला कोणता मानवी चेहरा नव्हता की वेदात वर्णन केलेल्या कोणत्याही देवतेचा चेहरा नव्हता. ही एक प्रचंड जागृतावस्था होती. त्याची जाणीव, चेतना आता केवळ 'सिद्धार्थ गौतमच्या' शरीर-मनापुरती मर्यादित नव्हती. त्याच्या पेशी-पेशींत ज्ञानामृत भरलेले होते. तो रात्रीचा पहिला प्रहर होता.

अनुभवाची व्याप्ती आणि गहराई वाढतच होती. असंख्य ग्रह-तारे विलय पावत होते. एकमेकांत मिसळून जात होते आणि नव्याने जन्मत होते. चराचरात चाललेला जन्म-मृत्यूचा खेळ हे स्वरूप अभूतपूर्व होते. समुद्राच्या पृष्ठभागावर क्षणाक्षणाला नवनव्या लहान मोठ्या लाटा निर्माण होतात नि दुसऱ्या क्षणाला त्या विरून जातात. यात जन्मही आहे आणि मृत्यूही आहे. तो लाटांना असतो सागराला नाही. सागर जन्म-मृत्यूच्या पलीकडे आहे. जेव्हां लाटांना ज्ञान होईल, असा साक्षात्कार होईल की, त्या लाटा नाहीत, त्यांचे खरे स्वरूप समुद्र आहे, अथांग सागर आहे तेव्हा त्याच क्षणाला त्या जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त होतील. या जाणिवेमुळे तो जन्म-मृत्यूच्या चक्रापलीकडे पोहोचला होता.

याचक्षणी आकाशात विजांचा कडकडाट झाला नि विजेचा लोट पृथ्वीकडे आला. साऱ्या दशदिशा प्रकाशित झाल्या. सिद्धार्थची हृदयगुंफाही प्रकाशित झाली. ज्ञान हाच प्रकाश असतो. त्याच वेळी मुसळधार पाऊस सुरू झाला. तो पुरता भिजून गेला. जलधारा बरसत होत्या. जणू आकाशाचा तो आशीर्वादच होता. अज्ञानच साऱ्या दुःखाचे मूळ कारण आहे याचा त्याला साक्षात्कार झाला. दुःख निवारण्याची गुरुकिल्ली सापडली. ज्ञानामुळेच अज्ञानी जगाची दया येते त्याबद्दल करुणा वाटू लागते. जगामध्ये दुःख आहे आणि ते कसे नाहीसे करावे व मानव जातीला कसे सुखी करावे हे गूढ कोडे त्यादिवशी त्याला सुटले.

पण ही प्रक्रिया एका दिवसाची नव्हती. त्याला चार आठवडे ध्यानमग्न राहावे लागले आणि चार पायऱ्यांनी संपूर्ण ज्ञान प्राप्ती करून घ्यावे लागले. दुःख नाहीसे करण्याचे उत्तर होते-सम्यक संबोधी (खरी ज्ञानप्राप्ती).

## बुद्धत्व

पहाट झाली होती. एकच शुभ्र तारका हिऱ्याप्रमाणे चमकत होती. पूर्वेला अंधूक प्रकाश हळूहळू पसरत होता. तशी ती तारका, तसा तो संधिप्रकाश त्याला नवा नव्हता. पिंपळाच्या झाडाखाली बसून ते दृश्य त्याने अनेकवेळा पाहिले होते. पण ही पहाटच अद्वितीय होती. ज्ञानाच्या प्रकाशामुळे ती उजळली होती.

त्याने स्वतःशीच संवाद साधला तो शब्दावीण संवाद होता. साऱ्या प्राणिमात्रांच्यामध्ये,



चराचरात प्रकाशित होण्याचे, ज्ञानाचा प्रकाश अनुभवण्याचे बीज लपलेले आहे. आणि हेच आश्चर्य आहे. तरीपण आम्ही सारे जन्म-मृत्यूच्या सागरात हजारो वर्षे बुडून गेलेलो आहोत.

त्याला पूर्णपणे कळले की, त्याच्यासमोर प्रकाशाने उजळलेला नवा मार्ग खोलला गेला आहे. हृदयात पूर्ण शांती अवतरली आहे, प्रगट झाली आहे. त्याला इप्सित साध्य झाले होते. यापूर्वी किती वर्षे त्याने यशापयशाच्या दऱ्या पार केल्या होत्या. शोध लावला तर तो तळागाळातल्या माझ्या माणसांना, माझ्या घरच्यांना, माझ्या प्रजाजनाला, शेतकऱ्यांना, साऱ्यांना सांगेन असे त्याने अभिवचन दिले होते याची आठवण झाली. त्यांना दुःखापासून, वेदनांपासून मुक्त करण्यासाठी त्याच्या हृदयात अपार करुणा दाटली होती. एक निरपेक्ष प्रेमाचा जिवंत झरा उगम पावला होता. थोड्या वेळात सूर्योदय झाला. सोनेरी कोवळी किरणे नदीच्या प्रवाहावर, गवताच्या कुरणावर पसरली होती. छोटी, छोटी रंगीबेरंगी फुले उमलत होती. सूर्य पाण्यावर चमकत होता नि पाना-फुलांसंगे नाचत होता. नव्याने साऱ्या वस्तू प्रकटल्या आहेत असे भासत होते. वर निळेभोर आकाश नि त्या पार्श्वभूमीवर तरंगत जाणारे पांढरे शुभ्र ढग दिसत होते. जणू सारे जग नुकतेच जन्मले होते.

आजूबाजूच्या खेड्यांतली गुराखी मुले नदीकाठी जनावरांना चरायला घेऊन आली नव्हती. फक्त अभि होता. तो त्याच्याकडे पाहून थबकला. डोळे विस्फारून पाहताना पाहून त्याने विचारले 'अभि!' तो भानावर आला. तो आज असे का बघतो नि का भांबावला आहे हेच त्याला समजत नव्हते. तो म्हणाला, ''शाक्यमुनी आज मला तुम्ही वेगळेच दिसायला लागलात. काल मी तुम्हाला पाहिले, दररोज पाहतो, पण आज तुम्ही वेगळेच आहात. कालचे आज नाही हे निश्चित.''

सिद्धार्थने त्याला जवळ बोलावून विचारले, ''मी आजच वेगळा तुला का वाटायला लागलो?'' तो म्हणाला, ''का ते कळत नाही; पण वेगळे दिसता एवढे खरे, आज आकाशतल्या चांदण्यासारखे दिसता.''

''पण अभि, आज तू लवकर का आलास नि बाकीचे गुराखी कोठे आहेत?''

यावर त्याने सांगितले, ''काल रात्री विजा चमकत होत्या. वीज कडाडली नि धो-धो पाऊस पडला. आमच्या घरच्या साऱ्यांनाच तुमची आठवण आली. तुम्ही कोठे असाल? म्हणून उठल्या उठल्या पाहायला आलो.''

सिद्धार्थने त्याला घरी जाण्याचा सल्ला दिला नि सूर्यप्रकाशाने न्हालेल्या नदीकाठाला फिरू लागला. दुपारी सुजाता त्याच्यासाठी खाण्याचे पदार्थ घेऊन आली. त्यावेळी तो

पिंपळाच्या झाडाखाली आनंदी, प्रसन्न भावात बसला होता. सुजाताही हसतमुख होती. ती वंदन करून म्हणाली, ‘‘तथागत, आज तुमच्या दर्शनाने माझ्या साऱ्या चिंता, दुःख, प्रश्न कोठल्या कोठे उडून गेल्यासारखे वाटते. मन हलकं हलकं वाटतं. आज पृथ्वीवरचे मला कोणी काहीही मौल्यवान देतो म्हटले तरी मला नको! मी खूप खूप आनंदी आहे. आज पिंपळाच्या झाडाचा परिसरच दैवी शक्तीने भारल्यासारखा वाटतो आहे.’’

त्याने सुजाताला जवळ बोलावले. गेले काही महिने ती त्याला शरीर पोषणासाठीचा उत्तम आहार देत होती. त्याने तिला सांगितले, ‘‘आजचा दिवस माझ्या जीवनातला सर्वोतम दिवस होय. मला लाभलेला ज्ञानाचा प्रकाश यापुढे साऱ्यांना वाटायचा आहे.’’ यावर सुजाताने आश्चर्याने विचारले, ‘‘म्हणजे तथागत तुम्ही येथून निघून जाणार? आम्हाला सोडून तुम्ही चाललात?’’

तो हसला, ‘‘होय सुजाता, मला जायला हवं. पण मी तुम्हाला कधीही सोडणार नाही, विसरणार नाही. मला जे समजले ते ज्ञानभांडार तुम्हाला दिल्याखेरीज मी जाणार नाही. अजून काही दिवस येथे राहीन आणि समजा दूर निघून गेलो तरी पुन्हा तुम्हा साऱ्यांना भेटायला निश्चित येईन.’’

यावर सुजाताला बरे वाटते. तिने केळीच्या पानात गुंडाळून आणलेला ताजा भात आणि भांड्यातील सार त्याला दिले. तो जेवेपर्यंत ती शांतपणे बसून होती. जेवणानंतर त्याने तिला गावात परतायला सांगितले. जाताना तिच्यासाठी एक गाथा म्हटली.

‘‘तं वो वदामि भद्दं
वो यावन्तेत्य समागता
तद्दांय मूलं खणथ
ऊसीरत्थो व बीरणं
मा वो नलं व सोतो व
मारो भंजि पुनप्पुनं।।’’

तुझ्या कल्याणासाठी उपाय सांगतो, ‘‘तुझ्या जीवनातील तृष्णा तुला वारंवार विनाशाच्या मार्गाने घेऊन न जावो.’’

ज्या झाडाची मुळे जमिनीत खोलवर रुजलेली असतात ते झाड कापले तरी त्याला पालवी फुटते. त्याप्रमाणे अति सूक्ष्म रूपातील तृष्णा नाहीशी न झाल्यामुळे वारंवार सांसारिक दुःख भोगावे लागते.



दुसऱ्या दिवशी सुजाता आली. हात जोडून म्हणाली, ‘‘मला थोडं सांगायचं होतं. तथागत!’’

त्याने मानेने होकार दिला. ‘‘जागृतीमुळे ज्ञान मिळते. तुम्हाला जीवनाच्या सर्वांगाविषयी जागृत झालेला साक्षात्कारी मुनी असं म्हटले तर चुकीचे नाही ना होणार?’’

त्याने तिचे बोलणे शांतपणे ऐकले. ती पुढे म्हणाली, ‘‘मागधी भाषेत जागृतीचा उच्चार बुद्ध असा करतात. जो मनुष्य जागृत बनला आहे, साक्षात्कारी बनला आहे त्यालाच मागधी भाषेत बुद्ध म्हणतात. त्यामुळे तुम्हाला यापुढे आम्ही बुद्ध म्हटले तर चालेल का?

त्याने होकार दिला.

सुजाताबरोबर आलेला १४ वर्षांचा नल उठून म्हणाला, ‘‘वंदनीय बुद्धा! तुमच्याबद्दल सुजाताने आम्हाला सारे सांगितले आहे. गेले सहा महिने या पिंपळाच्या वृक्षाखाली तुम्ही कसे ध्यान करीत होता; त्यापूर्वी किती कठोर तपश्चर्या केलीत व काल तुम्हाला कसे ज्ञान प्राप्त झाले तेही सांगितले. या सुंदर, भाग्यवान वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली म्हणून यापुढे या वृक्षाला आम्ही बोधीवृक्ष म्हटले तर चालेल?’’

त्याने होकार दिला.

अंधार पडू लागला. साऱ्यांनी निरोप घेतला. पण जाताना ते म्हणाले, ‘‘उद्या पुन्हा येणार आहे. तुमचा उपदेश ऐकायला. आम्हाला मार्गदर्शन करा. तुम्ही एकदा येथून निघून गेल्यावर काय उपयोग?’’

त्यालाही आश्चर्य वाटले. निरागस मुलांनी नि निष्पाप सुजाताने त्याला विशेषणे एखाद्या सुगंधी फुलाप्रमाणे बहाल केली. त्याच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातही जागृतीची पहाट आली होती. ती त्यांना दुःखमुक्त करून शांतीचा, सुखाचा मार्ग दाखवणार होती.

□□□

# धर्मोपदेश करावा की नको?

तो तेथून निघून जाणार म्हटल्यावर सुजाताने तिच्या मैत्रिणीच्या मदतीने त्याच्यासाठी एक चीवर (भिक्खूंचे वस्त्र) शिवले होते. ध्यानातून उठल्यावर तिने त्याला ते अर्पण केले. तिला जेव्हा कळले की त्याने प्रेत झाकण्यासाठी वापरलेले वस्त्र स्मशानातून आणले होते. त्यावेळी तिला खूप वाईट वाटले होते. दुसऱ्या दिवशी नवे वस्त्र त्याने घातले. सकाळी हवा थंड व शांत होती. तो अभिच्या झोपडीपाशी आला. साऱ्या गुराखी मुलांचा त्याने निरोप घेतला. सारेजण सुजाताच्या घरी आले व तिचा निरोप घेतला. तेव्हा तिला रडू कोसळले. गौतम बुद्धांनी तिची समजूत काढली.

''सुजाता! मला ही जागा सोडावीच लागणार आहे. राजा बिंबिसार, कपिलवस्तू नगरीतील लोक, कोंडाना व चार सहकारी यांनाही मला भेटायला हवे. मी पुन्हा येऊन तुम्हाला भेटेन.'' गावच्या वेशीपर्यंत बरेच लोक निरोप द्यायला आले. त्याचवेळी वाटेत एक तपस्वी भेटला. त्याने हात जोडून विचारले, ''हे मुनी! तुमचे नाव काय? तुम्ही कोणाचे शिष्य आहात? तुमचा तेजःपुंज चेहरा बरेच काही सांगून जातो.'' त्याला सांगितले, ''माझे नाव सिद्धार्थ गौतम, मी अनेक तपस्यांच्याकडे, साधूंकडे शिकलो पण माझा गुरू कोणी नाही. तुमचा परिचय काय?'' यावर त्याने सांगितले ''माझे नाव उदक. मी अलिकडेच 'उदक रामपुत्र' यांचा आश्रम सोडून निघालो आहे.''

त्यांची खुशाली विचारली.

त्यावर त्याने काही दिवसांपूर्वी ते समाधिस्त झाल्याचे सांगितले. सिद्धार्थने त्यांना कालाम ऋषी बाबत विचारले. यावर त्याने त्यांचेही अलीकडे निधन झाल्याने म्हटले. पुन्हा त्याला विचारले, उदकाचा शिष्य कोंडानाला ओळखता का? यावर त्याने सांगितले, ''होय. ते आणि चार तपस्वी वाराणसी जवळच्या सारनाथला आहेत.''

यानंतर त्या तपस्व्याने निरोप घेतला. त्याने अभि, सुजाता, सुबास यांना सांगितले, ''आता मी वाराणसीच्या दिशेने जाईन. निरंजना नदी गंगेला मिळते. त्या संगमाजवळून गंगा पार करेन नि वाराणसीला पोहोचेन.''

ऊन वाढत होते. साऱ्यांना घरी परतायला सांगून तो नदी काठाने पायवाटेने चिंतन



करीत निघाला. चिंतन करताना त्याच्यासमोर एक प्रश्न उभा राहिला, ''दुसऱ्यांना नव्या धर्माचा उपदेश करावा की, स्वतःची व्यक्तिगत पूर्णावस्था नि त्याच आनंदात राहावे. मला ज्ञान प्राप्त झाले हे सर्वसामान्य माणसाला कळेल का? त्यानंतर ज्ञान जीवनात उतरवणे ही बाब आणखी कठीणच आहे. सर्वसामान्य माणसावर यज्ञ, पूजापाठ, देव-देवता, स्वर्ग नरकाच्या कल्पनांचा वर्षानुवर्षे इतका प्रभाव पडला आहे की त्यातून मी एकट्याने सांगून ते बाहेर पडतील काय?''

बरे मी आत्मा मानीत नाही, हे सांगूनही लोकांना पटणार नाही. शिवाय मानवी स्वभावाची काही वैशिष्ट्ये आहेत. तो स्वार्थी आहे. त्यातच त्याला भौतिक सुखे मिळतात. मग त्याला त्याग, सदाचार, शील यांचा उपदेश कसा पटणार?''

''शील सांभाळा असे सांगणे सोपे पण कामवासनेचा इतका प्रभाव मानवावर आहे की तो त्याला टाळणे सोडा, संयमित करणे देखील कठीण. वैवाहिक जीवन जगणारे ऐकणार नाहीत. तरुणांच्या लक्षात त्याचे महत्त्व येणार नाही, मग नव्या धर्माचा लाभ कोणाला होणार?'' तो दिवसभर चालत होता. रात्री एका झाडाखाली थांबला. रात्री त्याला विलक्षण स्वप्न पडले. त्यात एक श्रमण त्याच्याजवळ येऊन सांगू लागला,

''गौतमा तू निष्क्रीयतेकडे तर वळत नाहीस ना? तू पर्वत शिखरावर उभा आहेस. तुझ्याभोवती खाली उभ्या असणाऱ्या लोकांकडे जरा बघ. प्रज्ञेच्या शिखरावर उभा राहून तुला दुःखाच्या सागरात बुडालेले लोक दिसत नाहीत काय?''

''जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून तू मुक्त झालास, तू विजयी झालास. पण जगाकडे पाठ फिरवून नकोस. ऊठ जगाकडे जा. करुणा बुद्धीने त्यांना सद्धर्माची शिकवण देण्याचा निश्चय कर. जगापासून पळून जाणे व्यर्थ आहे. त्यापेक्षा जग बदलण्याचा, परिवर्तन करण्याचा निर्णय घे.''

तो सकाळी जागा झाला. नदीमध्ये स्नान केले आणि नवा निश्चय त्याच्या मनात जन्मला. ''आपल्या सिद्धांताची शिकवण साऱ्यांना द्यायची. पृथ्वीवर, सदाचाराचे राज्य प्रस्थापित करण्याचे त्याने ठरवले.'' शांती देणाऱ्या निब्बाणाची शिकवण द्यायचा निश्चय केला.

तो वाराणसीच्या दिशेने चालला होता. त्याच्या पायांना गती लाभली होती. चालता चालता तो ज्ञानप्राप्तीपर्यंतच्या, बुद्धत्वापर्यंतच्या पायऱ्यांचा विचार करू लागला. मी नेमके काय केले? इतरांना कोणती आर्य सत्ये सांगावीत? कोणत्या अंगाने धर्माचा उपदेश करावा? असे प्रश्न त्याच्या मनात उभे राहिले व तो आत्मचिंतन करू लागला.

१. जीवनाच्या पहिल्या अवस्थेत स्वतःच विचार करू लागला की, त्यामुळे ढगातून बाहेर पडलेल्या चंद्राप्रमाणे माझे मन प्रकाशित झाले. त्यामुळे मला आनंद झाला आणि सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाची तीव्र तळमळ लागली.

२. दुसऱ्या अवस्थेत कामविकारावर मी विजय मिळवला. त्याचा परिणाम चित्त दयाशील बनले. लोकांच्या दुर्गुणांची खुशामत केली नाही किंवा सद्‌गुणाविषयी दुर्लक्ष केले नाही.

३. तिसऱ्या अवस्थेत मला प्रभाकारी (तेजस्विता) प्राप्त झाली. माझी बुद्धी आरशाप्रमाणे स्वच्छ झाली. आता फक्त सर्वोच्च ज्ञान मिळवण्याची इच्छा राहिली होती त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी झाली होती.

४. माझ्या जीवनाच्या चौथ्या टप्प्यातः (अर्चिष्मती) अग्नीप्रमाणे तेजस्वी बुद्धी अशी प्रज्ञा लाभली. त्यावेळी पंचशील, अष्टांग मार्गाचा मला बोध झाला.

५. पाचव्या अवस्थेतः सापेक्ष, निरपेक्ष यांच्यातील संबंधाचे पूर्ण ज्ञान झाले.

६. सहाव्या अवस्थेतः अभिमुखी म्हणजे पदार्थांची उत्क्रांती आणि तिची कारणे, बारा निदाने समजली. या ज्ञानामुळे अविद्येने अंध झालेल्या सर्व प्राणिमात्रांविषयी माझ्या अंतःकरणात अगाध करुणा उत्पन्न झाली.

७. सातव्या अवस्थेतः मी दूरङ्गमा म्हणजे स्थल-कालातीत अवस्थेत गेलो. दिक्कालातीत बनलो. अनंताशी एकरूप होऊनही चिखलातील कमलपत्राप्रमाणे संसारात राहू शकलो. अनासक्ती, अलिप्तता प्राप्त झाली की या अवस्थेत सहनशील राहून झालेले धर्मज्ञान सोप्या भाषेत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवू शकलो.

८. आठव्या अवस्थेतः जीवनात सहजता आली, कष्ट संपले. जे शुभ, चांगले ते स्वाभाविकपणे आचरले जाऊ लागले. जी गोष्ट करेन ती यशस्वी होत गेली.

९. जीवनाच्या नवव्या अवस्थेतः साधुमती बनलो. सर्व शास्त्र, सर्व दिशा यांचे पूर्ण आकलन झाले. ही कालातीत अवस्था प्राप्त झाली.

१०. जीवनाच्या दहाव्या अवस्थेतः धमनेध बनलो. दिव्यदृष्टी प्राप्त झाली. या दहा सामर्थ्यांच्या प्राप्तीनंतरच बुद्धत्व प्राप्त झाले. या दहा पारतितता म्हणजे बोधीसत्त्वाच्या जीवनातील बुद्ध हा कळस होय.

## धम्मचक्र प्रवर्तन

सिद्धार्थला प्रथम वाटले होते की ज्यांच्या आश्रमात तो ध्यान शिकला त्या दोघांना



आपली ज्ञानाभूती सांगावी. केवळ ते दोघेच समजु शकतील. पण गयेपासून वारासणीसकडे चालताना वाटेत त्याला समजले की ते दोघेही समाधिस्त झाले आहेत. बुद्धांना समजले की आपल्या कठोर तपश्चर्येच्या काळात आपल्याबरोबर असणारे पाच मित्र आता सारनाथला राहतात. सिद्धार्थने उपवास सोडला नि अन्न ग्रहण केले. त्याचा अर्थ सिद्धार्थचा तपोभंग झाला तो पथभ्रष्ट झाला असा त्यांनी केला होता. त्यामुळे ते त्याला सोडून गेले होते. सिद्धार्थच्या मनाच्या सखोल गाभाऱ्यात त्या पाच मित्रांबाबत प्रेम नि विश्वास होता. आपली ज्ञानाभूती समजण्यास तेच योग्य आहेत असे त्याला वाटले. गयेपासून वाराणसीकडे मजल दरमजल करीत सिद्धार्थ चालत होता. त्याला छोट्या वाड्या वस्त्यांतून प्रेमाची, आदराची वागणूक मिळत होती. पण अजून त्याची भूमिका उपदेशकाची नव्हती. त्याचे मौनही त्या खेडुतांना बोलके वाटायचे. भाताची हिरवीगार खाचरं, त्यावर पडलेले ऊन कधीकधी आकाशातील इंद्रधनुष्य त्याला एका वेगळ्या भावविश्वात घेऊन जात होते. त्यावेळी आठवड्याने ज्ञानी सिद्धार्थ मृगवनात (इसिपाटना) येथे पोहोचला. त्या पाच तपस्व्यांनी सिद्धार्थला त्यांच्या दिशेने येताना दूर अंतरावरून पाहिले. ते एकमेकाशी म्हणाले, ''तो पाहा तपस्वी गौतम आपल्याच दिशेने येत आहे. त्याने आपला कठोर तपस्येचा मार्ग सोडला होता. स्वतःच्याच मनाप्रमाणे तो भरकटत चालला आहे. आपण सारेजण त्याला कोणत्याही प्रकारची आदराची, पूज्यभावनेची वागणूक द्यायची नाही. तो समोर आला तरी आदराने उभे राहून स्वागत करायचे नाही. व त्याचे भिक्षापात्र आपल्या हाती घ्यायचे नाही; त्याचा दंड, झोळीही घ्यायची नाही. फारतर बसायला आसन देऊ वाटले तर तो त्यावर बसेल.''

पण जसा जसा हा ज्ञानी गौतम जवळ जवळ येऊ लागला तसतसे त्याच्या ज्ञानसागराच्या लाटात या पाचही तपस्व्यांचा निश्चय विलीन झाला नि त्याच्या ज्ञानाच्या स्पंदनाच्या वादळात तेच स्वतःला हरवून गेले. सारे उठले. एकजण पुढे गेला, गौतम बुद्धाचे भिक्षापात्र घेतले, दुसऱ्याने झोळी घेतली. तिसऱ्याने आसन तयार केले चौथ्याने हातपाय धुण्यासाठी पाणी आणले. सर्वांनी त्याचे अगत्याने स्वागत केले.

गौतम बुद्ध शांतपणे आसनस्थ झाले. पाच तपस्वी त्यांना म्हणाले, ''हे मित्रा कसा आहेस? सर्व कुशलमंगल आहे ना?'' यावर गौतम बुद्धांनी त्यांना समजावून सांगितले, ''हे तपस्व्यानो आता मला मित्र म्हणून संबोधू नका. कारण मी आता ज्ञानीगौतम आहे. म्हणून गौतम बुद्ध म्हणा. तुमची मने पूर्वग्रहदूषित ठेवू नका. आता ऐका. मृत्यूला जिंकणारे रहस्य मी शोधले आहे. मी तुम्हाला धम्ममार्ग दाखवू शकतो. त्या मार्गाने गेलात तर ज्या ज्ञानप्राप्तीसाठी, साक्षात्कारासाठी तुम्ही घर-दार सोडून तपस्येच्या मार्गावर आहात ते ज्ञान प्राप्त होईल. धम्म

मार्गाचे अंतिम ध्येय तुम्हाला प्राप्त होईल. आता या जन्मातच तुम्हाला ध्येयप्राप्ती होऊ शकेल.''

गौतम बुद्धांचे हे स्वानुभूतीपूर्व, आत्मविश्वासपूर्वक संभाषण ऐकल्यावर पाचही तपस्व्यांच्या पूर्वग्रहाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या, तरीपण एकाने संशय व्यक्त केलाच.

''हे सिद्धार्थ गौतम हे तू काल्पनिक तर सांगत नाहीस ना?'' यावर गौतम बुद्धांनी विचारले, ''हे तपस्वी मी या आयुष्यात तुमच्याशी कधी खोटे बोलल्याचे तुम्हाला स्मरते काय?''

''कधीही नाही.''

''मग आज मी का बोलेन?''

यावर तो तपस्वी म्हणाला, ''हे गौतम तू मागेच कठोर उपवास सोडलास. तुझ्या मनाप्रमाणे तू वागू लागलास म्हणून तो पथभ्रष्ट झालास, अशी आमची समजूत झाली.''

यावर गौतम बुद्धाने विचारले, ''मी यापूर्वी असे आत्मविश्वासपूर्वक मार्गदर्शनाचे आश्वासन कधी दिले होते काय?''

''नाही.''

''मग आता खुल्या हृदयाने सत्याच्या सूर्याचे स्वागत करा. दोन अतिरेक टाळा. एक सुखोपभोगाचा नि कठोर शरीर-मन कष्टाचा. या दोहोंतील मध्यम मार्गाने वाटचाल करा. त्यामुळे शरीर, मन, प्रकाशित होईल व निर्वाण प्राप्ती होईल. हा मार्ग अष्टांगमार्ग होय.

योग्य ध्येय, श्रद्धा, वाणी, कृती, जीवशैली, प्रयत्न, विचार, एकाग्रता हा मध्यम मार्ग होय.

यासाठी चार आर्यसत्यांची धारणा पक्की करा.

१) दुःख हे आर्यसत्य आहे. पंचमहाभूताशी जोडलेले राहणे, आसक्त होणे हे दुःख होय.

२) दुःखाचा उगम तृष्णा आहे.

३) दुःख निवारण होते.

४) दुःख निवारण्याचा मार्ग म्हणजे अष्टांगमार्ग होय.

हे तपस्व्यांनो या मार्गाने मी गेल्याने मला बुद्धत्व प्राप्त झाले. तुम्हालाही होऊ शकते. मी जन्ममरणाच्या फेऱ्यातून आता मुक्त झालो आहे.

या पहिल्या प्रवचनानंतर पाचही तपस्वी बुद्धापुढे नतमस्तक झाले. ते बुद्धसंघाचे



पहिले पाच आधारस्तंभ ठरले. नि येथूनच धम्मचक्र प्रवर्तन सुरू झाले. आकाशातून देवताप्रगट झाल्या नि धम्मचक्र सुरू झाल्याने त्यांना आनंद झाला.

## पुन्हा परतण्याचा आग्रह

काशी नरेशकडून राजा शुद्धोधन याना समजले की त्यांचा राजपुत्र सिद्धार्थ सध्या वाराणशीत आहे. त्यांची आशा होती की तो आज ना उद्या परत येईल. त्यासाठी त्यांनी अनेक निरोप पाठवले, पण सिद्धार्थ परत आला नाही. शेवटी आता आपले वय वाढत निघाले आहे, राज्यकारभाराचा ताण सहन होत नाही नि नातू राहुल अजून लहान आहे. सिद्धार्थचे मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न म्हणून त्यांनी त्यांचा एक विश्वासू मंत्री व ब्राह्मण पुजारी यांना एक जबाबदारी दिली की, सिद्धार्थचे मन न दुखवता त्याला पुन्हा राजधानीत परतण्याचा आग्रह करा.

मंत्री आणि ब्राह्मण पुजारी दोघांनी सिद्धार्थ प्रवासात असतानाच त्याला गाठले. तो पायी निघाला होता. मागून घोड्यांच्या टापा ऐकू येऊ लागल्या. जवळ येताच ओळखले की, हे राजाचेच दूत आहेत. ते घोड्यावरून उतरले. वाकून मुजरा केला. मग ते एका विशाल वृक्षाच्या सावलीत बसले.

ब्राह्मण पुजारी प्रथम हात जोडून सांगू लागला, ''तथागत! आपण जाणताच की शाक्यांचा राजा आता वृद्ध झाला आहे. त्यांचा नातू अजून लहान आहे. त्यांच्या भावनांचा तुम्ही विचार करावा अशी विनंती आहे. तुम्ही घरी परत या अशी त्यांनी विनंती केली आहे. त्यांचे सांगणे आहे की, तुम्ही एकदा परत येऊन राज्यकारभार पाहू लागलात की मी सुखाने डोळे मिटेन. तुमची धर्माची ओढ त्यांना पुरेपूर माहीत आहे. तुम्ही किती दृढ संकल्पी आहात हेही राजा शुद्धोधन ओळखतात. कर्तव्यावर तुमचे प्रेम आहे. राज्यकारभार चालवणे हे राजपुत्राचे कर्तव्य आहे. त्याचे आपणाला स्मरण करून देण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत.

आपण वैदिक धर्माचा आदर करणारे आहात. त्यानुसार आपले वय संन्यास घेण्याचे नाही. शास्त्रानुसार योग्य वेळी गृहस्थाश्रम सोडू शकता. पण आज पुन्हा गृहस्थाश्रमी बनून आपल्या पित्याला, प्रजेला, आपल्या शाक्य जमातीला साऱ्यांना आनंदी बनवा.

राजा म्हणून उपभोग घ्या. धर्म साधनेसाठी अरण्यात जायलाच हवे असे कोठेही धर्मशास्त्राने सांगितलेले नाही. मनातले परिवर्तन म्हणजेच संन्यास. केवळ संन्यासी वस्त्रे वापरली म्हणून वैराग्य येत नाही. उलट आपल्यावरची जबाबदारी टाळणाऱ्याला स्वर्ग प्राप्ती होत नाही.

शिवाय आमचा तारक, संरक्षक, पितामह राजा शुद्धोधन व आपली आई, जिने आपणाला लहानाचे मोठे केले, ती राणी महाप्रजापती यांच्या मन, भावनांची जरादेखील फिकीर न करणे म्हणजे तुमच्यात करुणेचा, प्रेमाचा लवलेश नाही असेच सारी प्रजा समजेल. त्या सर्वांपेक्षाही तुमची प्रिय अशी तरुण पत्नी जिवंत आहे. पती जिवंत असताना एखाद्या विधवेप्रमाणे ती आपल्या पुत्राचे पालनपोषण करते आहे. ते याचसाठी की तुम्ही एक दिवस परत याल. त्या तुमच्या पुत्राचा राहुलचा विचार करा. आज ना उद्या राजा शुद्धोधनानंतर त्याचे काय होईल? त्याला शाक्याचे शत्रू राजा बनू देतील काय? का त्यालाही तुमच्याप्रमाणे रानावनात भटकावे लागेल?''

ब्राह्मण पुरोहित हुशार म्हणून ओळखला जात होता. त्याचे तर्कशास्त्र, विषयाची मांडणी करण्याची पद्धत समोरच्याला क्षणभर निःशब्द बनवित असे. त्याने त्याला सर्व बाजूंनी आवाहन करून गोंधळवण्याचा प्रयत्न केला. त्याच्या वैराग्याच्या अभेद्य किल्ल्यावर खूप प्रभावी भावनांचे तोफगोळे त्याने डागून पाहिले.

सिद्धार्थाने शांतपणे ब्राह्मण पुरोहिताला उत्तर दिले, ''हे ब्राह्मणा! तुझ्या भावनांचा मी आदर करतो. तू राजा, प्रजा, माझे आप्तगण यांचे हित चिंतणाराच आहेस. त्यामुळे तुझ्या बोलण्याने मला कोणतेही दुःख होत नाही किंवा क्रोधही येत नाही. तू माझी मनोभूमिका राजा शुद्धोधनाला सांग जेणेकरून त्यांचे दुःख कमी होईल.''

त्यांना उत्तरादाखल सांगितले, ''महाराजांचे माझ्यावरचे प्रेम व विश्वास मी जाणतो पण केवळ शाक्यच नव्हेत तर आजूबाजूच्या राज्यातील प्रजेलाही विविध दुःखांनी ग्रासलेले आहे. किंबहुना साऱ्या मानवजातीच्या दुःख नावाच्या आजारावरचे औषध मी शोधायला बाहेर पडलो आहे.''

''प्रत्येकाला प्रिय वस्तू, व्यक्ती यांचा आज ना उद्या वियोग हा होतच असतो. पिता-पुत्रांचा वियोग हा ठरलेलाच आहे. पण तुम्ही समजता तसा मी त्यांच्या दुःखाला कारणीभूत नाही. भविष्यात मृत्यू आम्हां दोघांना कायमचे दूर करणार आहे हे वास्तव ते नाकारू शकत नाहीत. ज्या विचाराने त्यांना दुःख होत आहे, हे समजून घेतलेत तर हे ब्राह्मणा! तुझ्या हे लक्षात येईल की, पुत्र किंवा नातलग हे एखाद्याच्या दुःखाचे कारण नसून अज्ञान हेच दुःखाचे मूळ कारण आहे. जर ज्ञानाच्या प्रकाशाने अज्ञानाचा अंधार दूर होत असेल तर ते ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न नको का करायला?

प्राणी गर्भ सोडतो, त्याचवेळी तो मृत्यूच्या दिशेने वाटचाल सुरू करतो. त्यामुळे परिवर्तन हा काळाचा गुणधर्म आहे हे आपण विसरुन चालत नाही. राज्य, राज्यकारभार हे



सारे आभासम आहे. त्यामुळे मला आता राजप्रासाद, मिष्टान्न भोजन, सुखोपभोग हे क्षणमात्राचे सोबती वाटतात.''

गौतम बुद्ध ब्राह्मण पुरोहिताशी बोलत असताना थोडेसे कौतुकमिश्रित पण शांत मनाने ऐकणारा मंत्री काहीतरी बोलू इच्छित होता. तो हात जोडून विनम्रपणे म्हणाला, ''शाक्य कुलदीपक राजपुत्र सिद्धार्थ! तुम्ही विरक्त माणसाच्या वेशात दिसत असला तरी आमच्या राज्याचे आधारस्तंभ आहात. आजही स्वतः राजा आणि आम्ही मंत्रिगण, सारी प्रजा तुम्हाला राजपुत्र सिद्धार्थ म्हणूनच ओळखतो. त्यामुळे मला क्षमा करा राजपुत्र! तुम्ही या ब्राह्मण पुरोहिताला जे सांगितले ते तर्कशुद्ध आहे. तुमचा निश्चय उत्तम आहे, तो योग्यही आहे पण तो योग्यवेळी घेतलेला नाही. राजपुत्रा! मी व्यवहारी आहे. मंत्री म्हणजे राजाचे डोळे. या डोळ्यांना दिसते ते सारे व्यवहारातले, दृश्य जगातले.'' मंत्री पुढे म्हणाला, ''हे राजपुत्रा! मी वैदिक ब्राह्मण नाही. त्यामुळे त्यांच्या स्वर्ग, नरकावर माझा विश्वास नाही. त्यांच्याप्रमाणे मी पूर्वजन्मही मानीत नाही. कर्तव्यापासून पळून जाऊन मला मुक्तीही नको व मोक्षही नको. आम्हा क्षत्रियांची मुक्ती रणांगणात. शत्रूशी लढता लढता आम्ही मोक्षाला पोहोचतो. त्यासाठी जप, ध्यान, योगाची गरज नाही.''

हे सिद्धार्थ! अग्नीचा उष्ण आणि पाण्याची शीतलता हे त्यांचे सहज स्वभाव आहेत. आपण शाक्य म्हणजे क्षत्रिय. आमचेही काही सहज स्वभाव आहेत, ते सोडून देणे याला कर्तव्य पालन कोण म्हणेल? उलट तो पलायनवाद आहे. जे कोणी पाहिले नाही त्या देवाच्या, स्वर्गाच्या मागे लागणे व्यर्थ आहे. निसर्गाने बहाल केलेल्या तारुण्याचा तुम्ही केलेला हा तिरस्कार आहे. कृपा करून हा अट्टाहास सोडा नि राजधानीत परत चला. आम्ही तुम्ही येणार म्हटल्यावर राज्यभर सर्वत्र आनंदोत्सव साजरा करू.

हे राजपुत्रा! तू कितीही तर्कशुद्धरीत्या आम्हाला सांगितलेस तरी तुझ्यावर पितृऋण आहे, मातृऋण आहे, प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारी आहे. पती नि पिता म्हणूनही काही कर्तव्ये आहेत ती पार पाडल्याशिवाय तुला मोक्ष कसा मिळणार? या ऋणातून मुक्त होतो त्यालाच मुक्ती मिळते.

म्हणून हे सुकुमारा! शाक्यांचा संरक्षक, मार्गदर्शक सिद्धार्थ! तुला जर असे वाटत असेल की अरण्यातून परत राजवाड्यात आलो तर लोक तुला दोष देतील पण ती चिंता सोड, कारण प्राचीन काळापासून काही जण परतले आहेत. राजा अंबरीश, द्रुमकेश, राम यांची उदाहरणे आहेत. त्यामुळे निश्चिंत मनाने परत फिर. चल आमच्या बरोबर राजाकडे, आजच चल!'' मंत्री बोलत होता ते प्रामाणिकपणे, त्याचे उद्गार राजनिष्ठ होते. त्यांची अपेक्षा होती की तो त्वरीत होकार देईल. पण त्याने ठामपणे उत्तर दिले,

''हे मंत्री महोदय! तुमचे राजनिष्ठ व प्रजाहितकारक मनोभाव पाहून मला आनंद झाला. तुमच्यासारखे मंत्रिगण असल्यावर राजा शुद्धोधनांनी राजा म्हणून व माझे पिता म्हणून मी काळजी करण्याचे कोणतेचे कारण उरत नाही.

तुम्ही म्हणता ते विचार माझ्या चिंतनाशी जुळणारे आहेत. मीही पूर्वजन्म, पुनर्जन्म स्वर्ग-नरक यांचा विचार करण्यात जीवन व्यर्थ घालवायला तयार नाही. कोणीही सुज्ञ माणूस न पाहिलेल्या स्वर्गाबद्दल, आत्म्याबद्दल काही तर्कवितर्क करू लागला तर त्याच्यावर एखाद्याने विश्वास ठेवावाच असे काही नाही. स्वतःच सत्याचा शोध घ्यावा. चिंतनाने सत्य निश्चित करावे, मग त्याचे आकलन करण्याचा प्रयत्न करावा व स्वतः सत्याचा अनुभव घ्यावा.

तुम्ही म्हणाल सत्य स्पष्टपणे समजले नाही तर काय कराल? मला वाटते सत्य स्पष्टपणे समजले नाही किंवा चांगले काय? वाईट काय? याविषयी संदेह असेल, तरी माणसाने आपले मन चांगल्या गोष्टीवरच केंद्रित करावे.

आणि घरी परतण्याविषयी म्हणाल तर मला जे साध्य करावयाचे आहे ते केल्याशिवाय परत फिरून इंद्रिय सुखोपभोगासाठी संसारी माणूस बनण्याची माझी इच्छा नाही.

मला माहीत आहे की पुत्र वियोगाने दुःखी बनलेल्या वृद्ध राजाने तुम्हाला माझ्याकडे मोठ्या आशेने पाठवले आहे. पण त्यांना प्रणाम सांगा नि क्षमा मागितल्याचेही सांगा.''

तो ब्राह्मण पुरोहित नि मंत्री त्याला वंदन करून अडखळत्या पावलांनी माघारी परतले नि तो वैराग्ययुक्त दृढनिश्चयाने पुढे चालू लागला. एका मोहमाया जाळीतून तो सहीसलामत सटकला होता. त्यामुळे त्याचे मन सत्‌चित आनंद सागरात पुन्हा मुक्तपणे एखाद्या विशाल माशाप्रमाणे संचार करू लागले. निश्चितच तो चूक करीत नव्हता, चुकीच्या मार्गाने जात नव्हता.

□□□



## सात वर्षानंतर

सारिपुत आणि मोगलान यांच्या दीक्षेनंतर गौतम बुद्ध दोन महिने राजगृहात राहत होते. तेव्हा पिताश्री राजा शुद्धोधनांनी निरोप पाठवला. तो भावनाप्रधान होता. 'मला मरण्यापूर्वी माझ्या मुलाला पाहण्याची माझी इच्छा आहे.' ते थोडे गंभीर बनले. क्षणभर साऱ्या भूतकाळाच्या स्मृती मनःपटलावर उभ्या राहिल्या. पिताश्रींनी, मातृवियोगानंतर मातेप्रमाणे प्रेम केले. राजवैभवात वाढवले. छोट्या मोठ्या इच्छा पूर्ण केल्या. एकुलता एक पुत्र पुढे राज्यकारभार करेल. शाक्यांचा राजा म्हणून पुढे चक्रवर्ती होईल अशी स्वप्ने बाळगली. त्यांना विश्वासात न घेताच परिव्राजक जीवनाचा निर्णय घेतला. त्यावेळीही त्यांना किती दुःख दिले. दुःख विमोचनाचा मार्ग जगाला दाखवला, दाखवतो आहे पण जन्मदात्या माता-पित्यांच्या दुःखाला मीच कारणीभूत व्हावे?

राजा शुद्धोधनाचा निरोप घेऊन येणारा त्यांच्या दरबारातील कालुदायिन हात जोडून त्यांच्यासमोर कितीतरी वेळ उभा होता. त्याचे त्याला भानच नव्हते. तो दरबारातील एका दूताचा मुलगा होता, तो विनम्रतेने मान खाली झुकवून सांगू लागला, ''जगद्वंदनीय तथागता. तुम्ही नव्या धर्माचा मार्ग दाखवून चक्रवर्ती बनलाच आहात. साऱ्यांना लाभ झाला. पण राजा शुद्धोधन व आपल्या नातेवाईकांना तो अद्याप मिळालेला नाही. कमलपुष्प ज्याप्रमाणे सूर्योदयासाठी उत्सुक असते त्याप्रमाणे पिताश्री आपली वाट पाहत आहेत. ते वयोवृद्ध झालेत, याची सिद्धार्थला जाणीव होती. तशीच साऱ्या प्रजेलाही होती. गौतम बुद्धांनी त्यांची विनंती मान्य केली. ही सुवार्ता अगोदरच राजधानीत पसरली. दूत हे शुभ वर्तमान घेऊन कितीतरी अगोदर वायुवेगाने कपिलवस्तूला पोहोचला होता.''

काही योजने दूर असणाऱ्या कपिलवस्तूला जात असताना छोट्या छोट्या वाड्या-वस्तीमध्ये लोकांनी प्रेमादराने कमानी उभारल्या होत्या. केळीचे सोप, विविध रंगांच्या फुलांच्या माळा, रांगोळ्या, दीप लावले होते. अनेक स्त्रिया पंचारती घेऊन ओवाळत होत्या तर कोणी पायावर पाण्याच्या घागरी ओतत होत्या. त्यांच्याजवळ राज्य नव्हते की सिंहासन नव्हते पण प्रजेच्या मनात त्यांचा लाडका राजपुत्र, राजा शुद्धोधनाचा राजपुत्र सिद्धार्थ अजूनी घर करून बसलेला होता.

काही वयोवृद्धांना ते परत येतील अशी आशा होती. ते वंदन करून म्हणत, ''राजपुत्र सिद्धार्था! आता तुझा उद्देश सफल झाला आहे. आता स्वगृही परतून तुझ्या प्रजेला सुखी कर. राजा शुद्धोधन आता राज्यकारभार तुझ्याकडे सोपवतील तेव्हा नाही म्हणू नकोस. तुझी राणी यशोधरा, पुत्र राजकुमार राहुल हेच आमचे श्रद्धास्थान आशास्थान आहे!''

तो ऐकत होता स्थितप्रज्ञेतेने. त्याच्या आतला गौतमबुद्ध स्थिरच होता. भावनेच्या वादळाचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नव्हता. त्याला आपले जीवितकार्य स्पष्ट दिसत होते. तो अशा अवस्थेत होता की त्याला राजवाडा, राज्य, राजवैभव मोह पाडू शकत नव्हते. तरीपण प्रजेच्या भावना तीव्र होत्या, प्रामाणिक होत्या. शेवटी त्यांचा विश्वास नि प्रेम, श्रद्धा, जिव्हाळा न जाणवण्याइतका परिव्राजक जीवनात सिद्धार्थ शुष्क बनलेला नव्हता.

परिव्राजक अवस्थेत तर तुमचे वागणे हृदयशून्य बनले असेल तर तुम्ही निश्चित समजा ते वैराग्य नव्हे वैफल्य आहे. गौतम बुद्धांच्या बरोबर बरेच भिक्षू होते, उपासक होते. कपिलवस्तू जवळ येत होती आणि तिकडून वयोवृद्ध माता-पिता शुद्धोधन, महाराणी महाप्रजापती, मंत्री, नातलग भेटायला, स्वागताला येत होते. बुद्धांनी स्वतःशी विचार केला.

''मी त्यांचाच पुत्र होतो. ते माझे माता-पिता. आम्ही सात वर्षांनी एकमेकांना पाहत होतो, भेटत होतो. खूप जवळ आलो होतो पण आता मी 'तो' नव्हतो. मी एका राजाचा पुत्र नव्हतो. शाक्य जमातीचाही नव्हतो. मी साऱ्या मानवजातीचा बनलो होतो. आमच्यातील अंतर किती तरी मोठे होते. स्थल आणि काल सापेक्ष आहे म्हणतात. पण मी नेहमी म्हणतो काल प्रवाही आहे. सात वर्षांत कालाचा प्रवाह मला कोठल्या कोठे घेऊन गेला? हे परिवर्तनाचे वादळ मनात एखाद्या चक्रीवादळासारखे येते नि परस्परांना कित्येक योजने दूर नेऊन सोडते.''

समोरून येताना पाहून महाराज शुद्धोधन रथातून उतरले. त्यांनी गौतम बुद्धांना वंदन केले. वास्तविक त्याची आवश्यकता नव्हती नि अपेक्षाही नव्हती. दुसऱ्याच क्षणाला त्यांनी प्रेमालिंगन दिले नि मग त्यांच्या भावनेचा बांध फुटला, सिद्धार्थच्या पाठीवर त्यांच्या भावनांचे उष्ण मोती टपकू लागले.

त्यांनी प्रजेपुढे स्वतःला सावरले. पुत्रानेही त्यांच्या ज्येष्ठतेचा मान राखला. तो त्यांच्या पायाशी बसला.

सद्‌गदीत हृदयाने नि हुंदके देत ते सांगत होते. एकटक नजर पुत्रावर स्थिरावली होती. 'बेटा! सात वर्षे या क्षणाची वाट पाहत होतो. सारा जीव यासाठी राखून ठेवला होता. किती आतुरतेने तुझी वाट पाहत होतो, याची तुला कल्पना येणार नाही! तुला आता सिद्धार्थ म्हणून कशी हाक मारू? मला ते धैर्य होत नाही पण हे पुत्रा! परत ये पुन्हा एकदा शाक्यांचा नेता हो,



हे राज्य तुझ्या हाती सोपवून मला सुखाने डोळे मिटू दे.'' हे सांगताना त्यांनी अगतिकतेने हात जोडले. बुद्धही क्षणभर शहारले.

बुद्धांनी स्वतःला कधी देवदूत मानले नाही किंवा मोक्षाचे आश्वासन देणारा प्रेषितही मानले नाही. जन्मदात्या माता-पित्यांना स्वर्गाचे आश्वासन वा मोक्षाची भेट द्यायची नव्हती. पण हा पुत्र त्यांचा कधीही वारस बनणार नाही, या कल्पनेमुळे त्यांना आता पुत्राबद्दल वाटणारा अभिमानही लोप पावला होता. त्यांनी शांततेचा भंग करीत धीरगंभीरतेने म्हटले, 'बेटा माझे राज्य यापुढे तुझेच असणार आहे.' पण एक आवंढा गिळून ते स्वतःला सावरून म्हणाले, 'पण जर तुला ते दिले तर तू ते मातीमोल मानशील.'

त्यांचे हृदय पुत्राविषयीच्या प्रेमाने भरलेले होते. पण एक पुत्र कायमचा दुरावला याचे अपार दुःखही होत होते. बुद्धांना अंतःरंगातून एक विचार स्फुरला तो त्यांना सांगितला, ''माझ्याशी ज्या प्रेमरज्जूंनी तुमचे मन जखडले गेले आहे त्या प्रेमाने साऱ्या मनुष्यमात्राशी तुम्ही जोडले जा. नात्याच्या बंधनाचे पाश, माझेपण तोडून तेच प्रेम व्यापक करा.''

माझ्यातल्या राजपुत्रापेक्षा सत्य आणि सदाचार शिकविणारा पुत्र, शांती व निर्वाणाचा मार्ग दाखवणारा परिव्राजक अधिक महत्त्वाचा आहे हे तुम्हाला पटेल. जर तुम्ही मला राजाचा वंशज म्हणत असाल तर आता ते खरे नाही. मी प्राचीन बुद्धांचा वंशज आहे.

माझ्या पूर्वीचे तीन बुद्ध राजपुत्र होते. तीन ब्राह्मण होते. त्यानंतर त्या बुद्ध वंशातला मी पुन्हा एक राजपुत्र आहे. मला राजापेक्षा बुद्धांचा वंशज म्हणवून घेणे अधिक वास्तव आहे.''

शाक्यांच्या परंपरेची महत्ता गौतम बुद्धांना माहीत नव्हती असे नाही. बालपणापासून त्यांच्यावर तसे संस्कार झालेले होते. मुलांनी वडिलांची सेवा करावी. त्यांनी मनात असा विचार आणावा की, माझ्या वडिलांनी माझे पालनपोषण केले आणि मी त्यांना त्यांच्या वृद्धापकाळी पोसले पाहिजे. त्यांना जी कर्तव्ये करावी लागली ती मी आता केली पाहिजेत. माझ्या कुळाची परंपरा मी चालवली पाहिजे. त्या परंपरेला जुळेल अशी योग्यता मी माझ्या अंगी आणली पाहिजे. वडील मुलांवर प्रेम करीत असतात. दुर्गुणांपासून त्याला परावृत्त करतात. सद्‌गुणांचा त्याला उपदेश करतात. आपले ज्ञान त्याला देतात. त्याला व्यवसाय शिकवतात. त्यांचे लग्न करून देतात. योग्यवेळी आपली सारी मालमत्ता त्याच्यावर सोपवतात. पुत्रासाठी विनय किती महत्त्वाचा ठरतो.

बुद्धांचे पिता सारी मालमत्ता, सारे राज्य त्यांच्याकडे पुन्हा सोपवायला उत्सुक होते. पण आता बुद्ध परिव्राजकाचा गृहस्थी बनणे शक्य नव्हते हे त्यांना कोण समजावणार? ते

रिक्त मनाने निघून गेले.

दुसरा दिवस उजाडला. त्यांनी आपले भिक्षापात्र हाती घेतले नि कपिलवस्तूमध्ये भिक्षेसाठी निघाले. ज्या नगरातून राजपुत्र म्हणून ते रथातून फिरत होते, सेवकांची फौज त्यांच्या पुढे-मागे असायची, अनेक याचकांना त्यांनी मुक्तपणे दान केले होते. त्यांनी अनेकांच्या भिक्षापात्रात अन्नदान केले होते. पण आज सिद्धार्थच्या अंगावर मातीच्या रंगाचे चीवर होते नि हातात भाजलेल्या मातीचे भिक्षापात्र होते. हो! ज्ञानाग्नीमुळे त्यांचे मनही भाजलेल्या भिक्षापात्रासारखे बनले होते. कोणतीही वासना, लोभ आता भाजलेल्या मातीत उगवणार नव्हते. त्यांचे अनासक्त मन ज्ञानानंदात डुंबून गेले होते. चालतानाही त्यांना खऱ्या शाश्वत अस्तित्वाची सतत जाणीव होत होती. ही झाली त्यांची गोष्ट. पण राजा शुद्धोधनांच्या कानावर जेव्हा तो भिक्षापात्र घेऊन नगरात फिरतो आहे. ही गोष्ट गेली तेव्हा ते खिन्न झाले, त्यांच्यातला राजा जागा झाला. ते तडक रथातून ज्या भागात सिद्धार्थ फिरत होता तेथे आले. जवळ येऊन हळू आवाजात पण कठोरपणे ते म्हणाले, 'राजपुत्र सिद्धार्थ! हे तुम्हाला शोभत नाही. तुम्हाला नि तुमच्या शिष्यांची हवे तितके दिवस भोजनाची व्यवस्था मी करेन. पण मला मान खाली घालावी लागेल, असे हे भिक्षापात्र हाती घेऊन नगरात भिक्षा मागू नका. आपल्या कितीतरी पिढ्यांत असे कोणीही केले नाही.'

त्यांनी त्यांना वंदन करून शांतपणे सांगितले, 'राजन् ही माझ्या संघाची प्रथा आहे. येथे नियम साऱ्यांनाच पाळावे लागतात. मीही अपवाद नाही. आपले अन्न भिक्षा मागून मिळवायचे व एकवेळ जेवून निर्वाह करायचा हा साऱ्यांसाठीचा संघाचा नियम आहे.'

'जर मुलाला मौल्यवान खजिना मिळाला तर त्याने तो पित्याच्या पायाशी अर्पण करायचा ही शाक्यांची परंपरा आहे. मला नव्या धम्मरूपी धनाचा खजिना मिळाला आहे. ती भेट मला देण्याची परवानगी द्या. जर आपण सुख स्वप्नातून मुक्त व्हाल, नश्वर स्वप्नाऐवजी अंतःकरण सत्यासाठी उघडे कराल, सदाचाराचा आश्रय घ्याल तर शाश्वत असा आनंद तुम्हाला लाभेल.'

यावर मात्र राजाचे मन शांत झाले, तृप्त झाले. 'बाळ! तू म्हणतोस ते पटते. यापुढे जीवनात परिवर्तन करण्याचा प्रयत्न करेन. पण आता आयुष्य किती शिल्लक आहे कोणास ठाऊक? निदान बेटा एकवेळ घरी तुझे ज्ञानी पाय स्पर्श करू देत.'

बुद्धांनी त्यांना घरी येण्याचे आश्वासन दिले.

## राजा शुद्धोधनांचे स्वप्न

राजा शुद्धोधन यांना त्रासदायक अशी स्वप्ने पडली. एका स्वप्नात सुवर्णमय सूर्य



चमकणारा मोठा असा रथावरचा ध्वज इंद्राने दिला होता. एका वादळी वाऱ्याने तो रथावरून काठीसह खाली धुळीत कोसळला, असे पहिले स्वप्न पडले.

दुसरे स्वप्न पडले त्यात दहा प्रचंड आकाराचे हत्ती आले, त्यांचे सुळे चांदीसारखे चमकत होते. राजपथावरून ते चालत असताना जणू धरती कापत होती. त्या दहा हत्तींपैकी सर्वांत पुढे चालणाऱ्या हत्तीवर सिद्धार्थला बसलेला त्यांनी पाहिला. त्यांच्या पाठोपाठ इतर हत्ती येत होते.

तिसरे स्वप्न होते एक डोळे दीपवणारा चमकता रथ, त्याला जोडलेले चार घोडे दौडत होते. त्यातून पांढरा धूर आणि ज्वलंत फेस त्याच्या नाका-तोंडातून निघत होता. चौथ्या स्वप्नात प्रचंड रथाचे चाक फिरत होते. त्याचे आरे हिऱ्यांनी मढवलेले होते नि सोनेरी अग्नी ज्वाला बाहेर पडत होत्या. चाकावर विचित्र लिपीत लिहिले होते. संगीतही ऐकू येत होते. पाचव्या स्वप्नात प्रचंड आकाराचा ढोल सिद्धार्थ बडवत होते. तो ढोल शहर व डोंगरामध्ये होता. तो आवाज साऱ्या आसमंतात पसरला होता.

सहाव्या स्वप्नात एक मनोरा उंच-उंच होत आकाशाला भिडला, त्यावर बुद्ध बसले होते. दोन्ही हाताने ते विविध रंगाचे हिरे उधळत होते. जणू त्यांचा पाऊसच पडत होता. जगाच्या कानाकोपऱ्यातून ते धन गोळा करायला लोक जमले होते.

सातव्या स्वप्नात मात्र लोकांचा आक्रोश ऐकू येत होता. सहा लोक तोंडावर हात ठेवून मूकपणे चालत होते.

राजाला पडलेल्या या सात स्वप्नांमुळे त्यांची झोप उडाली. पण सकाळी कोणीही या स्वप्नांचा अर्थ स्पष्ट करणारा त्यांना भेटला नाही.

पण राजवाड्याच्या दरवाजासमोर एक वयोवृद्ध मुनी उभा होता. तो म्हणाला, ''मी सांगतो त्या स्वप्नांचा अर्थ.'' त्याने मृगजीन कमरेला बांधले होते.

तो वंदन करून राजाला म्हणाला, ''या स्वप्नांचा अर्थ शुभ आहे. याच वाड्यामध्ये सूर्यापेक्षाही प्रकाशित, तेजस्वी असा पुत्र जगाला प्रकाशित करेल.''

पहिले स्वप्न सांगते की, पूर्वीच्या धर्म-रूढी कोसळतील, धुळीस मिळतील. नव्या धर्म-कल्पना जन्माला येतील.

सत्याच्या मार्गावरून राजपुत्र जाईल नि दहा हत्तीच्या बळाने जगाला हलवून सोडेल. चौथ्या स्वप्नाचा अर्थ, नाका-तोंडांतून अग्नी ओकणारे घोडे म्हणजे चार आर्य सत्ये. राजा तुझा पुत्र लोकांना संशय आणि निराशेच्या गर्तेतून बाहेर काढेल.

प्रचंड रथचक्र म्हणजे नव्या धर्म नियमाने जगाची दृष्टी बदलवेल.

ढोल वाजवणारा राजपुत्र म्हणजे त्याची वाणी साऱ्या जगात गुंजत राहील. खांब, मनोरा उंच जातो त्यावर सिद्धार्थ बसलेला आहे म्हणजे त्याचा उपदेश हिऱ्या-मोत्यांसारखा लोकांवर उधळेल. शेवटचे स्वप्न सहा पंडितांना त्यांच्या मूर्खत्वाची प्रचिती राजपुत्र देईल त्यामुळे त्यांची वाणीच थांबेल.

''राजा या स्वप्नाबद्दल आनंदोत्सव साजरा कर,'' असे सांगून त्या मुनीने आठ वेळा दंडवत घातले. तीन वेळा भूमीला वंदन केले नि तो शांतपणे निघून गेला.

## अंध चक्षुपालचा हिंसाचार

कौशल देशाची राजधानी श्रावस्तीजवळच जेतवन नावाचा एक मठ आहे तेथे तथागत राहत होते. त्या कालावधीत त्याना भेटायला विविध देशांतून, दूरदूर अंतरांवरून भिक्खूगण येत असे. अचानक आलेले काही भिक्खूगण मठातल्या ज्येष्ठ साधकांना भेटण्यासाठी फिरत होते.

त्यावेळी मठात दोन्ही डोळ्यांनी आंधळा असा चक्षुपाल नावाचा भिक्खूही राहत असे. दररोज सायंकाळी झोपडीच्या बाहेर तो यावयाचा. जमीन साफ-सफाई करून तेथे पडून राहायचा. एके दिवशी त्याच्या पायाखाली बऱ्याचशा मुंग्या चिरडल्या गेल्या. हे पाहून अचानक आलेल्या भिक्खूंना फार दुःख झाले. भिक्खू चक्षुपालाचे दर्शन न घेता, त्याच्याशी न बोलताच ते तथागताकडे आले. त्यांनी प्रार्थना केली, 'हे कृपानिधे! येथल्या चक्षुपाल नावाच्या भिक्खूने चालण्याच्या निमित्ताने अनेक जीवांना पायाखाली चिरडून मारले आहे. स्वतःला महात्मा समजणाऱ्या भिक्खूला हे शोभत नाही. त्याला योग्य ती शिक्षा मिळाली पाहिजे. त्यामुळे तो पुन्हा अशी हिंसा करणार नाही.'

ही तक्रार ऐकल्यावर तथागतांच्या डोळ्यांसमोर वस्तूस्थिती उभी राहिली. त्यासाठी अंतःचक्षू उघडण्याची त्यांना गरजही नव्हती. तरीपण त्यांनी चक्षुपालला बोलावणे पाठवले. तो समोर उभा होता. सर्वांसमोर त्याला विचारले, 'चक्षुपाल! तू तो अपराध समजून उमजून केलास काय?'

प्रश्नाला विनम्रतेने उत्तर देताना तो म्हणाला, ''तुम्ही स्वतःच अंतर्ज्ञानी आहात. तरी पण माझी मानसिक अवस्था सांगतो. एक तर मी नेत्रहीन आहे. त्यामुळे मला ते जीव दिसले नाहीत. शिवाय येथे कोणी जीव आहे की नाही याचे मला ज्ञान नव्हते. माझ्या मनात, हृदयात त्या जीवांना मारण्याचा कोणताही विचार किंवा उद्देश नव्हता. याही उपर माझ्याकडून तो अपराध झाला आहे त्याला तुम्ही जी शिक्षा द्याल ती मी आनंदाने स्वीकारायला तयार आहे.



चक्षुपालचे हे सत्यपूर्ण निवेदन ऐकून तथागतानी त्या आगंतुक भिक्खूंना (पालीभाषेत) सांगितले -

मनोपुब्बङ्गमा धम्मा मनोसेठ्ठा मनोमया

मनसाचे पदुठ्ठेन भासति वा करोतिवा।

तता नं दुक्खमन्वेति चक्कं व वहतो पदं॥

संस्कार, धर्माने मन पूर्वगामी आहे. मन श्रेष्ठ आहे आणि मनोमय आहे. पाप आणि पुण्य मनामुळेच होते. येथे मन प्रधान आहे. जर दुष्ट मनाने खोटे बोलले आणि कोणाचा प्राण घेतला, हिंसाचार केला तर ज्याप्रमाणे बैलगाडीच्या बैलांच्या पावलामागे गाडीची चाके जातात त्याप्रमाणे पाप देखील कर्त्याच्या पाठोपाठ चालत राहते.

## एकांतवास आवडणारा थेर भिक्खू

श्रावस्तीमध्ये जेतवनात त्यांचा मुक्काम होता. त्यावेळी तेथल्या विहारात 'थेर' (वडील बंधू) नावाने ओळखला जाणारा भिक्खू राहत होता. तो एकांतप्रिय होता. तो ज्याला ज्याला भेटेल त्याला त्या त्या वेळेला एकांतात राहाणाऱ्या जीवनशैलीविषयी अभिमानाने बोलायचा. तो नगरात भिक्षा मागण्यासाठी एकटाच जायचा. तो ध्यानाला बसायचा ते एकटाच.

काही भिक्खू तथागताना भेटायला आले. त्यांनी वंदन केले नि काही अंतरावर बसले. त्यांनी भिक्खू थेराच्या एकांतप्रियतेविषयी सांगितले. त्यांनी त्याला बोलावल्याचा निरोप पाठवला.

थेराने आज्ञेचे पालन केले. तो तत्काळ आला. साष्टांग नमस्कार करून विनम्रतेने बाजूला बसला. मग सर्व भिक्खूंसमोर त्यांनी विचारले.

'थेरा! हे खरे आहे का की तुला एकांतात राहणे आवडते. एकांतवासाच्या जीवनाची स्तुती करतोस, भिक्षेलाही एकटाच जातोस, परततोस तो सर्वांबरोबर नसतोच. ध्यानालाही साऱ्या भिक्खूंबरोबर बसायला तुला आवडत नाही.'

यावर थेर म्हणाला, 'होय तथागत! हे खरे आहे.' मग थेराला विचारले, 'तू एकांतात कसे जगतोस?'

थेर म्हणाला, 'तथागत! माझ्याबरोबर कोणीही नसते. मी एकटाच राहतो. मी एकांतवासी जीवनपद्धतीचे गुणगान गातो. गावात भिक्षेसाठी एकटा जातो, एकटाच परत

येतो. ध्यानालाही एकटाच बसतो इतकेच.'

यावर तथागतानी त्याला उपदेश केला. 'थेरा! तू जे करतोस ते वाईट नाही. त्यावर मी टीकाही करीत नाही. पण त्याहीपेक्षा एकांतजीवन जगण्याची एक अद्‌भूत पद्धत आहे ती मी सांगणार आहे.'

ही पद्धत म्हणजे सखोल निरीक्षण. असे पाहणे की भूतकाळ अस्तित्वात नाही आणि भविष्यकाळ अजून आलेला नाही. वर्तमानकाळात सहजतेने जगणे. वासनेपासून मुक्त जगणे.

जर एखादी व्यक्ति अशा पद्धतीने जीवन जगेल तर त्याच्या हृदयात कोणताही अडथळा राहणार नाही. त्याच्या मनात कोणतीही अस्वस्थता, बेचैनी, पश्चाताप असत नाही. त्यामुळे तो बंधमुक्त मनाच्या अवस्थेत; खऱ्या अर्थाने तो स्वातंत्र्याचा, मुक्ततेचा अनुभव घेऊ शकतो. याला अधिक चांगल्या पद्धतीचा एकांत म्हणता येईल. अशा एकांतवासातच खरी शांती नि आनंद अनुभवास येतो.''

थेर हे ऐकून आनंदित झाला. तो नि इतर भिक्खूंच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. सारेजण बुद्धांना वंदन करून निघून गेले.

## <u>वेगळा धर्म</u>

कोसल देशाची राजधानी श्रावस्ती येथे होती. त्या देशाचा राजा प्रसेनजित हाही धार्मिक वृत्तीचा होता. त्यावेळी बुद्ध राजगृहात मुक्कामाला होते. राजा प्रसेनजितच्या दरबारातला सुदत्त नावाचा कोषाध्यक्ष एकदा त्यांना भेटायला आला. तो कनवाळू होता. गोरगरिबांना मदत करायचा. अनाथ बालकांना अन्नदान-वस्त्रदान त्याने अनेक वर्षे केले होते. अनाथांचा पीडा हरण करणारा म्हणून त्याला अनाथपिंडक असेही म्हणत.

तो बुद्धांना भेटला तेव्हा त्याचा दृष्टीकोन बुद्धांना व्यवहारी वाटला. त्याचा मुख्य प्रश्न होता, काल्पनिक देवाच्या मागे लागण्यापेक्षा, त्याची पूजा अर्चा, प्रसाद, स्तोत्र माजवण्यापेक्षा जी माणसे, मुले स्त्रिया अभावापासून तडफडतात, त्यांना अन्न-वस्त्र-निवारा देण्यापलिकडे धर्म धर्म म्हणजे वेगळा काय असतो?

## <u>कोणी श्रेष्ठ वा शूद्र नाही!</u>

अभि हा आठ-दहा वर्षांचा मुलगा दररोज नदीकाठी म्हैशी चरण्यासाठी घेऊन जायचा. हिरव्यागार कुरणात जनावरे सोडली की त्याला काही काम नसायचे, त्यामुळे इकडे तिकडे तो भटकत राही. गुराखी काम केल्यामुळेच एवढ्या बालवयात तो स्वतःच्या पोटा-पाण्याची



व्यवस्था मालकाकडे स्वतःच करी; पण जर जनावरे व्यवस्थित चरली नाहीत व येताना गवताचा भारा आणायला तो विसरला तर मात्र जमीनदाराकडून त्याला शिव्या खाव्या लागत, तर काही प्रसंगी मारही खावा लागे.

निरंजना नदीकाठी कधी कधी त्याच्या गळाला एखादा मासाही लागायचा मग त्या दिवशी त्याच्या झोपडीत मेजवानी साजरी व्हायची. एके दिवशी त्याने म्हैशींना नदीच्या पाण्यात धुतले. थोडे गवत कापले. त्याचा भारा बांधला. अभिला वाटले जरा एका मोठ्या झाडाच्या सावलीत जरा विश्रांती घ्यावी. अचानक तो थांबला. वीस फुटावरच एक माणूस बसला होता. पण त्याची बैठक अभिने कधीच पाहिली नव्हती. तो त्या बैठकीत सुंदर दिसत होता. एखादी जलदेवता नाही तर जंगलातला देव स्वर्गातून खाली येऊन बसल्यासारखा त्याला वाटला. त्याला काही तरी वेगळे वेगळे वाटत होते.

खरे तर बुद्धच त्या दिवशी ध्यानाला बसलेले होते नि अभिची नि त्यांची ती पहिली भेट होती. त्यांनी डोळे उघडून पाहिले तो त्यांच्यासमोर अभि एखाद्या पुतळ्यासारखा निश्चल उभा होता.

बराच वेळ ध्यानाला बसल्याने बुद्धांनी हळूच पाय मोकळे केले. गुडघे नि पायाचे घोटे आखडले होते. ते ते हलकेच चोळू लागले. लोहचुंबकाकडे एखादी लोखंडी वस्तू आकर्षित व्हावी तसा तो पळतच त्यांच्याकडे आला. पण अचानक थांबला.

बुद्ध हसले नि विचारले, 'अरे बाळ का थांबलास?' तो मान हलवत म्हणाला, 'नाही! आम्हाला तुमच्या सारख्या जवळ जाता येत नाही.'

बुद्ध समजायचे ते समजले. तो चर्मकार जमातीतला होता. तो म्हणाला, 'माझ्या वडिलाने मला बजावले आहे, ब्राह्मण जात सर्वांत श्रेष्ठ असते. त्या जातीतले लोक देवांचे पुजारी असतात त्यांनाच वेद शिकता येतात, तोंडाने म्हणता येतात. ब्रह्मदेवाने माणसाला निर्माण केले. ब्रह्माच्या तोंडातून ब्राह्मण जन्मले. युद्ध करणारे क्षत्रिय, ब्रह्माच्या हातापासून तर मांडीपासून शेतकरी, व्यापारी बारा बलुतेदार निर्माण झाले. ब्रह्मदेवांच्या पायापासून आम्ही शूद्र लोक जन्मलो. सर्वांत खालच्या धर्माचे आम्ही आहोत. त्यामुळे आम्ही तुम्हाला स्पर्शही करू शकत नाही. आमच्या गावतील एका गुराख्याच्या पोराने एका पुजाऱ्याला चुकून हात लावला तर त्याला ब्राह्मणांनी इतके बेदम मारले की तो गुरासारखा ओरडत होता. त्याच रात्री तो मेला.'

अभि सांगत होता, 'आम्ही गावगाड्यात राहतो ते गावाबाहेर. ज्या जातीत जो जन्मला त्याला त्याचे नियम पाळावे लागतात. हलक्या दर्जाची कामे करावी लागतात.'

रस्त्यावरून जाताना अभि नि त्याच्या घरच्यांना खूप काळजी घ्यावी लागे. त्यांचा स्पर्श सोडाच पण सावलीही ब्राह्मणावर पडून चालत नव्हती.

बुद्धांच्याजवळ येता येता अचानक थांबलेल्या अभिला वाटले की ह्या भल्या माणसाला आपण अपवित्र करू नये! पण बुद्ध चटकन पुढे झाले. त्यांनी डाव्या हाताने अभिचा खांदा पकडला. उजव्या हाताने त्याच्या डोक्यावर हळूवार थापटले. तो गप्प उभा होता. त्याला तो शारीरिक नि मानसिक धक्काच होता. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. डोळ्यांत अश्रू ओघळले, त्याचे अंग कापत होते.

बुद्ध म्हणाले 'घाबरु नको!' यावर त्याची भीती गेली. तो मान वर करून म्हणाला, 'तुम्ही किती मायाळू आहात! मला असं प्रेमाने कधीच कोणी जवळ उभं केलं नाही!'

अभिनं त्यांचा हात प्रेमाने हातात धरून बालसुलभ प्रश्न केला, 'मी तुम्हाला अपवित्र केलं नाही ना? मला कोणी मारणार नाही ना?'

बुद्धांनी त्याला अभय दिलं! त्याला समजून सांगितलं, 'माझ्या हृदयात जात-पातीला जागाच नाही. सारे समान आहेत. उच्चनीच कोणी नाही. तू मी दोघेही सारखेच. लोक काय सांगतात याकडे तू लक्ष देऊ नकोस.'

अभिला एका नव्या नात्याचा शोध लागला होता.

दुसऱ्या दिवशी तो त्यांना पुन्हा भेटायला आला. त्याने एका मातीच्या मडक्यातून त्यांच्यासाठी दही आणले होते. त्याने ते प्रेमाने दिले. बुद्धांनी आनंदाने स्वीकारले. त्यानंतर बोलता बोलता त्याने विचारले, 'काही लोक माझा वारंवार अपमान करतात. त्यांच्याशी ईर्षा करावीशी वाटते काय करू?' बुद्ध त्याला म्हणाले, ''मी बोलतो ते तुला समजेल ना? थोडे कठीण वाटेल, पण स्मरणात ठेव. पुन्हा-पुन्हा आठव, मग अर्थ कळत जाईल.

'हे पाहा ज्यांच्याकडे आपल्यापेक्षा जास्त आहे त्यांच्याशी ईर्षा करू नये. आपल्यापेक्षा ज्यांच्याजवळ कमी आहे त्यांचा अपमान करू नये. आणि जे आपल्या बरोबरीचे आहेत. त्यांच्याशी स्पर्धा करू नये.'

यावर तो म्हणाला, 'पण त्यामुळे काय होईल?'

बुद्धांनी एका शब्दात सांगितले, 'तू श्रेष्ठ होशील. वृषभ म्हणजे शूद्र तो की जो दुसऱ्याचे धन बळकावतो. वाटसरूंना लुबाडून ठार मारतो. साथ देताना स्वार्थापोटी खोटे बोलतो. जो आपल्या बांधवांच्या वा मित्राच्या पत्नीशी संबंध ठेवतो. वृद्ध माता-पित्यांचे पोषण करीत नाही, घरच्यांना मारहाण करतो, मनात दुष्ट हेतू ठेवून बोलतो, गुप्तपणे दुष्कर्म करतो पण कोणी ते जाणू नये अशी इच्छा बाळगतो. दुसऱ्याच्या घरी जेवतो, पण आपल्या घरी पाहुणचार



करीत नाही. स्वतःची प्रशंसा करतो, पण दुसऱ्याचा अवमान करतो. जो संतापणारा, दुर्भावना असलेला पापी, ढोंगी समजावा. चुकीची दृष्टी बाळगणारा, प्राण्यांची हिंसा करणारा, ज्याला प्राणिमात्रांबद्दल दया नाही तो शूद्र समजावा. जन्माने कोणीही श्रेष्ठ नसतो व कनिष्ठही नसतो.'

## न पाहिलेला स्वर्ग

नालंदामधील पावारिक आमराईत बुद्ध निवास करताना असिबंधकपुत्र नावाचा एक ग्रामप्रमुख त्यांच्याकडे आला. तो नुकताच वाराणशी, हरिद्वार, हृषीकेश या गंगा-यमुना काठच्या तीर्थस्थानाला जाऊन आला होता. तेथे त्याला काही साधू भेटले होते. त्यांच्याशी त्याने भूलोक, परलोक, स्वर्ग-नरक यांबाबत चर्चाही केली होती. त्यांच्या उत्तराने तो प्रभावित झाला होता. त्या साऱ्या तीर्थयात्रेचा वृत्तांत सांगून तो म्हणाला,''ते ब्राह्मण गंगा-यमुना नद्यांच्या पवित्र जलात त्रिकाल स्नान, संध्या करतात. काठावर यज्ञ करतात. त्यांचा असा दावा आहे की, ते मरणोत्तर जीवांना आवाहन करतात. त्यांच्याशी संवाद साधू शकतात. त्यांना स्वर्ग वा नरकात पाठवू शकतात. पितरांच्या आत्म्याला शांती देतात. त्यासाठी त्यांना काही सुवर्णमुद्रा दक्षिणा म्हणून दिल्यावर ते आपल्यासाठी या गोष्टी करतात. तसे तुम्ही माझ्या पितरांना स्वर्गात पाठवण्यासाठी काही करू शकता का?''

मुखियाची त्या प्रश्नामागची तळमळ बुद्धांना समजली. त्याच्यावर पडलेला प्रभावही ओळखला. ते त्याला म्हणाले, ''मी तुलाच विचारतो, तुला जे योग्य वाटेल ते तू स्पष्टपणे सांग, म्हणजे तुझ्या मनातील प्रश्नांचे उत्तर तू व मी दोघेही शोधून काढू. तू मला सांग, एखाद्याने आयुष्यभर व्यभिचार केला, चोरी केली, खोटे बोलला व त्याच्यासाठी काही लोक एकत्र येऊन काही क्षण प्रार्थना केली, पूजा केली, यज्ञ केला आणि म्हटले की त्याला मृत्यूनंतर सद्गती लाभो तर तसे होईल काय?''

यावर ग्राम मुखिया म्हणाला, ''तसे होणार नाही.'' मग साधी उपमा देऊन बुद्धांनी म्हटले, ''एखाद्या माणसाने मोठा दगड तलावात टाकला व काही ब्राह्मणानी एकत्र येऊन यज्ञ, प्रार्थना करून म्हणाले 'जमिनीवर ये.' तर तो दगड वर येईल काय?''

यावर मुखियाने नकारार्थी मान डोलावली. बुद्धांनी दुसरी उपमा देऊन म्हटले, ''समज पाण्यावर तूप किंवा तेल ओतले व प्रार्थना केली 'तेल बुडावे' तर काय होईल?''

मुखिया म्हणाला, 'तसे होणार नाही.''

त्याप्रमाणे सदाचारी माणूस नरकात जावा म्हणून प्रार्थना, यज्ञ केला तर तसे होणार

नाही आणि पंचशीलाचे आचरण करणारा स्वर्गात जावा किंवा जाऊ नये म्हणून कोणी कर्मकांडे करीत असतील तरी तसे होणार नाही.

त्यामुळे स्वर्ग-नरक, आत्मा या कल्पनांचा विचार न करता विद्यमान जीवन कसे चारित्र्यसंपन्न, ज्ञानी बनवून आपण सुखी, आनंदी बनू याचाच विचार करणे योग्य.

## शरीर पीडा

बुद्ध हेही माणूसच आहेत हे त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना पटत नव्हते. त्यांना बुद्धांनी समजून सांगितले, 'मीही हाडा-मांसाचा, रक्ताचा माणूस आहे. वयोमानाप्रमाणे मलाही शरीर पीडा होतात, अपघाताने शरीराला इजाही होते. त्या वेदना मी अनुभवतो.'

राजगृहातील मृगवनात विहार करताना त्यांच्या पायाला दगडाच्या कपरीने जखम झाली. बरेच रक्त गेले. जखमही खोल होती. त्यावर हळद आणि दगडी पाला या वनस्पतीचा लेप बांधला, पण वेदना तीव्रही होती नि सहनही होत नव्हती, पण खचून न जाता हळूहळू निसर्गानुसार जखम भरेल, वेदना कमी होईल. काही दिवसांत दुःख नाहीसे होईल. या विचार-विवेकाने ते वेदना सहन करीत होते.

कपिलवस्तूमध्ये न्यग्रोधारामात, श्रावस्तीत, राजगृहातील कलंदकनिवासात ते आजारी होते. ऋतू बदलतात त्याप्रमाणे शरीर पीडा होते नि निघून जाते. श्रावस्तीमध्ये असताना त्यांना वातपीडा झाली. वात, पित्त, कफ योग्य प्रमाणात नसले तर कोणती ना कोणती पीडा होते, वात पीडा होईल, पित्तपीडा होईल नाहीतर कफ पीडा होईल. वातपीडेवर गरमपाणी हा उपाय असतो. उपवाण नावच्या भिक्खूने देवहित ब्राह्मणाच्या घरी जाऊन गरम पाणी आणि गुळाचा खडा आणला. गरम पाण्याने स्नान केल्यावर बुद्धांना बरे वाटले.

आजारी पडल्यावर त्यावर उपाय करावेत. मनाच्या अवस्थेचाही शरीरावर परिणाम होतो. त्यामुळे शील आणि प्रज्ञा जपणाऱ्यांना निरोगीपणा लाभते असा त्यांचा अनुभव होता. काहीवेळा त्यांना ताप आला तर ते लंघन करीत. अनेक प्रकारचे लेप, काढे यांचाही उपयोग ते करीत. औषधांच्या मात्रेने शरीर दुःख हलके होते किंवा त्याचे निर्मूलन होते.

परिवर्तन अटळच नव्हे तर अपरिहार्यही असते. बालपण, तारुण्य, वृद्धत्व हे शरीरातील परिवर्तनाचे टप्पे असतात. वृद्धत्व हे वेदनादायक तसेच देहत्यागही क्लेशकारक. देहत्यागात दुहेरी क्लेश असतात. एक भौतिक आसक्तीमुळे आणि सर्वस्व हरवण्याच्या भीतीमुळे!

शरीरातील असंख्य पेशी, अनेक अवयव, त्यांचे कार्य यावरही ते चिंतन करीत.



शरीराविषयीची जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. असंख्य पेशी, अनेक अवयव एकमेकांशी सहकार्य करतात. संघ भावनेने जगतात, वाढतात. शरीराविषयी चिंतन करता करताच बुद्धांना संघाची कल्पना स्फुरली असावी. अनेक भिक्खू, एकमेकांना सहकार्य करून एकसंघ जगले, वाढले तर समाज, शरीर कसे निकोप बनेल हा विचार त्यांनी प्रथम आनंदला सांगितला होता. त्यानंतर संघाची सुरूवात झाली. त्यात संघाचे उद्दिष्ट होते 'बहुजन सुखाय, बहुजन हिताय' पण त्यात मोक्षाच्या प्राप्तीपेक्षा धम्माचे आचरण महत्त्वाचे होते.

## खरा यज्ञ

बुद्ध कोसल देशात सुंदरिका नदीच्या काठी विहार करीत होते. त्या भागातच सुंदरिक भारद्वाज हा ब्राह्मण त्या नदीच्या काठावर यज्ञामध्ये आहुती देत बसलेला होता. यज्ञ केल्यावर, पूर्णाहुती दिल्यावर तो उठला. राहिलेल्या हवी द्रव्याचे काय करावे हा त्याला प्रश्न पडला. त्याचवेळी दूर अंतरावर एका झाडाखाली डोक्यावर पांघरूण घेऊन बुद्ध बसले होते ते त्याने पाहिले. तो त्यांच्याजवळ आला तेव्हा पावलांची चाहूल लागली, म्हणून त्यांनी पांघरूण दूर केले. तो जवळ आला. त्याच्या एका हातात हवी द्रव्य व दुसऱ्या हातात कमंडलू होते. त्याने बुद्धांना विचारले, 'आपण कोणत्या जातीचे आहात?'

बुद्ध त्याला म्हणाले, 'जात विचारू नकोस, आचरण विचार. लाकडातूनही अग्नी निर्माण होतो. हलक्या कुळातूनही मुनी जन्माला येतो. तो विद्वान असू शकतो व संयमीही असू शकतो. तो सत्याने स्वतःचे दमन केलेला, ज्ञानी, ब्रह्मचारी असतो. हे याज्ञिका, तू त्याला आवाहन कर.' यावर तो सुंदरिक म्हणाला, 'तुम्ही ज्ञानी आहात. तुमच्या भेटीने माझा यज्ञ सफल झाला. तुमची आजपर्यंत भेट झाली नव्हती. त्यामुळे मला मार्ग दिसत नव्हता. तुम्हीच हा प्रसाद भक्षण करावा. कारण तुम्ही ब्राह्मणच आहात व श्रेष्ठही आहात.' त्यावर बुद्धांनी सांगितले, 'जेथे धम्माचा उपदेश करतो. तेथे मी भोजन करीत नाही.'

यज्ञामध्ये समीधा जाळण्याऐवजी आंतरिक अग्नी, जो नित्य प्रज्वलित असतो तो महत्त्वाचा आहे. आंतरिक शुद्धी महत्त्वाची आहे. ती बाह्य उपचाराने मिळत नसते. अभिमान हा खारिभार आहे. क्रोध हा धूर आहे. खोटे बोलणे हे भस्म, हृदय हे ज्योतीचे स्थान, संयमित मन ही ज्योती, धम्म हा जलाशय, शील हा घाट, ज्ञानी लोक त्या जलाशयात स्नान करतात. स्वच्छ मार्ग आचरणारे तरुण पैलतीराला जातात. सत्य, धम्म, संयम, ब्रह्मचर्य यांनी युक्त मध्यम मार्ग श्रेष्ठ आहे.

□□□

# नित्यजागृती

निरंजना नदीच्या काठावर फिरत असताना त्यांच्या मनात विचार स्फुरला. नदीच्या अखंड प्रवाहातील प्रत्येक जलबिंदू म्हणजे त्यांच्या शरीरातील एक एक पेशी बनली होती. या प्रवाहात अपरिवर्तनीय असे काही नव्हते. सततचे प्रवाहीपण त्यात होते. त्या बिंदूंना स्वतंत्र अस्तित्वही नव्हते. एकमेकांत ते विविध जलबिंदू मिसळत होते. एकमेकांशी ते थडकत होते, फुटत होते, नाहीसे होत होते नि पुन्हा नव्या आकारात, नव्या रूपात त्यांचा जन्म होत होता. त्यांच्या चित्तातील भावना प्रवाहातही तसेच काहीतरी घडत होते. काही भावना सुखकारक होत्या तर काही त्रासदायक. पण त्या येत होत्या नि जात होत्या त्या कायमस्वरूपी नव्हत्या.

जेव्हा अनित्य भावप्रवाहांना आपण नित्य स्वरूपाच्या समजतो तेव्हा दुःखाची अनुभूती येते. या साऱ्यांमध्ये महत्त्वाचा भाग होता तो म्हणजे जागृती. भावनाविषयी जागृती, ज्ञानाच्या सूर्यामुळे साऱ्या गोष्टी कशा ताजेपणाने अनुभवास येत होत्या. त्यांचे तपशीलही प्रकाशित झाले होते. आजपर्यंत प्रकाशाच्या अभावामुळे जे दिसत नव्हते ते स्पष्ट दिसत होते.

झाडाची पाने वसंत ऋतूत दिसतात पण ती तेथे अगोदरच होती. ढग, झाड, सूर्य, भूतकाळात होते नि भविष्यात नाही असे नाही. हे सारे नित्य वर्तमानात आहे. या सृष्टीला जन्मही नाही अन मृत्यूही नाही. प्रश्न फक्त प्रकटीकरणाचा आहे. सुप्तावस्थेतले झाडाचे पान प्रकट झाले इतकेच. त्याचे जन्म नि मरण दोन्हीही भ्रमच आहेत. झाडाचे पान आणि आपण स्वतंत्र आहोत हेही खरे नव्हते. दोन्हींत ही एक अद्वैत गौतम बुद्ध अनुभवत होते.

आकाशात श्रावणातील कृष्णवर्णीय मेघ दाटी करतात. ते थंड हवा सुटली की जलधारा बनून बरसतात. त्यांच्याकडे पाहून वाटले, ढग जन्मलाही नव्हता नि त्याच बरसणं म्हणजे मृत्यू नव्हे; पण जर हे ढगाला समजलं व त्याची जाणीव झाली तर तो जलधारा बनून पृथ्वीवर बरसताना दुःखी बनणार नाही. आक्रोश करणार नाही; तो नव्या रूपात, आनंदाने गात गात पृथ्वीवर येईल, जंगलावर, दऱ्या-खोऱ्यात, भाताच्या खाचऱ्यातही तो बरसेल. येथे जागृतीमुळे दुःखाचे रूपांतर सुखात होईल.

परिव्राजक अवस्थेत फिरताना अनेक ऋषी-मुनींना चौकशीअंती राजपुत्र सिद्धार्थचा



भूतकाळ माहीत होता. मग उत्सुकते पोटी काहीजण म्हणत, 'राजपुत्र म्हणून तुमच्या आठवणी सांगा' यावर बुद्ध त्यांना नम्रपणे समजून सांगत, 'भूतकाळ महत्त्वाचा नाही. आजच्या वर्तमानाचा विचार करा. आपण फार पुढच्या भविष्यात नि फार मागे भूतकाळात जायला नको. वर्तमानाविषयी सर्वार्थाने जागृत बनणे महत्त्वाचे आहे!'

## श्रमणाने कसे वागावे?

चितेतून काढलेले, दोन्ही बाजूंनी पेटलेले आणि मधल्या भागात मलिन झालेले लाकूड ज्याप्रमाणे घरात चुलीसाठी उपयोगी पडत नाही आणि आता ते अरण्यातही जाऊ शकत नाही त्याप्रमाणे, ज्याच्या मनात विषयोपभोगाबद्दल तीव्र आसक्ती निर्माण होते त्याच्या मनात विकार निर्माण होतात. इंद्रियांवर नियंत्रण राहत नाही. असा श्रमण संसारी माणसाप्रमाणे गृहभोगापासून दूर राहतो आणि श्रमणाच्या जीवनाची उद्दिष्टेही पूर्ण करीत नाही.

एकदा एक भिक्खूने कोसल देशातील वनप्रदेशातून जाताना भिक्षा मागून मिळालेले अन्न सेवन केले आणि एका सुंदर सरोवरात शिरला. तेथल्या कमळाचा रंग पाहून मोहित झाला. त्याचा वास घेऊ लागला. हे पाहून वनदेवतेला त्याच्याबद्दल अनुकंपा वाढली. त्याच्या हितासाठी, त्याला सावध करण्यासाठी ती त्याच्याजवळ गेली आणि तिने त्याला उपदेश केला, 'हे श्रमणा, तुला कोणी हे कमळ दान दिलेले नाही. भेटही दिलेले नाही तरीही तू त्याचा वास घेत आहेस, ही एका दृष्टीने चोरी आहे. तू गंधचोर ठरतोस.'

त्यावर तो भिक्खू म्हणाला, ''मी काही हे कमळ तोडीत नाही की पळवून नेत नाही वा नष्टही करीत नाही. दुरून त्याचा फक्त वास घेत आहे. मग मला गंधचोर कसे म्हणता? शिवाय जे लोक कमळ मुळापासून तोडतात, कमळे नष्ट करतात, असे अनिष्ट कर्म करणाऱ्याला तू सांगायला हवेस; त्याऐवजी मला का उपदेश करतेस?''

यावर त्या देवतेने सांगितले, ''चारित्र्यसंपन्न व्यक्तीने इतरांचे दोष दाखवून आपल्या दोषांचे समर्थन करू नये. त्याऐवजी आपल्या ठिकाणी तो दोष राहणार नाही याचीच दक्षता घ्यावी. यावर त्या भिक्खूच्या लक्षात देवतेचा सद्हेतू आला. मग तो म्हणाला, ''हे देवते, पुन्हा कधी अशी चूक मी करताना पाहिलेस तर मला त्यापासून परावृत्त कर.''

यावर ती देवता म्हणाली, ''मी काही तुझा नोकर नाही की तुझा पगार घेत नाही. कोणत्या मार्गाने गेल्यावर आपल्याला चांगली गती मिळेल, हे तुझे तूच जाण.''

दुसऱ्या कोणी तरी येऊन आपला दोष दाखवावा अथवा आपल्यात सुधारणा घडवावी अशी अपेक्षा न बाळगता विवेकाच्या आधारे स्वतःच स्वतःला सावरावे. शीलवान माणसावर

अधिक जबाबदारी असते हे विसरू नये.

## कसा असावा भिक्खू

श्रावस्तीमध्ये बुद्ध राहिले होते. तेव्हा काही भिक्खू त्यांच्याकडे आले. त्यांनी तक्रार केली की त्यांच्या ध्यानधारणेत काही देवगण सतत उपद्रव देत असतात. यावर बुद्धांनी त्यांना उपदेश केला,

''जो परमार्थ विषयात कुशल आहे, जो शांतिपदाची आकांक्षा करीत आहे तो समर्थ, न्यायी, सुवचनी, मृदू आणि विनम्र असला पाहिजे. तो संतुष्ट असला पाहिजे; त्याच्या गरजा अधिक असू नयेत. त्याची कर्तव्ये कमी, त्याची जीवनवृत्ती साधी असावी. तो इंद्रिय निग्रही व विवेकी असला पाहिजे. उद्धट असता कामा नये. त्याला कुटुंब परिवाराची आसक्ती असू नये. सज्जन नावे ठेवतील अशा क्षुल्लक गोष्टींचा नाद त्याने धरू नये. सर्वांचे मंगल होवो, सर्वांचे कुशल होतो. सर्वांची हृदये निरामय होवोत अशी इच्छा, धारणा त्याने केली पाहिजे. कोणी कोणास फसवू नये. कुणाचाही द्वेष करू नये. रागाने, वाईट भावनेने कुणाचेही अनिष्ट चिंतू नये.

आपल्या असीम मित्रत्वाच्या भावना जगात सर्वत्र वर-खाली, आसमंतात, अनिर्बंधपणे, द्वेषरहीत प्रसृत झाल्या पाहिजेत. जोपर्यंत तो जागा असेल तोपर्यंत त्याने जागरूक राहिले पाहिजे. आपल्या शत्रूवरही प्रेम करावे. त्यामुळे खरी ध्यानधारणा होईल नि मोक्षाचा मार्ग खुला होईल.''

## सर्व नश्वर आहे

श्रावस्तीच्या एका व्यापाऱ्याची सून किंसा गौतमीचा एकुलता एक पुत्र सर्पदंशाने मरण पावला. पण तो बेशुद्ध आहे असेच तिला वाटत होते. त्यामुळे त्यावर उपचार करण्यासाठी ती ते कलेवर घेऊन अनेक ठिकाणी फिरत होती. प्रत्येकाला ती विचारायची, 'अजून याला शुद्ध का आली नाही?' लोकांना वाटले ती मुलाच्या मृत्यूने वेडी झाली आहे. कोणीतरी ज्येष्ठ माणसाने तिला बुद्धांना भेटण्याचा सल्ला दिला.

ती धावतच बुद्धांच्याकडे पोहोचली व पुत्रासाठी औषध मागितले. तिचा विलाप बुद्धांच्या हृदयापर्यंत पोहोचला. तिचे अनावर दुःख तिलाही हानीकारक आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तिला सांगितले, 'तू नगरात जा आणि ज्या घरी एकही मृत्यू झालेला नाही त्या घरातून थोडी मोहरी घेऊन ये, म्हणजे तुझ्या मुलाला बरे करतो.' प्रथम तिला वाटले



की, ही फार सोपी गोष्ट आहे आणि मुलाचे कलेवर घेऊन ती नगरात गेली. पण लवकरच तिचा भ्रम निरास झाला. कारण जिथे जिथे ती गेली त्या घरी कुणाचा ना कुणाचा तरी मृत्यू झालेला होता. जे जिवंत होते, थोडे होते, पण निधन पावलेल्यांची संख्या कितीतरी अधिक होती.

ती निराश होऊन परतली.

तेव्हा बुद्धांनी तिला विचारले, 'मृत्यू हा प्रत्येकालाच असतो. प्रत्येक जन्मलेल्या पशू, पक्षी, मानव साऱ्यांनाच मृत्यू येतो. ही बाब तुझ्या पुत्राबाबतच झाली असे नाही. मग तू शोक किती काळ करणार? आता तो मृत देह अग्नीला अर्पण कर व तू शांत हो.'

अत्यंसंस्कारानंतर तिच्या आक्रोशाचा बांध फुटला. ती खूप रडली. पण जेव्हा शांत झाली, तेव्हा बुद्धांच्याजवळ येऊन बसली नि म्हणाली, 'सर्व नश्वर आहे हा सृष्टीनियम आहे.'

जीवनाचं एक रहस्यच किंसा गौतमीला उलघडले होते.

## वाईट विचारांपासून मुक्त व्हा!

बुद्ध खेडोपाडी, दऱ्या-खोऱ्यांतून फिरत होते. एखाद्या शेतकऱ्याने उत्तमरीत्या जमीन कसावी; नांगरणी, पेरणी, कोळपणी करावी, खतपाणी करावे, किडीपासून संरक्षण करण्यासाठी उपाय करावेत म्हणजे उत्तम पीक हाती येते. तसेच धम्माचे आहे. धम्म उपदेश करण्यासाठी मानवी मनाची मशागत करावी लागते. या कामात त्यानी आळस टाकून दिला होता. वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या शरीर व्याधींकडेही ते दुर्लक्ष करीत होते. अर्थात अन्नग्रहण, शरीर-व्यायाम नियमित असायचा. फिरताना जे जे लोक भेटत त्यांच्याविषयी बुद्धांच्या मनात उच्चनीचता, गरीब-श्रीमंत हा भेद भाव नव्हता. त्यामुळे गृध्रकूट पर्वताजवळच्या खेड्यातले ब्राह्मण असोत किंवा उत्तरावती प्रदेशातले पाचशे ब्राह्मण असोत, ते एकच धम्माचा उपदेश करीत असत. उपाली न्हाव्यासही धम्मदीक्षा देताना त्यांचे मन कचरले नाही. सोपाक आणि सुप्पयी या अस्पृश्यांना त्यानी दीक्षा दिली. दीन, दरिद्री सुप्रबुद्ध नावाच्या महारोग्यालाही दीक्षा दिली. त्यामुळे या साऱ्यांना नवजीवन प्राप्त झाले.

निष्कलंक असे शुभ्रवस्त्र ज्याप्रमाणे कोणताही रंग धारण करण्यास तयार असते, त्याप्रमाणे अंतःकरणात सत्याची शुद्ध आणि निष्कलंक जाणीव उत्पन्न झाली की त्या माणसाला सत्याचे ज्ञान होते.

गृध्रकूट पर्वताजवळच्या ब्राह्मणांच्या तीस पिढ्या गुरेढोरे पाळण्याचा व्यवसाय करीत.

ते निरनिराळ्या ऋतूनुसार सूर्य, चंद्र, पर्जन्य आणि अग्नी यांची पूजा करीत, होमहवन करीत. ब्रह्मलोकात पितरांना चांगले स्थान मिळावे म्हणून कर्मकांडे करीत. बुद्धांनी त्यांना त्या कर्मकांडाची निरर्थकता पटवून दिली.

जोराची पर्जन्यवृष्टी होत असताना पाणी आत येते व घर गळू लागते. त्याप्रमाणे ज्यावेळी आपल्या विचारावर आपलेच निमंत्रण नसेल तर कामवासना आपल्या सर्व चांगल्या संकल्पांना पोखरून काढते. छप्पर मजबूत असेल तर त्यातून पाणी गळत नाही. त्याप्रमाणे आपल्या चित्तवृत्तीवर नियंत्रण ठेवले आणि विचारपूर्वक वर्तन केले तर असल्या वासना निर्माण होत नाहीत किंवा आपल्याला विचलित करू शकत नाहीत.

त्या ब्राह्मणांना उपदेश करताना सज्जनांची संगत धरणारा कसा शहाणा होतो हेही सांगितले. उत्तरावतीचे पाचशे ब्राह्मण अंगाला चिखल, राख वगैरे फासून ऋषी होण्याच्या आकांक्षाने गंगेच्या काठावर बसत. त्यांना बुद्धांनी सांगितले, ''मनुष्य जरी केसांच्या जटा वाढवून नग्न राहू लागला किंवा शरीरावर त्याने थोडीशी पाने किंवा वल्कले धारण केली व त्याने अंगाला चिखल फासला किंवा दगडावर झोपू लागला तरी वाईट विचारांपासून तो मुक्त होत नाही. त्यासाठी जो सदाचार बाळगतो, इतरांचा योग्य मान राखतो, वयोवृद्धांबाबत आदर बाळगतो, त्याला सौंदर्य, सामर्थ्य, आयुष्य आणि शांती या चार सुखाची प्राप्ती होते.''

## चमत्कार

मल्ल देशातील अनुप्रिया नावाच्या निगमामध्ये बुद्ध विहार करीत होते. त्यावेळी भिक्षेसाठी जाण्याला थोडा वेळ होता म्हणून ते जवळच रहात असणाऱ्या एका सर्वसंग परित्यागीकडे गेले. त्याने त्यांचे स्वागत केले. बसायला आसन दिले नि स्वतः नम्रपणे कमी उंचीच्या आसनावर बसला. त्याला काही दिवसांपूर्वी सुन्नवसत लिच्छविपुत्त नावाचा भिक्षू भेटला होता. त्याने त्याला सांगितले, आपण आता संघ सोडला आहे नि शाक्यमुनीचा धम्मही मानीत नाही.

त्याने विचारले ''हे खरे आहे का? असेल तर नेमकी वस्तुस्थिती काय आहे?'' यावर जे घडले ते बुद्धांना सांगितले. त्यांची प्रश्नोत्तरे झाली. त्याला विचारले होते, ''सुन्नवसत! माझ्याकडे ये आणि माझा धम्म स्वीकार असे मी तुला कधी म्हटले होते काय?'' त्यावर तो म्हणाला, नाही. त्याला विचारले, ''तुमचा धम्म स्वीकारतो असे तरी तू कधी मला सांगितले होतेस काय?'' यावर तो म्हणाला, ''भंते! नाही!''

मग बुद्ध त्याला म्हणाले, 'मग जे तू कधी स्वीकारलेच नाहीस ते सोडण्याचा प्रश्नच



उद्‌भवत नाही? हा तुझाच अपराध आहे. तरीपण तू जाण्यामागचे कारण कोणते?'' असा प्रश्न विचारल्यावर तो एवढेच म्हणाला, ''अतिंद्रिय शक्तीचे चमत्कार तुम्ही आम्हाला दाखवत नाही.'' यावर त्याला त्यांनी समजून सांगितले, ''अलौकिक चमत्कार दाखविणे न दाखविणे या गोष्टींचा आणि धम्म सफल होण्याचा काही संबंध नाही. दुःखांच्या पूर्ण नाशासाठी मी ज्या धम्माचा उपदेश करतो तो चमत्कारापेक्षा फार महत्त्वाचा आहे.''

चमत्कार दाखवण्याचे कृत्य, आपल्या शीलाची विक्री करण्यासारखे, देहप्रदर्शनासारखे आहे. चमत्कार दाखवून मिळणारी वस्तू जगाला कितीही मोलाची वाटली तरी भिक्खूच्या दृष्टीने तिचे काही मोल नाही.''

पुढे एकदा सिद्धार्थला बोधीराजकुमारने भोजनाचे निमंत्रण देऊन बोलावून घेतले होते. तो चांगला उपासक होता. भोजनानंतर ते दोघे बोलत होते. त्यावेळी तो त्याला म्हणाला, ''शाक्यमुनी मला असे वाटते की, सुखाने सुख प्राप्त करता येत नाही, दुःखाने सुख प्राप्त करता येते. शारीरिक कष्ट देणाऱ्या उपासनेमुळे ध्येय प्राप्ती होईल व त्यामुळे सुखही सहजच लाभेल.''

सिद्धार्थाने त्याला ज्ञान प्राप्तीपूर्वीची त्याची आठवण सांगितली, ''त्यावेळी मलाही तुझ्यासारखेच वाटत होते. पण तो मार्ग ज्ञानप्राप्तीसाठी फारसा उपयोगी पडला नाही.'' हे सांगितल्यावर बोधीराजाने स्वतःही शरीराला जादा पीडा देऊन ज्ञान प्राप्त होईल हा मार्ग निरुपयोगी असल्याचे निश्चित केले.

## मनाचा अभ्यास

अनेकवेळा सायंकाळी भिक्खू बुद्धांच्या भोवती जमत तेव्हा प्रश्नोत्तरातून अनेक गोष्टींचा खुलासा होत असे. बोलता बोलता जाणवत होते की त्यावेळी त्यांना त्यांच्यातला अधिक कोणीतरी प्रज्ञ बोलता करीत असतो. त्यांनाच वाटायचे की ते काहीतरी नवीन बोलत आहेत. काही उदाहरणे डोळ्यासमोर एखाद्या दृष्यांप्रमाणे दिसत आणि त्या अनुषंगाने ते भाष्य करीत.

एके सायंकाळी भिक्खूने त्याना विचारले, ''चंचल मनाला सरळ मार्गावर कसे आणायचे?'' त्यांनी त्याला सांगितले.

फन्दनं चपलं चित्तं दुरवरचं दुनिवारयं।
ऊजुं करोति मेधावि ऊसूकारो व तेजनं.

बाण चालवणारा शिकारी बाण सरळ रेषेत सोडण्यासाठी ज्याप्रमाणे एक डोळा बंद करतो नि बाण सरळ रेषेत सोडतो, त्याप्रमाणे योगी चंचल मनाला सरळ बनवतो.

तृष्णारूपी पाण्यातून बाहेर पडताना किंवा कामदेवाचे मोहजाल तोडण्यासाठी (मासा तडफडतो तसे) दुष्ट मन पाण्यातून योगभूमीवर आणल्यावर तडफडते.

दूरंगमं एकचारं असरीरं गुहासयं

ये चित्तं संयमेस्मंति मोक्षंति मारबंधना।

दूरवर एकटे भटकणाऱ्या, निराकार आणि शरीर गुंफेत राहण्याऱ्या मनाला जे लोक संयमपूर्वक ताब्यात ठेवतात ते लोक संसार बंधनातून मुक्त होतात.

अस्थिर चित्त आणि ज्यांच्या मनातून श्रद्धा नि भक्ती निघून गेलेली आहे अशा हीन दर्जाच्या साधकाला धर्म म्हणजे काय हे कळत नाही आणि विशेष ज्ञान किंवा प्रज्ञा लाभत नाही. याचाच अर्थ असे साधक अज्ञानाच्या गर्तेत, विहिरीत पडून राहतात.

अनवस्सुतचित्तस्थ अनन्वाहतचेतसो

पुण्यपाप हीनस्य नत्थि जागरतो भयं।

ज्याच्या मनामध्ये तृष्णेची तीव्र धार राहत नाही, मन क्रोधाचे शस्त्र चालवीत नाही, पाप पुण्याच्या दोन्हीही कल्पनांचा जो त्याग करतो, त्याच्यात स्वजागृतीमुळे जन्म-मृत्यूचे भयच उरत नाही.

हे भिक्खूजण! क्षणभंगूर देहाला मातीच्या भांड्याप्रमाणे मानून विशाल मनाला चांगल्या प्रकारे जाणून प्रज्ञारूपी शस्त्राने कामदेव या संसारातील शत्रूंशी घनघोर युद्ध करा. त्यातून तुम्हांला समाधी जिंकता येईल. जिंकलेली ही वस्तू नीट सांभाळून ठेवा. परंतु त्या समाधीत मन आसक्त होऊ देऊ नका. सत्‌विचाराने भरलेले तुमचे मन तुम्हांला अधिक श्रेष्ठ बनवेल.''

काही गावात संसार तापांनी पोळलेले दु:खीजन बुद्धांना भेटून आपल्या संसारी जीवनातल्या व्यथा सांगत. त्यांना बुद्धांनी सांगितले, ''मीही ७/८ वर्षे तुमच्या सारखाच संसारी माणूस म्हणून जीवन व्यतीत केले आहे. संसार यात्रा काहींना कठीण वाटते, काहींना सोपी वाटते.'' या लोकांसाठी त्यांनी सांगितले, एक गाथा म्हटली –

दीघा जागरतो रत्ति दीघं सनास योजणं

दीघो बालानं संसारो सद्धम्मं अविजानजं।

जागणाऱ्या व्यक्तीला रात्र सरता सरत नाही. रात्र फार मोठी वाटू लागते. जर तुम्ही चालता चालता थकला असाल तर कमी अंतराचा रस्ताही फार लांबचा वाटतो. त्याप्रमाणे



मूर्खासाठी, अज्ञानी माणसासाठी संसारयात्रा फार कठीण गोष्ट वाटत असते.

चरच्चे नाधिगच्छेय्य सेखं सदिसमत्तनो

एक चरियं दव्हं कयिरा नत्थि वाले सहायता

आपल्या तोडीचा किंवा आपल्यापेक्षा श्रेष्ठ मित्राचा नेहमी शोध घ्या. जर मिळाला नाही तर एकट्याने का होईना निश्चयाने वागा, कारण दुष्टबुद्धीच्या लोकांबरोबरची मैत्री चांगली असत नाही.

हा माझा मुलगा, हे माझे धन असा विचार करणारे मूर्ख असतात. हे लोक असा विचार करत नाहीत की, आपण ज्याला आपले शरीर म्हणतो ते आपले स्वत:चे नसते, मग पुत्र आणि पैसा तुमचा कसा असू शकतो?

तुम्ही गुणहीन असतानाही मठात, आश्रमात अधिकार मिळावा किंवा गृहस्थींच्याकडून पूजा आणि सत्काराची अपेक्षा करीत असाल तर तुमच्या इतका मूर्ख कोणी नाही. मोक्षाचा मार्ग यापासून वेगळा आहे.''

## <u>ज्ञानी कसा ओळखावा?</u>

एकदा एका भिक्षूने त्यांना विचारले की ज्ञानी, विद्वान, श्रेष्ठ पुरूष कसा ओळखावा? तेव्हा बुद्धांनी म्हटले -

''न भजे पापके मित्ते न भजे पुरिसाधमे

भजेथ मित्ते कल्याणे भजेथ पूरिसूत्तमे

अधम आणि दुष्ट पुरुषाची संगतही करू नका आणि सेवाही करू नका. श्रेष्ठ पुरुषाची संगत करा आणि सेवाही करा. त्यातून तुमचे कल्याणच होईल. विद्वान पुरुष नेहमी प्रसन्नचित्त राहत असतो. जसा कुशल सुतार लाकडाला घासून घासून सुंदर आकार नि चमक निर्माण करतो, त्याप्रमाणे विद्वान लोक आपल्या मनाला परिश्रमाने सुंदर बनवितात. जसा खोल आणि विशाल तलाव स्वच्छ पाण्यामुळे प्रसन्न वाटतो, तसे पंडित लोक सदुपदेश श्रवण केल्यामुळे प्रसन्न बनतात.''

दुसऱ्या एका सद्‌गृहस्थाने त्यांना विचारले, ''तुम्ही धम्माचा उपदेश करताना प्रज्ञा व शीलाला महत्त्व देता. आम्ही सर्वसामान्य लोकांनी कोणाला शीलवान समजावे?''

यावर ते म्हणाले, ''जे आपल्या किंवा दुसऱ्याच्या साठी धन, राज्य, पुत्र यांची इच्छा

धरीत नाहीत, त्याचबरोबर अधर्माने धनसंचय करीत नाहीत अशा लोकांना शीलवान, ज्ञानी आणि धर्मात्मा समजावे. अर्थात भवसागर तरून जाणाऱ्यांची संख्या फारच कमी असते. इतर काठाने पळत राहतात किंवा बुडून मरून जातात.''

## पाप आणि पुण्य

सर्वसामान्य माणसाच्या मनात कशाला पाप म्हणावे आणि कशाला पुण्य म्हणावे? याबाबत गोंधळ असतो. त्यामुळे गावोगावी अनेक स्त्री-पुरुष विचारणा करीत की पाप म्हणजे कशा प्रकारचे वागणे किंवा कशा प्रकारचे विचार? भिक्खूनाही याविषयी जाणण्याची उत्सुकता असे, त्यासाठी बुद्धांना उपदेश करावा लागे. पुण्य कर्माची गती वाढवायला ते सांगत, कारण तसे केले नाही तर मन पापाच्या वाटेवर चालू लागते. एखाद्यावेळी हातून पापाचरण घडले तर मात्र त्याची पुनरावृत्ती टाळा, कारण तेच पाप पुनःपुन्हा करणे हे दुःखाचे कारण बनते. जर तुम्ही पुण्य कर्म केले असेल, तर मात्र ते पुनःपुन्हा करा. अर्थात ते करताना श्रद्धापूर्वक करा. कारण पुण्यसंचय करणे हे सुखाचे कारण आहे.

अनेकवेळा लोक उदाहरणे देत, ''पाहा तो पापी माणूस पापकर्म सतत करतो तरी पण त्याला त्याचे वाईट फळ भोगावे लागत नाही. तो सुखाने जगतो आणि दुसरा पुण्यकर्म करत राहतो तो मात्र दुःख भोगत असतो. हा काय न्याय झाला? पाप करणाऱ्याला शिक्षा नाही उलट पुण्य करणारा शिक्षा भोगतो.'' अशी विचारणा चुकीची नसते. तो लोकांचा प्रत्यक्ष अनुभव असतो. अशा चर्चेच्यावेळी बुद्धांनी त्यांना वेगवेगळ्या प्रश्नावर उपदेश केला,''

पापोपी पस्मती भद्रं
    याव पापं न पच्चति।
यदाच पच्चति पापं
    पापो पापानि पस्सति॥

जोपर्यंत पापाचा घडा भरत नाही, ते पूर्णतेला पोहोचत नाही तोपर्यंत पूर्वजन्मातील शुभ संस्काराच्या जोरावर तो सुखे भोगतो. पण जेव्हा पाप आपल्या पूर्णत्वाला पोहोचते तेव्हा तो पापी नाना प्रकारच्या केलेल्या पापांची फळे भोगायला लागतो.

भद्रो पि पस्सति पापं
    याव भद्रं न पस्सति
यदाच पच्चति भद्रं
    भद्रो भद्रानि पस्सति



जो पर्यंत पुण्य आपल्या पूर्णत्वाला पोहोचत नाही तो पर्यंत पुण्यात्मा असूनही पूर्वजन्मीच्या अशुभ संस्काराच्या कारणामुळे दुःख भोगत राहतो. जेव्हा पुण्य आपल्या परिणामाला पोहोचते, शिखर गाठते तेव्हा पुण्यात्मा शुभ फळ भोगू लागतो.

पापाला क्षुल्लक मानू नका, कारण ज्याप्रमाणे छोटे-छोटे जलबिंदू साठत गेल्याने घडा भरतो त्याप्रमाणे छोट्या छोट्या पापकृतीचा संचय होत जातो नि तुम्हांला केव्हा पापात्मा बनलो हे समजतही नाही. हीच गोष्ट पुण्य कर्माबाबत.

छोटेसे पुण्यकर्मही दुर्लक्षू नका, तेच तुम्हांला सन्मार्ग दाखवेल.

आध्यात्मिक सुखाचा शोध घेणाऱ्याने, साधकाने, भिक्षूने पापकर्मांचा त्याग करावा.

पाणिह्मि चे वणो नास्स
    हरेय्य पाणिनाविसं
नाब्बणं वियमन्वेनि
    नत्थि पापं अकुव्वतो

ज्याप्रमाणे हातावर विष घेतले तरी त्याचा शरीरावर परिणाम होणार नाही मात्र त्यावर जखम असता कामा नये. त्याप्रमाणे जी कृती केली नाही तर ते पाप बनत नाही.

महात्मा लोकांना निर्वाण प्राप्त होते. काही लोक समजतात की पाप करायचे नि पळून जायचे म्हणजे त्याचे फळ भोगावे लागणार नाही. पापाचे फळ दुःखच असते. पण त्यांना हे माहीत नाही की, आकाश, समुद्र, पर्वतातील गुंफा या कोणत्याही ठिकाणी राहून केलेल्या पापापासून मुक्त होता येत नाही. अर्थात पापाचे फळ हे भोगावेच लागते आणि अशा ठिकाणी राहून यमराजापासून कोणीही वाचू शकत नाही. कोठेही राहा, लपा, तुमचा मृत्यू ठरलेलाच आहे.''

## शिक्षा

''सर्व प्राणिमात्रांना शिक्षेमुळे कष्ट होतात. मृत्यूचे भय सर्वांना असते. त्यामुळे आपल्या स्वतःच्या जीवाप्रमाणे, आत्म्याप्रमाणे इतकेच समजून कोणाची हत्या करू नका. त्यांना मारू नका. प्राण्यांची हत्या, शिकार करू नका.

अहिंसेचे पालन करणाऱ्या विद्वानाला परलोकातही सुख प्राप्त होते. याउलट हिंसाचारी मूर्ख आणि पापी माणसाला या लोकातही नाही व परलोकातही सुख मिळत नाही.

मानोच फरुसं किञ्चि

वुत्ता पटिवदेय्युं तं ।

दुक्खहिसार म्भकथा

परि दण्डाफुस्सेय्युंतं

कोणाशीही कटू भाषण करू नका. तसे बोलल्यामुळे तुम्हाला उत्तरही त्याच भाषेत मिळेल. कोणाविषयी आक्षेप घेण्याचा परिणाम दुःखदायक होतो.

ज्याप्रमाणे गुराखी चरणाऱ्या गाईंना काठीचा वापर करून गोठ्याकडे नेतो. त्याप्रमाणे आजारपण आणि मृत्यू प्राण्यांच्या जीवांचे हरण करून घेऊन जातो.''

## ब्राह्मण कोणाला म्हणावे?

''ब्राह्मण कोणाला म्हणावे, कोणाला श्रमण समजावे, कोणाला भिक्खू मानावे?'' असा प्रश्न एका भिक्खूने त्याना विचारला. त्यावर उत्तर म्हणून त्यांनी सांगितले,

''जो मनुष्य गृहस्थाश्रमातले वस्त्र-भूषण, अलंकार घालूनही राग द्वेषादिरहित, इंद्रिय दमन करून नियमित ब्रह्मचारी राहतो व हिंसा, घात, दंड यांपासून परावृत्त जीवन जगतो तोच ब्राह्मण, तोच श्रमण व तोच भिक्खू समजावा.''

ज्याप्रमाणे चांगला घोडा चाबुक अंगावर लागण्याच्या अगोदरच सावध होतो, त्याप्रमाणे लोकापवाद, निंदा सुरू होण्यापूर्वीच खरा साधक सावध बनतो.

जर चाबकाने मार खाल्ला असेल तर तो घोडा पुन्हा मार खावा लागेल या भीतीने अत्यंत जागृत बनतो. त्याप्रमाणे महात्मा लोकापवादाच्या भीतीने सावध बनतो व धर्म उद्योगात रमतो. संसारात राहूनही तुम्ही श्रद्धा, शील, उद्योग, समाधी, धर्माचरणाचा निश्चय, ज्ञान, त्रिविधा व १५ चरण स्मृतीने युक्त होऊन संसारातील दुःखांना दूर करू शकता.

## प्राणायाम

ते प्रत्येक भिक्खूला श्वासप्रच्छ्वासाबद्दल जागृत राहा असे आवर्जून सांगत असत. आनंद, सारीपुत्त हे आता नव्या, तरुण भिक्खूंना मार्गदर्शन करीत. ते उपदेशाच्या कामाचे विकेंद्रिकरण करू लागले. त्यामुळे भिक्खू आणि विहारांच्या वाढत्या संख्येला ज्येष्ठ आचार्यांची गरज होती. यापूर्वी सारे भिक्खू समान होते, पण आता शिक्षक आणि विद्यार्थी



असे वर्ग तयार केले. विद्यार्थी भिक्खूंनी शिक्षकांशी कसे वागावे याचे नीतिनियम त्यांनी समजून सांगितले व त्याची अंमलबजावणीही सुरू केली. त्यांना प्राणायाम कसा करावा हे सांगितले.

प्राणायामाच्या अभ्यासात प्रथम पायरी होती

१) दीर्घश्वासाची

आतमध्ये दीर्घ श्वास घेणे व दीर्घ श्वास सोडणे.

२) लघू श्वास

आतमध्ये लघू श्वास घेणे व लघू श्वास बाहेर सोडणे.

या अभ्यासामुळे मनाला स्थिरता येते व मन जागृत बनते. हा अभ्यास जागृतपणे केला तर शरीर व मनाविषयी अधिक ज्ञान लाभते.

३) तिसऱ्या पायरीवर

दीर्घ श्वास आत घेण्यामुळे साऱ्या शरीराविषयी जाणीव निर्माण होते. शरीर क्रियेव्यतिरिक्त जन्म-मृत्यू सारख्या जीवनाच्या अंगाचाही विचार केला जातो.

४) चौथी पायरी

श्वास घेताना व सोडताना शरीर स्थिर आणि शांत बनत असल्याची धारणा स्थिर करा. त्यामुळे शरीर-मन व श्वासोच्छ्वास एका संतुलित अवस्थेत स्थिरावतील.

५) पाचवी पायरी

श्वास आत घेताना तुम्ही आनंदी बनता. श्वास सोडतानाही आनंदी वृत्ती राहते.

६) सहावी पायरी

या दोन श्वासप्रच्छ्वासामुळे उत्साही-आनंदी अशी मनाची अवस्था लाभते. स्वतःबद्दल आजपर्यंत असणारे अज्ञान निघून जाते. आनंद व उत्साहाने तुम्ही भरून जाता.

७) सातवी पायरी

मी श्वास आत घेतो, बाहेर सोडतो नि मनाच्या कार्याविषयी जागृत बनतो.

८) आठवी पायरी

आता श्वास-प्रच्छ्वासामध्ये आतील मनाच्या क्रिया शांत व स्थिर बनवतो.

आता मनाच्या अंतरंगात विचार-भावना कशा जन्मतात हे समजते. त्यांच्या मुळांशी जाता येते. त्यांना समजून घेतल्याने त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येते. राग, द्वेषादी भावनांमुळे

भावना-विचार निर्माण झाले तरी त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येते.

९) नववी पायरी

मनाच्या विविध पैलूंचा परिचय होतो.

१०) दहावी पायरी

आता प्राणायामामुळे मन प्रसन्न व शांतीचा अनुभव घेऊ लागते.

११) अकरावी पायरी

म्हणजे आता मनाची एकाग्रता, चित्ताची स्थिरता सहज प्राप्त होते.

मनाच्या विविध अवस्था, स्थिती कार्य समजू लागते. यानंतर मग क्रमशः समाधी अवस्थेकडे निब्बाण साधकाची वाटचाल सुरू राहते. तो जीवनाचे खरे दर्शन घडवतो. निब्बाण, मुक्ती म्हणजे जीवनापासून पलायन नव्हे.

## उपाली न्हावी जेष्ठ भिक्खू बनला

कपिलवास्तूच्या उत्तरेला कोसलांचे राज्य होते. त्यात अनुपिया शहराच्या एका वनात बुद्ध थांबले होते. माला जमातींची तेथे वस्ती होती. सारीपुत्त, कालदायी, नंद आणि छोटा राहुल त्यांच्या बरोबर होते.

दोन महिने उलटून गेले होते. शाक्य जमातीत बडे जमीनदार लोक होते. त्यांतील महानामा आणि अनुरुद्ध यांना धर्मचिंतनाची आवड होती. कपिलवस्तूत बुद्ध असताना ते नियमित त्यांचे विचार ऐकायला येत असत. महानामाचे अनेक मित्र यापूर्वीच आमच्या संघात दाखल झाले होते. अनुरुद्धने भिक्खू बनण्याचा विचार आपल्या आईपुढे बोलून दाखवला होता. पण ती म्हणाली होती, ''माझी दोनच मुले. दोघेही भिक्खू बनले तर मला चालणार नाही. पण जर तुझा जवळचा मित्र भदीया जर भिक्खू बनेल तर मी परवानगी देईन.''

अनुरुद्ध भदीयाकडे गेला. भदीया हा बडा जहागीरदार होता. त्याचा अंमल साऱ्या उत्तरप्रदेशावर होता. भदीयाने अनुरुद्धला येण्याचे कारण विचारले. ते कळल्यावर तो म्हणाला, ''भिक्खू होण्यास मी सर्व ते साहाय्य तुला करेन हे माझे आश्वासन, त्यात काही विघ्न असेल तर तेही दूर करेन.'' मग अनुरुद्धने सांगितले, ''तूच त्यातला अडथळा आहेस.'' ते कसे? मग अुनरुद्धने आईची अट सांगितली. थोडा वेळ विचार करून भदीया म्हणाला, 'ठीक आहे! पण ७ वर्षे थांब. या प्रदेशाचा राज्यकारभार व्यवस्था सुरळीत करतो नि मग संघात प्रवेश घेतो.'



''पण ७ वर्षे हा कालावधी फार झाला. तोपर्यंत मी नाही जगलो तर ?'' - अनिरुद्ध.

''असे नकारात्मक विचार मनात आणू नको, ७ महिने तरी थांबशील ?'' - बधिया.

असे करता करता तो ७ दिवसानंतर राजी झाला.

मग अनिरुद्धने आपले इतर मित्र भागू, किंबीला, देवदत्त आणि आनंद यांनाही बरोबर घेतले. ते बुद्धांचा शोध घेत कोयल राज्याच्या सीमेपर्यंत पोहोचले. आनंद त्यावेळी १८ वर्षांचा सर्वांत तरुण होता. अनिरुद्ध म्हणाला, ''सीमा ओलांडण्यापूर्वी आपण आपले दाग-दागिने, राजवस्त्रे काढू या.'' सर्वांनी त्याने अनुकरण केले. मग ते एका गाठोड्यात बांधले.

त्यांच्यापुढे प्रश्न पडला की आता त्याचे काय करायचे? एकजण म्हणाला, 'कोणा गरीबाला देऊ'. वाटेत एक न्हाव्याचे दुकान दिसले. त्यांच्याच वयाचा तरुण मुलगा तेथे गिऱ्हाईकाची वाट बघत बसला होता. त्याला त्याचे नाव अनिरुद्धने विचारले. तो होता 'उपाली.' अनिरुद्धने त्याला विचारले 'तू सीमेपर्यंत रस्ता दाखवशील का?' त्याप्रमाणे त्याने मार्गदर्शन केले. त्याचा निरोप घेण्यापूर्वी साऱ्यांनी त्याच्याकडे ते दागिन्याचे गाठोडे सोपवले.

त्याने विचारले 'हे काय आहे?'

या साऱ्या तरुणांनी सांगितले 'आम्ही बुद्धानुयायी होणार आहोत, भिक्खू होणार आहोत, त्यामुळे या वस्तूंचा आम्हाला काही उपयोग नाही. याचा तुला आयुष्यभर आरामात राहण्यासाठी उपयोग होईल.' असे सांगून त्यांनी निरोप घेतला व सीमा ओलांडली.

उपालीने गाठोडे सोडले नि हिरे, माणके पाहून त्याचे डोळे चमकले. त्याच्या घरातल्या कोणीही इतका मौल्यवान खजिना कधीही पाहिला नव्हता. त्याला आनंद झाला, पण क्षणमात्रच. तो घाबरला. त्याने ते गाठोडे छातीशी धरले. या दागिन्यासाठी कोणीतरी आपला जीव घेईल ही भीतीही मनात तरळून गेली. सारे राजवैभव त्या तरुणांनी सोडले ते कशासाठी? ते निरुपयोगी आहे म्हणूनच.

त्यांना म्हणे भिक्खू व्हायचे आहे. हे भिक्खूपण काय इतके मौल्यवान आहे? दागदागिन्यांपेक्षाही ते अधिक आनंद, सुख, शांती देते? संपत्ती नि सत्ता या तरुणांनी भोगलेली आहे. त्यातील धोकेही त्यांनी ओळखले आहेत.

उपालीच्या मनात ऊर्मी आली की हे गाठोडे फेकून द्यावे व त्या राजपुत्रांच्या पाठोपाठ धावत सुटावे. जीवनाचे खरे ध्येय, शांती, आनंद, स्वातंत्र्य आहे. क्षणाचाही वेळ न दवडता त्याने ते गाठोडे येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या नजरेला पडेल असे एका झाडाच्या खालच्या फांदीला बांधले नि तो जवळजवळ धावतच सुटला. थोड्याच वेळाने त्यानेही राज्याची

सीमा ओलांडली. त्याने साऱ्या राजपुत्रांना गाठले.

देवदत्तने ते पाहिले नि उपालीला विचारले, ''अरे तू इतका धापा का टाकतोस? तुझ्या मागे कोणी लागले आहे का? तुझ्या जीवाला काही धोका तर नाही ना? तुला दिलेले दागिन्यांचे गाठोडे कोठे ठेवलेस?'' यावर उपालीने आपला खरा हेतू सांगितला. देवदत्त हसू लागला. 'तुला भिक्खू बनायचे आहे? अरे पण तू जातीने...'

देवदत्तचे उद्‌गार मध्येच थांबवून अनिरुद्ध म्हणाला, 'वा! वा! छान निर्णय घेतलास. आम्हा साऱ्यांना तू आल्याचा आनंद झाला आहे. संघ म्हणजे एखादा महान सागर आहे नि त्याला भिक्खूंच्या वेगवेगळ्या नद्या मिळतात. मग त्या संघाशी एकसंघ बनतात. त्या नद्यांचा उगम वेगवेगळ्या दऱ्याखोऱ्यांत झालेला असतो. त्यांच्या प्रवाहांची दिशा वेगवेगळी असते. पण शेवटी त्या सागराला मिळाल्याने सागरमय होतात. त्यांच्यात कोणताच भेदभाव राहत नाही, सारेच बंधू होत.'

सारेजण अनुपिवा येथे पोहोचले. दुसऱ्या दिवशी सकाळी बुद्धांना एका जंगलात भेटले. बधियाने साऱ्यांच्या वतीने दीक्षेची प्रार्थना केली. बुद्धांनी अनुमती दिली. बधियाने सर्वांत उत्तम गोष्ट सांगितली. त्याने प्रार्थना केली, 'उपालीला सर्वप्रथम दीक्षा द्यावी.'

बुद्धांनी त्यामागचा हेतू विचारला. बधिया म्हणाला, ''हे शाक्य मुनी, उपाली जन्माने न्हावी आहे. मात्र त्याला प्रथम दीक्षा दिल्याने तो आमचा ज्येष्ठ गुरुबंधू बनेल नि मग आम्ही त्याला ज्येष्ठतेचा मान म्हणून वंदन करू. अन्यथा दीक्षेपूर्वी तो आम्हाला वंदन करायचा तोच प्रकार दीक्षेनंतरही चालू राहील. आमच्या मनातील वर्ण वर्चस्वाची गाठ तशीच राहील नि हे तथागतांना मान्य होणार नाही व आमच्या भिक्खूपणालाही शोभणारे नाही.''

तो समजूतदारपणा क्रांतीचे सुचिन्ह होता. त्याप्रमाणे दीक्षाविधी पार पडला. त्यानंतर सारे राजगृहाकडे गेले. तेथे कसपा, मोगलाना आणि कोंडाना आणि सहाशे भिक्खू होते. तेथे आल्याचा साऱ्यांना आनंद झाला.

□□□



# कपिलवस्तूत बुध्द

कपिलवस्तूत भिक्षेसाठी बुद्ध राजवाड्याजवळ येताच त्यांना आलेले पाहून राजा शुद्धोधन बुद्धांना खाली वाकून नमस्कार करीत असताना राजवाड्याच्या गच्चीतून महाप्रजापिता गौतमी व यशोधरा पाहत होत्या. राहुल आणि राजा शुद्धोधनांबरोबर बुद्ध बागेतील संगमरवरी बाकावर बसले असताना माता गौतमी व यशोधरा आल्या. बुद्ध उठले. मातेला वंदन केले. यशोधरेला अश्रू अनावर झाले. सिद्धार्थला संन्यासी वेशात ती पाहू शकत नव्हती.

थोड्यावेळाने ती शांत झाल्यावर त्यांनी आपला सावत्र भाऊ नंद कोठे आहे? असे विचारले. त्यावेळी तो युद्धातील शस्त्र चालवण्याचे शिक्षण घेत होता. तर बहीण सुंदरीनंदा आता सोळा वर्षांची झाली होती. हे बुद्धांना माता गौतमीने सांगितले, ''सिद्धार्थ! तू गेली सात वर्षे आम्हाला सोडून गेलास या दीर्घ काळात तुझी पत्नी यशोधरा किती मोठ्या धैर्याने जीवन जगली हे आम्ही पाहिले आहे. तिच्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो.''

यशोधरा हसली, पण काही बोलली नाही. इकडे राजा शुद्धोधनांना सिद्धार्थ विषयी सात वर्षांपूर्वी राजवाडा सोडल्यापासून आजपर्यंत काय काय घडले हे ऐकण्याची उत्सुकता होती. बुद्धांनी जेतवनात झोपडी बांधल्याचे ऐकल्यावर राजा म्हणाला, ''तुमच्यासाठी निग्रोध बागेत तशी झोपडी बांधतो, तेथे तुम्ही काही महिने वास करा व तुमच्या धम्माचा उपदेश आम्हाला करा.

बुद्धांची परतण्याची वेळ झाली. ते उठले. राजाने रथ तयार ठेवला होता. पण त्यांनी पायीच जाणे पसंत केले.

## अंबापाली नि जीवक

एके सायंकाळी सम्राट बिंबिसार आणि बुद्ध दोघेच बोलत बसले होते. बिंबिसारनी बोलता बोलता सांगितले, ''तथागत, मला आणखी एक मुलगा आहे. पण तो महाराणी विदेहीचा नव्हे. अंबापाली ही माझी दुसरी पत्नी. तिच्या मुलाचे नाव जीवक. तो आता सोळा वर्षांचा होईल. ते दोघेही पाटलीपुत्र नगराच्या उत्तरेला राहतात. अंबापालीला राजवाडा,

राणी, महाराणी सारख्या पदव्यात रस नाही. तिचा पुत्र जीवक याला राजकारण, युद्धनीती यात आवड नाही. ते एका सुंदर आमराईत राहतात.''

त्यांना भेटण्याचे बुद्धांनी मान्य केले.

काही दिवसानंतर एक अतिशय सुंदर स्त्री, तिच्या १५/१६ वर्षांच्या मुलासह बुद्धांना भेटायला आली. दोन शुभ्र घोड्यांच्या रथातून ती आली होती. त्यावेळी बुद्ध भिक्षेसाठी गेले होते. परत येताना त्यांच्याबरोबर कालुदायी, सारीपुत्त व नागयमाला होते.

बुद्धांनी पाहिल्याबरोबर ओळखले की ती अंबापाली व तो जीवक होता. कालुदायी महिन्यापूर्वीच संघात दाखल झाला होता. त्याने नंतर बुद्धांना सांगितले की, आयुष्यात इतकी सुंदर स्त्री त्याने प्रथमच पाहिली. सारीपुत्तचीही तीच अवस्था होती. ते तिच्याकडे सरळ पाहू शकत नव्हते. त्यांनी नजर जमिनीकडे नेली.

अंबापालीने सरळ बुद्धांच्या नजरेला नजर भिडवली. आजपर्यंत तिच्याकडे पाहणाऱ्या नजरा वासनेने, लोभाने भरलेल्या होत्या. ती बुद्धांना म्हणाली, ''हे भगवंत ! आज पहिल्यांदा निष्पाप डोळे मला पाहत आहेत. मी अंबापाली नि हा माझा पुत्र जीवक आहे.''

बुद्धांनी जीवकाच्या वैद्यकीय विषयाच्या अभ्यासाची चौकशी केली. त्याने नम्रतेने उत्तरे दिली. तो एक हुशार मुलगा होता. अजातशत्रू प्रमाणे तोही सम्राट बिंबिसाराचा पुत्र होता. तो म्हणाला, 'माझा वैद्यकीचा अभ्यास पूर्ण झाला की तुमच्या सान्निध्यात येऊन राहणार आहे.'

अंबापाली म्हणाली, ''यापूर्वी वाटले होते की इतर धर्म-पुरोहिताप्रमाणे तुमची भेट होईल, पण का कोणास ठाऊक माझ्या हृदयात इतकी वर्षे कोंडलेले दुःख आज हलके झाले आहे.'' तिच्या डोळ्यातून अश्रूंचा पूरच लोटला होता. ती सांगत होती, ''मला राजवैभवाचे आकर्षण नाही. आजचा माझ्या जीवनातला सर्वांत आनंदाचा दिवस आहे.'' अंबापाली ही प्रसिद्ध नर्तिका. राजाच्या प्रेमात पडली नि जीवकचा जन्म झाला. राजवाड्यातल्या सर्वांनी तिचा द्वेष केला. त्यामुळे राजाने तिची स्वतंत्र व्यवस्था केली होती.

त्यांनी तिची कथा शांतपणे ऐकून घेतली नि तिला म्हणाले, ''अंबापाली! सौंदर्य उगवते नि मावळते. इतर गोष्टींप्रमाणे त्यालाही उदय आणि अस्त असतो. प्रसिद्धी याहून वेगळी नाही. फक्त शांती, आनंद आणि स्वातंत्र्य ही ध्यान-चिंतनाची फळे आहेत. त्यातून आनंद लाभतो. त्यामुळे उर्वरीत आयुष्यातील प्रत्येक क्षण महत्त्वाचा समजून सत्कारणी लाव. प्राणायामाचा अभ्यास कर, जागृतपणे प्रत्येक कृती कर. पंचशीलाचे आचरण कर.''

या उपदेशाने तिचे समाधान झाले. ती हात जोडून म्हणाली, ''भगवन्, वैशाली



नगराबाहेर माझ्या मालकीची एक आमराई आहे, तेथे आपण व सर्व भिक्खूंनी भोजन करावे अशी विनंती आहे.''

बुद्धांनी निमंत्रण स्वीकारले.

ती दोघे निघून गेली.

थोड्या वेळाने कालुदायी, सारीपुत्त, नागासामाला, तिघेही बुद्धांच्यासमोर बसले. धीर एकवटून सारीपुत्ताने विचारले, ''तथागत, भिक्खूने स्त्रीच्या सौंदर्याकडे कसे पाहावे? स्त्रीचे सौंदर्य हे भिक्खूच्या आध्यात्मिक प्रगतिपथातला अडथळा ठरतो का?''

त्यांनी सांगितले, ''सर्व धर्मांचे सार हे सौंदर्य किंवा कुरूपता यांच्यापलिकडे असते. त्या कल्पना आपल्या मनाने निर्माण केलेल्या असतात. नदी, ढग, पान, फूल, सूर्यकिरण, सोनेरी पहाट ही सारी सौंदर्यस्थळेच असतात. पण स्त्रीच्या सौंदर्याने पुरुषांच्या नजरा विचलित होतात. जर एखादा साधक त्याने प्रभावित झाला तर पथभ्रष्ट बनू शकतो.

जर तुम्ही अध्यात्मक्षेत्रात प्रगती केलीत तर सुंदर गोष्टी अधिक सुंदर दिसू लागतील. निर्वाण प्राप्तीने, जागृतीमुळे तुम्ही सुंदरता-कुरूपतेच्या पलिकडे जाता. त्यांचे क्षणभंगुरत्व जाणल्याने त्याने तुम्ही मोहित होत नाही, प्रभावितही होत नाही.

खरे सौंदर्य जे कधी कमी होत नाही किंवा मावळत नाही ते सौंदर्य करुणामय हृदयात असते. कोणत्याही अटीशिवाय, निरपेक्ष भावनेची करुणा तुम्हाला खरी शांती देते. चांगले अनासक्त ध्यान करा, म्हणजे सौंदर्याचा साक्षात्कार होईल.''

त्यांनी त्यांच्यासाठी एक गाथा म्हटली -

''भूतकाळाचा पाठलाग करू नका
भविष्याच्या विचारात स्वतःला हरवू नका
भूतकाळ आता उरलेला नाही
भविष्यकाळ अद्याप आलेला नाही
जीवनाकडे जसे आहे तसे सखोल पाहा
आता नि येथे
स्थिरतेत नि स्वातंत्र्यात जगा
आज सतत कामात राहा
उद्यापर्यंत थांबणे हे उशीर करते

मृत्यू अनपेक्षित येतो
त्याच्याशी सौदा कसा करणार ?
साधू त्याला जवळ करतो.
जो रात्रंदिन जागृत मनाच्या
अवस्थेत राहतो
एकांतात वेगळ्या पद्धतीने
कसे राहायचे हे त्यालाच समजते.''

**स्त्रियांना दीक्षा**

कपिलवस्तू सोडून पायी चालत येणाऱ्या महाप्रजापिता गौतमी व पन्नास एक स्त्रिया यांना भिक्खूंनी प्रथम ओळखलेच नाही. त्यांचे पाय रक्तबंबाळ झाले होते, त्यांनी मुंडन केले होते व साऱ्या पिवळ्या वस्त्रांमध्ये होत्या. भंते आनंदने गौतमींना विचारले, ''तुमची ही अवस्था कशामुळे झाली? तुम्ही कोठून आलात? येथे येण्याचा उद्देश कोणता?''

यावर गौतमीने सांगितले, ''भंते आनंद! आम्ही राजवस्त्रे, राजवैभवाचा त्याग केला आहे. कपिलवस्तू सोडून आज पंधरा दिवस झालेत, चालतच आहोत. रस्त्याकाठी झोपत होतो व गावात भिक्षा मागून खात होतो. आमच्या वतीने भगवान बुद्धांना सांगा व आम्हांला संघात दीक्षा देऊन सामील करून घ्या अशी प्रार्थना करा.'' आनंदने सारा वृत्तांत बुद्धांना कथन केला. पण बुद्धांनी काहीच भाष्य केले नाही. त्यांचे मौन समजून घेत आनंदने पुन्हा विचारले, ''भगवन्, स्त्रिया अरिहंत पदापर्यंत पोहोचू शकत नाहीत का?''

बुद्ध म्हणाले, 'निःसंशय पोहोचू शकतात. आनंदने आग्रह धरला. मग स्त्रियांना संघात प्रवेश द्यायला परवानगी का देत नाही?'

यावर त्यांनी ज्येष्ठ भिक्खूंना पाचारण केले. त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. त्यांचा निष्कर्ष असा होता की, स्त्री-पुरुष असा भेद करण्याची गरज नाही. परंतु संघाच्या रचनेत अंतर्बाह्य बदल कसा करावा. हा जटिल प्रश्न होता व व्यवहारी अर्थाने, व्यवहारी दृष्टीने त्याचा विचार करावा. सारीपुत्तने आपले मत मांडताना सांगितले,

''प्रथम भिक्खूणींच्या आचार-विचारांचे नियम बनवावेत. अन्यथा सामाजिक टीका सुरू होईल.'' यासाठी आठ नियम बनवण्यात आले-ते खालीलप्रमाणे होते.

१) जरी भिक्खूंणी वयाने ज्येष्ठ असली तरी भिक्खूंचा मान राखावा, त्यांचे ऐकावे.

२) वर्षाकालासारख्या काळात भिक्खूंच्या मठाजवळपासच त्यांचा मठ, निवास



असावा. म्हणजे त्यांना व्यवहारी व आध्यात्मिक प्रगतीसाठी पाठिंबा मिळू शकेल. पुढील आध्यात्मिक अभ्यास होऊ शकेल.

३) पंधरा दिवसांतून एकदा ज्येष्ठ भिक्खूला निमंत्रित करावे, म्हणजे तो प्रोत्साहन देईल, शिकवेल आणि त्यांची उपासनेत प्रगती होईल.

४) वर्षाऋतूनंतर भिक्खूणींनी आपल्या प्रगतीचा आढावा महंताना द्यावा.

५) एखाद्या भिक्खूणीने नियमभंग केला तर त्याबद्दल भिक्खूणी व भिक्खूपुढे आत्मनिवेदन करावे व क्षमायाचना करावी.

६) ध्यानाच्या अभ्यासाचा प्राथमिक कालावधी पूर्ण झाल्यावर भिक्खूणींनी पूर्ण अभ्यासक्रम आत्मसात करावा.

७) भिक्खूंवर टीका-टिप्पणी करू नये.

८) भिक्खूसमूहाला धर्मविषयक सूचना देऊ नयेत.

९) स्त्रियांना धर्माची द्वारे खुली करताना स्त्री-पुरुष भेद राहू नये, पण त्यासाठी प्राथमिक सूचनांचे पालन आवश्यक ठरते.

**धम्मदीक्षेचे दोन प्रकार होते.**

१) संघात सामील होणे.

२) सामान्य अनुयायी बनणे.

एकाला भिक्खू म्हणत तर दुसरा उपासक. भिक्खू हा गृहहीन परिव्राजक असतो. दोघांनाही काही नियम पाळावे लागतात. पण नियम मोडल्याबद्दल भिक्खूला शिक्षा असते. उपासकांसाठी हे नियम आज्ञा असतात.

उपासक संपत्ती बाळगू शकतो पण भिक्खूला ती बाळगता येत नाही. उपासक होण्यासाठी कोणत्याही संस्काराची गरज नसते, पण भिक्खू होण्यासाठी उपसंपदा नावाचा संस्कार विधी करावा लागतो.

भिक्खूणींना जर हे नियम मान्य असतील तर त्यांना संघात प्रवेश द्यावा असे सर्वानुमते ठरले. त्या साऱ्या स्त्रियांनी त्याबद्दल अभिवचन दिले. त्यामुळे त्यांचा संघ प्रवेश सुकर झाला. मात्र स्वतः बुद्ध या साऱ्या प्रवेशाला फारसे अनुकूल नव्हते. आता संघात चार प्रकारचे अनुयायी वावरत होते.

१) पुरुष उपासक

२) स्त्री उपासक

३) भिक्खू

४) भिक्खूणी

भिक्खूणीसंघ बुद्धांनीच प्रथम स्थापन केला असा याचा अर्थ होत नाही. त्यापूर्वी जैन आणि इतर संप्रदायांत दोन शतकांपासून स्त्रिया धर्मदीक्षा घेत होत्या. भिक्खूणींचे मोठमोठाले संघ होते. त्यांतल्या काही भिक्खुणी हुशार व विदुषी होत्या. स्त्रियांचा मान चांगला ठेवण्यात येत असे. पण अपवादाने भिक्षुणीवर गावातल्या लोकांकडून बलात्काराचे प्रकारही घडले त्यामुळे त्यांच्या आचार, विचार, विहाराबाबत काही नियम घालून देणे आवश्यक झाले.

## बुद्धांचा आजार आणि वैद्य जीवक

एके दिवशी बुद्ध आजारी पडले. पोटाचा त्रास सुरू झाला, अस्वस्थता वाढली, तापही आला. भंते आनंदला वैद्य जीवककडे पाठवले. जुलाबाचे औषध देण्याची विनंती केली. त्याने काही दिवस स्निग्ध करायला सांगितले. त्याप्रमाणे केल्यावर तीन चमचे वेगवेगळ्या औषधांचे चूर्ण जीवकने आणले. त्यातील एक चमचा औषधाचा वास घेतल्यावर दहावेळा जुलाब होतील. दुसऱ्या चमच्याने दहावेळा व तिसऱ्याने दहावेळा जुलाब व्हायला हवेत. पण एकवेळ कमी होईल असे जीवकने स्पष्ट केले तसे झाले. मग आनंदला सांगून स्नानासाठी गरम पाणी तयार केले. त्यानंतर एक जुलाब झाला. काही तासांतच बुद्धांची तब्येत ठीक झाली. शरीर स्वास्थ्य पूर्ववत झाले. त्यांना प्रसन्न चित्ताने बसलेले पाहून वैद्य जीवक भेटायला आला. तो म्हणाला, ''तथागत! एक वर मागायला आलो आहे. राजा प्रद्योत याने साऱ्यांना चीवर वस्त्र दान करण्याची इच्छा व्यक्त केली आहे ती स्वीकारावी. ज्ञानप्राप्तीनंतर वीस वर्षे बुद्ध किंवा भिक्खू साधी वस्त्रे वापरत होते. सर्व पांसुकुलिक होते. जीर्ण वस्त्रे, चिंध्या वापरत होते. जीवकाने परवानगी मागितली.

त्यांनी त्याला अनुमती दिली.

त्यानंतर पुढे चीवरचा रंग कोणता असावा, रंग कसा तयार करायचा, नखावर किंवा पाण्यात एक थेंब टाकून रंग व्यवस्थित बनला आहे की नाही ही परीक्षा घेऊन मग रंगाच्या भांड्यात रंग देणे, ते वाळत घालण्याचा प्रकार; सारे काही व्यवस्थित नियम बनले. चीवर शिवून टाके घालणे, ठिगळं लावणे यालाही परवानगी मिळाली.



## नग्नतेला विरोध

एके ठिकाणी एक भिक्खू नग्न झाला नि बुद्ध राहत होते तेथे आला. त्यांना म्हणाला, ''भगवान तुम्ही अल्प गरजा असाव्यात यावर भर देता. विचार केला की, त्यागी जीवन जगावे मग त्यासाठी चीवर तरी कशाला हवे? नग्नता हे 'असंग्रह' वृत्तीचेच निदर्शक आहे त्यामुळे भगवान भिक्खूंना नग्न राहण्याची परवानगी द्यावी!'' बुद्धांनी त्याला परवानगी दिली नाही, त्याला फटकारले. असे वागणे अनुचित आहे. श्रमण आचाराविरुद्ध आहे. जैन श्रमण तीर्थंकारांनी हा मार्ग अवलंबिला आहे तो तीर्थंकारांना शोभतो. भिक्खूंनी त्यांचे अनुकरण करू नये.

काही भिक्खूंचे म्हणणे होते की, मृगजीन, बाल कंबळ, केश कंबळ, वल्कले, झाडांच्या साली वापरून राहावे; चीवर पेक्षाही असे राहणे अधिक त्यागीपणाचे चिन्ह ठरेल. पण यालाही बुद्धांनी परवानगी दिली नाही.

भिक्खू बरोबर भिक्खूणींचा वावर संघामध्ये असतो हे विसरता येत नव्हते. भिक्खूंनी समाजात वावरावे, समाजाला आपल्या चांगल्या वर्तनाने उन्नत करावे अशी बुद्धांची अपेक्षा होती.

## निर्दोष व्यक्तीला शिक्षा देणे हा अपराध

चंपामध्ये गग्गरा पुष्करणीच्या काठावर बुद्धांचा मुक्काम होता. त्यावेळी काही देशात वासभगाम नावच्या गावात काश्यप गोग नावाचा आश्रमवासी भिक्खू राहात होता. तो नेहमी अशा प्रयत्नात असायचा की, त्याच्याकडे चांगले चांगले भिक्खू यावेत, राहावेत. सुखपूर्वक ते येथे वावरावेत. धम्माची चर्चा करावी. त्यासाठी तो त्यांच्या खाण्यापिण्याची, निवासाची उत्तम व्यवस्था करे. त्या साऱ्यांच्या सेवेत त्याला आनंद वाटे, सुख वाटे.

देशात बरेचसे भिक्खू भ्रमण करीत असत. त्यांपैकी काही वसभगाम होता तेथे पोहोचले. त्याने दूरवरूनच भिक्खूंना येताना पाहिले. त्याने आपल्या विहारात त्यांच्यासाठी हात-पाय धुण्यासाठी पाणी, न्याहारी, स्नानाची व्यवस्था, भोजन, विश्रांती सर्व सोयी मोठ्या कष्टाने उपलब्ध करून दिल्या.

नवोदित भिक्खूंना तो पाहुणचार आवडला. त्यांनी वासभगामची स्तुती केली. आता येथेच आपण राहू असे त्यांनी ठरवले.

वासभगाम भिक्खू आजूबाजूच्या कुटुंबांतून भिक्षा मागून आणीत असे. त्याला तसे

पुनःपुन्हा मागणे कठीण झाले. शिवाय त्याने विचार केला की हे नवोदित भिक्खू खूप दूरवरून आलेत, तेव्हा आता त्यांची थकावट दूर झाली असेल. ते ताजेतवाने झाले आहेत. पण पुढे जायला तयार नाहीत. याचा अर्थ ते आळशी बनत आहेत. ते बिघडतील. त्याऐवजी आता त्यांची देखभाल करणे सोडून द्यावे, म्हणजे आजूबाजूच्या वाडी वस्तीत संघाबद्दल वाईट मत निर्माण होणार नाही.

नवोदित भिक्खू एकत्र जमले. चर्चा करू लागले की प्रारंभी हा वासभगाम भिक्खू चांगले आदरातिथ्य करीत होता. आता त्याने सारे सोडले. प्रारंभी स्नानासाठी पाणी, भोजनासाठी अन्न, खास आग्रहाने सेवा करायचा. आता तो बदलला आहे. दुष्ट बनला आहे. आता आपण सारे मिळून आश्रमवासी भिक्खूला (उत्क्षेपण) दंड देऊ, शिक्षा करू.

मग साऱ्यांनी मिळून त्याच्या अपराधाची त्याला जाणीव दिली.

यावर तो भिक्खू म्हणाला, ''मी जाणीवपूर्वक कोणताही अपराध केलेला मला दिसत नाही.'' यावर त्यांनी तुला तुझा दोष दाखवतो असे म्हणून त्याला (उत्क्षेपण) दंड केला. तेव्हा भिक्खू वासभगाम म्हणाला, ''मला हे समजले नाही की या नवोदित भिक्खूंचे आदरातिथ्य करणे हा अपराध ठरेल! ही आपत्ती आहे की अनापत्ती हे मला कळेना! ही गोष्ट भगवानाकडून समजून घेऊ.''

असे ठरवून तो आपले आसन, पात्र चीवर घेऊन चंपाच्या दिशेने चालू लागला. तो बुद्धांना भेटल्यानंतर प्रथम त्यांनी त्याची विचारपूस केली. 'वाटेत काही त्रास वगैरे झाला नाही ना?' तू कोठून येतोस वगैरे चौकशी केली. नंतर त्याने आपली सर्व व्यथा सांगितली.

त्याची व्यथा ऐकून बुद्धांनी त्याला सांगितले, ''तुझी यात काही चूक नाही. तुला दंड केला हाच अपराध आहे. त्यांनी तुला दंड करून चूक केली आहे. तू निश्चिंत मनाने परत जा.'' ही गोष्ट नवागत भिक्खूंच्या कानावर गेली. त्यांना पश्चाताप झाला. मग त्या साऱ्यांनी ठरवले की, आपण सारे चंपाला जाऊन भगवानांची माफी मागू या.

ते सारे चंपाला आले. बुद्धांनी त्यांनाही विचारले,''कोठून आलात? प्रवासात काही त्रास नाही ना झाला?'' त्यांनी सांगितले, ''काही देशातून, वायभगामच्या आश्रमातून आलो.'' मग त्यांना विचारले, ''आश्रमवासी भिक्खूला तुम्ही दंड का केलात? कोणत्या चुकीसाठी? ''कशासाठी दंड केलात?

यावर ते म्हणाले, ''विनाकारण दंड केला, भगवान.''

त्यांना बुद्धांनी फटकारले. निर्दोष, शुद्ध भिक्खूला, विनाअपराध, विनाकारण दंड करणे हा गुन्हा आहे.



यावर त्यांनी उठून साष्टांग नमस्कार घालून सांगितले, ''आमच्या अज्ञानामुळे हा दोष घडला. त्याबद्दल क्षमा करा. भविष्यात असा गुन्हा पुन्हा घडणार नाही.''

त्यांचे अज्ञान त्यांना समजले. मग त्यांना माफी देऊन बुद्धांनी म्हटले, ''नम्र बना, अपराध ओळखून तसा भविष्यात न करण्याचा, संयम राखण्याचा निर्णय घेतो तो भविष्यात चांगला भिक्खू बनतो.''

भिक्खू जीवनात अनेक नियम हळूहळू तयार होत गेले. कसे वागावे हे काही अनुभवावरून निश्चित होत गेले. नख वाढवायचे ते किती? कर्णमूल हरिणीचा वापर करून कर्ण मळ काढणे किंवा अंगाला मालिश करणे, केस कापणे, लसूण खावा की खाऊ नये असे विविध प्रश्न उपस्थित होत. त्या-त्या वेळी स्वतः बुद्ध, आनंद, मोंगलायन या नवोदित भिक्खूंना मार्गदर्शन करीत असत.

## नख, केस राखणे

एक भिक्खू नखे लांब वाढवून आणि केस वाढवून नगरात भिक्षेसाठी जात असे. तो चारित्र्याने चांगला होता. पण त्याला थोडे छानछोकीने राहायला आवडायचे.

एका स्त्रीने त्याला पाहिले नि म्हटले, ''ये तरुणा ये! मैथुनाचा आनंद घे.''

''नाही भगिनी! आमच्यासाठी ते सर्वथा निषिद्ध आहे.''

''जर तू आला नाहीस तर नखाने स्वतःला ओरबडेन, रक्तबंबाळ करेन आणि तू मला भ्रष्ट करीत होतास म्हणून आरडा-ओरडा करेन.''

त्याप्रमाणे त्या स्त्रीने आरडा-ओरडा सुरु केला. तो ऐकून लोक पळत आले. त्यांनी भिक्खूला पकडला. त्यातल्या ज्येष्ठ व्यक्तीने त्या स्त्रीच्या नखांमध्ये रक्त, चमडी पाहिली. हे काम या स्त्रीचेच आहे हे त्यांना समजून चुकल्यावर त्यांनी त्या भिक्खूला सोडून दिले.

ही घटना त्या भिक्खूने बुद्धांना सांगितल्यावर 'साऱ्या भिक्खूंना लांब नखे ठेऊ नका, भिंतीवर घासणे, तोंडाने नख कापणे, धारधार शस्त्राने जखम करून नख कापणे करू नका,' असे बुद्धांनी सांगितले.

## कमरबंध

त्यावेळी एक भिक्खू गावात भिक्षेसाठी गेला असता, सडकेवर त्याचे अंतर्वस्त्र सुटले नि रस्त्यावर पडले. लोकांनी टाळ्या वाजवल्या. तो लज्जित झाला, अबोल बनला. ही

घटना बुद्धांच्यापर्यंत पोहोचली. तेव्हा कमरबंध वापरायला त्यांनी परवानगी दिली.

पण पुढे भिक्खू नाना प्रकारचे कमरबंध वापरू लागले. कोणी चांदीचा तर कोणी सोन्याचा. मग त्याला त्यांनी बंधन घातले. कापडी कमरबंध वापरा. नाडीचा वापर करा. सोने, चांदीचे कडदोरे, कमरबंध वापरण्यावर बुद्धांनी बंधन घातले.

उरूवेल कश्यपने परिव्राजक दीक्षा घेतल्यानंतर त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात तांबे, लाकूड, मातीची भांडी होती, ती सर्व संघात जमा झाली. मग भिक्खूंनी विचारले की या सर्व भांड्यांचे काय करायचे?

लोखंडाचे आसन, खुर्ची, झारे, हत्यारे; लाकडाची, मातीची भांडी वगैरे वापरण्याची बुद्धांनी परवानगी दिली. साऱ्या भिक्खूंनी समाजाला सर्व प्रकारची दुःखे दूर करण्याचा उपदेश द्यावा; नव्हे ते त्यांचे कर्तव्य मानावे असे बुद्धांनी सांगितले.

## अनावश्यक प्रश्न, अनावश्यक चर्चा

घोसीराच्या विहारात बुद्ध राहात होते. चिंचेच्या झाडाखाली ते ध्यानाला बसत असत. एके सायंकाळी ध्यानानंतर परतताना त्यानी मूठभर चिंचेचा पाला हातात धरला. पटांगणात अनेक भिक्खू जमलेले होते. हात वर करून बुद्धांनी त्यांना विचारले, ''माझ्या हातातील चिंचेची पाने अधिक संख्येने आहेत का जंगलातल्या चिंचेच्या झाडावर अधिक पाने आहेत?''

साऱ्या भिक्खूंनी ओरडून उत्तर दिले, ''जंगलातल्या झाडावर.''

ते म्हणाले, ''अगदी बरोबर, त्याचप्रमाणे जे मी सत्य पाहतो ते, मी तुम्हाला जे शिकवतो त्याही पेक्षा खूप मोठे आहे. मी मोजक्याच गोष्टी तुम्हाला शिकवतो. जेवढ्या गोष्टी तुम्हाला निब्बाणापर्यंत घेऊन जाण्यास गरजेच्या आहेत, तेवढ्याच शिकवतो.'

घोसीराच्या विहारात अनेक विद्वान भिक्खू होते. भिक्खू मालुंक्यपुत्त हा त्यांतीलच एक. तो अनेक प्रश्न विचारीत असे. हे विश्व मर्यादित आहे की अमर्यादित? शाश्वत आहे की अशाश्वत? आम्ही कोठून आलो? विश्वाला आदी आहे का? अंत आहे का? तत्त्वज्ञानाच्या अशा जटिल प्रश्नावर चर्चा करणे त्याला आवडत असे! अशा प्रश्नांवर चर्चा करण्याचे बुद्ध टाळत किंवा शांत राहत असत.

एके दिवशी भिक्खू मालुंक्यपुत्त खूपच अस्वस्थ झाला. त्याला बुद्धांचे शांत राहणे पसंत नव्हते. त्याने आपल्या सहकाऱ्यांना सांगितले, ''मी भगवान बुद्धांना एकदा शेवटचे प्रश्न विचारणार आहे. ते जर त्यांची उत्तरे न देता शांतच राहिले तर मी त्यांना भिक्खू म्हणून



मला संघातून मुक्त करा अशी विनंती करणार आहे.''

मग तो बुद्ध होते तेथे आला नि म्हणाला, ''जर तुम्ही माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यायला कबूल असाल तरच मी तुमचा शिष्य म्हणून राहीन. नाहीतर संघाचा त्याग करेन.'' आता सांगा, ''विश्व हे मर्यादित आहे का अमर्यादित?'' जर याचे उत्तर तुम्हाला माहीत असेल तर होय म्हणून सांगा नसेल तर नाही म्हणून कबूल करा.'

बुद्धांनी भिक्खू मालुंक्यपुत्तकडे शांतपणे पाहिले व त्याला प्रतिप्रश्न केला, ''हे भिक्खू मी जेव्हा तुला दीक्षा दिली तेव्हा तुला तुझ्या प्रश्नांची उत्तरे देईन असे आश्वासन दिले होते का? किंवा तुझे लोक, परलोकांविषयीचा कूट प्रश्न सोडवीन असे सांगितले होते का?''

तो म्हणाला, ''भगवान! नाही. तसे काही सांगितले नव्हते.''

ते म्हणाले, ''मग मालुंक्यपुत्त! मग आताच अशा प्रश्नांची उत्तरे मी द्यावीत म्हणून हट्टाग्रह का धरतोस बरे?''

''एखाद्या माणसाला विषारी बाण लागल्यामुळे तो गंभीर जखमी झाल्याप्रमाणे तुझी अवस्था बनली आहे. त्याच्या घरची माणसे वैद्याला बोलावतात व तो बाण काढून त्याचे जीव वाचवण्याची विनंती करतात. पण तो म्हणतो, ''माझ्यावर उपचार करण्यापूर्वी माझ्या प्रश्नांची उत्तरे द्या. तो बाण कोणी मारला? त्याची जात काय? तो काय काम करतो? त्याने मला बाण का मारला? तो कोणत्या प्रकारचे धनुष्य वापरतो? बाणाला विष लावण्यासाठी त्याने कोणकोणते पदार्थ एकत्रित केले?'' भिक्खू मालुंक्यपुत्त असे प्रश्न विचारणारा मनुष्य उत्तरे मिळण्यापूर्वीच मरून जाईल.

त्यामुळे मी त्या गोष्टी शिकवतो की, आपल्या निर्वाणाच्या मार्गासाठी ज्या जरूर आहेत, अत्यावश्यक आहेत; ज्या गोष्टींची मदत होणार नाही किंवा उपयुक्त नाहीत त्या मी तुम्हाला शिकवतच नाही.

स्वर्ग आहे किंवा नरक आहे, विश्व मर्यादित का अमर्यादित यापेक्षा मानवी जीवनात दुःख हे अपरिहार्य आहे. दुःख हे आर्यसत्य आहे. त्याची काही कारणे आहेत व ती काढल्याने दुःख निवारण होते. इतका साधा, सरळ, सोपा संदेश सुखी-समाधानी जीवनासाठी महत्त्वाचा ठरतो.''

बुद्धांच्या या बोलण्याने भिक्खू शरमिंदा बनला. तो म्हणाला, ''भंते! मी मूर्खासारखी, प्रश्नांच्या उत्तराची मागणी करीत होतो. मला माफ करा.'' त्याने प्रार्थना केली व बुद्धांनी त्याला माफ केले.

□□□

# एकांतवास

काही भिक्खूंना बुद्ध धम्माची सूत्रे सांगत होते. तसेच ती पाठांतर करण्याचे काम सोपवलेले होते. त्यानुसार दर पंधरवड्याला सारे भिक्खू मिळून सामुदायिकरीत्या त्याचे गायन करीत. तर काही भिक्खूंना नवोदीत भिक्खूंना शिस्त लावणे, दीक्षा देणे, संघाचे नियम शिकवणे ही जबाबदारी सोपवलेली होती.

दुर्दैवाने या दोन प्रकारच्या भिक्खूंत किरकोळ कारणावरून मतभेद वाढत गेले नि ते भांडण विकोपाला गेले. काही तटस्थ भिक्खू बुद्धांच्याकडे आले व त्यांनी या भांडणात हस्तक्षेप करण्याची विनंती केली. ते फार दूरवर राहात नव्हते. त्यांनी दोन्ही गटांच्या प्रमुखांना बोलावून समजावून सांगितले. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. उलट संघर्ष वाढत गेला. त्यांची परस्परांना असहकार्य करण्यापर्यंत मजल गेली.

पुन्हा त्यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी साऱ्या भिक्खूंना एकत्रित बोलावून सभा घेतली व साऱ्यांना उपदेश केला. 'संघात तुम्हीच फूट पाडू नका. संघ अभेद्य ठेवा.'

यावेळी एक नवोदित तरुण भिक्खू उठला. तो म्हणाला, ''भगवान! या भांडणात तुम्ही पडू नका. तुमची ध्यानधारणा चालू राहू दे. आम्ही आता लहान राहिलो नाही. आमचे आम्ही बघून घेऊ.''

या बोलण्यामुळे सर्वत्र एकदम शांतता पसरली. कोणालाही आणि स्वतः बुद्धांनाही असे कधी ऐकायची सवय नव्हती. आजपर्यंत संघातील एकाही भिक्खूचे त्यांच्यासमोर असे औद्धत्यपूर्ण बोलण्याचे धाडस झाले नव्हते.

त्यांनी शांतपणे सभा सोडली. झोपडीत आले. भिक्षापात्र घेतले नि निमूटपणे कोसंबीत भिक्षेसाठी निघून गेले. ते कोठे निघाले याविषयी त्यांनी कोणालाच कल्पना दिली नाही. चालत चालत दूर निघून गेले. वाटेत काही अनुयायी भेटले पण त्यांच्याही पुढे पुढे चालत राहिले. पूर्वेकडच्या बांबूच्या वनात आले. तेथल्या विहाराजवळ पोहोचले. पण दरवाजाजवळचा रखवालदार नव्याने नेमलेला होता. तो त्यांना ओळखत नव्हता. त्याने रोखले, 'आत साधू ध्यानमग्न आहेत, काही ज्ञानयज्ञ करीत आहेत, त्यांना तुमच्या जाण्याने



त्रास होईल.' ते थांबले. त्यांना आनंद झाला, सारे जुने नवे भिक्खू धर्मज्ञान, प्रसारात कार्यरत आहेत.

इतक्यात अनिरूद्ध नावाचा ज्येष्ठ भिक्खू तेथे आला. त्याने बुद्धांना वंदन करून रखवालदाराला सांगितले, 'अरे हेच माझे गुरुदेव आहेत.' मग त्या रखवालदाराने माफी मागितली. पण बुद्धांनी तो योग्यच वागला, त्याने कर्तव्य पार पाडल्याचे सांगितले व त्याला शाबासकी दिली.

त्या विहारात समन्वय, सुसंवाद नांदत होता. तेथून निघण्यापूवी ते प्रमुख भिक्खूंना म्हणाले,

''संघाचे खरे वैशिष्ट्य म्हणजे समन्वय, संतुलन. ते खालील गोष्टींमुळे साध्य होते.''

१) जागा सर्वांनी वापरावी. मग ते घर असो किंवा जंगल असो.

२) दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू परस्परांत वाटून घ्याव्यात.

३) संघाचे नियम, शिस्त साऱ्यांनी पाळावी.

४) बोलताना असे शब्द वापरा की ज्यामुळे समन्वय वाढेल, आणि असे शब्द वापरू नयेत की, ज्यामुळे परस्परांत मतभेद वाढतील व संघात फूट पडेल.

५) आलेले चांगले अनुभव, घटना, ज्ञान परस्परांशी समजून सांगावे.

६) इतरांचे दृष्टिकोनाविषयी आदर बाळगावा. स्वतःचे दृष्टिकोन दुसऱ्यावर लादू नका किंवा त्यानुसार वागण्याची सक्तीही करू नका.

ही सहा तत्त्वे भिक्खूंनी पाळावीत अशी अपेक्षा त्यानी व्यक्त केली. मग ते परीलेयका जवळच्या रकीता जंगलात गेले. तेथेच एकांतात वर्षावास करण्याचे त्यांनी ठरवले.

## <u>कुकर्माने नीचता येते.</u>

बुद्ध जेव्हा एखाद्या समुहात जात तेव्हा त्याच्याशी एकरूप बनत. त्यांच्या भाषेत ते बोलत, त्यांच्या भावनांशी, मनाशी सुसंवाद साधत.

त्यांची शिकवण सागरासारखी होती. अष्टांग मार्ग सागराप्रमाणे हळूहळू सखोल बनत जातो. त्यांचे वैशिष्ट्य कायमच राहाते. मृतवत आणि निर्जिव कलेवर ते काठाला आणून सोडतात. जशा लहान-मोठ्या नद्या सागराला मिळाल्या की स्वतःचे नाव, स्वतःचे अस्तित्व विसरून जातात मग त्यांचे नाव राहाते सागर. त्याप्रमाणे बुद्ध संघात साऱ्यांची जात-पात वितळून जाते व सारेजण अमृताचे पुत्र बनतात. समुद्राकडे जाणे एवढेच ध्येय

नदी, ओढा, पावसाचे पाणी यांना असते. ते सारे मिळूनही सागर कधी अती भरत नाही किंवा रिताही होत नाही. त्याचप्रमाणे बुद्ध संघात लाखो लोक सामील होतात पण त्यामुळे तो अधिक भरून वाहत नाही की रिताही होत नाही. साऱ्या समुद्राच्या पाण्याला कोठेही जा एकच चव असते तसे त्यांच्या धर्मसंदेशाला एकच सुगंध होता, तो म्हणजे निर्वाणाचा. धम्म व सागर हिरे, पाचू, रत्ने, मोती यांनी भरलेले आहेत. प्रचंड जिवांना ते दोघेही आश्रय देतात, निवासस्थान देतात . अशी आठ गुण वैशिष्ट्ये दोघांतही असल्याने धम्म नि सागरात विलक्षण साम्य आहे.

उरूवेला येथे असताना बुद्धांना कश्यपाने सांगितले की, सम्राट बिंबिसार यांनी फार मोठा यज्ञ योजलेला आहे. त्यासाठी शहराबाहेर मोकळ्या मैदानात मंडप उभारला आहे. त्यात उंच चौथरा असून विविध आकारातील यज्ञकुंड बांधली आहेत. अनेक पुरोहितांना निमंत्रण दिले असून त्यांची भोजन-निवासाची सोय केलेली आहे. तेथे अन्नदान मोठ्या प्रमाणात होणार आहे.

हे ऐकल्यावर बुद्ध कश्यपाला घेऊन राजगृहाच्या दिशेने चालू लागले. वाटेत मेंढ्यांचा कळप लागला. त्यात एक लंगडे बछडे होते. चालताना त्याला खूप वेदना होत असतील म्हणून त्यांनी त्याला उचलून घेतले. त्याला प्रेमाने कुरवाळले. ते पाहून मेंढपाळ जवळ आला. त्याने वंदन केले. त्याला कोठे चाललास अशी विचारणा केली. तो म्हणाला, ''मी राजगृहाला निघालो आहे. ही सारी महाराजांच्या मालकीची बकरी आहेत. महाराज मोठा यज्ञ करणार आहेत त्या अग्निकुंडात यांची जिवंत आहुती दिली जाणार आहे.''

सम्राट बिंबिसाराला बुद्ध राजगृहाकडे येत असल्याची खबर त्याच्या दूतांनी दिली. ते स्वतः आपल्या मंत्रिमंडळासह त्यांच्या स्वागताला सामोरे आले. त्यांच्याबरोबर उरूवेला कश्यप असल्याचे पाहून सम्राट गोंधळला. कोणकोणाचा अनुयायी हेच त्याला समजेना. ते जवळ आल्याचे पाहून बुद्धांनी लंगडे बछडे खाली ठेवले. राजाने वंदन करून म्हटले, ''तथागत आम्ही मोठा यज्ञ सोहळा आरंभ करीत आहोत, त्याला आपले व कश्यपाचे आगमन शुभशकुन आहे. आपण सहभागी व्हावे. मार्गदर्शन करावे व आशीर्वाद द्यावेत. सर्व ब्रह्मवृंद तयार आहेतच.'' बुद्धांनी सांगितले, ''सम्राट बिंबिसार, निष्पाप जीवांची हत्या करणे हे शुभ कार्य बनू शकत नाही. तुला व प्रजेला सुख, शांती, समाधान हवे आहे पण रक्तपाताने, हिंसेने सुख, शांती, समाधान येत नाही. यज्ञ हा त्यासाठीचा मार्ग नव्हे.'' यज्ञ मार्गातील प्रसिद्ध कश्यप तरी आपल्या हेतूला पाठिंबा देईल या आशेने सम्राटाने त्याला वंदन करून म्हटले, ''आपले स्पष्ट मत सांगा!'' कश्यप काही न बोलता बुद्धांपुढे झुकला नि म्हणाला, ''मी बुद्धानुयायी आहे. '' सम्राट म्हणाला, ''मी ही बुद्धानुयायी आहे, पण हे कश्यप, तुमचा



यज्ञावर विश्वास आहे ना?'' कश्यपाने सम्राटाला सांगितले, ''मला बुद्धाने योग्य मार्ग दाखवला आहे. तो यज्ञमार्ग योग्य नव्हे. मुक्या प्राण्यांच्या हत्येमुळे आपण दुःख मुक्त बनू शकत नाही.''

सम्राट त्यांच्याकडे वळून म्हणाला ''हे शाक्यमुनी, तुम्हीच ज्ञानाचे चार शब्द सांगा. मी काय करू?'' त्यांनी त्याला उपदेश केला.

बिंबिसारने ते मान्य केले. त्याने यज्ञाची योजना सोडली नि पुढे सम्राटाने बुद्ध भिक्खूंसाठी विहार उभारायला वेणुवन संघाला अर्पण केले.

तथागतांना बिंबिसारांना पंचशील तत्त्वांचा अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह उपदेश केला. मादक द्रव्याच्या आहारी जाऊ नका असाही संदेश दिला. सम्राटाने जर नैतिक जीवन जगायचे ठरवले, तर साऱ्या प्रजेचे हित पाहणारा राजा फारच चांगले कार्य समाजासाठी करू शकतो हे त्यांनी पटवून दिले.

त्या उपदेशाने बिंबिसार आनंदी झाले. महाराणी विदेही व राजपुत्र अजातशत्रू हे ही बरोबर होते. राजपुत्र अजातशत्रू बरोबर राजघराण्यातील चारशे मुलांसाठीही त्यांचे सोप्या भाषेतील कथाद्वारे प्रबोधन झाले. या भावी पिढीत नैतिक आचरणाचे बीज पेरणे अतिशय महत्त्वाचे आहे याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे मुलांशी सुसंवादाची एकही संधी ते सोडत नव्हते.

## आनंदचा अनुभव

आनंद जरी भिक्खू बनला तरी त्याचे राजबिंडे रूप लपत नव्हते. त्याने आपला एक अनुभव सांगितला. उन्हाळ्याच्या दिवसात भिक्षेसाठी शेजारच्या गावात फिरत असताना त्याला खूप तहान लागली. जवळच एक विहीर होती. तेथे एक तरुणी पाणी विहिरीतून काढत होती. आनंद तेथे गेला व पिण्यासाठी थोडे पाणी मागितले. तिने नाकारले. ती म्हणाली, ''मी मातंग समाजातली आहे. मी भिक्खूला अपवित्र बनवण्याचे पाप करू इच्छित नाही.''

आनंदने स्पष्ट केले की, ''मला जाती पातीशी काही देणे घेणे नाही. सर्व जाती आम्हाला समान असतात. तू फक्त पाणी दे.''

तिने पाणी दिले. आनंदचे चालणे, बोलणे, वागणे यामुळे ती त्याच्याकडे आकर्षली गेली. पुढे ती दररोज त्या विहिरीवर येऊन आनंदची वाट पाहू लागली. तिच्या आईला ही गोष्ट कळली. तिने तिला त्यापासून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला. पण ती आनंदशी विवाह करण्याची स्वप्ने पाहू लागली.

ते प्रकरण शेवटी बुद्धांच्यापर्यंत येऊन पोहोचले. त्यांनी मुलीला विचारले, ''तुझे भिक्खू आनंदवर खूप प्रेम आहे का?'' तिने होकारार्थी उत्तर दिले. त्यांनी तिला विचारले, ''नेमके तुझं कशावर प्रेम आहे? आनंदच्या डोळ्यांवर, त्याच्या मुखावर, त्याच्या नाकावर? की त्याचा आवाजावर?''

तिने सांगितले, ''सर्वांवर.''

त्यांनी म्हटले, ''पण त्याशिवाय आनंदकडे फार चांगले गुण आहेत त्याविषयी तुला काहीच माहिती नाही. त्याचे निर्वाणाच्या मार्गावर प्रेम आहे. शांती, सुखाचा मार्ग साऱ्यांना लाभावा म्हणून तो प्रयत्नशील आहे. त्यात त्याला आनंद, सुख मिळते. जर तुझे आनंदवर खरेच प्रेम असेल तर या गुणांवरही असायला हवे. तू शाश्वत गोष्टीवर प्रेम कर. तारुण्य, सौंदर्य या गोष्टी आज आहेत, उद्या नाहीत. तूही या मार्गाने जाशील तर स्वार्थी प्रेमातून बाहेर पडशील व खऱ्या अर्थाने आनंदी, सुखी, शांतीमय बनशील.''

त्या तरुणीला पटले. तिने बुद्धांना साष्टांग नमस्कार केला व पुढे तीही संघात सामील झाली.

स्त्रियांशी भिक्खूंनी कसे वागावे? त्यांनी सतत जागृत राहावे असे बुद्धांनी सांगितले. तुमच्यापेक्षा अधिक वयाच्या स्त्रिया मातेप्रमाणे, वडील भगिनिप्रमाणे माना. तर तुमच्यापेक्षा कमी वयाच्या स्त्रियांना तुमची छोटी बहीण किंवा मुलगी माना. पण शक्यतो स्त्रियांशी कमी संपर्कात या, कमी बोला.

## देवदत्तची महत्त्वाकांक्षा

देवदत्त हा संघामध्ये सामील झाला, पण त्याच्या चित्तातील मल नाहीसा झाला नव्हता. त्याच्या मनात संघाचे नेतृत्व करण्याचे विचार जन्मले होते. बुद्ध राजगृहातील कलंदकजवळच्या वेणुवनात राहत होते. सायंकाळी सारे भिक्खू जमले होते तेथे देवदत्त आला त्याने भिक्खूंना संबोधून म्हटले,'' भगवान आता थकले आहेत, वयोवृद्ध बनले आहेत. आता त्यांनी विश्रांती घ्यावी व संघाची सूत्रे माझ्याकडे सोपवावीत. ''

ही गोष्ट बुद्धांच्या कानावर आली. देवदत्त पूर्वीसारखा भिक्खू राहिला नाही. त्याच्या मनात विपरीत बदल झाला आहे. तो त्याला किंवा संघाला हितावह नाही हे त्यांच्या ध्यानात आले. वास्तविक मौंगल्यायन सारखे ज्येष्ठ व श्रेष्ठ भिक्खू संघात होते. त्यामुळे देवदत्तच्या वृत्तीला, विचाराला यापुढे संघ जबाबदार असणार नाही असे त्यांनी सूचित केले. या गोष्टीचा देवदत्तला अपमान वाटला. मग देवदत्त राजपुत्र अजातशत्रू होता तेथे गेला. त्याला देवदत्तने



सांगितले, ''अरे तू महत्त्वाकांक्षी बन. पूर्वीच्या काळी मनुष्य दीर्घायू असत, आता अल्पायू बनलेत. कदाचित तू राजकुमार म्हणूनच मरून जाशील. त्यासाठी पित्याची हत्या कर नि राजा बन. मी इकडे बुद्धाला ठार करतो म्हणजे मी संघाचा प्रमुख बनू शकतो.''

अजातशत्रूही भडकला. त्याच्या मनातही राजा बनण्याची महत्त्वाकांक्षा होतीच. दुष्टबुद्धी देवदत्तने जागी केली. मग त्याने कमरेला सुरा बांधला. तो लपवला. मग भयभीत, उद्विग्न, शंकित, त्रस्त मन:स्थितीत त्याने राजाच्या अंतःपुरात प्रवेश केला. तेथे राजाच्या अंगरक्षकाने त्याला पकडले. त्याने त्याला सरळ प्रश्न केला, ''राजपुत्र तुम्ही कशासाठी आलात? राजाचे बरे-वाईट करण्याचा विचार दिसतो. हे कोणी सुचवले? या कटाचा सूत्रधार कोण आहे?''

यावर अजातशत्रूने देवदत्तचे नाव सांगितले. मग सेनापतीने ठरवले की कुमार अजातशत्रू व देवदत्तला ठार केले पाहिजे. दुसरा विचार केला त्यापेक्षा कुमारला राजापुढे सादर करू, मग मगधराज बिंबिसार सांगतील तसे करू. राजासमोर अजातशत्रूला उभे केले असता राजा बिंबिसारने विचारले ''कुमार! कशासाठी तू मला मारण्याचा विचार केलास?'' कुमार म्हणाला, ''मला राज्य हवे.'' बिंबिसार म्हणाला, ''एवढेच ना! हे तुझेच राज्य आहे. तुझ्या हाती सुपूर्द करतो.''

आता राज्याची सूत्रे अजातशत्रूकडे आली. देवदत्तच्या कुटील कारस्थानाचा तो विजय होता. मग देवदत्तने पुढचे पाऊल उचलले. ''महाराज अजातशत्रू! शिपायांना आज्ञा द्या की श्रमण गौतमाला जिवानिशी मारा.'' अजातशत्रूने आपल्या लोकांना आज्ञा दिली, देवदत्त सांगतो तसे करा. मग देवदत्तने बुद्ध कोठे रहातात? त्यांची दिनचर्या कोणती? त्यांना कसे ठार मारावे? हे लोकांना सांगितले. त्यांच्या मार्गात दोन लोकांना त्याने बसवले व सांगितले, ''या मार्गाने एकटा माणूस चालत येईल. त्याला ठार करा.'' दुसऱ्या मार्गावर चार लोकांना बसवले, ''या मार्गाने दोघे येतील. त्या दोघांना ठार करा.'' असे चारी मार्गांवर लोक ठेवले. त्यापैकी एकजण ढाल तलवार व धनुष्यबाण घेऊन बुद्धांच्या दिशेने आला पण जवळ येताच त्याचे हातपाय गळून गेले. त्यांच्या चरणावर पडून तो रडू लागला. त्याने प्रार्थना केली, ''हे भगवान! या अक्षम्य अपराधाबद्दल मला क्षमा करा.'' व तो त्यांचा अनुयायी बनला.

ते एका वृक्षाखाली येऊन बसल्यावर त्यांच्या मागावर देवदत्तने सोडलेली दोन माणसे जवळ आली. पण त्यांनीही अभिवादन केले नि समोर जाऊन बसले. त्यापैकी एकजण उठला नि देवदत्त होता तेथे गेला, त्याने स्पष्ट शब्दात सांगितले, ''आम्ही श्रमण गौतमाला मारू शकत नाही. ते भगवान आहेत, नि महाज्ञानी, महानुभावी आहेत.'' देवदत्त या गोष्टीने

अधिकच संतापला. तो त्या लोकांना म्हणाला, ''ठीक आहे! तुमच्या कडून श्रमण गौतम ठार होणार नाही. मीच त्याला संपवतो. ''

पुढे गृध्रकूट पर्वतावर बुद्ध फिरत असताना अचानक एक शिळा पर्वतावरून घरंगळत खाली आली. पण वरच्या झाडांनी नि पर्वतावरील विशाल शिळांनी ती अडवली. तिच्या ठिकऱ्या उडाल्या मात्र त्यातील एक उसळून त्यांच्या पायावर पडली नि पायावर खोल जखम झाली. त्यातून बरेचसे रक्त वाहून गेले. बुद्धांनी जवळचा झाडपाला बांधला. काही भिक्खू त्यांना विहारात घेऊन गेले नि त्यांनी शोध घेताना कळले की गृध्रकूट पर्वतावरून देवदत्तनेच ती शिळा त्यांना मारण्याच्या उद्देशाने ढकलली होती.

या घटनेने संघातील भिक्खू प्रक्षोभित बनले. त्यांपैकी काहींनी देवदत्तला धडा शिकवण्याची भाषा केली. बुद्धांनी त्यांना थोपवले. देवदत्तने स्वतःच्या मोक्षमार्गात स्वतःच अडथळा निर्माण केल्याचे सांगितले. त्यानंतर बुद्धांच्या कुटी भोवती साऱ्या भिक्खूंनी संरक्षणाची व्यवस्था केली. ते पाहून बुद्धांनी आनंदला समजून सांगितले, ''मी दुसऱ्याच्या प्रयत्नाने परिनिर्वाण प्राप्त करणार नसून स्वतःच्या इच्छेनुसार परिनिर्वाण प्राप्त करेन. जा आपापल्या कामात मग्न व्हा. माझ्या संरक्षणासाठी भिक्खूनी थांबण्याची गरज नाही. माझा अकाली मृत्यू होणार नाही. ''

## नालागिरी हत्ती अंगावर सोडला

देवदत्तची असूया दिवसेंदिवस वाढतच चालली. बुद्ध अहिंसा पाळतात, क्षमाशील आहेत याचा तो गैरफायदा घेऊ लागला. त्या काळात राजगृहात नालागिरी नावाचा मनुष्य घातक चंड नावचा हत्ती बाळगत होता. देवदत्त राजगृहात आला नि एका माहुताला पैसे देऊन त्याने सांगितले, ''श्रमण गौतम या रस्त्यावरून चालत जातो. त्याच्या विरूद्ध दिशेने त्या भडकलेल्या हत्तीला सोड.''

नेहमीच्या प्रथेप्रमाणे अनेक भिक्खूंसमवेत बुद्ध नगरात भिक्षा मागण्यासाठी चालत होते. अचानक त्यांच्या समोर धावत येणारा हत्ती दिसला. त्याचा चित्कार कर्कश होता. दोन मोठे सुळे वर करून सोंड हवेत फिरवत त्यांच्या दिशेने चंड हत्ती धूळ उडवत येऊ लागला. सोबतच्या भिक्खूंपैकी एकजण ओरडला, ''भंते! पळा; नाहीतर साक्षात यमदूत वाटेत येणाऱ्या कोणालाही जिवंत सोडणार नाही. भगवान दूर व्हा! दोन-तीन वेळेला भिक्खूंनी सांगितले. काहीजण भिंतींवर, घरावर, झाडावर चढून बसले. ते शांत होते. तो चंड हत्ती मदमस्त झाला होता. बेभान होता. ते त्याच्या समोरच उभे होते. सरळ त्याच्या नजरेत स्नेहभावाने पाहात उभे



राहिले. चंडने आपली सोंड खाली केली. शांतपणे त्यांच्या समोर उभा राहिला. त्यांनी त्याच्या सोंडेवरून प्रेमाने हात फिरवला नि मग त्याने पुढील पाय खाली मिटवून जणू बुद्धांना वंदन केले. काही प्रेक्षक गाथा गाऊ लागले. कोणी कोणी दंड, अंकुशाने हत्तीचे दमन करू लागले. महर्षीने, श्रमण गौतमाने मात्र दंड, शस्त्राशिवाय नाग-चंडचे दमन केले. आणि देवदत्तचे हे कुटिल कारस्थान उघड झाले. अवलक्षणी देवदत्तला खुनाचे कट कारस्थान रचल्याबद्दल दोष दिला. त्याला वाळीतच टाकले. देवदत्तबद्दल राजगृहामध्ये लोकांचे मत चांगले राहिले नाही. त्याला कोणी पापी म्हणत तर कोणी अवलक्षणी. हे ऐकले की बुद्धांना धम्माचा तो पराभव वाटायचा. कारण त्याने धम्माचा स्वीकार केला होता व तो एक भिक्खू बनला होता. स्वधम्माच्या उपदेशामुळे त्याच्यात बदल झाला होता. तो वरकरणी होता. इतर भिक्खू येऊन सांगत, ''त्याचा समाजात मान-सन्मान होत नव्हता. तो आता भिक्खू नव्हता, भिकारी बनला होता. घराघरांतून तो भिक्षा नव्हे, भीक मागून जगत होता. ते पाहून लोक म्हणत बघा हा शाक्यकुलीन श्रमण घराघरांतून मागून खातो!''

## संघात फूट पाडण्याचा प्रकार

एके दिवशी देवदत्त कोकालिक, कटमोर, निस्सक, समुद्रदत्त यांच्याबरोबर बुद्धांच्याकडे आला. त्यांना वंदन करून बाजूला बसला. तो म्हणाला, ''श्रमण गौतम! मी तुमच्याकडे पाच गोष्टी मागण्यासाठी आलो आहे. त्या तुम्ही मान्य कराव्यात.''

१) भिक्खूंनी आयुष्यभर अरण्यातच राहावे.

२) भिक्खूंनी आयुष्यभर भिक्षामागूनच जगावे. कोणाचे भोजनाचे निमंत्रण स्वीकारून भोजन ग्रहण करू नये.

३) आयुष्यभर चिंध्या पांघरूनच राहावे. ठिगळे लावलेले वस्त्र वापरावे. गृहस्थी लोकांनी दान केलेले चीवर वापरू नये.

४) आयुष्यभर राना-वनात, वृक्षाखाली राहावे, घरात राहू नये, विहारात राहू नये.

५) आयुष्यभर मांस-मासे खाऊ नये.

याप्रकारे भिक्खूंनी जगण्याचे नियम साऱ्यावर लादण्याची परवानगी द्यावी.''

बुद्ध देवदत्तच्या या मागण्या ऐकून चकित झाले. त्यामागचा त्याचा उद्देश हा संघ अधिक व्यापक, बलवान, व दीर्घकाळ टिकावा असा नसून एकसंघ अशा भिक्खूंत फूट पाडण्याचा त्याचा तो कुटिल डाव होता. ते त्याला म्हणाले, ''ज्याला हवे तो अरण्यात राहील नाहीतर, कोणी भिक्षामागून राहील किंवा निमंत्रणाने भोजन ग्रहण करेल; चिंध्या

पांघरेल वा चीवर घालेल. आठ महिने वृक्षाखाली राहण्याचीही मी परवानगी दिली आहे. मांसाहार म्हणशील तर अदृष्ट (माझ्यासाठी मारले हे मी पाहिलेले नाही), अश्रुत (किंवा ऐकलेले नाही), अ-परिशंकित (माझ्यासाठी मारले माहिती नाही, शंका आहे) अशा तीन प्रकारच्या परिशुद्ध मांस ग्रहणाची मी अनुज्ञा दिली आहे.'' तेव्हा देवदत्त आपल्या मनाप्रमाणे, बुद्ध अनुमती देत नाहीत हे पाहून नाराज होऊन आसनावरून उठून त्याच्या बरोबर आलेल्या लोकांना घेऊन निघून गेला.

## <u>संघात फूट पाडली</u>

यानंतर देवदत्त शांत बसला नाही. त्याने त्या पाच गोष्टींबद्दल चर्चा सुरू केली. तो सांगायचा-''अहो सज्जनहो! आम्ही श्रमण गौतमकडे पाच गोष्टींची याचना केली पण त्याला ते परवानगी देत नाहीत.'' हे संभाषण ऐकणाऱ्यापैकी जे लोक अश्रद्धाळू, अप्रसन्न, दुर्बुद्धीवाले होते. ते म्हणत, ''वा! वा! हा शाक्यपुत्र श्रमण अवधूत तपस्वी, सल्लेखवृत्ती आहे. उलट श्रमण गौतम हा भ्रष्ट आहे. लोकांना तो खऱ्या मार्गापासून दूर नेतो आहे.'' पण जे श्रद्धाळू, प्रसन्न, पंडित, बुद्धिमान होते ते हैराण होत. त्यांना समजत होते की, देवदत्त संघात फूट पाडण्यासाठी ही कट कारस्थाने करीत आहे. चक्रभेद करण्याचा प्रयत्न त्याने चालवला आहे. या साऱ्या गोष्टी बुद्धांच्या कानावर येत होत्या.

एके सकाळी आनंद भिक्षेसाठी राजगृही गेला असता देवदत्तने त्याची भेट घेतली. आनंदने त्याला 'तू जे करतोस ते पापकर्म आहे, ते सोडून दे' असे समजावले पण पालथ्या घड्यावर पाणी! देवदत्तने उलट त्याला सांगितले, ''मी यापुढे भगवानपासून अलग होणार असून वेगळा संघ स्थापन करीत आहे.'' आनंदने बुद्धांना हे सारे कथन केले. ''आजपासून संघात दुफळी माजणार, देवदत्त संघ फोडणार !'' यावर बुद्धांनी साऱ्यांना सांगितले, ''भल्या माणसाबरोबर, सज्जनाबरोबर चांगुलपण दोस्ती करते. पापी माणसाबरोबर चांगुलपणाची दुष्मनी राहते. पापी माणसाबरोबर पापाची दोस्ती असते. खऱ्या श्रमणापासून पाप दूर राहते.''

त्यादिवशी देवदत्तने भिक्खूंना सांगितले, ''श्रमण गौतम पाच वस्तू द्यायला तयार नाहीत. तेव्हा त्या घेऊन मी नवा संघ स्थापीत आहे. त्या गोष्टी म्हणजेच खरा धर्म आहे, विनय आहे, हाच गुरूंचा उपदेश आहे.'' यानंतर जे नवे, अपरिपक्व भिक्खू होते, त्यांतील पाचशे भिक्खूंना घेऊन देवदत्त ब्रह्मयोनी पर्वत म्हणजे गयेला निघून गेला.

हे वर्तमान सारीपुत्त नि मोंगलान यांनी बुद्धांना सांगितले. अर्थात ही संघामधली फूट नव्हती, मतभेद मानावेत. कारण सर्वांच्या एकमताने, अनुमतीने पाचशे भिक्खू संघाबाहेर



गेले नव्हते, असे मत काही ज्येष्ठ भिक्खूंनी प्रगट केले. बुद्धांनी त्यांना विचारले, ''अरे पण त्या भिक्खूंची तुम्हाला दया आली नाही का? जा आणि त्या भ्रामक मार्गापासून त्या पाचशे भिक्खूंना परावृत्त करण्याचा प्रयत्न करा.'' त्यानंतर सारीपुत्त व मोंगलान देवदत्त जेथे धर्मोपदेश करीत होता तेथे गेले. त्यांना दूरवरून येताना पाहून देवदत्त भिक्खूंना म्हणाला, ''अरे पाहा, माझा मार्ग किती महत्त्वाचा नि श्रेष्ठ आहे. श्रमण गौतमचे सर्वांत लाडके आणि ज्येष्ठ शिष्य माझ्याकडे येत आहेत.''

कोकालिकने देवदत्तला सावध केले, ''त्यांच्यावर देवदत्त विश्वास ठेवू नका. त्यांच्या मनात पाप असेल.'' तरीही देवदत्तने सारीपुत्त व मोंगलानला आपले अर्धे आसन देण्याचे आमीष दाखवले. पण ते दोघेही स्वतंत्र आसनावर बसले व देवदत्तशी त्यांनी चर्चा केली. देवदत्त लौकरच निद्राधीन बनला. त्यावेळी या दोघांनी भिक्खूंना खरा धर्म म्हणजे काय हे समजावून सांगितले. त्यामुळे त्यांना विरज-विमल धर्मचक्षू लाभला. त्यानंतर त्यांना सारीपुत्तने आवाहन केले. चला सद्धर्माच्या वाटेने ज्यांना यावयाचे त्यांनी भगवान श्रमण गौतमांचा मार्ग पुन्हा स्वीकारा. याबरोबर सारे भिक्खू पुन्हा भगवान होते तेथे वेणुवनात परतले.

इकडे देवदत्त झोपला होता. कोकालिकने त्यांना उठवले व परिस्थितीची कल्पना दिली. तेव्हा देवदत्तने क्रोधाने लाखोली वाहिली. इकडे साऱ्या पश्चातापदग्ध भिक्खूंना पुन्हा संघात सामील करून घेतले. त्यांना देवदत्तच्या अधःपतनाची कारणे समजावून सांगितली-

१) पापाची इच्छा

२) पापाशी मैत्री

३) थोडीशी प्रगती करून विशेष स्थानाची सत्तेची अपेक्षा

मूळ संघाशी द्रोह केला. आपले विष समुद्रात ओतण्याचा देवदत्तने प्रमाद केला, पण त्यामुळे संघरूपी समुद्र विषारी बनला नाही, उलट त्या विषाचा प्रभाव देवदत्तवर पडून तोच अधःपतीत बनला.

अनेक भिक्खूंच्या बाबतीत असे घडायचे की, ब्राह्मण पुजाऱ्यांनी चालू केलेले रीती-रिवाज आणि पूजा-प्रार्थना-अनुष्ठान याचा सर्वस्वी त्याग काहींनी केला नाही. वरवर ते भिक्खू होते पण आंतरिक बदल त्या गतीने होत नव्हते. नव्या धम्माचे संरक्षण अनेकांना लाभले पण संपूर्ण सामाजिक पद्धतीत परिवर्तन होण्यास वेळ लागतो. हे एक मतभेदाचे कारण ठरत होते. एखादा ब्राह्मण तरुण संघात दाखल होत असे. तो उपचार म्हणून त्याला बुद्धांच्याबद्दल व्यक्तिगत आदर, प्रेम असावयाचे पण साऱ्या भिक्खू संघाबद्दल त्यांना प्रेम-आदर होताच असे नाही.

हूण, गौड, मोंगली या जमातींच्या चालीरिती वेगळ्या होत्या. हिंसाचार, क्रौर्य हे मानवी दुर्गुण भिक्खूंवर अन्याय, अत्याचाराला कारणीभूत ठरतील का? अशीही सामाजिक समस्या बुद्धांना भेडसावत होती.

## माझेच वचन आहे याची खात्री करा

काही प्रसंग असे आले की, एखादा भिक्खू दुसऱ्या भिक्खूंना सांगत असे की, ''आवुसो! मी स्वतः भगवानांच्या मुखातून ऐकले, मुखातून ग्रहण केले. हाच धर्म आहे, हाच नियम आहे, हेच अनुशासन आहे.'' अशामुळे भिक्खू-भिक्खूंमध्ये मतभेद निर्माण होत. मग बुद्धांच्यापर्यंत मतभेद आले की, ते साऱ्या भिक्खूंना सांगत, ''तुम्हाला ठामपणे सांगणाऱ्या त्या भिक्खूंचे अभिनंदनही करू नका आणि निंदाही करू नका. तो काय म्हणाला त्या पद-व्यंजनांचा अभ्यास करून सूत्राबरोबर पडताळून पाहा. जर ते त्याच्याशी जुळत नसेल तर समजा की ते माझे वचन नाही; ते त्या भिक्खूंनी स्वतःच गृहीत धरलेले वचन आहे. शिवाय मी असताना मला तुमची शंका विचारा, मनात ठेवू नका. जर माझेच वचन असेल तर मी तुम्हाला तशी खात्री देईन. अर्थात स्थल, कालानुरूप आचरणाच्या नियमात बदल करावे लागतात.''

पूर्वी तीन शरण-गमन म्हणून उपसंपदा होत होती. राधब्राह्मणाच्या प्रव्रज्या आणि उपसंपदेच्या वेळी, बुद्धांनी चौथी घोषणा केली. योग्य समर्थ भिक्षू दीक्षा देण्याची, संघात सामील करून घेण्याबाबत भिक्षू संघाला विनंती करेल. साऱ्यांना तीनवेळा विचारले जाई. कोणाचा विरोध आहे का? याचीही दखल घेतली जाई. कोणाचा विरोध नाही याचा अर्थ त्या व्यक्तीला संघात सामील करून घ्यावे.

या दीक्षा पद्धतीत अनेक खानदानी कुटुंबातील तरुण संघात सामील होत होते. ते पाहून त्यांचे कुटुंबीय व नातेवाईक बुद्धांना दोष देत. त्यांचा आक्षेप होता, ''श्रमण गौतम आई-वडिलांना पुत्रहीन बनवतो, श्रमण गौतम स्त्रियांना पतीहीन बनवतो. श्रमण गौतम कुलाचा नाश करीत सुटला आहे.'' यावर बुद्धांचे उत्तर होते, ''आम्ही कोणालाही जुलूम-जबरदस्तीने भिक्खू बनवीत नाही. ज्यांना भिक्खू बनायचे आहे त्यांना आम्ही साहाय्य करतो. त्यात कोणाला अडचण येण्याचे आम्ही कारण ठरत नाही.''

संघामध्ये भिक्खूंची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. त्यांच्या जीवनाला शिस्त येण्यासाठी काहीतरी उपाययोजना करणे भाग होते. पूर्वीप्रमाणे सारे समान, सारेच भिक्खू या पद्धतीत बदल करणे गरजेचे होते. त्यासाठी बुद्धांनी आनंद, सारीपुत्त, मोंगलान यांच्याशी



प्रदीर्घ विचार विनिमय केला. त्यासाठी संघात ज्येष्ठ व अनुभवी भिक्खूंना उपाध्यक्ष आणि आचार्य अशी पदे दिली. तरुण नवोदित भिक्खूंनी त्यांच्याशी आदराने वागावे, सेवा करावी म्हणून काही नियम बनवले.

## मौन व्रतात समूहाने राहू नये

श्रावस्तीमध्ये अनाथपिंडिकच्या जेतवनात बुद्ध राहत होते. त्यावेळी बरेचसे संभ्रमीत भिक्खू कोसल देशातील एका आश्रमात राहत होते. त्यांच्यात एकदा चर्चा झाली की, या वर्षाऋतूमध्ये आपण सर्वजण वाद-विवाद न करता, आनंदाने, चांगल्यापद्धतीने राहू. साऱ्यांना भोजन मिळेल. यावर साऱ्यांनी उपाय सुचवला की, आपण एकमेकांत बोलणे बंद करू या. मौन पाळू. त्यामुळे वादविवादाचा प्रसंगच येणार नाही. जे भिक्खू भिक्षा मागून नगरातून लौकर परततील त्यांनी आश्रमातील काही कामे न बोलता करावीत, आसने मांडावीत, पाय धुण्याचे पाणी ठेवावे. पाय दाबण्याची कथलाची वाटी वृद्ध भिक्खूंसाठी काढून ठेवावी, खाण्याची थाळी धुवून ठेवावी, गावात मागून आणलेल्या भिक्षेतील अन्न शिल्लक राहीले असेल तर ते गवत नाही अशा ठिकाणी टाकावे किंवा ज्या पाण्यात माशासारखे प्राणी नाहीत त्या पाण्यात सोडून द्यावे. पाणी पिण्याचे घडे, इतर खर्चासाठी वापरावयाच्या पाण्याची साठवणे भरून ठेवावीत. चौक, अंगण साफ करावे, ज्याला हे घडे रिकामे दिसतील त्याने ते न सांगता भरावेत. पायखान्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे घडे रिकामे असतील तर तेही भरावेत. जर वयाप्रमाणे एखाद्याला ते काम झेपत नसेल तर त्याने इशारा करून इतरांना बोलावून ते काम करून घ्यावे, पण त्यासाठी त्याने आरडा-ओरडा, शिवीगाळ, कटुवचन बोलू नये. यारितीने सारेजण एकमताने, वादविवादरहीत व गुण्यागोविंदाने एकत्र राहू, वर्षावास उत्तमरितीने घालवू व भोजनापासूनही सारे वंचित राहणार नाहीत.

त्यामुळे ते सारे भिक्खू एक दुसऱ्याशी सुसंवाद न करता राहिले. त्यामुळे दुर्वचनही बोलले नाहीत. त्यावेळी संघाचा नियम होता की, वर्षावासानंतर वेगवेगळ्या ठिकाणचे भिक्खू बुद्धांना येवून भेटत व त्यांच्या प्रगतीचा आढावा देत. त्यानुसार तीन महिने झाल्यावर ते कोसलनिवासी भिक्खू अंथरूण-आसन, भिक्षापात्र-चीवर घेऊन श्रावस्तीला पोहचले. बुद्धांना अभिवादन करून एका बाजूला सारे बसले. त्यानी कुशल-प्रश्न विचारले, ''भिक्खूहो! कसा गेला वर्षावास? काही अडचण तर आली नाही ना? कोणी उपाशी राहिले नाही ना? तुम्हां मंडळींत वादविवादाचे प्रसंग आले की नाही? आनंदात वर्षावास घालवला का?''

या प्रश्नांना साऱ्यांनी एकसुरात उत्तर दिले, ''हो, भगवान! वर्षावास उत्तम गेला,

एकमताने, एकदिलाने सारे राहिलो. वाद-विवाद घडलेच नाहीत. भोजनाचीही चिंता राहिली नाही.'' काही गोष्टी बुद्धांना समजत पण तरीही ते प्रश्न विचारीत. काही गोष्टी त्यांना समजल्या तरीही प्रश्न विचारत नसत. सार्थक गोष्टीबद्दल ते विचारत, निरर्थक गोष्टींबद्दल विचारत नसत. भिक्खूंना प्रश्न विचारण्याचा त्यांचा उद्देश, धर्मोपदेश करण्याचा व शिष्यांना नियम समजून सांगण्याचा असे.

त्या दृष्टीने त्या साऱ्या भिक्खूंना विचारले, ''मला तुमच्याकडून समजून घ्यायचे आहे की तुम्ही लोकांनी वादविवादरहीत, चांगल्या पद्धतीने वर्षावास केला व भोजनाचीही विवंचना राहिली नाही ते कशापद्धतीने?'' यावर ते म्हणाले, ''भंते ! आम्ही कोसल देशात वर्षावास केला व या या पद्धतीने नियम करून वादविवादरहीत आनंदाने राहिलो.'' यावर बुद्धांनी त्यांना स्पष्ट केले, ''निष्क्रिय बनून वर्षावास केला तरीही तो उत्तमरितीने घालवला असे तुम्ही सांगता. शेळ्या-मेंढ्यांनी एकत्र वास केल्याप्रमाणे तुम्ही राहीलात. पशुंप्रमाणे राहूनही तुम्ही म्हणता की वर्षावास उत्तम ठरला. पक्षीही कळपाने राहतात त्याप्रमाणे तुम्ही एकत्र राहिलात तरीही तुम्हाला प्रगती केल्यासारखे वाटते. भिक्खूंनो हा भ्रम आहे. ही स्वतःची भलावण आहे. एकत्र राहून वर्षावास करताना कधीही मूक व्रत, मौन व्रत धारण करू नका. तो संघातील दोष मानावा. वृद्ध भिक्खूंसमोर तरुणांनी बसावे. त्यांना नम्रतेने प्रार्थना करावी. ''आयुष्यमान! कृपा करून मला तुम्ही पाहावे, मी बोलताना ऐकावे आणि संशयास्पद अपराध मला सांगावेत. त्याप्रमाणे मी ते दोष घालवण्याचा प्रयत्न करेन. मी निर्दोष भिक्खू बनेन.''

## पुन्हा पाणी तंटा

शाक्य आणि कोलियांच्यातला रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून होणारा वाद-संघर्ष बुद्ध कपिलवस्तूत असतानाही होता नि नसतानाही सुरू होताच.

पूर्वी पाण्याच्या वाटपातून शाक्य आणि कोसल नागरिकांच्यात युद्धाने हा प्रश्न सोडवावा असा प्रस्ताव पुढे आला. त्याला सिद्धार्थने विरोध केला होता. त्यावेळी त्यांनी साऱ्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला होता की,

न हि वेरेण वेराणि सम्मन्तीध कुदाचनं

अवेरणे च सम्मंनि एक धम्मो सनातनो

झगडा करून झगडा समाप्त होत नाही. युद्धामुळे युद्ध थांबत नाही. परंतु स्नेहभावाने संघर्ष, झगडा नाहीसा होतो.



आजही तथागतांचे तेच मत होते. धर्माचरणाचा हा अर्थ सरळ सरळ समाजजीवन परिवर्तन करणारा आहे.

राजा महानामा आणि राजा सुप्पबुद्ध या दोघांनाही हा वाद मिटावा म्हणून बुद्धांनी विनंती केली. मानवी जीव महत्त्वाचे का पाणी? या त्यांच्या प्रश्नावर त्या दोघांनीही विचार केला. अहंकार आणि क्रोध यामुळे हा प्रश्न धगधगत राहिला आहे. दुष्काळ पडतो तेव्हा पाणी किती प्रमाणात वाटून घ्यायचे हे ठरवणे गरजेचे होते. त्यानुसार संघर्ष, हिंसा टळली. राजा महानामाच्या विनंतीनुसार बुद्धांनी त्यावेळी वर्षावासकाळी त्याच भागात राहण्याचे ठरवले.

त्यानंतर ते दक्षिणेकडे गेले. अलवी, कोलिया, राजगृह असे करीत गजहकूट पर्वतावर आले. गरुडासारखे एक पर्वतशिखर होते. राजा बिंबिसार कधीकधी त्यांच्या या ठिकाणच्या कुटीत येत असत. त्यांनी तेथे पोहोचण्यासाठीच्या पायवाटेवर छोटे छोटे पूल बांधले होते. त्यांच्या झोपडीजवळून दिसणारा निसर्ग अप्रतिम होता. नितळ पाण्याचा झरा, प्रचंड आकाराच्या शिळांचे छत; मोर, हरीण यांचे बागडणे, या पशुपक्ष्यांचे मंजुळ ध्वनी या साऱ्यांचा त्यांना ध्यानात अडथळा वाटत नव्हता. ते निसर्गाचे गूढ गुंजन होते. जो त्या लयीशी साद घालतो त्याचे मन आपोआप अंतर्मुख होते. त्या झऱ्यात ते त्यांचे चीवर धूत असत. स्नान करीत असत. स्वावलंबनाचा वेगळा आनंद त्यांना अनुभवास येत होता.

खेडोपाडी गोरगरीब आपापल्या कुवतीप्रमाणे भिक्खूंना अन्नदान, वस्त्रदान करीत. एकेदिवशी एक भिक्खू ढीगभर वस्त्रे खांद्यावर घेऊन संघाकडे परतला होता. बुद्धांनी त्याला विचारले, ''तुझ्या खांद्यावर किती वस्त्रे आहेत?'' तो म्हणाला, ''आठ.'' ''सारे तुझ्यासाठी आणलेस काय?'' ''नाही भगवंत! इतरांच्यासाठी त्याचा उपयोग होईल म्हणून स्वीकारलेत.'' ''भिक्खूला किती वस्त्रांची गरज असते?'' तो म्हणाला, ''थंडी, वारे, ऊन,पाऊस यांत फक्त तीन वस्त्रे पुरतात.'' मग त्यांनी साऱ्याच भिक्खूंसाठी नियम केला. एक भिक्षापात्र नि तीन वस्त्रे बाळगण्यास भिक्खूंना परवानगी राहील.

तथागतांचे दिवसेंदिवस पायी चालणे, वेगवेगळ्या हवा, पाण्याचा परिणाम शरीराला जाणवत होता. छोट्या-मोठ्या आजारांची चाहूल लागत होती. इच्छाशक्ती, आंतरिक सामर्थ्य यांच्या प्रयोगामुळे पुन्हा पूर्ववत बनत होते. तर वैद्य जीवक त्यांची काळजीही घेत होता. त्याने एकदा त्यांच्यासाठी शाकाहारी भाजी, सूप बनवले होते. त्याचा उद्देश असा होता की, अशक्तपणा आल्याने डोंगरावरून उतरून गावात जाणे व पुन्हा डोंगरावर चढणे त्यांना त्रासदायक झाले होते. काही दिवस भिक्षेसाठी जाण्याचे त्यांनी थांबवावे.

भोजनानंतर चर्चेच्या दरम्यान एक विषय निघाला. काही टीकाकार म्हणत की, बुद्ध भिक्खूंना मांसाहार करायला परवानगी देतो. स्वतःला व भिक्खूंना मांसाहार हवा असतो म्हणून प्राण्यांची हत्या करायला सांगतो. काहींनी तर आरोप केला की, भिक्खूंना मांस दान म्हणून द्यावे असे सुचवले जाते.

या गोष्टी खऱ्या नाहीत हे बुद्धांनाही माहीत होते. पण पुन्हा त्यांनी जीवकाला सांगितले की, तुला हे माहीत आहे की, याविषयी मी यापूर्वीही खुलासा केला आहे.

१) जर भिक्खूला अन्न म्हणून देण्यासाठी कोणी प्राण्यांची हत्या करीत असेल तर ते नाकारा.

२) त्याने प्राण्याला मारताना प्रत्यक्ष पाहिले नाही, पण जर कोणी तो प्राणी त्याच्यासाठी मारण्याचे सांगितले तरी ते अन्न नाकारावे.

३) जर भिक्खूला संशय आला की, त्याच्यासाठी प्राणीहत्या होत आहे तरी ती थांबवावी व नाकारावी.

जर भिक्खूसाठी म्हणून प्राण्याची हत्या होत नसेल तर ते भिक्षापात्रात अन्न म्हणून येईल ते नाकारू नये असा संकेत आहे. बहुतेकांना माहीत असते की, भिक्खू शाकाहार पसंत करतात. त्यांच्याबाबत हा प्रश्न नाही, पण जे धम्माला ओळखत नाहीत, भिक्खूंना कधी भेटले नाहीत, त्यांनी जे अन्न वाढतील ते स्वीकारा. देणाऱ्याचा अवमान करू नका. त्यांना मुक्तिमार्ग दाखवण्याची संधी सोडू नका. काही काही वेळा लोक बुद्धांची वैयक्तिक व धम्माची कुचेष्टा करीत. तर काही स्तुती करीत. साऱ्या भिक्खूंना त्यांनी सांगितले होते की, ''कोणी टीका केली तर त्याकडे दुर्लक्ष करा. क्रोध येऊ देऊ नका. त्याचप्रमाणे कोणी स्तुती केली तरी त्याने हुरळून जाऊ नका. मन दोन्ही वेळा स्थितप्रज्ञाप्रमाणे राखा. जगात विविध प्रकारचे लोक, विविध मत संप्रदाय आहेत. तत्त्वचिंतक आहेत, श्रमण आहेत. त्यांतील काही परस्परावर आरोप-प्रत्यारोप करीतात. त्याला काही अंत नाही. श्रद्धा-अंधश्रद्धा अशा तार्किक गोष्टींच्या वाद-विवादातून, खंडन-मंडनातूनही काही मिळत नाही.''

## सोमा भिक्खूणी

सोमा भिक्खूणीला वाटेत एक ब्राह्मण भेटला. ती त्यावेळी श्रावस्ती जवळच्या अंधवनात ध्यान करण्यासाठी बसली होती. तो ब्राह्मण तिला म्हणाला,

''यन्तं इसीहि पत्तब्बं ठानं दुरभिसंभवं
न तं द्वंगुलपत्त्राय सक्का पप्पोतुमित्थिया॥''



जे (निर्वाण) स्थान ऋषींना मिळणे कठीण ते (भात शिजला असता तपासून पाहण्याची) दोन बोटांची जिची प्रज्ञा, त्या स्त्रीस मिळणे शक्य नाही.

यावर सोमा भिक्षुणी म्हणाली,

''इत्थिभावो किं कयिरा चिन्तम्हि सुममहिने ।
जाणाम्हि वत्तमानम्हि सम्या धम्मं विपस्सतों ।
यस्य नून सिया एवं इत्थाहं पुरिसोतिवा ।
किञ्चि वा पन अस्मीति तं मारो वत् तुमरहति ।''

''चित्त उत्तम प्रकारे समाधान पावले असता आणि ज्ञानलाभ झाला असता सम्यकपणे धर्म जाणणाऱ्या व्यक्तीला (निर्वाण मार्गात) स्त्रित्व कसे आड येणार? ज्या कोणाला मी स्त्री आहे, मी पुरुष आहे किंवा मी कोणीतरी आहे, असा अहंकार असतो त्याला हे ब्राह्मणा तुझे विचार सांग, मला ते सांगू नको.'' यावर दुःखित अंतःकरणाने ब्राह्मण निघून गेला.

## खरा ब्राह्मण

तथागत एके दिवशी भिक्षाटन करीत असता भारद्वाज ब्राह्मणाच्या शेतावर गेले तेथे भारद्वाज आपल्या मजुरांना जेवण देत होता. भिक्षेसाठी एक श्रमण उभा आहे असे पाहून तो बुद्धांना म्हणाला, ''माझ्याप्रमाणे तू देखील शेत नांगर, पेर, धान्य गोळा कर आणि खा. भिक्षा का मागतोस?''

यावर बुद्ध त्याला म्हणाले, ''हे ब्राह्मणा! मी देखील शेतकरी आहे. मी श्रद्धेचे बी पेरतो. त्यावर तपश्चर्येची (प्रयत्नाची) वृष्टी होते. माझा नांगर आहे, पापलज्जा, चित्त-दोऱ्या, स्मृती (जागृती)- नांगराचा फाळ आणि चाबूक आहे. कायेने आणि वाचेने मी संयम पाळतो. आहारात नियमित राहून सत्याच्या योगे (मनो दोषांची) मी खुरपणी करतो. संतोष ही माझी सुटी आहे, उत्साह हे माझे बैल; आणि माझी बैलगाडी अशा दिशेने जाते की जेथे शोक करण्याची पाळी येत नाही.''

त्यांच्या म्हणण्याचा अर्थ भारद्वाजला समजला. तो बुद्धानुयायी बनला.

बुद्धांनी शेतीचा कधी निषेध केला नाही. शाक्य कुटुंब हे शेतकऱ्याचे कुटुंब. शेतीला नितिमत्तेचे पाठबळ नसेल तर तिच्यापासून समाजाला सुख न होता दुःख होईल. एकाने पेरलेली शेती पिकाच्या वेळी दुसऱ्याने बळकावली किंवा उभे पीक कापून नेले तर समाजात भयंकर अव्यवस्था माजेल. प्रथम परस्परांचे हितसंबंध अहिंसात्मक असावयास पाहिजेत.

त्यामुळे प्रथम मानसिक शेती केल्याशिवाय भौतिक शेतीचा उपयोग होणार नाही.

मगध देशाचा राजा बिंबिसार बुद्ध धम्माचा एक प्रमुख आधार होता. भिक्खूंसह भोजनाचे त्याने आमंत्रण दिले. त्याचा बुद्धांनी स्वीकार केला. राजाला खूप आनंद झाला. तो आसनावरून उठला. त्याने अभिवादन केले. त्यांच्या आसनाभोवती प्रदक्षिणा घालून तो निघून गेला.

रात्र संपताच त्याने उत्तमोत्तम भोजनाची व्यवस्था केली. दोन प्रहर होण्यापूर्वी त्यांनी चीवर परिधान केले. उत्तरीय आणि भिक्षापात्रासह पूर्वजटिल भिक्खूसह राजगृहात प्रवेश केला.

राजा बिंबिसारने ठेवलेल्या आसनावर ते भिक्खूसह बसले. सर्वांना राजाने स्वतःच्या हाताने भोजन वाढले. भिक्षापात्र धुऊन स्वच्छ केल्यावर राजा बिंबिसार त्यांच्याजवळ येऊन बसला. राजाने आपले मनोगत सांगितले, ''आपल्या निवासासाठी मी अशी जागा निवडली आहे जी गावापासून फार दूरही नाही आणि फार जवळही नाही. तुम्हाला भेटायला येणाऱ्या खेडोपाडीच्या गोरगरिबांना सोयीची आणि चांगली वाट असणारी ती जागा आहे. दिवसा फार गजबजलेली नाही अशा शांत रात्री, गर्दीच्या वस्तीपासून दूर एकांतात व निवृत्तवासास अनुकूल अशी आहे. त्याला वेळूवन म्हणतात. ती जागा भिक्खूसंघास मी दान करू इच्छितो.'' असे म्हणून बुद्धांची अनुमती घेऊन राजाने पाण्याने भरलेले सुवर्णपात्र हाती घेऊन वेळूवन भिक्खूसंघास दान केले. साऱ्या भिक्खूंना बुद्धांनी सांगितले, 'ह्या उद्यानाचा स्वीकार करण्यास तुम्हाला अनुमती देतो.'

## आमराईतील भिक्खू

मगधराज बिंबिसार यांची एक मोठी आमराई होती. आंब्यांनी ती बाग बहरलेली होती. राजाने भिक्खूंना म्हटले की, 'तुमच्या इच्छेनुसार आंबे खा !' आता राजाचीच अनुमती म्हटल्यावर तरूण भिक्खू दररोज आमराईत जात होते. तरुण भिक्खूंनी तर आंब्याच्या झाडांवर चढून कच्चे आंबेही तोडून खाल्ले.

राजाला आंब्यांची गरज होती. त्याने सेवकाना आज्ञा केली की चांगल्या प्रतीचे आंबे आमराईतून घेऊन ये. ते सेवक पाहतात तो पिकलेले आंबे तर गायब होतेच शिवाय कच्चे आंबेही नाहीत. सेवकांनी येऊन राजाला सांगितले की भिक्खूंनी आंबे खाऊन टाकले आहेत.

राजा बिंबिसार म्हणाला, ''बरे झाले भिक्खूंनी ते खाल्ले.'' पण याची बुद्धांना कल्पना नव्हती. जेव्हा समजले तेव्हा साऱ्या भिक्खूंना त्यांनी बजावले,''राजाने आंबे खाण्याची



परवानगी दिली याचा अर्थ त्याचे सारे पिकलेले व कच्चेही आंबे संपवायचे नसतात. पाहुण्याने परवानगी दिल्याखेरीज त्याच्या वस्तूला आपण हातही लावू नये.''

## मुंडन करण्यास संघाची परवानगी हवी

एका स्वर्णकाराचा मुलगा आई-बापाशी भांडला नि सरळ संघात सामील झाला. त्याने मुंडन केले आणि इतर भिक्खूंच्यात मिसळून गेला. पुढे त्या मुलाचे आई-वडील आपल्या मुलाचा शोध घेत घेत फिरत-फिरत भिक्खूंना भेटले. त्यांनी काही भिक्खूंना विचारले, ''भंते! या वर्णनाच्या आमच्या मुलाला तुम्ही पाहिलेत का?''

त्याची ओळख नसल्याने त्यांनी सांगितले,'आम्ही त्याला ओळखत नाही. त्याला पाहिले नाही.' पण अधिक शोध घेताना त्यांनी आपल्या मुलाला ओळखले. मुंडन करून भिक्खू बनलेला त्याला पाहिल्यावर माता-पित्याला फार दुःख झाले. त्याहीपेक्षा अधिक दुःख झाले ते भिक्खू खोटे बोलले याचे. त्यांचा धिक्कार करून ते म्हणाले, ''हे शाक्यपुत्रीय श्रमण निर्लज्ज, दुःशील, खोटारडे आहेत. त्यानी जाणूनही सांगितले आम्ही त्याला ओळखत नाही. त्याला पाहूनही सांगितले आम्ही त्याला पाहिले नाही. आता तर पुत्र भिक्खू बनला आहे.'' या गोष्टीमुळे ते आई-वडील शोकसंतप्त झाले. त्यांना हैराण झालेले पाहून झालेली घटना भिक्खूंनी बुद्धांच्या कानावर घातली. तेव्हा त्यांनी नवा नियम घातला की, मुंडन कर्म करण्यापूर्वी संघाची अनुमती घेणे बंधनकारक राहील.

## नंदही भिक्खू संघात थांबला

एक दिवस कपिलवस्तू नगरात शाक्य परिवार बुद्धांना भेटायला आला. त्यात त्यांचा सावत्रभाऊ नंदही होता. निरोपासाठी साऱ्यांना दोन्ही हात जोडून नमस्कार करताना त्यांच्या हातांतील भिक्षापात्र नंदाने घेतले. मग ते निवासस्थानाकडे निघाले.

इकडे नंद गोंधळला. भिक्षापात्राचे काय करायचे? तो बुद्धांच्या पाठोपाठ चालू लागला. त्यांनी त्याला विचारले, ''काही दिवस भिक्खूचे जीवन जगून बघतोस?'' नंदने मानेनेच होकार दिला. काही दिवस गेले. त्याला शांत आणि बरे वाटत होते. पुन्हा विचारले, ''काही महिने राहशील?'' तो आनंदाने तयार झाला. या साऱ्या प्रकाराला राजा शुद्धोदनांची अनुमती होती; कारण नंद इतर तरुणांच्यात वावरताना थोडा व्यसनाधीन बनला होता. भविष्यात राज्यकारभार करण्यासाठी एकाग्रता, शौर्य, शहाणपण, मनाची शांती असे गुण आवश्यक

होते. ते त्याला बुद्धांच्या सान्निध्यातच मिळत होते.

## राहुल भिक्खू बनतो.

राजगृहात विहार करून, कपिलवस्तूच्या दिशेने ते चालू लागले. हळूहळू कपिलवस्तूला पोहोचले. तेथल्या न्यग्रोधारामध्ये विहार करीत होते. सकाळच्या वेळेला चीवर वस्त्र घातले, भिक्षापात्र घेतले नि भिक्षेसाठी निघाले. राजा शुद्धोधनाच्या वाड्याजवळ आले. तेथे घातलेल्या आसनावर बसले. तेव्हा राहुलच्या मातेने त्याला म्हटले, ''राहुल हे तुझे पिता आहेत. खूप श्रीमंत आहेत. त्यावर तुझा वारस म्हणून हक्क आहे. तू त्यांच्याकडे तो माग.''

ते ऐकून छोटा राजकुमार राहुल बुद्धांच्यापर्यंत आला. त्यांच्या समोर उभा राहून म्हणू लागला, ''हे श्रमण! तुला पाहून आनंद होतो. तुझी सावली सुखमय आहे.''

हे ऐकून भावविवश व्हायला नकोत, म्हणून ते सरळ उठले नि चालायला लागले. तेंव्हा तोही त्यांच्यामागून येऊ लागला. वारंवार तो म्हणू लागला, ''हे श्रमण, मला माझा वारसाचा वाटा दे! मला माझी वस्तू दे.''

## राहुलला दीक्षा

हे वारंवार ऐकून, राणी यशोधरेचा हेतू ओळखून बुद्धांनी सारिपुत्तला आज्ञा केली की, ''राहुल कुमारला दीक्षा दे'' तो म्हणाला, ''कोणत्या प्रकारे दीक्षा देऊ?'' यावेळी साऱ्याच भिक्खूंना उद्देशून बुद्धांनी सांगितले, भिक्खूओ ! तीन शरण-गमनाने श्रामणेर प्रव्रज्येची आज्ञा देतो. प्रथम मुंडन करा. भगवी वस्त्रे घाला. खांद्यावर एक उपरणे टाका. ज्येष्ठ भिक्खूंच्या पायाला स्पर्श करून वंदन करा. मांडी घालून बसा. हात जोडा. असे म्हणा की, ''मी बुद्धाला शरण जातो. धर्माला शरण जातो. संघाला शरण जातो.'' असे तीन वेळा म्हणा. अशा प्रकारे नव्या भिक्खूंना संघात सामील करून घेतले गेले. राहुल कुमार आता सर्वसामान्य भिक्खू बनला. तो आता राजकुमार नव्हता.

राहुल संघात दाखल झाला. पण त्यावेळी त्याचे वय कमी होते. आता तो वीस वर्षांचा झाला होता. सारीपुत्तने त्याचा दीक्षाविधी पूर्ण केला. त्यापूर्वी कितीतरी दिवस अगोदर सारीपुत्तने त्याला आसन, प्राणायाम, ध्यान याविषयी शिकवले होते. गुराखी मुलगाही त्याच्याबरोबर शिकत होता.

स्वतः बुद्धांनी त्याला डोळे, कान, नाक, जीभ, शरीर व मन यांवर कसे ध्यान करायचे,



ते शिकवले. सहा इंद्रिये, विषय-आकार, ध्वनी, वास, चव, स्पर्शविषय नि मनाचे विषय समजून सांगितले.

सहा इंद्रिये जाणिवा-नेत्राची जाणीव, कानाची जाणीव, नाकाची जाणीव, चवीची जाणीव, शरीर जाणीव व मनाची जाणीव यांविषयी समजून सांगितले. या साऱ्या १८ इंद्रिये गुंफांच्यामध्ये सखोल कसे पाहावे हा अभ्यास महत्त्वाचा होता. त्यालाच अठरा धातू म्हणतात. त्यात सहा इंद्रिये, सहा इंद्रिय विषय, सहा इंद्रिय जाणीवा, यांचा समावेश होतो. इंद्रिय आणि इंद्रिय विषय यांच्या संगमातून संवेदनेचा जन्म होतो. इंद्रियांचे अस्तित्व परस्परांवर अवलंबून असते. शिवाय अस्थिर व नाशवंत असते. ही गोष्ट ज्याला कळेल त्याला शून्यता म्हणजे काय हे समजते; मग तो जन्म मरणाच्या चक्रातून मुक्त होतो.

राहुलला त्यांनी हेही सांगितले की, आत्मा नावाची चीज नसते. शरीर, भावना, संवेदना, मानसिक आकार आणि जाणीव यांचा आपण अनुभव घेत असतो. पण स्वतंत्र आत्मअस्तित्व नसते. शरीरात आत्मा नसतो नि आत्म्यात शरीर नसते.

राहुल हळूहळू मनाच्या रिक्ततेचा अभ्यास करू लागला. पुढे तो अर्हत बनला.

राजा शुद्धोधनांच्या कानी हा दीक्षाविधी गेला. ते बुद्ध होते तेथे आले. अभिवादन करून एका बाजूला बसले. त्यांच्या डोळ्यात अश्रू साठले होते. निराशा चेहऱ्यावर पसरली होती. आवाज घोगरा बनला होता. ते म्हणाले, ''भगवान बुद्धाकडे मी एक वर मागतो.'' बुद्ध म्हणाले, ''हे राजन! मी वर वगैरे काही देत नाही. त्यापासून मी खूप दूर आहे.'' ते म्हणाले, ''भंते! जे योग्य आहे, उचित आहे तेच मी मागतो.'' बुद्ध म्हणाले, ''बोला राजन!'' ते म्हणाले, ''भगवान! तुम्ही संन्यास घेतलात तेव्हा मला वाईट वाटले होते. नंदने संन्यास घेतला तेव्हाही दुःख झाले. मात्र राजपुत्र राहुलने संन्यास दीक्षा घेतली त्याचे मला सर्वाधिक दुःख झाले. पुत्रप्रेमाने माझी त्वचा सोलली गेल्याप्रमाणे वेदना झाली. त्याखालचे मांस छेदले असे वाटले नि त्याखालच्या नसा कापल्यासारख्या वाटले. आता त्याही पलीकडे खोलवर जाऊन माझी हाडेच विदीर्ण झाली. त्याने मी घायाळ झालो आहे. माझ्या राज्याच्या वारसाची उरलीसुरली आशा धुळीला मिळाली आहे. माझी स्वप्नेच उद्ध्वस्त झाली आहेत. असे स्वप्न कोणत्याही माता-पित्याचे उद्ध्वस्त होणार नाही असा वर द्या!'' राजा शुद्धोदन आसनावरून उठले. त्यांनी बुद्धांना अभिवादन केले. बुद्धांनी त्यांची वेदना जाणली, त्यामागचे सत्य जाणले नि पूर्ण होकार दिला. साऱ्या भिक्खूंना संबोधित करून त्यांनी सांगितले,''यापुढे माता-पित्याच्या परवानगीशिवाय कोणत्याही पुत्राला धम्म दीक्षा देऊ नका. ही आज्ञा उल्लंघेल तो धम्माचा अनादर ठरेल.''

बुद्धांनी सम्राट बिंबिसारांच्या राज्यात निघण्याचा संकेत दिला. त्यावेळी राजा शुद्धोधन, राजपुत्र द्रोनोदनराज (त्यांचे चुलते नि देवदत्त आणि आनंदचे वडील) आले होते. त्यांना धम्म उपदेश करताना सांगितले, ''जेव्हा राजकर्त्यांकडे पुरेसे शहाणपण, प्रेम, गरिबाबद्दल करुणा, दुःखी जनाबद्दल, शोषिताबद्दल सहानुभूती असेल तर प्रजेला शांती नि सुख लाभेल. जर त्याने अहिंसेचा आधार घेतला तर युद्धे कमी होतील. त्यावेळी गरीब नि श्रीमंतातील दरी कमी होईल. स्वतः राजानेच चांगल्या चारित्र्याचा, गुणांचा आदर्श जनतेपुढे ठेवायला हवा. मग त्याला प्रजेकडून आदर, प्रेम, समर्पण लाभेल. कायद्यापेक्षा गुणामुळे प्रजेचा मिळणारा प्रेमादर मोलाचा ठरतो. त्यावेळी शिक्षेचा आधार घ्यावा लागत नाही. जीवनात जागृतीची पहाट येते ती सद्गुणामुळे.''

साऱ्याना बुद्धांचे विचार आवडले. राजपुत्र द्रोणोदनराज त्यांना म्हणाले, ''फार सुंदर विचार आहेत. पण अशा मार्गाने स्वतः जाणारा नि प्रजेला नेऊ शकेल असा माणूस, हे शाक्यमुनी! तुमच्या खेरीज दुसरा कोणी नाही. तुम्हीच कपिलवस्तू नगरात राहून नव्या उत्तमपद्धतीचे राज्य का करीत नाही. साऱ्याच लोकांना आनंद व शांती लाभेल.'' राजा शुद्धोदनांनी त्यातच आपला सूर मिसळला. ते म्हणाले,''होय! मी आता वयोवृद्ध झालो आहे. जर तुम्ही येथे राहण्याचे ठरवत असाल तर मी राज्यच तुमच्या हाती सोपवायला तयार आहे. मला खात्री आहे तुमच्यामागे सारी प्रजा उभी राहील नि मग अभूतपूर्व अशी क्रांती होईल. राज्य कधी नाही ते समृद्ध होईल.''

यावर बुद्धांनी स्मित हास्य केले नि सांगितले,''मी आता केवळ शाक्य कुटुंबाचा राहिलेलो नाही. वसुधैव कुटुंबम्. सारी मानवजात ही माझी प्रजा आहे. सारी पृथ्वी हे माझे घर आहे. मी जो मार्ग निवडला आहे, तो राजकर्त्याचा नव्हे. माझ्या या मार्गाने मी साऱ्यांचेच कल्याण करू शकेन.'' हे बोलणे ऐकणारी राजमाता गौतमी नि यशोधरा काहीच बोलल्या नाहीत. त्यांच्या डोळ्यातून वाहणारे अश्रूच बोलत होते. बुद्ध पुन्हा परतणार नाही याची ती पावती होती. ते मगधाला चालले होते. पुन्हा कपिलवस्तूला येईन हे त्यांचे आश्वासन साऱ्यांना धीर देणारे होते.

## महाकश्यप - मृत्यूची भीती

राजा बिंबिसारला बुद्ध तेथे आल्याचे समजले. पावसाळा जवळ येत चालला होता. आता हा तेथला तिसरा पावसाळा होता. सारी तयारी झाली होती.

एकेकाळचा जहागीरदार बधिया आता मुक्त जीवन जगत होता. तो निर्भयपणे



झाडाखाली झोपू शकत होता. आता त्याला राजवाडा, संरक्षक, सत्ता, प्रसिद्धी कशाचीच गरज नव्हती. कारण त्यातून जे मिळत नव्हते ते सुख, आनंद तो उपभोगत होता. कोणाच्या आयुष्यात परिवर्तनाचा क्षण कसा नि केव्हा येतो हे सांगता येत नाही. मगधात महाकश्यप नावाचा अतिशय श्रीमंत तरुण राहत होता. भद्रकपालिनी ही त्याची सुंदर पत्नी होती. त्यांनी १२ वर्षे संसार केला होता. एक दिवस पहाटे महाकश्यप उठला. त्याची पत्नी झोपलेलीच होती. खिडकीतून एक भला मोठा जहाल विषारी साप आत आला नि तो नेमका पत्नीच्या हाताजवळून सरपटत गेला. भीतीने महाकश्यप गांगरून गेला. त्याला काही सुचेना, हालचाल करावी, ओरडावे तर साप पत्नीला दंश करणार; ती प्राणाला मुकणार. बर्फासारखा गोठलेल्या अवस्थेत तो उभा राहिला. तो साप सुदैवाने खोलीबाहेर निघून गेला. पण जन्म नि मृत्यूचे अंतर महाकश्यपने मोजले. पत्नीला जागे करून तिला भयनाट्य कथन केले. त्या दोघांनीही जीवनाच्या क्षणभंगुरतेचा विचार केला. सकाळी लवकरच ते बुद्धांच्याकडे आले. त्यांनी झालेली घटना कथन केली नि संघाची दीक्षा देण्याची प्रार्थना केली. बुद्धांनी त्याला अनुमती दिली. त्यांना उपदेश करताना सांगितले.

''दान आणि शील यांच्याद्वारे इतरांचे कल्याण करा.

क्षमा आणि पराक्रम यांच्याद्वारे आपले स्वतःचे कल्याण करा.

ध्यान व प्रज्ञा यांच्याद्वारे मोक्ष प्राप्त होतो.''

## अंगुलीमाल

बालपणी झालेल्या अन्याय अत्याचाराचा बदला घेण्यासाठी एक तरुण हिंसाचाराकडे वळला होता. त्याचा हिंसाचार पराकोटीला गेला होता. तो तरुण सामर्थ्यवान होता, चपळ होता व युद्धात तरबेज होता. त्याच्या हिंसाचाराने एका मनोवृत्तीचे रूप धारण केले, त्यामुळे त्याला राजाच्या शिपायांनाही त्याला पकडता येत नव्हता. मात्र कौसलच्या नागरिकांना त्याने सळो की पळो करून सोडले होते. राजा प्रसेनजितही मोठ्या संकटात पडला होता. प्रजेचे रक्षण या दरोडेखोरापासून करायचे की, शेजारच्या राज्यांच्या अतिक्रमणापासून करायचे हेच त्याला सुचत नव्हते.

बुद्ध श्रावस्तीच्या जेतवनात राहताना भिक्षेसाठी गेल्यावर घराघरांतून या दरोडेखोराच्या अन्यायाविषयी कहाण्या ऐकत होते. तो माणसांना, स्त्रियांना, मुलांना ठार मारीत असे व त्यांचे एक बोट व अंगुली तोडून ती गळ्यात ताईताप्रमाणे घालीत असे. असे जवळजवळ शंभर लोक त्याने ठार केले होते.

बुद्धांच्या मनात एक विचार चमकून गेला, 'गोरगरिबांना आपण अहिंसा, करुणा यांचा उपदेश करतो. पण खरी कसोटी अंगुलीमाल या दरोडेखोराचे हृदयपरिवर्तन करण्यात आहे. त्याला सदाचारी बनवण्यात आहे.'

एके दिवशी भोजन झाल्यावर त्याला शोधण्यासाठी जंगलातील पायवाटेने ते निघाले. त्या वाटेवरचे गुराखी, शेतकरी, धनगर त्यांना सांगत होते की त्या बाजूला जाऊ नका. अतिशय क्रूर असा अंगुलीमाल त्या वाटेवर असतो व तो तुम्हालाही ठार करेल. त्यांनी त्यांचे हितकारक बोल ऐकले. त्यांचे आभारही मानले पण ते पुढे चालत राहिले.

चाळीस माणसांचा जथा असो वा राजा प्रसेनजितचे सैनिक असोत त्यांना न घाबरणाऱ्या अंगुलीमानने त्यांना पाहिले. तो डोंगरावरून खाली पायवाटेने येताना त्यांनी त्याला पाहिले. पण ते चालतच राहिले. तो अचानक रस्त्यावर आला. बुद्धांचा हात धरून ओरडून म्हणाला, ''श्रमणा! तुला थांब म्हटले तरी तू थांबला का नाहीस?''

अंगुलीमालच्या सरळ डोळ्यात पाहत ते म्हणाले, ''अंगुलीमाल मी केव्हाच थांबलो आहे. आता थांबण्याची तुझी वेळ आली आहे!''

तो थोडा गोंधळला. आजपर्यंत त्याने असे कधी निर्भय बोल ऐकलेच नव्हते. तो म्हणाला, ''म्हणजे काय?''

बुद्ध त्याला म्हणाले,''मी हिंसा कधीच सोडली आहे. तू सोडण्याची वेळ आली आहे. दुष्कर्म करण्याचा आपला मार्ग सोडून दे.''

यावर अंगुलीमाल म्हणाला, ''हे श्रमणा! तू भलतेच बोलू नको. माणसे एकमेकांवर प्रेम करीत नाहीत. उलट एकमेकांशी क्रौर्याने वागतात, फसवतात. मलाही फसवले, क्रौर्याने वागवले. मग मी प्रेमाने का वागावे?''

बुद्धांनी त्याला उपदेश केला, ''अंगुलीमाल जन्मतः माणूस क्रूर असत नाही. तूही नव्हतास. पण हिंसेने हिंसा वाढते. प्रेमाने प्रेम वाढते. पण क्रौर्य, हिंसा ही अज्ञानामुळे घडते. पण ज्ञानामुळे चूक कळते. दया, करुणा निर्माण होते. असे खूप लोक आहेत की जे दुसऱ्याचे रक्षण करतात. प्रेमाने, शांतीने राहतात. तुला तसे राहयचे आहे काय?'

यावर अंगुलीमाल एकदम चमकला. बुद्धांच्याकडे निरखून पाहत म्हणाला, ''तू गौतम बुद्ध तर नाहीस?''

त्यांनी होकार दिल्यावर त्याने आपल्या पाठीशी बांधलेला सुरा काढला. तो बुद्धांच्या पायाशी ठेवला नि पायावर डोके ठेवून तो ओक्साबोक्सी रडू लागला.

त्याचे मन थोड्या वेळाने मोकळे झाले. तो म्हणाला,''यापूर्वी तुम्ही भेटला असता



तर इतकी पापाची राशी मोठी झाली नसती. पण आता मी तुमचा शिष्य होतो म्हटले तरी कोण विश्वास ठेवणार? माझे कोण संरक्षण करणार? मला लोक दगडाने ठेचून मारतील. राईराईएवढे तुकडे करून गिधाडांना खायला घालतील.''

तो बोलत होतो त्यात तथ्य होते. पण बुद्धांनी त्याला अभय दिले. त्याच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली.

या वेळेपर्यंत आनंद, राहुल नि पंधरा वीस तरुण भिक्खू त्यांचा माग काढत तेथपर्यंत पोहोचले. त्यांनी त्यांच्या भोवती कडे केले. त्यांना बुद्धांच्या जीविताची काळजी वाटणे साहजिक होते. प्रत्यक्ष परिस्थिती पाहून त्यांनी नि:श्वास टाकला.

त्यांनी आनंदला अंगुलीमालला दीक्षा देऊन संघात सामील करण्यास व धर्मशिक्षण देण्यास सांगितले. पुढे दहा दिवस उपाली, सारीपुत्त यांनी त्याला संघाचे नियम, शिस्त शिकवली. त्याच्यात मोठे परिवर्तन दिसत होते. तो शांत व स्थिर बनला होता.

एके सकाळी भिक्षेसाठी पन्नास-साठ भिक्खूंसह बुद्ध श्रावस्तीत गेले. इतक्यात राजा प्रसेनजित व पन्नास साठ सैनिक युद्धाच्या तयारीने निघालेले दिसले. त्यांना पाहिल्यावर राजा घोड्यावरून खाली उतरला. वंदन केले. त्यावेळी त्याचा चिंतित चेहरा पाहून बुद्धांनी विचारले, ''राजा, मगध व वैशालीच्या सैन्याचा प्रजेला काही त्रास तर होत नाही?''

यावर राजा म्हणाला, ''नाही तथागत! पण माझ्या राज्यात अंगुलीमाल नावाचा एक दरोडेखोर आहे. तो अतिशय क्रूर आहे. प्रजाजन त्रस्त झालेत. त्याचा नि:पात करावयाचा आहे. या हिंसेसाठी मला क्षमा करा.''

बुद्धांनी हसून म्हटले, ''क्षमेची गरज उरली नाही राजन! जर अंगुलीमालने हिंसा सोडली, चोरी, खोटे बोलणे सोडले, भिक्खूप्रमाणे तो जगू लागला तर कसे होईल? अशा अंगुलीमालला तू पाहिलेस तर तू त्याच्याशी कसा वागशील?'

राजा प्रसेनजित प्रसन्न मुद्रेने म्हणाला,''भगवान मी त्याला वंदन करेन, वस्त्र, अन्न, औषधे व संरक्षणही देईन. पण भगवन, असा दुष्ट कधीतरी भिक्खू बनेल का?''

यावर त्यांच्या उजव्या हाताला चीवर धारण केलेल्या, हातात भिक्षापात्र व मुंडन केलेल्या भिक्खूकडे बोट करून त्यांनी म्हटले, ''राजा! हाच तो पूर्वीचा अंगुलीमाल!''

यावर राजा क्षणमात्र भयचकित झाला. त्याच्या अंगावर रोमांच उभा राहिले.

थोड्यावेळाने राजा अंगुलीमालजवळ गेला व त्याच्याशी बोलून खात्री केली व त्याला अभय दिले. संरक्षण, अन्न, वस्त्र, औषधे पुरवण्याचे आश्वासन दिले.

मग त्यांच्याजवळ येऊन राजा म्हणाला, ''भगवन्, हा दैवी चमत्कार आहे.''

त्यात दुरुस्ती करून बुद्धांनी सांगितले, ''हा चमत्कार नसून मानवातील दैवी गुणांना केलेले यशस्वी आवाहन आहे.''

तरीपण तो भिक्षेसाठी गेल्यावर लोकांचा क्रोध उफाळून येई. कोणी कोणी त्याला जखमी करीत, रक्तबंबाळ करीत. पण तो ते सहन करीत होता. संतत्वाच्या वाटेवर तो चालला होता.

## सत्यपालन

पूर्वीचा अंगुलीमाल आता अहिंसक भिक्खू बनला होता. जंगलातून जाताना त्याला झाडाखाली एक प्रसूतिवेदनेने तळमळणारी स्त्री दिसली. जवळपास कोणी नाही आणि तिला कशी मदत करावी हे त्याला सुचेना; मग तो पळतपळत, धापा टाकतच बुद्धांच्या कुटीत आला. म्हणाला ''भगवान! ती स्त्री वेदनेने तळमळत आहे. तिची कशी सुटका होईल?'' त्यांनी सांगितले, ''तेथे जाऊन अशी प्रार्थना कर की मी जन्मल्यापासून जाणीवपूर्वक कोणाही जीवाची हत्या केली नाही; त्यामुळे तू आणि तुझे बाळ शांत नि सुरक्षित राहाल.''

बुद्धांना अहिंसकाचे सत्यपालन वाणीतही उतरले की नाही हे पाहायचे होते.

तो म्हणाला ''भगवान ! अशी प्रार्थना खोटी असेल, कारण मी जन्मल्यापासून असंख्य जीवांची अगदी ठरवून, जाणीवपूर्वक हत्या केलेली आहे.''

या उत्तराने ते सुखावले. मग त्यांनी पुन्हा सांगितले, ''ठीक आहे. मग आता अशी प्रार्थना कर की, जेव्हा पासून मी नव्या धम्माची दीक्षा घेतली तेव्हा पासून आजपर्यंत एकाही जीवाची जाणीवपूर्वक हत्या केली नाही. त्यामुळे तुझी सुटका होवो, सुरक्षित प्रसूति होवो व बाळ-बाळंतीण सुखरूप राहोत.'' भिक्खू अहिंसक पळत पुन्हा जंगलात गेला नि त्याने प्रार्थना केली. त्या सत्यपूर्ण प्रार्थनेला फळ आले. त्या स्त्रीने बाळाला सुखरूप जन्म दिला.

बुद्धांनी जाणले की भिक्खू अहिंसकने फार चांगली प्रगती केली. त्याची वाटचाल ठीक चालली होती.

## नालंदात वास्तव्य

विविध जातीधर्मांचे लोक मोठ्या प्रमाणात संघात सामील होत गेले. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पंथातील लोकही तो पंथ सोडून संघात सामील होऊ लागले. ते स्वतःहून येत



त्यांचे स्वागतच होत होते. नातपुत्त नावाचे एक प्रसिद्ध गुरू होते. त्यांच्या विचार व आचार पद्धतीला निगंठ पंथ म्हणत असत. बुद्ध त्या काळात नालंदात राहत होते. निगंठ पंथातील ज्येष्ठ तपस्वी दिधा तपस्वी त्या शहरात होता. ते भिक्षेसाठी शहरात फिरताना त्याने थांबण्याची विनंती केली. तो पंथ कर्माविषयी काही बोलत नाही. पापाविषयीच बोलतो. शरीराने केलेले पाप, चुकीच्या बोलण्याने घडणारे पाप व पापी विचारामुळे घडणारे पाप.

यावर बुद्धांनी विचारले, ''यातला कोणता प्रकार सर्वांत जास्त गंभीर मानावा.''

तो म्हणाला, ''शरीराने केलेले पाप सर्वाधिक गंभीर असते.''

कृतीमागचा विचार, त्याचा उद्देशही महत्त्वाचा असतो हे त्याला बुद्धांनी समजून सांगितले.

त्या तपस्व्याला अनेक गोष्टींची उकल झाली. तो मूळ पंथ सोडून संघात दाखल होऊ इच्छित होता. पण बुद्धांनी त्याला स्पष्ट सांगितले, ''कोणालाही आपला पंथ सोडून संघात दाखल व्हा असे सांगत नाही. उलट खूप सखोल चिंतन करा. मग निर्णय घ्या असे सांगतो, शिष्यांच्या संख्येवर गुरूचे महत्त्व वाढते हा भ्रम असतो, उलट प्रत्येक भिक्खू जीवनाविषयी किती जागृत बनतो हे महत्वाचे असते. यश वा अपयश या कल्पनेशी चिकटून राहू नका.''

## गुरुबंधूची सेवा

आनंदला घेऊन बुद्ध एका छोट्या विहारात गेले. त्यावेळेला बहुतांश भिक्खू नगराकडे भिक्षेसाठी गेले होते. विहाराभोवती फिरताना त्यांना माणसाचा कण्हण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. त्या दिशेने गेले. तेथे एक झोपडी होती. एक प्रकारची दुर्गंधीही पसरली होती नि एका कोपऱ्यात पोटाशी पाय दुमडून पडलेला एक भिक्खू दिसत होता. त्याला पाहून दया आली. बुद्धांनी पुढे होऊन विचारले, ''तू आजारी दिसतोस?''

''होय तथागत, मला हगवणीने बेजार नि असहाय बनवले आहे. मला हालचाल करणेही कठीण झाले आहे.'' यावर बुद्धांनी विचारले ''तुझी कोणी सेवा करीत नाही का?''

यावर तो म्हणाला,''सारे भिक्खू भिक्षेसाठी गावात गेले आहेत. प्रथम आजारी पडलो तेव्हा साऱ्यांनीच मला मदत केली. पण आता मी वृद्धही झालो नि इतरांच्या दृष्टीने निरुपयोगीही बनलो आहे.''

बुद्धांनी आनंदला बादलीभर पाणी आणण्यास सांगितले. त्यानंतर आनंद नि बुद्धांनी त्या आजारी भिक्खूला स्नान घातले, स्वच्छ केले. त्याचे घाण कपडे धुतले, जमीन साफ

केली. तोपर्यंत भिक्षेसाठी गेलेले भिक्खू परतले. त्यांनी पाहिले की बुद्धांनी आजाऱ्याची सेवा केली. तेव्हा ते लाजले. त्यांपैकी काहीजण पुढे आले. त्यांनी क्षमायाचना केली व काय करू असे विचारले. त्यांना आनंदने पाणी गरम करून काही औषधोपचार करायला सांगितले.

मग साऱ्या भिक्खूंना एकत्र बोलावून बुद्धांनी त्यांना उपदेश केला,

'भिक्खूंनो! जेव्हा तुम्ही धम्मदीक्षा घेता नि घरादारांचा त्याग करता. नातेवाईक, आई-वडील, बहीण-भाऊ यांनाही मागे सोडता, तेव्हा तुम्हीच एकमेकांचे आधार बनायला हवे. अडी अडचणीला मदत करायला हवी. मग तो प्रशिक्षक असो, विद्यार्थी असो किंवा गुरुबंधू असो. त्याला निरोगीपणा लाभेपर्यंत तुम्ही सेवा करायला हवी. समजा मी आजारी असतो तर तुम्ही काय केले असते?'

या प्रश्नाला साऱ्यांनी एकसुरात उत्तर दिले, ''आम्ही तुमची जीवापाड सेवा केली असती.'' यावर त्यांनी सांगितले, ''जो आजारी भिक्खू आहे तो मीच आहे असे समजून त्याची सेवा तुम्ही करायला हवी.''

साऱ्या भिक्खूंनी सूचनेचा स्वीकार केला. हात जोडले नि त्यांना वंदन केले.

## कालगणना

राजगृहात तथागत असताना नागरिकांच्या काही महत्त्वाच्या सूचना त्यांच्या कानावर आल्या. जेव्हा भिक्खू नगरात भिक्षेसाठी जात तेव्हा लोक विचारत, ''भंते, आज कोणता पक्ष आहे? कोणती तिथी आहे?'' तेव्हा भिक्खू त्यांना सांगत, ''आम्हाला माहिती नाही.''

या उत्तराने लोक हैराण बनत. ते म्हणत, ''शाक्यमुनींच्या पंथातील या भिक्खूंना साधे पक्ष नि तिथीचे ज्ञान नाही. इतके ते अडाणी आहेत. मग गहन धर्मज्ञान त्यांना कसे कळणार?''

या गोष्टी बुद्धांच्या कानावर आल्या तेव्हा त्यांनी साऱ्या भिक्खूंना आज्ञा केली की ''तुम्ही साध्या साध्या गोष्टींचे ज्ञान मिळवा. कालगणनेचे ज्ञान तुम्हाला हवे.''

काही वेळा लोक विचारत तुमचे किती भिक्खू गावात आलेत? किती जेवायला थांबणार आहेत? त्यावर भिक्खू म्हणत, ''आम्हाला माहीत नाही.''

त्यामुळे लोक हैराण होत. ते म्हणत या शाक्यमुनींच्या शिष्यांना कितीजण आहेत ते सांगता येत नाही. एकमेकांना ते ओळखत नाहीत हे किती दुर्दैव आहे.

या प्रकारामुळे शिक्षणाची आणि अंकगणितासारख्या विषयाची जाण भिक्खूंना किती गरजेची आहे हे बुद्धांना समजले, त्याप्रमाणे संघात ते शिक्षण घेणे हा नियमच त्यांनी बनवला.



## जातिभ्रष्ट

श्रावस्तीमध्ये राहत असताना बुद्ध भिक्षेसाठी गावात फिरत होते तेव्हा त्यांच्या हाती भिक्षापात्र होते. एका पुरोहिताच्या ते दारात आले. तेव्हा तो घरात यज्ञ करीत होता. यज्ञाच्या अग्नीज्वाळा घराच्या छतापर्यंत पोहोचत होत्या. तो पुरोहित त्यांच्याकडे पाहून जोराने ओरडला, ''हे श्रमणा! तू धर्मद्रोही आहेस, जातिभ्रष्ट आहेस, तू आत येऊ नको. तेथेच थांब!''

बुद्धांनी त्याला विचारले, ''कोण जातिभ्रष्ट? जो मनुष्य क्रोधाला बळी पडतो, राग मनात बाळगतो, जो द्वेष्टा आहे, जो ढोंगी आहे, जो पाप करतो, जो कुकर्माने भरलेला आहे तो भ्रष्ट, तोच जातिभ्रष्ट आहे.''

जो मनुष्य द्वेष वाढवतो, शत्रुत्व वाढवतो, ज्याच्या मनात वाईट इच्छा आहेत, जो दुसऱ्याचा द्वेष करतो, शत्रू मानतो, खोटारडा नि निर्लज्ज आहे, पाप करताना जो कचरत नाही, त्यालाच जातिभ्रष्ट म्हणायला हवे. जन्मामुळे, विशिष्ट जातीत जन्मल्याने कोणी श्रेष्ठ ठरत नाही, कोणी नीच ठरत नाही. चांगल्या कर्मामुळे श्रेष्ठता येते.''

## आरोग्य

आता संघ व्यापक बनत चालला होता. राजगृह, वेणुवन, गरुड टोक, वैभरवण, सारपरूनदिंका, प्रभार, सातपर्णगुहा, इंद्रसैलगुहा अशा अनेक ठिकाणी धर्म केंद्रे सुरू झाली. तेथे ज्येष्ठ भिक्खू नवोदितांना मार्गदर्शन करीत. तर बिंबिसार व अंबापालीचा पुत्र जीवक हा बुद्ध नि भिक्खूंचा प्रमुख वैद्य बनला होता. त्यानेही सर्वांच्या आरोग्यासाठी काही नियम बनवले. बुद्धांची त्याला मान्यता होती.

१) छोट्या तळ्यातले वा विहिरीचे पाणी घेतले तर ते पिण्यापूर्वी उकळून घ्या.

२) आठवड्यातून एकदा का होईना भिक्खूंनी आपली वस्त्रे स्वच्छ धुतली पाहिजेत.

३) अधिक स्वच्छतागृहे बांधली पाहिजेत.

४) दुसऱ्या दिवसासाठी म्हणून शिळे अन्न रात्रभर ठेवू नये.

## तुम्ही कोण?

बुद्ध एक दिवस फिरत फिरत उकट्ट आणि सेतत्व ह्या दोन नगरांच्या मधील राजरस्त्यापर्यंत पोहोचले. त्यांच्यापाठोपाठ द्रोण नावाचा एक ब्राह्मण येत होता.

सायंकाळी एका रम्य ठिकाणी वृक्षाखाली ते पद्मासनात ध्यानासाठी बसले. पाठोपाठ

येणारा द्रोण ब्राह्मण तेथे पोहोचला. त्यांचे ध्यान सखोल होत गेले. बराच वेळ त्यात निघून गेला.

त्यांनी ध्यान संपवले व पुढे निघणार तोपर्यंत द्रोण आला. त्याने आपला परिचय दिला. वंदन करून नम्रतेने काही प्रश्न विचारले. त्या साऱ्या प्रश्नांना बुद्धांनी नकारार्थी उत्तरे दिली. ते प्रश्न पुढीलप्रमाणे होते -

- आपण देव तर नाही? - आपण गंधर्व तर नाही?
- आपण यक्ष तर नाही? - आपण मनुष्य तर नाही?

या साऱ्या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशी आल्यावर त्याने गोंधळून विचारले, ''तुम्हाला देव आहात का? गंधर्व आहात का? यक्ष आहात किंवा मनुष्य आहात? असे विचारले असता नाही म्हणता, मग तुम्ही आहात तरी कोण?''

त्यांनी उत्तर दिले, ''हे ब्राह्मणा, जोपर्यंत नी माझ्या अंगचा आसक्तींचा निरास केला नव्हता. तोपर्यंत मी खरोखरच देव, गंधर्व, यक्ष, मनुष्य होतो. पण आता मी आसक्तिंपासून मुक्त झालो आहे आणि मुळाचे विच्छेदन करून बैठकच नाहीशी केली आहे. ज्याप्रमाणे वृक्षाची मुळे पूर्णपणे काढून टाकल्यावर त्याला अंकुर फुटणार नाही, त्याप्रमाणे माझे झाले आहे. ज्याप्रमाणे जलात जन्मलेली कमलता पाण्यातून वर येते आणि तरीसुद्धा पाण्याचा अंश तिला चिकटत नाही तसे हे ब्राह्मणा! मी जगात जन्मास आलो, जगात वाढलो आणि जगावर विजय मिळवून जगाच्या कलंकापासून दूर राहिलो आहे. म्हणून हे ब्राह्मणा काहीजण मला तथागत (ज्ञानी पुरुष) म्हणतात. तसे तू समज.''

□□□



# पवित्र जीवन आणि समता

संघातील भिक्खूंना बुद्धांनी सांगितले की, ''भिक्खूंनो, पवित्र जिवन हे लोकांना फसविण्यासाठी जगायचे नसते. त्यांची कृपा साधण्यासाठी, काही लाभासाठी, काही कीर्तीसाठी किंवा वादविवादाच्या जटिल प्रश्नातून सुटका करून घेण्यासाठी, किंवा लोकांमध्ये आपले नाव व्हावे यासाठी जगायचे नसते.

भिक्खूहो! शरीर आणि वाणी यांचे नियंत्रण करण्यासाठी, कोणत्याही प्रकारची अशुद्धता, आसक्ती आणि तृष्णा यांपासून विमोचन करण्यासाठी हे पवित्र जीवन जगायचे असते.''

संघाचे दार साऱ्या जातीजमातींच्या लोकांसाठी खुले ठेवले होते, साऱ्यांना प्रवेश मुक्त होता. यासाठी संघावर टीका करणारे लोकही होते. त्यांच्या मते, काही लोकांना संघात प्रवेश मिळाल्यावर संघ सोडून ते पुन्हा गृहस्थाश्रमात जातील आणि यामुळे श्रमण गौतमाचा धर्म व्यर्थ ठरला असे लोक म्हणतील.

अशा टीकाकारांना समतेचा संदेशच समजला नव्हता. बुद्धांनी तर मुक्तिजलाने परिपूर्ण व स्नानासाठी योग्य असा जलाशय संघाच्या माध्यमातून निर्माण केला होता. सद्धम्माचा जलाशय. त्यांची इच्छा अशी होती की, पापाच्या कलंकांनी जो भ्रष्ट झाला असेल तर त्या जलाशयात स्नान केल्याने त्याची पापे धुऊन जातील आणि जर कोणी सद्धर्माचे स्नान न करताच पूर्वीप्रमाणे कलंकित अवस्थेत मागे फिरला तर त्याबद्दल तोच दोषी आहे, धम्म नव्हे. धम्माने होणारे हित हे फक्त निवडक लोकांपुरतेच मर्यादित करावे असे बुद्धांना कधी वाटलेच नाही. धम्म पडताळून पाहावा यासाठी तो सर्वांना खुला असावा अशी त्यांची इच्छा असे.

## वर्तमानात जगा

कुरू राज्यातील कामसाधम्मा या राजधानीत तीनशेपेक्षा अधिक भिक्खू जमले होते. तेथे ध्यानाचा अभ्यास कसा करावा असे अनेक उपासक विचारत असता बुद्धांनी सांगितले, ''मनाची जागृतावस्था महत्त्वाची असते. शरीर आणि मनाची संतुलित अवस्था ध्यानासाठी

आवश्यक असते. त्यानंतरच दुःखावर मात करता येते. पश्चातापाचा अग्नी शांत होतो. कष्ट, खिन्नता, दूर होते व उच्चप्रतीच्या ज्ञानाचा लाभ होतो आणि अंती निर्वाणाचा लाभ होतो.

आनंद आणि सारिपुत्तने साऱ्या भिक्खूंना बुद्धांच्या प्रवचनापूर्वी व नंतर पुनःपुन्हा सांगितले की या प्रवचनाचा अभ्यास करा, स्मृतीत ठेवा नि ते आचरणात आणा. त्यांच्या प्रवचनात 'सती' हा शब्दप्रयोग होता. त्याचा अर्थ तुमच्या अवतीभवती घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीविषयी जागृत राहा. शरीर, भावना, विचार, मनाचे विषयांविषयी सजग बना.

प्रथम शरीराकडे लक्ष द्या. श्वासप्रच्छ्वासाकडे ध्यान द्या. शरीराच्या हालचाली - चालणे, उभे राहणे, पडून राहणे आणि बसणे, शरीर पुढे नेणे, मागे आणणे,पाहणे,वस्त्र परिधान करणे, खाणे, पिणे, शौचालय वापरणे, बोलणे, कपडे धुणे, स्नान करणे; शरीर अवयव-केस, दात, हाडे, शरीरातील अवयव, अस्थी, आतडी, लाळ, घाम आणि शरीर ज्या पंचमहाभूतांपासून बनते ते जल, वायू, अग्नी, प्रकाश आणि शरीर मृतवत बनते त्यापासून ते पंचमहाभूतांशी एकरूप होते. तोपर्यंतचा विचार करणे गरजेचे ठरते.

शरीराचे निरीक्षण करताना, शरीराच्या प्रत्येक हालचालीविषयी उपासकाने जागृत व्हावे. उदा. जेव्हा तो श्वास आत घेतो तेव्हा त्याला माहीत असते की तो श्वास आत घेत आहे. त्यावेळी सर्व शरीर शांत व निश्चल असते. त्याचीही जाणीव या उपासकाला राहते.

चालताना आपण चालत आहोत याचे भान उपासकाला असते. बसताना-बसत आहोत याची जाणीव राहते. अंगावर वस्त्र घालताना किंवा पाणी पिताना त्या क्रियेविषयीही तो जागृत असतो. ही 'शरीरजाणीव' फक्त विशिष्ट क्रियेपुरतीच नसून दिवसभर राहते. मग तो कपडे धूत असो, चालत असो, भिक्षापात्र साफ करीत असो किंवा भिक्षा मागीत असो. भावनेवर चिंतन करताना उपासक त्या भावना निर्माण होताना, वाढताना, आणि लयास जाताना पाहतो. त्या सुखकारक वा दुःखकारक वा तटस्थ हे समजून घेतो.

भावना एक तर शरीराच्या माध्यमातून प्रकट होतील किंवा मनाच्या माध्यमातून प्रकट होतील. दातदुखी सुरू झाली तर ती वेदना दातातून निर्माण झाली हे त्याला समजते. जेव्हा कोणी त्याची स्तुती करतात तेव्हा त्याला बरे वाटते. त्यावेळी स्तुतीमुळे तो आनंदी बनला हा कार्यकारण भाव त्याला समजलेला असतो. उपासक त्या भावनांना शांत करतो. त्यानंतरच त्या कोठून उगम पावल्या हे त्याला समजते. ध्यानाला बसल्यामुळेच भावनांचे चिंतन होते असे नाही, ते दिवसभर चाललेले असते.

मनाच्या चिंतन प्रक्रियेत मनाच्या अवस्थांचा विचार केला जातो. त्याची आस, क्रोध,



एकाग्रता, उन्मुखता, ज्ञान लाभणे या गोष्टी भावात्मक वा नकारात्मक स्वरूपात समजत असतात. वर्तमान काळात, या क्षणी कोणती मनःस्थिती आहे हे उपासकाला समजत असते.

या त्याच्या ध्यानावस्थेमध्ये पाच अडथळे असतात.

१) शरीर वासना, २) वाईट भावना, ३) आळस, ४) उद्विग्नता,

५) संशय.

## विशाखाचा शोक

बुद्ध श्रावस्तीमध्ये पूर्वारामध्ये विहार करीत होते. त्या काळात विशाखामातेची एक नात मरण पावली. ती इतकी शोकाकूल झाली की, वर्षा चालू असतानाच मध्यरात्री आक्रोश करीत विहारात आली.

बुद्ध झोपले होते. मध्यरात्री आनंदने त्यांना विशाखा भेटायचा आग्रह करीत आहे असे सांगितले. त्यांनी पाहिले. ती पूर्ण भिजलेली होती. तिने त्यांना वंदन केले. ती एका बाजूला बसली.

त्यांनी विचारले, ''विशाखे! तू भिजलेले केस, भिजलेली वस्त्रे अशा उद्विग्न मनःस्थितीत आणि मध्यरात्री कोठून आलीस? तुझ्यावर कोणते संकट कोसळले आहे?''

यावर ती म्हणाली, ''भंते! माझी प्रिय नात मरण पावली आहे.'' त्यांनी विचारले, ''विशाखा तुला किती पुत्र, पौत्र हवेत? श्रावस्तीत जितके लोक आहेत तेवढे हवेत का?''

विशाखा म्हणाली, ''होय भंते! श्रावस्तीत जेवढे लोक आहेत तेवढे पुत्र-पौत्र हवेत असे वाटते.''

''विशाखे! श्रावस्तीत दररोज किती लोक मृत्यू पावतात?''

''भंते! काही वेळा १०, काही दिवशी ९, ८, ७, ६, ५, ४, २. श्रावस्तीत माणूस मेल्याशिवाय एकही दिवस जात नाही.''

''तर विशाखे! तू असे समजतीस का की बिना भिजलेले केस, बिना भिजलेली वस्त्रे अशी तू कायमच राहू शकशील?''

''नाही भंते! माझे जेवढे पुत्र-पौत्र आहेत तेवढेच बस!''

''म्हणून विशाखे ! ज्यांचे शंभर 'प्रिय' असतात त्यांची शंभर दुःखे असतात. ज्यांचे ९० त्यांना ९० दुःखे,... ज्यांचा एक प्रिय त्यांना एकच दुःख. ज्यांना कोणीच प्रिय नाही त्यांना दुःखच नाही. तो शोकरहित, त्रासरहित जिवन जगतो.''

यावर स्पष्टीकरण करताना त्यांनी भिक्खूनांही सांगितले, ''विशाखेप्रमाणे लोकांना जीवनात नाना प्रकारची दुःखे भोगावी लागतात. त्याला कारण 'प्रिय'! प्रिय वस्तू नसल्यामुळे दुःख वाट्याला येत नाही. म्हणून ज्यांना 'अशोक' बनायचे यांनी लोकात काहीही प्रिय बनवू नये.' याचा अर्थ शत्रू निर्माण करावेत असे नव्हे. आसक्ती विरहित जगावे.

## वृद्धत्व

बुद्धांनी आता वयाची सत्तरी ओलांडली होती. ध्यानानंतर ते संध्याकाळच्या वेळेला सूर्यकिरणे पाठीवर घेऊन बसले होते तोपर्यंत आनंद तेथे आला. तो प्रेमाने त्यांची पाठ रगडत म्हणाला,

''भंते! आज खूप वर्षांनंतर पाहतो की पूर्वीप्रमाणे तुमच्या त्वचेचा रंग उज्ज्वल राहिलेला नाही. गात्रे शिथिल झालीत, त्वचा सुरकुतलेली आहे. शरीर पुढे वाकलेले आहे. शरीर इंद्रियात आजारपण दिसू लागले आहेत, डोळे कमजोर झालेत, कानांनी कमी ऐकू येते, जेवण कमी घेत आहात.''

बुद्धांनी होकार दिला. ''होय आनंद यालाच वार्धक्य म्हणतात. तारुण्यात वृद्धत्व लपलेले असते. आरोग्यात व्याधिधर्म लपलेला असतो, तर जीवनात मरणधर्म लपलेला असतो. माणसाला बेढब, दुर्बल बनवणाऱ्या वृद्धत्वाचा स्वीकार करावा लागतो. कोणी शंभर वर्षे का जगेना. शेवटी सारे मृत्युपरायण आहेत. मृत्यू कोणाला सोडत नाही. प्रत्येकाचे मर्दन करतोच!''

कोसल राजा प्रसेनजित आणि मगध राजा अजातशत्रू 'काशी' गावावरून युद्ध करीत. अजातशत्रूने आपला पिता बिंबिसारचा वध केला. काही दिवसांत त्याची आई वारली. काशी गाव प्रसेनजितच्या वडिलांनी आपल्या कन्येला भेट दिले होते. त्यामुळे हे युद्ध मामा-भाच्यात होते, पण अजातशत्रू हा वाईट संगतीत होता.

राजा प्रसेनजितने दुसऱ्यावेळी अजातशत्रूचा पराभव केला. त्याला पकडले, पण शेवटी तो माझा भाचा आहे; त्याला देहदंड देण्याऐवजी त्याला त्याचे सर्व हत्ती, अश्व, सैन्य काढून घेऊन एकट्याला सोडून द्यावे, त्याप्रमाणे सोडलेही.

इकडे प्रसेनजित भिक्खूंना विचारत विचारत बुद्ध कुटीपर्यंत पोहोचला. त्यावेळी ते कोणाला भेटत नव्हते. प्रसेनजितने दरवाजाची कडी वाजवली. त्यांनी दरवाजा उघडला तर त्याने त्यांच्या पायावर लोटांगण घातले. तोंडाने पायाचे चुंबन घेतले.

त्याला उठवून त्यांनी विचारले, ''महाराज, या नश्वर देहात तुम्ही काय पाहिले म्हणून



परमसुश्रूषा करीत आहात?'' महाराज प्रसेनजित म्हणाले, ''कृतज्ञता! भंते! तुम्ही मला सन्मार्ग दाखवलात. भंते, तुम्ही आजवर बहुजनांच्या सुखाचाच विचार केलात. बहुजनांचे हितच पाहिलेत. कुशल धर्माची जनमानसात प्रतिष्ठापना केलीत. माझी कृतज्ञता या साक्षात परमेश्वराच्या पायावर अर्पण करण्यासाठी ही सेवा करीत आहे.''

## आत्मा नाही

वाराणसी येथे ऋषिपतनात मृगदावात तथागत राहत होते. तेथे भिक्षू जमले. त्यांच्या आग्रहावरून त्यांना उपदेश करताना त्यांनी सांगितले, ''भिक्खू हो! जड शरीर अनात्मा आहे. शरीर जर आत्मा असते तर ते उपद्रवकारक झाले नसते आणि माझे शरीर असे होऊ द्या व याप्रमाणे न होऊ द्या, असे म्हणता आले असते. पण ज्या अर्थी शरीर अनात्मा आहे, त्याअर्थी ते उपद्रवकारक होते. त्याचप्रमाणे ते याप्रमाणे होऊ द्या आणि ह्याप्रमाणे होऊ नये, असे म्हणता येत नाही.''

भिक्खूहो! वेदना अनात्मा आहे. ती जर आत्मा असती तर उपद्रवकारक झाली नसती आणि म्हणता आले असते की माझी वेदना याप्रमाणे व्हावी आणि याप्रमाणे होऊ नये. त्याचप्रमाणे संज्ञा, संस्कार आणि विज्ञान अनात्मा आहेत.

भिक्खूहो! जड शरीर, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान नित्य आहेत की अनित्य आहेत?''

भिक्खू म्हणाले,''भंते! ती अनित्य आहेत.''

त्यांनी सांगितले, ''जे अनित्य आहे ते दुःखकारक आहे. आणि जे दुःखकारक, विपरिणाम पावणारे, ते माझे आहे, ते मी आहे. तो माझा आत्मा आहे असे समजणे योग्य होईल काय? नाही! म्हणून भिक्खूहो, जे काही जड पदार्थ अतीत, अनागत, प्रत्युत्पन्न, आपल्या शरीरातील किंवा शरीराबाहेरचा, स्थूल, सूक्ष्म, हीन, उत्कृष्ट, दूरचा किंवा जवळचा तो सर्व माझा नाही, तो मी नाही, तो माझा आत्मा नाही. असे यथार्थ तथा सम्यक ज्ञानाने जाणावे त्याचप्रमाणे कोणतीही वेदना, कोणतीही संज्ञा, संस्कार, जे काही विज्ञान, अतीत, अनागत, प्रत्युत्पन्न, आपल्या शरीरातील किंवा शरीराबाहेरचे सूक्ष्म, स्थूल, हीन, उत्कृष्ट, दूरचे किंवा जवळचे ते सर्व माझे नव्हे, तो माझा आत्मा नव्हे असे यथार्थ तथा सम्यक ज्ञानाने जाणावे. याप्रमाणे जाणणारा विद्वान आर्यश्रावक जड पदार्थ, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान या पाच स्कंधांविषयी विरक्त होतो. हे स्कंध सदोदित बदलणारे म्हणजे अनित्य, दुःखकारक आहेत म्हणून ते माझे किंवा तो माझा आत्मा असे म्हणणे योग्य होणार नाही.''

जनमानस बहुतकरून अस्तिता आणि नास्तिता या दोन अंतांना जाते. बुद्ध हे दोन्ही अंत सोडून मध्यममार्गाने धर्मोपदेश करतात.

यावरही जर एखादा भिक्खू हट्ट धरून बसला की, शरीर आणि आत्मा एक आहे का भिन्न आहे हे सांगा, तर बुद्ध त्याला समजून सांगत, ''ह्या ऊहापोहात मी पडत नसतो कारण की, त्यामुळे मनुष्य जातीचे कल्याण होणार नाही.''

## भोजन चारिका

आरंभी बुद्ध रात्री जेवीत असत, नंतर ते एक वेळ जेवण घेत. आहार अत्यंत नियमित होता. त्यांनी खाण्यापिण्यात कधी अतिरेक केला नाही. भिक्खूंना ते वारंवार सांगत, ''भिक्खूहो! मी रात्रीचे जेवण सोडले आहे आणि त्यामुळे माझ्या शरीरात व्याधी कमी झाली आहे. जाड्य कमी झाले आहे, अंगी बळ आले आहे आणि चित्ताला स्वास्थ्य मिळत आहे.''

बुद्ध सतत प्रवास करीत असत, म्हणजे शीघ्र चारिका आणि सावकाश चारिका करीत. भिक्खूंना संबोधून ते म्हणाले, ''शीघ्र चारिकेमध्ये पाच दोष आहेत. १) पूर्वी जे धर्मवाक्य ऐकले नसेल ते ऐकू शकत नाही, २) जे ऐकले असेल, त्याचे संशोधन होत नाही, ३) काही गोष्टींचे पूर्ण ज्ञान मिळत नाही, ४) त्याला कधी कधी भयंकर रोग जडतो, ५) त्याला मित्र मिळत नाहीत. त्यामुळे सावकाशचारिका करा. त्यातून ज्ञान प्राप्त करा आणि मध्यम मार्गाने वाटचाल करा.''

ते स्वतः लहान मोठ्या भिक्खू संघाबरोबर प्रवास करीत असत. कशाही प्रकारच्या चीवरांनी संतुष्ट असा, जी भिक्षा मिळेल. तिच्यात ते संतुष्ट असत. राहण्याला मिळालेल्या जागेत संतुष्ट राहत आणि एकांतात राहत व त्याचे गुण वर्णित. कधी कधी भिक्खू, भिक्खूणी, उपासक, उपासिका, राजा, मंत्री इतर संघाचे पुढारी आणि त्यांचे श्रावक यांना भेटत असत.

ते संघात शिस्त ठेवीत असत. रात्री ध्यानसमाधी आटोपून मध्यम यामात सिंहशय्या करीत आणि पहाटेला उठून पुन्हा चक्रमण करण्यात किंवा ध्यानसमाधीत निमग्न राहत. सकाळी त्या गावात किंवा शहरात बहुधा एकटेच भिक्षाटनाला जात. वाटेत किंवा भिक्षाटन करीत असताना प्रसंगानुरूप गृहस्थांना उपदेश करीत. पोटापुरती भिक्षा मिळाल्यावर गावाबाहेर येऊन एखाद्या झाडाखाली किंवा अशाच दुसऱ्या प्रशस्त जागी बसून ते अन्न जेवीत व विहारात येऊन थोडा वेळ विश्रांती घेऊन ध्यानसमाधीत काही काळ घालवीत असत. संध्याकाळच्या वेळी भेटण्यासाठी लोक येत, त्यांच्याशी धार्मिक संवाद साधीत असत.



सोणदंड, कूटदंड या ब्राह्मणांनी मोठ्या ब्राह्मण समुदायासह त्यांची भेट घेऊन धार्मिक चर्चा केली होती. ज्यावेळी गृहस्थ येत नसत, त्यादिवशी बरोबर आलेल्या भिक्खूंना ते धर्मोपदेश करण्यासाठी वेळ देत. पुन्हा एक दोन दिवसांनी प्रवासाला निघत. अशारितीने पूर्वेला भागलपूर, पश्चिमेला कुरूंचे कल्माषदम्य नावाचे शहर, उत्तरेला हिमालय व दक्षिणेला विंध्य या चतुःसीमांच्या दरम्यान आठ महिने भिक्षू संघासह चारिका (प्रवास) करीत त्यांनी उपदेशाला प्रारंभ केला. त्याकाळी भिक्षू वर्षाकाळात एके ठिकाणी राहत नसत. चारी दिशांना हिंडून धर्मोपदेश करीत. इतर संप्रदायांचे श्रमण वर्षाकाळात एकाच ठिकाणी राहत. सामान्यजनांना भिक्खूंचे वर्तन आवडले नाही म्हणून वर्षाकाळात किमान तीन महिने एक ठिकाणी राहावे असा नियम केला. वर्षाकाळात काही गांवात लोक वर्षाकाळासाठी झोपड्या बांधून भिक्खूंच्या राहण्याची व्यवस्था करीत. त्यांच्यासाठी एक निराळी झोपडी असे. तिला सारे गंधकुटी म्हणत.

बुद्ध वैशालीजवळच्या महवनातील कुटागरात एकांतात पंधरा दिवस राहिले होते. सोबत भिक्षा घेऊन येणाऱ्या एका भिक्षूला तेवढी राहण्यास परवानगी दिली होती. त्यानंतर इच्छानंगल वनात राहताना तीन महिने एकांतात राहण्याची इच्छा झाली. त्यांच्याजवळ पिंडपात आणणाऱ्या भिक्षूशिवाय दुसऱ्या कोणाला येण्याची परवानगी नव्हती.

त्या काळात ते आनापानस्मृतिसमाधी करीत होते. आन म्हणजे आश्वास व अपान म्हणजे प्रध्याय. या प्राणायामाच्या अभ्यासानाने ध्यान, धारणा, समाधी असा अनुभव ते पुनःपुन्हा घेत होते. आंतरिक शांती, समाधानात चित्तस्थिरतेत विसावत होते. त्या काळात कधी कंटाळा आला नाही की शरीरस्वास्थ्य बिघडले नाही.

## बलशाली कोण?

एकवेळ आनंदने त्यांना विचारले, ''भंते, पाणी, वायू, अग्नी इत्यादी तत्त्वांत सर्वांत शक्तिशाली तत्त्व कोणते?'' ते म्हणाले, ''आनंद सर्वांत कठीण आणि शक्तिशाली दगड दिसतो. परंतु लोखंडाचा हातोडा त्याचे तुकडे-तुकडे करतो. त्यामुळे लोखंड दगडापेक्षा शक्तिशाली ठरेल.

पण लोहाराच्या आगीच्या भट्टीत लोह वितळते नि लोहार मनाला येईल त्या, हव्या त्या रूपात त्याला आकार देतो; त्यामुळे अग्नी लोखंडापेक्षा शक्तिशाली ठरेल.

पण आग कितीही आक्राळ-विक्राळ रूप दाखवू दे, जल त्याला शांत करते; त्यामुळे दगड, लोखंड, अग्नीपेक्षा जलतत्त्व सामर्थ्यवान ठरते. परंतु पाण्याने भरलेल्या ढगांना वायू कोठल्या कोठे नेऊन सोडतो, त्यामुळे वायुतत्त्व जलतत्त्वापेक्षा अधिक बलवान ठरते.

परंतु हे आनंद! इच्छाशक्ती वाऱ्याच्या दिशेलाही बदलू शकते. त्यामुळे सर्वात शक्तिशाली तत्त्व आहे इच्छाशक्ती, मनोबल! इच्छाशक्तीपेक्षा अधिक बलशाली तत्त्व कोणतेच नाही.''

आनंदला बुद्धांनी एक कथा सांगितली. ती अशी होती, ''विराट नगरात श्रुतकीर्ती नावाचा राजा राज्य करीत होता. तो महापराक्रमी होता. त्याचा एक प्रिय हत्ती होता. त्याचे नाव लौहश्रृंग. राजाचा आवडता हत्ती होता त्यामुळे त्याची खास देखरेख केली जात होती. त्याला खास प्रशिक्षण दिले गेले होते. तो युद्ध कौशल्यात प्रवीण होता. राजाने त्यावर स्वार होऊन अनेक युद्धात नेतृत्व केले होते. प्रत्येक युद्धात राजाला यश प्राप्त झाले होते. शत्रूंची दाणादाण उडवीत तो जणू युद्ध नृत्य करीत असे. राजाला त्याचा मोठा अभिमान वाटे.

कालांतराने हत्ती म्हातारा झाला. हत्ती-शाळेत त्याला आता बांधून ठेवले जाई. राजाचा तो आवडता असल्याने त्याची सर्व प्रकारची देखभाल होत होती. त्याच्या जागी नवा हत्ती आणला गेला. आता तो युद्धात भाग घेऊ लागला. त्यामुळे जुन्याकडे हळूहळू साऱ्यांचेच दुर्लक्ष झाले. एके दिवशी त्याला खूप तहान लागली. तो चित्कारत होता, पण कोणी लक्ष देत नव्हते. तेव्हा त्याने साखळी तोडली नि तो खुल्या, मोकळ्या मैदानात आला. वर निळेभोर आकाश होते. खूप दिवसाने त्याने मुक्त श्वास घेतला.

तहानेने व्याकुळ झाल्याने समोरच्या तलावाकडे त्याने धाव घेतली. तलावाजवळ पोहोचल्यावर त्याला तरुणपणीचा काळ आठवला व तहान विसरून मुक्त जलक्रीडा करीत बसला. थोडा थोडा पुढे जात गेला. आपण चिखलात अडकत चाललो आहोत हे त्याला कळले. घाबरून त्याने पाय उचलायचा प्रयत्न केला तर तो अधिकाधिक रुतत चालला. त्याचे ओरडणे ऐकून सारा गाव तळ्याकाठी जमला. सारे ओरडू लागले, राजाचा हत्ती तलावात बुडायला लागला आहे.

थोड्यावेळात ही वार्ता राजापर्यंत पोहोचली. त्याच्या मंत्रीमंडळात एक हुशार मंत्री होता. त्याने सल्ला दिला 'हे राजन सेनापतिला आदेश द्या. नगारे, शंख दुंदुभी वाजवत भाले, तलवारी खणखणत सेना तलावाच्या दिशेने जाऊ ये..' तो आवाज ऐकून लोकांच्या मनात शौर्य जागे झाले. त्यांच्या धमन्यांतून रक्त जोराने वाहू लागले.

इकडे सारे आयुष्य युद्धात घालवलेल्या हत्तीने कान टवकारले. युद्धज्वर त्याने अनुभवला होता. त्याच्यातही शौर्य जागृत झाले. त्याला वाटले आता युद्ध सुरू होणार आहे. शत्रूवर तुटून पडण्यासाठी त्याने जोराने उसळी मारली नि तो सैन्याच्या दिशेने धावत सुटला. सैन्यात प्रचंड गडबड माजली. मोठ्या प्रयासाने माहुताने या वृद्ध हत्तीला काबूत



आणले.

ही कथा सांगून साऱ्या भिक्खूंना त्यांनी उपदेश केला की, प्रारब्ध नव्हे, भाग्य नव्हे, नियती नव्हे की, पूर्वजन्म-कर्मामुळे व्यक्ती सफल किंवा असफल बनत नाहीत. किंवा प्रचंड साधन सामग्रीमुळे विजय किंवा पराजय प्राप्त होत नाही. फक्त मनोबलच व्यक्तीला यशस्वी किंवा अपयशी बनवते, विजय मिळवून देते किंवा पराजय देते. मनोबल जागे झाल्यावरच तो म्हातारा हत्ती दलदलीतून बाहेर येऊ शकला व पुन्हा त्याला नवजीवन प्राप्त झाले.''

## कोण श्रेष्ठ?

श्रावस्तीमध्ये अनाथपिंडकच्या जेतवनात विहार करीत असतानाची ही गोष्ट आहे.

त्यावेळी वेगवेगळ्या देशांतील पाचशे ब्राह्मण श्रावस्तीत उतरले होते. त्यांच्या एका सभेत अशी चर्चा झाली की, श्रमण गौतम हा चातुर्वर्ण्य व्यवस्था मानीत नाही. तो सर्व वर्ण समान आहेत; कोणी श्रेष्ठ, कनिष्ठ नाहीत असा उपदेश करतो. त्याच्याशी कोणी वादविवाद करण्यास तयार आहे का? त्यावेळी श्रावस्तीत 'आश्वलायन' नावाचा निघंटुकल्प, अक्षर शिक्षासहित तीनही वेद, इतिहास या विषयांत पारंगत, कवी, वैयाकरण, चार्वाक दर्शन या शास्त्रात प्रवीण, मुंडन केलेला असा तरुण राहत होता.

तेव्हा ते प्रमुख ब्राह्मण त्याच्याकडे गेले. त्याला म्हणाले, ''आश्वलायन माणवक! हा श्रमण गौतम चातुर्वर्णी शुद्धीचा उपदेश करतो. तुम्ही त्यांच्याकडे जा आणि त्यांच्या मताचे खंडन करा.''

आश्वलायन त्यांना म्हणाला, ''श्रमण गौतम धर्मवादी आहे. त्यांच्याशी चर्चा करणे कठीण असते. मी या विषयावर त्यांच्याशी वाद-विवाद करू शकत नाही.''

त्या ब्राह्मणांनी पुनःपुन्हा विनंती केल्यामुळे, नाइलाजाने तो तयार झाला. अनेक विद्वान ब्राह्मणांचा समूह घेऊन तो बुद्धांच्याकडे आला. त्यांची खुशाली विचारून मग त्यांना प्रश्न केला, ''हे गौतम! ब्राह्मण असे म्हणतात की, ब्राह्मण हाच सर्वश्रेष्ठ वर्ण आहे, बाकीचे छोटे आहेत. ब्राह्मणच गौरवर्णीय आहेत, दुसरे कृष्णवर्णीय आहेत, ब्राह्मणच शुद्ध असतात, अब्राह्मण नसतात. ब्रह्माचे औरस पुत्र म्हणजे ब्राह्मण. ब्रह्माच्या मुखापासून उत्पन्न झालेले, ब्रह्मज, ब्रह्मनिर्मित, ब्रह्माचे अधिकारी होत. गौतम, याविषयी तुमचे मत काय?''

ते उत्तरले, ''परंतु आश्वलायन! ब्राह्मणांची पत्नी, ब्राह्मणी ऋतुमति होतात, गर्भिणी, जन्म देणारी, पालनपोषण करणारी, पाजणारी असते असे दिसते. ब्राह्मणपुत्र योनी मार्गे जन्मतो. तरीपण ब्राह्मणच सर्वश्रेष्ठ समजता?''

आश्वलायन म्हणाला, ''तुम्ही तसे मानीत असाल, पण ब्राह्मणच श्रेष्ठ आहे असे सर्व ब्राह्मण समजतात, सांगतात.'' बुद्ध म्हणाले, ''आश्वलायन तुम्हालाही माहीत आहे की, ग्रीस किंवा ताजिकिस्तानमध्ये दोनच वर्ण अस्तित्वात आहेत. एक आर्य (स्वतंत्र) आणि दास (गुलाम). आर्य दास बनू शकतो तर दास आर्यही बनू शकतो.'

आश्वलायनने कबूल केले की, त्या देशात ती प्रथा आहे.

ते म्हणाले, ''मग ब्राह्मणांनी स्वतःला श्रेष्ठ वर्णाचे समजण्यात काय अर्थ आहे?''

तो म्हणाला, ''तरीही ब्राह्मण पूर्वापार श्रेष्ठच मानतात.''

बुद्धांनी त्याला विचारले, ''मग आश्वलायन मला सांग की, जो कोणी, चोर, खोटे बोलणारा, चुगलीखोर, कटुभाषी, संधिसाधू, प्राणहिंसक, लोभी, द्वेषी, खोटी धारणा बाळगणारा असेल तो मृत्यूनंतर दुर्गतीला जाईल की नाही? तुम्ही मानता तसा नरकात जाईल की नाही? मग तो क्षत्रिय असो, शूद्र असो किंवा ब्राह्मण असो?''

आश्वलायनाने मान्य केले की, तो ब्राह्मण असो वा क्षत्रिय वा शूद्र दुर्गतीलाच जाईल, नरकातच जाईल. चारी वर्ण नरकातच जातील.

''आश्वलायन! मग ब्राह्मणांच्याकडे असे कोणते वेगळे सामर्थ्य आहे की ते सर्वश्रेष्ठ ठरतात?''

या प्रश्नावर त्याचे एकच उत्तर होते, ''तरीही ब्राह्मणच सर्वश्रेष्ठ ठरतात.''

बुद्धांनी पुन्हा विचारले, ''जर ब्राह्मण अहिंसा पाळणारा, चोरी न करणारा, दुराचारी, खोटे, कटुवचनी, ढोंगी नसेल, लोभी नसेल, साधी दृष्टीवाला असेल तर शरीर सोडल्यावर त्याला सुगती प्राप्त होईल, तुमच्या स्वर्गलोकात जाईल मात्र तसेच वागणारे क्षत्रिय वा शूद्र सुगती प्राप्त करणार नाहीत किंवा स्वर्गात जाणार नाहीत का?''

आश्वलायनने मान्य केले, ''चांगल्या वर्तनाचा कोणीही सुगती प्राप्त करेल. स्वर्गातच जाईल.''

-''मग आश्वलायन काय फक्त ब्राह्मणच वैररहित, द्वेषरहित मैत्री, चित्ताची भावना करू शकतो काय? क्षत्रिय वा शूद्र का करू शकत नाहीत?''

-आश्वलायन उत्तरला, ''नाही! गौतम, चारी वर्णांचे लोक चांगल्या भावना बाळगू शकतात.''

''आश्वलायन! तुम्ही असे मानता का की, उटणे घेऊन फक्त ब्राह्मणच नदीवर मंगलस्नान करू शकतो! मळ धुऊ शकतो नि क्षत्रिय नाही?''



आश्वलायन म्हणाले, ''क्षत्रिय देखील उटणे घेऊन नदीला जाऊन मळ धुऊ शकतो, इतकेच नव्हे तर चारी वर्णांचा कोणीही तसे मंगलस्नान करू शकतो.''

बुद्धांनी विचारले, ''आश्वलायन! असे समजा की, येथे क्षत्रिय राजाने नाना जातींचे शंभर पुरुष एकत्र केले आहेत. त्यांना त्याने सांगितले की, विविध वर्णांत जन्मलेल्या लोकांनी, शाल, सरल, चंदन किंवा पद्म या वृक्षापासून बनवलेली उत्तरारणी घेऊन आग निर्माण केली, तेज निर्माण केले. या शंभर लोकांत बारा बलुतेदार जातीचे, चांडाल कुलात जन्मलेलेही लोक होते. त्यांनीही विविध लाकडांच्या उत्तरारणी घेऊन आग निर्माण करावी, तर हे आश्वलायन या दोहोंनी उत्पन्न केलेला अग्नी एकच असतो का वेगवेगळा असतो? तो तेजस्वी व ज्योती निर्माण करतो का? दोघांनीही निर्माण केलेल्या अग्नीमुळे एकच काम होऊ शकते की नाही?''

आश्वलायनने उत्तर दिले, ''हे गौतम! ब्राह्मण वा क्षत्रियाने निर्माण केलेला असो किंवा चांडालाने निर्माण केलेला असो; अग्नी एकच असतो, समान असतो.''

-''आता आश्वलायन! जर क्षत्रिय कुमार आणि ब्राह्मण कन्येपासून पुत्र जन्मला तर तो आई वडिलांप्रमाणे मानव असतो की....?''

-''हो गौतम!''

-''जर ब्राह्मण कुमार व क्षत्रियकन्या यापासून पुत्र झाला तर तो पहिल्या पुत्राप्रमाणे मानव असतो का?''

-''हो गौतम!''

''पण आश्वलायन! जर घोडा आणि गाढव यांचा संकर झाला तर तो बछडा पहिल्या उदाहरणातील मानव पुत्रात मात्र साम्य असते. त्यात भेद राहत नाही. काय घोडा असतो का गाढव?''

''नाही तो खेचर असतो.''

मानवात साम्य आहे, प्राण्यात नाही. ''आश्वलायन! आता सांग, दोन जुळे ब्राह्मण भाऊ आहेत. एक अध्ययन करणारा, गुरूच्या सान्निध्यात राहणारा नि दुसरा अध्ययन न करणारा आहे. यांत तुम्ही श्राद्ध घालता किंवा यज्ञ करता तेव्हा कोणाला प्रथम भोजन द्यावे?''

-''अर्थातच अध्ययन करणाऱ्या, गुरूसान्निध्यात रहाणाऱ्याला.

-अन् अध्ययनवाल्याला भोजन देऊन काही पुण्य मिळणार नाही.''

-''पण समज! अशाच दोन जुळ्या ब्राह्मण भावांपैकी एक अध्ययन करतो, गुरूसान्निध्यात राहतो पण चारित्र्यहीन आहे व जो अध्ययन करीत नाही, पण चारित्र्यसंपन्न आहे तर प्रथम भोजन कोणाला द्यावे? अर्थात! चारित्र्यसंपन्न पण अध्ययन न करणाऱ्याला. पापाचरण करणारा दुराचारी भोजनप्रसाद घेण्याच्या लायकीचा ठरत नाही. शीलवान, कल्याणधर्मी आहे त्यालाच प्रसाद द्यावा.''

बुद्धांनी त्याला आठवण करून दिली, ''आश्वलायन, प्रथम तू जातीचा विचार केलास, नंतर मंत्रावर आणि नंतर चातुर्वर्णी शुद्धीपर पोहोचलास. सर्व जातींमध्ये समानता मान्य केलीस. कोणताही वर्ण श्रेष्ठ, कनिष्ठ नाही. खरे महत्त्व चारित्र्यसंपन्नतेला आहे, हा विचार तुलाही पटला. या व्यतिरिक्त मी काही वेगळे मांडत नाही.''

त्यानंतर आश्वलायन माणवकने मौनच पाळले. अधोमुख, निष्प्रभ, चिंतनात मग्न असा तो बसला. चातुर्वर्ण्य मानणे हा मानसिक दुर्भाव आहे. तो सोडण्याची गरज आहे. आश्वलायनने विनंती केली, ''हे गौतम, आजपासून मला अंजलीबद्ध उपासक म्हणून स्वीकारा.''

## पाहताना फक्त पाहा

श्रावस्तीमधील जेतवनात असताना बाहिय नावाचा वल्कलधारी साधू सप्पारक तीर्थावर राहत होता. लोक त्याचा आदर सत्कार करीत, त्याला मान देत. लोक त्याला सारे काही भेट देत. त्यामुळे त्याला वाटू लागले की जगात जे सिद्ध आहेत, साक्षात्कारी आहेत किंवा त्या वाटेवर आहेत त्यांच्यापैकी मी एक आहे. त्याच्या मनात हा विकल्प आला आहे, हे जाणून त्याच्या कुलदैवताने, जे त्याच्यावर प्रसन्न होते त्याने त्याला सांगितले, ''बाहिय, तू अर्हत नाहीस किंवा तू अर्हत मार्गावर आरूढ झालेला नाहीस. अर्हतपदाच्या किंवा अर्हतमार्गावर आरूढ होण्याच्या मार्गाजवळसुद्धा तू गेलेला नाहीस.''

मग बाहियाने विचारले, ''मग देवामध्ये किंवा मनुष्यामध्ये या जगात असे कोण आहेत, जे अर्हत आहेत किंवा त्या मार्गावर आरूढ झालेले आहेत?''

त्या देवतेने त्याला बुद्धाबद्दल सांगितले व मग बाहिय त्यांच्याकडे आला. त्यावेळी ते भिक्षाटनासाठी शहरात गेले होते.

त्याने त्यांना विनंती केली, ''भंते, मला धर्मोपदेश करा. त्यामुळे मला चिरकाल हितकारक व सुखकर उपदेश लाभेल.'' बुद्धांनी त्याला समजावून सांगितले, ''बाहिय, ही



योग्य वेळ नाही. मी आता भिक्षेसाठी चाललो आहे.''

असे तीनवेळा समजावून सांगितले. पण तो ऐकेना. त्यांनी त्याला सांगितले, ''बाहिय, तुला हे शिकले पाहिजे की, पाहताना फक्त पाहिले पाहिजे. ऐकताना फक्त ऐकले पाहिजे. वास घेणे, चाखणे किंवा स्पर्श करणे या क्रियांच्यावेळी फक्त वास घेतला पाहिजे, चाखले पाहिजे व स्पर्श केला पाहिजे. जाणून घेताना केवळ जाणले पाहिजे. बाहिय, तुला असेच शिकले पाहिजे.''

''बाहिय, जर तू पाहताना केवळ पाहणारा, ऐकताना केवळ ऐकणारा, वास जाणून घेताना केवळ वास जाणणारा, चाखताना केवळ चाखणारा होशील तर तू त्यामध्ये आसक्त राहणार नाही आणि जर त्यामध्ये आसक्त झाला नाहीस, तर तू येथेही नाहीस आणि परलोकातही पडणार नाहीस. हाच दुःखाचा अंत करणे आहे. निर्वाण प्राप्त करणे आहे.''

पुढे या उपदेशाचे पालन करता करता बाहियचे चित्त जगाच्या विषयीच्या आसक्तीतून मुक्त झाले. त्याचप्रकारे चित्त मलापासूनही मुक्त झाले.

काही कालावधीनंतर एका खोंडाने बाहियला धडक मारली व तो जागच्या जागी ठार झाला.

मग भिक्खूंनी त्याच्या देहाला अग्नी देऊन त्याचे स्मारक केले. भिक्खूंनी त्याला कोणती दशा लाभली हे विचारले तेव्हा बुद्धांनी गाथा म्हटली.

जेथे जल, पृथ्वी, अग्नी किंवा वायू थांबत नाही
तेथे ना शुक्र, ना सूर्य प्रकाशत आहे
जेथे चंद्रसुद्धा उगवत नाही, तेथे अंध:कार होत नाही
जेव्हा क्षीणाश्रव भिक्खू स्वतःच स्वतःला ओळखतो
तेव्हा तो रूप अरूप पासून मुक्त होतो
सुखदुःखापासून मुक्त होतो

श्रावस्तीत असताना भिक्खूंना संबोधित करताना बुद्धांनी सांगितले, 'भिक्खूंनो! ज्याप्रमाणे एखादे मळलेले, डागाळलेले वस्त्र असावे, रंगाऱ्याने त्याला घेऊन जाऊन कोणत्याही रंगात बुडवावे; पाहिजे तर निळ्या, पिवळ्या, लाल, किरमिशी रंगात, पण त्याच्यावर चांगला रंग चढणार नाही. ते डागाळलेलेच राहील. कारण काय? वस्त्र मलीन असल्या कारणाने! त्याचप्रमाणे भिक्खूंनो! चित्त मलीन असल्यास सद्गुणांचा त्याच्यावर योग्य तो परिणाम होत नाही त्यामुळे तो दुर्गतीस जातो.

पण जर एखादे स्वच्छ, साफ वस्त्र रंगाऱ्याने रंगात बुडवले तर त्याच्यावर सुंदर रंग चढेल, शुद्ध रंग चढेल. कारण काय? वस्त्र शुद्ध होते म्हणून. त्याचप्रमाणे भिक्खूंनो चित्त निर्मल असल्यास ते सुगतीस जाणारच.

भिक्खूंनो चित्ताचे मल

| | |
|---|---|
| १) अभिध्या = परद्रव्यासक्ती | २) व्यापाद = द्वेष |
| ३) क्रोध | ४) उपानह = वैर |
| ५) म्रक्ष = अनादरबुद्धी | ६) प्रदाहा = स्पर्धा |
| ७) ईषा | ८) मत्सर |
| ९) माया = मायावी असणे | १०) शठता |
| ११) स्तंभ = कठोरता | १२) सारंग = हिंसा |
| १३) मान | १४) अतिमान |
| १५) मद | १६) प्रमाद |

जेव्हा हे मल नष्ट होतात तेव्हा त्याची धम्म व संघावर दृढ श्रद्धा बसते. त्यामुळे त्याला धार्मिक आनंद प्राप्त होतो. आनंदामुळे प्रीती प्राप्त होते. प्रीतीमुळे शांती व शांतीमुळे सुख आणि त्यामुळे चित्ताची समाधी प्राप्त होते.''

## अंतींद्रिय शक्ती

वैशाली नगराच्या बाहेर अवरपूर नावाच्या उद्यानात राहत असताना सकाळच्या पहिल्या प्रहरी सारिपुत्त वैशालीत भिक्षेसाठी गेला होता. भोजनानंतर तो बुद्धांच्याजवळ आला. त्यांना अभिवादन करून बसला व म्हणाला, ''भंते! नुकताच आपला धम्म सोडून गेलेला लिच्छवीपुत्र सुनक्खत वैशालीच्या सभेत असे म्हणत होता की, श्रमण गौतमाजवळ आर्याला शोभेल असे लोकोत्तर ज्ञान नाही, दिव्य शक्ती नाही. श्रमण गौतम केवळ तर्क आणि मीमांसा यांच्याआधारेच धर्मोपदेश करतो आणि म्हणतो की, ज्यांच्यासाठी ह्या धम्माचा उपदेश केला जात आहे. ते धम्मानुसार वागल्याने आपल्या दुःखांचा अंत करू शकतीलही.''

हे ऐकून आयुष्यमान सारिपुत्त दुःखी बनला होता. उद्वीग्नही झाला होता. बुद्धांनी त्याला शांत करीत स्पष्ट केले, ''सारीपुत्त! सुनक्खत मोघ पुरुष (हलक्या वर्तनाचा मनुष्य) क्रोधी आहे. क्रोधानेच त्याने हे शब्द बोलले असले पाहिजेत. सारिपुत्त! निंदा करण्याच्या विचाराने बोलूनसुद्धा सुनक्खतने माझी प्रशंसाच केली आहे. जो कोणी असे म्हणतो की,



ज्याच्यासाठी ह्या धम्माचा उपदेश केला जात आहे ते धम्मानुसार वागल्यास आपल्या दुःखाचा अंत करू शकतील, सारीपुत्त! ही तथागताची प्रशंसाच आहे. पण त्या सुनक्खताला हे कळणार नाही की, तो भगवान अर्हत, सम्यक, सम्बुद्ध (परमज्ञानी) विद्या व आचरणाने संपन्न सुगत (सुंदर गतीला प्राप्त), लोकविद (लोक-परलोकाचे रहस्य जाणणारा) पुरुषांना सन्मार्गावर आणणारा अनुपम सारथी, देव आणि मनुष्यांचा शास्ता, बुद्ध (ज्ञानी) भगवान आहेत.

हे सारिपुत्त! सुनक्खताला हेही कळणार नाही की ह्या प्रकारे मी अनेक प्रकारच्या ऋद्धींचा अनुभव घेतो. एक होऊन अनेक होतो. प्रकट होतो, अंतर्धान पावतो, भिंतीत जाऊन किंवा पर्वतात जाऊन, तसेच न दिसता चालतो. जसे की हवेत उडावे किंवा पाण्यात पोहावे त्याप्रमाणे जमिनीत डुबकी मारतो. जमिनीवर चालावे त्याप्रमाणे पाण्यावर न भिजता चालतो. आकाशात आसन मांडून पक्षाप्रमाणे उडतो. चंद्र सूर्याला हातांनी स्पर्श करतो. ब्रह्मलोकापर्यंत त्याची गती अव्याहत आहे. सारिपुत्त! मोघपुरुष सुनक्खताला हेही कळणार नाही की, मी दिव्य कानांनी देवलोकातील आणि मनुष्य लोकातील दूरचे आणि जवळचे शब्द ऐकतो. सत्त्वाच्या चित्ताला आपल्या चित्ताने पाहून जाणतो. चित्ताचे प्रकारही जाणतो.

सारिपुत्त! तथागत भूत, भविष्य आणि वर्तमानात केलेल्या कर्माचे परिणाम काय होणार ते यथार्थपणे जाणतात. हे सुद्धा दहा बलांपैकी एक तथागत बल आहे. त्याला प्राप्त करुन धर्मचक्र चालवतात.''

## तराफा

भिक्खूंनो! मी तराफ्याच्या साहाय्याने पैलतीरावर जाण्यासाठी तुम्हाला धर्माचा उपदेश करतो. एक मनुष्य प्रवास करताना एखाद्या मोठ्या जलाशयाजवळ यावा, त्याचा अलीकडचा तीर धोक्याचा आणि भीतिदायक असावा आणि पलीकडचा तीर क्षेत्रयुक्त आणि भयरहित असावा. पण तेथे पलीकडे जाण्यासाठी ना होडी असावी, ना पूल असावा. तेव्हा त्याच्या मनात यावे, 'अरेरे! हा मोठा जलाशय आहे, त्याचा अलीकडचा तीर धोक्याचा आणि भीतिदायक आहे. पलीकडचा तीरही चांगला नाही. मग मी तृण काष्टाच्या साहाय्याने तराफा बांधावा व हातांनी आणि पायांनी मेहनत करून, स्वस्थ चित्ताने पलीकडच्या तीरावर का उतरून जाऊ नये? तेव्हा भिक्खूंनो! तो मनुष्य तसा पैलतीराला पोहोचला व त्याच्या मनात असे यावे की, हा तराफा मला फार उपकारी झाला आहे. त्याच्या साहाय्याने मी पैलतीर गाठला तेव्हा ह्या तराफ्याला डोक्यावर घेऊन किंवा खांद्यावर घेऊन जिथे जायचे आहे तेथे

का जाऊ नये? तर तुम्हाला काय वाटते भिक्खूंनो, काय असे करणारा तो मनुष्य त्या तराफ्याच्या बाबतीत जे करायला पाहिजे ते करतो काय?''

सारे भिक्खू म्हणाले, ''नाही भंते!''

''मग त्याने काय करायला हवे? त्या तराफ्याला त्या जागेवर ठेवून किंवा पाण्यावर सोडून त्याला जिथे जायचे आहे तिथे जावे''

त्याचप्रमाणे भिक्खूंनो! मी तराफ्याप्रमाणे पैलतीरावर जाण्यासाठी तुम्हाला धम्माचा उपदेश केला आहे, त्याला पकडून ठेवण्यासाठी नाही. धम्माला तराफ्याप्रमाणे उपदेशिलेले आहे हे जाणून तुम्ही धम्माला पण सोडून द्यावे, अधम्माची तर वाटच सोडा.

अडाणी माणूस रूपाला, वेदनेला, संज्ञेला, संस्काराला, विज्ञानाला, विचारांना हे माझे आहे, हे मी आहे, हा माझा आत्मा आहे अशाप्रकारे समजतो. पण जो ही सहा दृष्टिस्थाने आहेत ती माझी नव्हेत, असे समजतो तोच अजय होतो.''

## <u>राहुलोवाद - राहुलला धम्मोपदेश</u>

राजगृहाच्या वेळुवनातील कलदंकनिवापात बुद्ध होते नि आयुष्यमान राहुल अम्बलट्ठिकामध्ये विहार करीत होता. संध्याकाळी ध्यानातून उठून ते राहुलकडे गेले. दुरूनच येताना पाहून त्याने आसन पसरले. पाय धुण्यासाठी पाणी ठेवले. अभिवादन करून तो बाजूला बसला.

बोलता बोलता त्याला पात्रातील फेकलेले पाणी, शिल्लक पाणी आणि जाणून बुजून खोटे बोलणे त्याबाबत लाज वाटणे, न वाटणे याविषयी समजावून सांगितले. राजाचा युद्धात विश्वसनीय हत्ती कसा वागतो त्याचे उदाहरण देऊन सांगितले की राहुल! थट्टामस्करीतसुद्धा खोटे बोलणार नाही असा निश्चय केला पाहिजे. प्रश्नोत्तरातून समजावून सांगताना त्याला विचारले ''आरसा कोणत्या कामाचा असतो. असे तुला वाटते?''

''भंते! आपले प्रतिबिंब पाहण्यासाठी.''

बुद्धांनी सांगितले, ''त्याप्रमाणे राहुल शरीर, शरीर प्रक्रियाचे खरे स्वरूप पाहून, जाणीवपूर्वक काम करायला हवे. वाणीचे, मनाचे खरे स्वरूप जाणून काम केले पाहिजे, बोलले पाहिजे, विचार केला पाहिजे.''

शरीराने जे काम करशील त्याच्या परिणामाचा विचार करावा. त्याचा परिणाम स्वतःसाठी वा इतरांसाठी पीडादायक होणार तर नाही ना याचा विचार करायला हवा. एखाद्या



वाईट कामाचा परिपाक दुःखात होईल का याचे निरीक्षण करावे. तसे अकुशल कर्म कधी करू नये.

जे शरीर कर्म स्वतःसाठी वा दुसऱ्यासाठी पीडादायक होणार नाही ते करावे. वारंवार करावे. शरीर कर्म केल्यानंतरही निरीक्षण करावे. दुःखाचा हेतू त्यामागे आहे का हे तपासावे.

जर अकुशल, वाईट कर्म घडले तर अशा प्रकारचे शरीर कर्म केल्याची कबुली शास्त्याजवळ किंवा विद्वान गुरुबंधूजवळ येऊन सांगितली पाहिजे. मन खोलले पाहिजे, उघडे केले पाहिजे. त्यापुढे संयम बाळगला पाहिजे. तू दिवस-रात्र कुशल कार्य, कुशल गोष्टी करण्याचा निश्चय करणारा हो; त्यामुळे तू प्रीती - प्रमोदाने विहार करशील. हीच गोष्ट वाणीने कर्म करताना, मनाने विचार करताना कर म्हणजे तू प्रीती प्रमोदाने सुखी बनशील.

राहुल, आतापर्यंत ज्या कोणी श्रमणांनी किंवा ब्राह्मणांनी भूतकाळामध्ये शरीर, वाचा, मन याने विशुद्ध कर्म केले आहे, त्या सर्वांनी अशा प्रकारे निरीक्षण करूनच विशुद्ध कर्म केले आणि काया, वाचा, मनाने भविष्यकाळात जे विशुद्ध कर्म करतील तेही आरशाप्रमाणे निरीक्षण करूनच करतील.''

हे विचार, धर्मोपदेश ऐकून राहुल खूपच संतुष्ट झाला. ''भंते ! आज तुमच्या वारसाला तुमच्या अनमोल संपत्तीचा वारसा मिळाला,'' असे म्हणून तो नतमस्तक झाला.

सकाळच्या पहिल्या प्रहरी श्रावस्तीत पिंडपातासाठी बुद्ध गेले होते. आयुष्यमान राहुलसुद्धा मागोमाग येत होता. मागे वळून पाहून त्यांनी त्याला संबोधित केले,

''राहुल, भूत-भविष्यातले, वर्तमानातले जे रूप आहे. मग ते शरीराच्या आतले किंवा बाहेरचे, महान किंवा सूक्ष्म, चांगले किंवा वाईट, दूरचे किंवा जवळचे ते ते सारे रूप म्हणजे माझा आत्मा नाही किंवा ते रूप माझे खरे स्वरूप नव्हे असे यथार्थपणे जाणले पाहिजे.''

जी गोष्ट रूपाची, तीच वेदनेची, संज्ञेची, संस्काराची आणि विज्ञानाचीही.

एवढा धर्मोपदेश, ज्ञानयोग ऐकल्यावर राहुलने भिक्षा मागण्यासाठी नगरात जाण्याचा विचार सोडून दिला, तो म्हणाला, ''तथागत, मी वृक्षाच्या खाली आसन मांडून, शरीर सरळ करुन, स्मृती जागृत करुन तुम्ही शिकवल्याप्रमाणे धारणा करतो.''

बुद्धांनी त्याला सुचवले, ''राहुल ! आनापानसती भावनेचे ध्यान कर. आनापानसती भावना करणे महाफलदायक असते. त्याला योगात मोठे महत्त्व आहे. त्याप्रमाणे राहुल सायंकाळपर्यंत ध्यानात बसला. त्यातून उठल्यावर बुद्धांच्याजवळ येऊन त्याने विचारले,

''भंते, कोणत्या प्रकारची भावना केल्याने, वाढवल्याने आनापानसती भावनेचे ध्यान होते ?''

''राहुल ! जे काही शरीरात, प्रतिशरीरात कर्कश, खरखरणारे आहे. उदा. केस, लोम, नख, दात, कातडी, मांस, स्नायू, हाडे, अस्थिमज्जा, हृदय, यकृत, क्लोमक, प्लीहा, फुफ्फुस, आतडी, लहान आतडी, पोटातील मळ आणि आणखी काही त्या साऱ्यांना पृथ्वीधातु असे म्हणतात. तो शरीरातील व बाह्य भागातील पृथ्वीधातूच आहे. त्याला हा माझा नाही, हा मी नाही, हा माझा आत्मा नाही, अशाप्रकारे यथार्थ जाणून पाहिले पाहिजे. त्यानंतर भिक्खू पृथ्वी धातूपासून उदास होतो. चित्ताला विरक्त करीत असतो.

त्याचप्रमाणे शरीरातून वाहणारे जल, पित्त, कफ, पू, घाम, चरबी, अश्रू, लाळ, नाकातील शेंबूड, मूत्र व आणखी त्याला आपधातू (जलधातू) म्हणतात. वरीलप्रमाणे धारणा केल्याने त्यापासून विरक्त होता येते.

तेजधातू - आध्यात्मिक तेज, शरीर तेज, अन्न पाण्यापासून शरीरात उर्जा निर्माण होते, त्यापासूनही विरक्त व्हावे.

वायूधातू - शरीरात गतिमान वायूसारखे आहे. त्यापासून उत्पन्न झालेले आहे. उदा. उर्ध्वगामी वायू, अधोगामी वायू, पोटातील वायू, श्वासोच्छ्वास करताना शरीराच्या निरनिराळ्या अवयवातून जाणारा वायू, त्यापासूनही चित्ताला विरक्त करावे.

आकाश धातू - तो आध्यात्मिक आहे नि बाहेरचाही. शरीरात, प्रतिशरीरात आकाश आणि आकाशाविषयक आहे. उदा. कर्णछिद्र, नासिकछिद्र, मुखद्वार, ज्याच्यातून अन्नपाणी घेणे, आस्वाद घेणे आणि जेथे खाल्ले - प्यालेले खालच्या भागातून निघून जाते, त्या आकाशधातूपासूनही चित्ताला विरक्त करावे.

त्यामुळे राहुल पृथ्वीप्रमाणे भावना असलेले ध्यान कर. पृथ्वीत अपवित्र, वस्तू, मलमूत्र, कफ, रक्त सारे फेकतात. पण पृथ्वी दुःखी होत नाही. कष्टी होत नाही. घृणा करीत नाही. त्याचप्रमाणे राहुल तू पृथ्वीसारखी भावना असलेले ध्यान कर. त्यामुळे तुझ्या चित्ताला चांगले-वाईट होणारे स्पर्श चित्ताला चारही बाजूंनी पकडून राहणार नाहीत.

जल (आप) प्रमाणे भावना असलेले ध्यान कर. पाण्यात स्वच्छ-अस्वच्छ दोन्हीही धुतात. पण पाणी दुःखी होत नाही. तेज, वायू, आकाश याप्रमाणे भावना असलेले ध्यान कर. मैत्री, करुणा, मुदिना (दुसऱ्याला सुखी पाहून आनंदी होणे) उपेक्षा, अशुभ (सर्व भाग वाईट आहेत) अनित्य या भावना स्थिर कर.''

□□□



# अंतःस्फूर्त उत्तरे

राजगृहातील वेळूवनात कलंदक निब्बाणात बुद्ध विहार करतानाची ही गोष्ट. निगंठ नातपुत्तांचा त्या भागात चांगलाच बोलबाला होता. त्यांच्या पंथाचे अनेक अनुयायी होते. एकदा अभय राजकुमार त्यांना भेटायला गेला. तेव्हा निगंठ नातपुत्त त्याला म्हणाले, ''हे राजकुमार! श्रमण गौतमाबरोबर तू शास्त्रार्थ कर. त्यामुळे तुझी कीर्ती पसरेल की, अभय राजकुमाराने एवढ्या महाऋद्धिक महानुभाव श्रमण गौतमांच्याबरोबर वाद केला, शास्त्रार्थ केला.''

यावर राजकुमारने कोणत्याप्रकारे शास्त्रार्थ करावा? असा प्रश्न केला.

निगंठ नातपुत्तने त्याला सांगितले, ''तू जेथे श्रमण गौतम आहेत तेथे जा. जाऊन असे म्हण-काय भंते! तथागत असे शब्द बोलू शकतात काय की जे दुसऱ्यांना अप्रिय, अमान्य आहेत? जर असे विचारल्यावर श्रमण गौतम होय म्हणाले तर विचार भंते! अज्ञ संसारी माणसे आणि तथागत यांच्यात काय फरक राहिला? कारण तेही तशी भाषा बोलतात. यावर श्रमण गौतम म्हणाले की, बोलू शकत नाहीत. तर तू त्यांना म्हण की, आपण देवदत्ताबद्दल अशी भविष्यवाणी का केली की देवदत्त दुर्गतीत जाईल, देवदत्त नरकात जाईल. कल्पभर नरकात राहील. देवदत्ताच्या बाबतीत इलाज नाही. राजकुमार अशा तऱ्हेने दोन बाजू असलेला प्रश्न विचारल्यावर श्रमण गौतम अडचणीत येईल. ज्याप्रमाणे एखाद्या माणसाच्या गळ्यात लोखंडाचा आकडा अडकला असता तो गिळूही शकत नाही आणि काढूही शकत नाही त्याचप्रमाणे.''

अभय राजकुमार त्याप्रमाणे बुद्धांच्याकडे आला. पण त्याने शास्त्रार्थ करण्याऐवजी त्यांना व चार भिक्खूंना दुसऱ्या दिवशीचे भोजनाचे निमंत्रण दिले. भोजनानंतर अभय राजकुमाराने निगंठ नातपुत्तने पढवले तसे प्रश्न विचारले,

''काय भंते! तथागत अशी भाषा बोलू शकतात काय की जी दुसऱ्यांना अप्रिय आहे, अमान्य आहे?''

ते उत्तरले, ''राजकुमार! हे एकांशाने (अपवाद न सांगता) सांगता येणार नाही.''

या एकाच उत्तराने राजकुमार उद्गारला, ''भंते! निगंठाचा नाश झाला.''

''असे तू का बोललास?'' असा त्यांनी प्रश्न विचारल्यावर मागची पार्श्वभूमी राजकुमारने विषद केली.

त्या चर्चेच्यावेळी राजकुमारच्या मांडीवर अगदी लहान मुलगा बसला होता. त्याच्याकडे पाहून बुद्धांनी त्याला विचारले, ''तुझ्या किंवा दाईच्या चुकीमुळे जर ह्या मुलाने आपल्या तोंडात एखादा लाकडाचा किंवा दगडाचा तुकडा घातला तर तू काय करशील?''

-''भंते! काढून टाकेन! सहज नाही निघाला तर डाव्या हाताने डोके खाली करून उजव्या हाताचे बोट तोंडात घालून तो तुकडा काढेन. रक्त आले तरी काढेन.''

-''कारण काय राजकुमार?''

-''कारण मुलावर माझे प्रेम आहे.''

-''त्याचप्रमाणे राजकुमार! जे सत्य नाही, वस्तुस्थितीला धरून नाही, जे निरर्थक आहे, ते बोलत नाही. पण जे सत्य आहे व दुसऱ्याला प्रिय आहे ते बोलतो. कारण राजकुमार! माझे प्राणिमात्रावर प्रेम आहे, अनुकंपा आहे.''

राजकुमारने दुसरा प्रश्न केला, ''कोणी काही विचारतील हे गृहीत धरून, मनात उत्तर तयार ठेवून बोलता काय?''

राजकुमार हा रथाच्या अंगप्रत्यंगामध्ये चतुर होता. त्याला बुद्धांनी विचारले की, रथाच्या एखाद्या अंगाबाबत कोणी विचारेल, म्हणून त्याचे उत्तर तू अगोदरच तयार करतोस काय?

''नाही, त्याच क्षणी मला ते सुचत असले पाहिजे.''

''त्याचप्रमाणे राजकुमार जेव्हा क्षत्रिय पंडित, ब्राह्मण गृहस्थी पंडित, श्रमण पंडित प्रश्न विचारतात, त्याचक्षणी उत्तर सुचते कारण धर्मधातू (मनाचे विषय) चांगल्या रितीने प्रश्नाचे मर्म जाणतात; त्यामुळे त्याचक्षणी अंतस्फूर्तरित्या उत्तर सुचते.''

यावर अभय राजकुमार बोलला, ''आश्चर्य! भंते! मला शरणागत उपासक म्हणून स्वीकारावे.''

शाक्यांच्या देवदह (देवांची पुष्करणी) नावाच्या बाजारपेठेच्या गावात बुद्ध विहार करीत होते. तेथे भिक्खूंना संबोधित करताना त्यांनी सांगितले,

''जेव्हा चित्त परिशुद्ध, समाहित, पापमुक्त, क्लेशमुक्त, मृदू, कार्योपयोगी, स्थिर आणि समाधियुक्त झाल्यावर प्राण्यांच्या मृत्यूच्या आणि उत्पत्तीच्या ज्ञानासाठी तो चित्ताला वळवितो, तेव्हा तो अतिमानवी, विशुद्ध, दिव्यचक्षूने चांगले-वाईट, सुवर्ण-दुर्वर्ण सुगतीला



गेलेल्या, दुर्गतीला गेलेल्या प्राण्यांना मरताना आणि उत्पन्न होताना पाहू लागतो. कर्मानुसार फळ भोगणाऱ्या प्राण्यांना ओळखू लागतो. जे प्राणी शरीराचे दुराचरण करणारे, वाणीचे दुराचरण करणारे, मनाचे दुराचरण करणारे, अर्हतांची निंदा करणारे, मिथ्या दृष्टी ठेवणारे, मिथ्या दृष्टीने प्रेरित होऊन कर्म करणारे होते, ते शरीर सोडल्यावर, मेल्यावर, दुर्गतीत पडून नरकात गेले आहेत. जे प्राणी शरीराचे सदाचरण करणारे, वाणीचे सदाचरण करणारे आणि मनाचे सदाचरण करणारे, अर्हतांची निंदा न करणारे, सम्यक दृष्टी ठेवणारे, सम्यक दृष्टीने प्रेरित होऊन कर्म करणारे होते, ते शरीर सोडल्यावर, मेल्यानंतर सुगतीला जाऊन स्वर्ग लोकात प्राप्त झाले आहेत. अशाप्रकारे सुद्धा भिक्खूंनो, साधना सफल होत असते तपश्चर्या सफल होत असते.''

## विवाद

शाक्य देशातील सामगामात विहार करताना बुद्धांना सांगण्यात आले की निगंठ नातपुत्त जैन तीर्थंकर वर्धमान महावीर हे पावा येथे समाधिस्त झाले.

काही दिवसानंतर जैन साधू दोन भागांत विभागले जाऊन भांडण, तंटा, विवाद करीत एकमेकांस सुखरूपी शक्तीने छेदीत फिरत असल्याचेही कानावर आले. धर्मविनय कोण जाणतो? कोण सत्यारूढ? कोण मिथ्यारूढ? कोणाचे म्हणणे अर्थपूर्ण? कोण निरर्थक? कोण पहिल्यांदा बोलावयाची गोष्ट नंतर बोलला? कोण अगोदर बोलला? कोण वाद जिंकला? कोण हरला? अशा अनेक बाबतीत जैन संघाची शकले होताना बुद्ध पाहत होते. आनंद आणि चुंद समणुदेस त्यांना भेटण्यास आले.

आनंद त्यांना म्हणाला, ''भंते, मला असे वाटू लागले आहे की, भगवानांच्या नंतर संघातही असा विवाद तर उत्पन्न होणार नाही ना? तो विवाद बहुजनांच्या अहितासाठी, बहुजनांच्या असुखासाठी, बहुजनांच्या अनर्थासाठी, देव व मनुष्याच्या अहित आणि दुःखासाठी कारण होईल.''

बुद्धांनी आनंदला प्रश्न केला, ''आनंद, मी साक्षात्कार करून ज्या धर्माचा उपदेश केला, ज्यात १) चार सतिपट्ठान, २) चार सम्यक प्रधान, ३) चार ऋद्धिपाद, ४) पाच इंद्रिये, ५) पाच बल, ६) सत बोध्यंग ७) आर्य अष्टांगिक मार्ग यांचा समावेश आहे. त्याबाबत दोन भिक्खूंच्यात मतभिन्नता दिसते?''

आनंद म्हणाला, ''नाही. परंतु, जी माणसे आज तुमच्या आश्रयाने राहत आहेत ते तुमच्यानंतर जीविकेच्या विषयाबाबत, प्रतिमोक्षाच्या विषयाबाबत विवाद उत्पन्न करू

शकतील. हे विवाद बहुजन आणि देवमनुष्य यांच्यासाठी अनर्थकारक, दुःखकारक ठरतील.''

''आनंद हा जो जीविकेच्या विषयाबाबत किंवा प्रतिमोक्षाबाबतचा विवाद आहे तो क्षुल्लक आहे. मार्ग किंवा प्रतिपदाच्या विषयाबाबत जर संघात विचार उत्पन्न झाला तर तो बहुजनांच्या दुःखाचे कारण ठरेल. आनंद, जो भिक्खू क्रोधी व पाखंडी असतो त्याला गुरूबद्दल, धर्माबद्दल, संघाबद्दल, गुरूबाबत अभिमान, आदर वाटत नाही.' तो भिक्खूनियमांचे नीट पालन करीत नाही, तोच संघामध्ये विवाद उत्पन्न करणारा असतो. तो वाद बहुजनांच्यासाठी अहितकारक, बहुजनांच्या असुखासाठी होतो. आनंद! जर तू अशा प्रकारच्या विवादमुळाला स्वतात किंवा दुसऱ्यात पाहशील तर आनंद, तर त्या पापी विवादमुळाला नष्ट करण्यासाठी प्रयत्न कर. त्यामुळे त्याची भविष्यात उत्पत्ती होणार नाही.

भांडणे मिटवण्यासाठी सात (अधिकरण शमथ) नियम आहेत ते उपयोगात आणा.

**१) संमुख विनय** : सर्वांनी एकत्र येऊन विचार विनिमय करून भांडण मिटवा.

**२) स्मृती विनय** : स्मरण करायला संधी द्या. कदाचित एखादा भिक्खू म्हणेल, 'आयुष्यमान! मला आठवत नाही की मी गुन्हा केला आहे.'

**३) अमूढ विनय** : मतिभ्रांत वा वेडा वा उन्मत्त झाल्याने आचरण झाल्याची कबुली दिली तरी भांडण मिटेल.

**४) प्रतिज्ञात करण** : आरोप न करताच दोष आठवतो, उघड करतो, स्पष्ट करतो, गुन्हा कबूल करतो. येथून पुढे संयमित राहण्याचे सांगतो.

**५) यद्‌भूयसिक** : ज्या ठिकाणी जास्त भिक्खू आहेत तेथे जाऊन एकत्रित राहावे.

**६) तत्पापीयसिक** : मोठा गुन्हा केल्याची स्मृतीबाबत खोटे बोलणे हा आणखी गंभीर गुन्हा आहे, तो आठवल्याने भांडणे मिटतात.

**७) तिणवत्थारक** : गवताने झाकल्यासारखे निवेदन, कबुली ज्येष्ठ भिक्खूंना करणे.

आनंद! एकीभावासाठी, एकतेसाठी सहा धर्म लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

१) सहकाऱ्याबाबत मैत्री भाव

२) वाचिक कर्म

३) मानसिक कर्म

४) धर्माने लाभणारा धार्मिक भाव सहकाऱ्यांनाही वाटावा.

५) निर्दोष शील आचार. अखंड शीलामध्ये-शीलश्रमण भावयुक्त होऊन सहब्रह्मचाऱ्याबरोबर वावरावा.

६) श्रेष्ठ दृष्टी, निर्वाणाकडे नेणारी त्यानुसार वागावे.''



## उच्चकुलातून आलेले भिक्खू

गौतम बुद्धांकडे साऱ्या जाती, जमातींचे लोक येत नि भिक्खूसागरात विलीन होत. पण काही भिक्खूंच्या मनात संघात दाखल झाल्यावरही जातिभेद राहत असे. त्यामुळे कुलाचा अभिमान सोडायला हवा, यासाठी एकदा भिक्खू समूहाला त्यानी म्हटले तुम्हाला सत्पुरुषांचा धर्म वा असत्पुरुषांचा धर्म याविषयी उपदेश करतो. तो ऐकून मनात चांगल्याप्रकारे धारण करा.

काही भिक्खू विचार करतात 'मी उच्चकुलातून प्रव्रज्जित झालो आहे आणि हे दुसरे भिक्खू नीचकुलातून प्रव्रज्जित झाले आहेत.' यामुळे हा भिक्खू स्वतः गर्व बाळगतो, दुसऱ्यांना कमी लेखतो. भिक्खूंनो हा असत्पुरुषाचा धर्म होय. खरा सत्पुरुष असा विचार करतो की, उच्चकुलीनतेच्या कारणाने लाभ, द्वेष, मोह नष्ट होत नसतो. परंतु जर तो धर्ममार्गावर आरूढ झालेला असेल, ठीक मार्गावर आरूढ झालेला असेल. धर्मानुसार आचरण करणारा असेल तर तो पूज्य आहे, प्रशंसनीय आहे.

प्रसिद्धी, वस्त्र, भोजन, शयनायन, औषध, पथ्य मिळणाऱ्या भिक्खूनेही स्वतःला त्याआधारे श्रेष्ठ मानणे चुकीचे असते. हा चित्तमल नष्ट झाल्यावरच त्याची खरी प्रगती धम्माच्या दिशेने चालू राहते.

सत्पुरुष भिक्खू बहुश्रुत, धर्मकथित, अरण्यात राहणारा, चिंध्या शिवून बनवलेले वस्त्र वापरणारा, भिक्षा मागून खाणारा, झाडाखाली, स्मशानात, कामविषयापासून विरहित असतो आणि तो दुसऱ्यांना कमी लेखत नाही.''

## संयमाचे धडे

काही काही वेळा बऱ्याचशा भिक्खूंना थोडीफार तपस्या केली की वाटू लागायचे की त्यांना निर्वाण प्राप्त झाले. मग तशी घोषणा करून म्हणत की, जन्म संपला, ब्रह्मचर्यवास पूर्ण झाला. जे करायचे होते ते केले गेले. आता येथे करायचे काही बाकी उरले नाही हे आम्ही जाणतो.

अशा घोषणेमुळे इतर भिक्खू गोंधळून जात. त्यांना प्रश्न पडे की, त्यांनी निर्वाण

प्राप्तीची ठीक घोषणा केली आहे का केवळ बढाई मारण्यासाठी निर्वाण लाभ झाल्याचे बोलतात?

अशा भिक्खूंत असे काही भिक्खू होते की ज्यांनी ठीक घोषणा केली आणि त्यात असेही काही होते की ज्यांनी केवळ बढाई मारण्यासाठी घोषणा केली. अशांना धम्माचा उपदेश करण्याची गरज होती.

त्यासाठी काही कसोट्या होत्या. पाच कामगुण जिंकणे १) इष्ट, कांत (कमनीय) मनोज्ञ, प्रिय, कामनायुक्त, रंजनीय, डोळ्यांना दिसणारे रूप, २) कानांना ऐकू येणारे शब्द, ३) नाकाला येणारा गंध, ४) जीभेला जाणवणारा स्वाद, ५) शरीराला होणारा स्पर्श हे पाच कामगुण (विषयभोग) आहेत.

जो भिक्खू सहा शारीरिक आयतनात (डोळे, कान, नाक, जीभ, शरीर त्वचा, मनाचे विषय) संयमी आहे, जो भिक्खू उपाधी (विषय संग्रह) दुःखाचे मूळ आहे हे जाणून त्यापासून मुक्त झाला आहे, तो पुन्हा उपाधीमध्ये शरीर लावेल, चित्त लावेल हे संभवत नाही.

भिक्खूंना संयमाचे धडे देताना बुद्ध सांगत, ‘‘इंद्रियांबाबत संयमी राहा. चक्षुइंद्रियांना काबूत ठेवा. नंतर तू भोजन मात्रेचा विचार कर. मोजकेच, प्रमाणात खा. मस्ती येण्यासाठी नाही, मद येण्यासाठी नाही, शोभेसाठी नाही, सौष्ठवासाठी नाही तर शरीराच्या स्थितीसाठी, जीवनासाठी, रोगांना रोखण्यासाठी, ब्रह्मचर्येच्या साहाय्यतेसाठी जितके आवश्यक तितकेच खा. अशाप्रकारे जुन्या वेदनांचा नाश कर. नवीन वेदना उत्पन्न होऊ देऊ नको. तुझी शरीरयात्रा चालू राहील, निर्दोषणासुद्धा चालू राहील, सुखपूर्वक विहार होईल.

त्यापुढे दिवसा फिरण्यात, बसण्यात किंवा इतर आचरणाच्या गोष्टी करताना चित्ताला परिशुद्ध कर. रात्रीच्या मध्यम यामात पायावर पाय ठेवून स्मृती संप्रजन्याबरोबर उठण्याचा विचार मनात ठेवून उजव्या करवटीवर सिंहशय्या करून झोप. रात्रीच्या अंतिम यामात उठून फिरण्यात, बसण्यात किंवा इतर आचरणाच्या गोष्टी असताना चित्ताला परिशुद्ध कर.

त्यापुढे अवलोकन, विलोकनात जाणीवयुक्त राहा. खाण्यापिण्यात, मलमूत्र विसर्जन करण्यात, जात असता; उभे राहता, झोपताना जागे असता, बोलत असता, गप्प असता जाणून वागा.

मग हे भिक्खू! एकांतात, अरण्यात; वृक्ष छायेच्याखाली पर्वत, कंदर, गिरिगुहा, स्मशान, वनप्रांत, मोकळे मैदान किंवा गवताच्या गंजांवर विहार कर. तू भोजनानंतर आसन मांड, शरीर ताठ करून, स्मृतीला जागृत ठेवून बस. लोकांमध्ये लोभ, द्रोह, द्वेष, शारीरिक आणि मानसिक आळस सोडून सावधरितीने विहार कर. उद्धटपणा, खेद, संदेह सोडून



निःसंकोचपणे कल्याणकारक कृत्ये करीत विहरत जा. चित्ताला शुद्ध कर.

यामुळे चतुर्थ ध्यान प्राप्त होऊन निर्वाणाच्या वाटेवर चालू लागशील.’’

## सारिपुत्त

श्रावस्तीमध्ये असताना बुद्धांना जाणवले की, त्यांच्या धम्म उपदेशामुळे कोणाला चतुर्थ समाधी अवस्था लाभली आहे की नाही? अशा शंका एका भिक्खूने घेतली होती. ती चुकीचीही नव्हती. ते साऱ्यांना सांगत असत,‘‘स्वतः मी सांगितले तरी तुम्ही स्वतंत्र विचाराने त्याचा शोध घ्या. अर्थात सारिपुत्त, मोंगलायन सारखे काही सहकारी यांनी चांगली प्रगती केली होती. ते प्रवासामुळे, वाढत्या वयामुळे थकून जात असत. त्यावेळी जमलेल्या भिक्खू समुदायाला मार्गदर्शन करण्याचे काम या ज्येष्ठ भिक्खूकडे त्यांनी सोपवून पाहिले तेव्हा त्यांनाही समाधान वाटले की या मार्गाने वाटचाल करणाऱ्याला निश्चित दुःखमुक्ती, निब्बाणापर्यंत पोहोचता येते.

बुद्धांनी भिक्खूंना संबोधित केले. सारिपुत्तविषयीच त्यांना बोलले, कारण साऱ्यांनाच प्रज्ञाचक्षुलाभलेला नसतो.

‘‘भिक्खूंनो, सारिपुत्त हा महाप्रज्ञ आहे. शीघ्र प्रगतिप्रज्ञ, तीक्ष्णप्रज्ञ, निर्वेधिकप्रज्ञ आहे. पंधरा दिवस तो अनुपद धम्म विशेषाची विपश्यना करीत असतो. तो कामविकाररहीत बनलेला आहे हे पहिले ध्यान, मग समाधीतून उत्पन्न होणारे प्रीती आणि सुखाने युक्त असे दुसरे ध्यान प्राप्त करून तो विहरत असतो. जागरूकता व सुस्पष्ट आकलन यांनी युक्त होऊन तिसरे ध्यान करतो. त्यानंतर सुखाचा नि दुःखाचा त्याग केल्याने मनाचा उल्हास वा संताप हे अगोदरच अस्त झालेत. त्यामुळे चतुर्थ ध्यानात तो विहार करतो. आकाश, विज्ञान, याहीपलिकडे जाऊ शकतो. ज्या समाधीत संज्ञा व वेदनेचा अभाव असतो त्यात तो विहरतो.

अद्वितीय, अनुपम धर्मचक्राला सारिपुत्त गतिमान करतो.

उपस्थित भिक्खूंना यामुळे सारिपुत्ताची खरी ओळख पटली व बुद्धांच्याप्रमाणेच सारिपुत्तला मार्गदर्शक म्हणून आदर करू लागले. महामोग्गलान, महाकस्सप, महाकल्पायन, महाकोट्टित, महाकप्पिन, महाचंद, अनुरुद्ध, रेवत, आनंद हे सारे उच्चपदाला पोहोचले होते.

आता हे स्थविर नवीन भिक्खूंना शिकवण देत. काही ठिकाणी नवे दहा भिक्खू होते तर काही ठिकाणी चाळीस. ते नवीन भिक्खू एकामागून एक येणाऱ्या साऱ्याच विषयांना समजू शकत नव्हते, म्हणून काही पौर्णिमेच्या रात्री भिक्खूसंघाला बुद्ध स्वतःच संबोधित करीत असत.

आयुष्यमान आनंदने त्यांना विचारले, ''भंते! भिक्खूला अत्यंत कुशल असे केव्हा म्हटले जाते?''

सहा आयतन आहेत - चक्षू = रूप, कान = शब्द, नाक = गंध, जीभ = रस, शरीर = स्पर्श, मन = धर्म (विचार = कल्पना). विशेष विरागाने संस्कार निरोध होतो. त्यामुळे विज्ञान निरोध मग - नामरूप निरोध - त्याने षड्आयतनाचा निरोध होतो. आनंदने विचारले - षड्आयतनाचा निरोध झाल्यावर पुढे भिक्खूला 'प्रतीत्यसमुत्पाद कुशल' केव्हा म्हणावे?''

स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव, जाती निरोध होतो. त्याचा परिणाम जरा-मरण, शोक, परिदेव, दुःख दौर्मनस्य उपाहास यांचा निरोध होतो. अशाप्रकारे या केवळ दुःखपुंजाचा निरोध होतो. एवढ्याने आनंद, भिक्खूला प्रतीत्यसमुत्पाद कुशल म्हटले जाऊ शकते. बुद्ध इस्तिगिली पर्वतावर राहत होते. काही भिक्खू त्यांना भेटायला आले तेव्हा सहज चर्चा निघाली. त्यांना उद्देशून ते बोलले-

''या पर्वताला ऋषिगिरी पर्वत, वैभार पर्वत, पांडव पर्वत असेही म्हणतात. वैपुल्य पर्वत आणि गंधकूट पर्वतही म्हणून हा पर्वत ओळखला जातो.

भिक्खूंनो, प्राचीन काळी या पर्वतात ५०० बुद्ध चिरनिवासी होते. ते या पर्वतात प्रवेश करताना दिसले होते. पण प्रवेश केल्यानंतर दिसले नव्हते. लोक म्हणत हा पर्वत त्या ऋषींना गिळतो. अशाप्रकारे ऋषिगिरी (इस्तिगिली) हे नाव रूढ झाले. त्यातील काही बुद्ध अरिट्ठ बुद्ध होते व तेथले चिरनिवासी होते. त्या ध्यानी नरोत्तमाची नावे -

अरिष्ट, उपारिष्ट, तगरशिखी, यशस्वी, सुदर्शन, प्रियदर्शी. काही बुद्ध भवबंधनमुक्त होते. प्रत्येक बुद्ध ते सगळे सर्वसंगपरित्यागी व निर्वाणप्राप्त महर्षी होते.

## <u>भद्देकत्त सुत्त (भद्द = शुभ, करत्त = कार्य)</u>

बुद्धांनी भिक्खू आयुष्यमान लोभस कंगियसाठी एक गाथा म्हटली, ''भूतकाळात गुंतू नको, भविष्याचे चिंतन नको, भूतकाळ संपला आहे, भविष्य अजून आला नाही. वर्तमानाच्या गोष्टीचे निरीक्षण कर. जे असंहारी स्थिर आहे, ते विद्वान ग्रहण करतो. आजचे कर्तव्य आज कर, उद्याचे मरण कोणास माहीत? मृत्यूपुढे कोणाचा भरोसा नाही.

दिवसरात्र उद्योगी राहा, फिरत राहा, निरलस राहा. शुभकार्य करणारे त्यांना शांतमुनीजन म्हणतात. स्तुती निंदा पलिकडे.''

एकदा ते पाचशे भिक्खूंच्या मोठ्या समुदायासमवेत 'राजग्रह व नालंदा' यांच्या दरम्यान चालत निघाले होते. त्याचप्रमाणे 'सुप्रिय परिव्राजक' आणि त्याचा शिष्य 'ब्रह्मदत्त' बुद्ध



संघाविषयी चर्चा करत निघाले होते. वाटेत, 'अंबलट्ठीका' नावाच्या, एका उद्यानात, त्यांनी मुक्काम केला. जवळपासच, तेही उतरले होते. पहाटे उठून काही भिक्खू याविषयी चर्चा करीत होते ते बुद्धांनी अंतर्ज्ञानाने जाणले. 'अंतर्ज्ञान' ही ज्ञानप्रक्रिया त्यांना नवीन नव्हती. प्राणायामाच्या सखोल अभ्यासानंतर मनाच्या सुप्त शक्ती ह्या प्रत्येकामध्येच प्रकट होतात. त्यात काही विशेष नाही. कोणत्याही बाह्य साधनाव्यतिरिक्त अनेक गोष्टी अशा रितीने समजू शकतात. दिव्य दृष्टी आणि दिव्य श्रवण अनेक तपस्व्यांना लाभतात. त्याचा अर्थ त्यांना 'निब्बाण' प्राप्त झाले असा नव्हे. अनेकजण या अतिंद्रिय शक्तींचे प्रदर्शन मांडून समाजाला प्रभावित करीत असतात. त्यादिवशी ह्या गोष्टी जाणून सभामंडपात ते आले आणि भिक्खूंना म्हणाले, 'भिक्खूहो, माझी, धर्माची अथवा भिक्षूसंघाची, कोणी निंदा केली तर तुम्ही आपणास राग येऊ देऊ नका. वाईट वाटून घेऊ नका. आनंदाने वाहून जाऊ नका, तसे केलेस तर तो मोक्षाच्या मार्गात तुम्हालाच अडथळा ठरेल, पण जे खरे असेल ते खरे आहे असे दाखवून द्यावे.''

## <u>आत्मसुखाचा जिवंत झरा</u>

अनेक ठिकाणी विहार करीत असताना, उपदेश करावा लागे तो स्थलकालानुरूप असायचा. ते त्या त्या प्रसंगास अनुसरून निरनिराळ्या प्रकारचे होते. त्या प्रकारांना सुत्त - गेय - वैयाकरण गाथा - उदान इतिवुत्तक - जातक अब्भूतधम्म व वेदल्ल हे नऊ विभाग होत. ह्यावरून त्यांनी भिक्खू ह्या उपदेशाला 'नवंग सत्थुसासन' असे म्हणत असत.

एके समयी, मी भिक्खूंना संबोधित करताना म्हटले, 'भिक्खूहो आत जिवंत उमाळा, झरा असलेले एखादे तळे असावे त्यास पूर्व - पश्चिम दक्षिण आणि उत्तर ह्यांपैकी कोणत्याही दिशेस, पाणी आत येण्यास मार्ग नसावा - पावसाच्या सरीही वेळोवेळी पडू नयेत, तरीही त्या तळ्यामधून थंड पाण्याची धार निघून तिने ते सर्व तळे पूर्णपणे भरावे - भिजवावे - व्यापून टाकावे व सर्व बाजूंनी काठोकाठ भरावे. त्या तळ्यातील एवढासाही भाग भिजल्याशिवाय राहू नये, त्याप्रमाणे भिक्खूहो खरा तपस्वी आपले शरीर, समाधीपासून प्राप्त होणाऱ्या सुखाने भरतो, भिजवितो, व्यापतो व सर्व बाजूंनी भरून टाकतो. त्याच्या सर्व शरीरात समाधीपासून प्राप्त होणाऱ्या, आत्मसुखाने, प्रीतिसुखाने भरला नाही असा एकही भाग उरत नाही. हे ह्याच आयुष्यात अनुभवण्यासारखे, डोळ्यांनी दिसण्यासारखे, संतोषदायक असे उपासनेचे फल आहे. ज्याप्रमाणे एखाद्या भिक्खूने 'मुंज' नावाच्या गवतातील काडी बाहेर काढावी किंवा 'साप' कातीतून बाहेर यावा किंवा तलवार म्यानातून बाहेर काढावी

तेव्हा त्या भिक्खूला अशी जाणीव व्हावी की, हे मुंज गवतही काडी वेगवेगळे आहेत. मुंज गवत निराळे, आतील काडी निराळी. परंतु ही काडी गवतातूनच बाहेर काढली आहे, ही तलवार हे म्यान वेगवेगळे आहे. परंतु त्या मानातूनच तलवार बाहेर काढली आहे. सर्प निराळा, कात निराळी पण कातीतूनच सर्प बाहेर आला आहे. त्याचप्रमाणे चित्त शांत, शुद्ध, तेजस्वी - निष्पाप, निष्कलंक, मृदू, लवचिक, स्थिर व अक्षोभ्य झालेले असता तो उपासक ते चित्त वळवून 'मनोमय शरीर' निर्माण करण्याकडे लावतो. तो ह्या शरीराहून निराळे रूपी, मनोमन, सर्वांगपरिपूर्ण, सर्व इंद्रियांनी युक्त असे शरीर निर्माण करतो. अशावेळी तो अनेक चमत्कारांचाही अनुभव घेतो.

यानंतरची पायरी म्हणजे, एखादा हुशार कुंभार, मळलेल्या मातीची, त्याच्या इच्छेप्रमाणे, विविध आकारातील भांडी घडवतो. हुशार सोनार तापविलेल्या सोन्यापासून जे जे प्रकार करू इच्छितो - घडवितो, त्याप्रमाणे ज्या उपासकाचे चित्त शांत - शुद्ध - तेजस्वी - निष्पाप - निष्कलंक - मृदू - लवचिक - स्थिर व अक्षोभ्य झाले असता तो ते वळवून, ब्रह्म लोकापर्यंत आपला ताबा बसवितो. तेच चित्त दिव्य क्षेत्राकडे लावले तर तो लांबचे व जवळचे असे दोन्ही प्रकारचे शब्द ऐकतो.

दुसऱ्याच्या हृदयातील विचार तो ओळखू शकतो, दुसरे पुरुष व प्राणी ह्यांची हृदये आपल्या हृदयाने जाणतो. दुसऱ्याचे चित्त रागयुक्त का रागरहित, द्वेषयुक्त का द्वेषरहित, मोहयुक्त व मोहरहित असे चित्ताचे विविध प्रकार तो जाणतो. त्याचप्रमाणे अनेक हेतूंनी व प्रकारांनी युक्त अशा पूर्व जन्माची स्मृती त्याला होते. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून तो मुक्त होतो.

## जग-खरे-खोटे

श्रावस्तीमध्ये जेतवनात आराम करीत असताना, त्याचवेळी पोइपाल नावाचा परिव्राजक, तीनशे परिव्राजकांच्या मोठ्या समूहासह, एकशालक नावाच्या वनराईत राहत होता. तो ब्राह्मण प्रोष्ठपदा नक्षत्रांवर जन्मला होता. प्रचंड संपत्तीचा त्याग करून आचार्य बनला होता. तो वादविवादामध्ये तज्ज्ञ होता. एके सकाळी वस्त्र परिधान करून पात्र व चीवर घेऊन, श्रावस्ती नगरीत बुद्ध भिक्षेसाठी गेले, त्यावेळी वाटले की, श्रावस्ती नगरीत भिक्षेसाठी जाणे फारच लवकर होईल. त्याऐवजी पोट्टपाद परिव्राजक राहतो तेथे जावे. त्यावेळी अनेक परिव्राजक उच्च स्तराने, मोठमोठ्याने बोलत, गोंगाट करीत होते. बुद्धांना दुरून येताना पाहून त्यांना शांत वृत्ती आवडते म्हणून त्याने साऱ्यांना शांत केले. त्यांना आदराने आसन दिले. त्यांनी त्याला विचारले, ''पोट्टपादा, कोणत्या गोष्टीसंबंधाने कथा चालल्या होत्या?



कोणत्या गोष्टींचा माझ्या आगमनामुळे भंग झाला? असे विचारल्यावर पोट्टपाद म्हणाला - ''आमच्या ज्या गोष्टी चालल्या होत्या, त्या राहू द्यात. भगवंतांना ह्या गोष्टी पुढे केव्हातरी ऐकणे कठीण नाही.'' वेगवेगळ्या विषयावर चर्चा होत. बुद्धांनी त्याला सांगितले, ''पोट्टपादा, तुझी मते निराळी, आवड निराळी, रुची निराळी. तुझे प्रयत्न निरनिराळ्या गोष्टी संबंधाने, तुझे गुरू निराळे, तेव्हा पुरुषांची संज्ञा हाच त्याचा आत्मा की संज्ञा आणि आत्मा हे निरनिराळे, हे कळणे तुला बरेच कठीण जाईल.''

यावर तो म्हणाला, ''भगवन, असे असेल तर मला आपण एवढे तरी सांगावे की, जग शाश्वत आहे काय? हेच खरे असून, दुसरे सगळे खोटे आहे काय?''

''पोट्टपदा, जग शाश्वत आहे हेच खरे असून दुसरे सर्व खोटे आहे, असे मी कधीही म्हटलेले नाही.''

पण...

- भगवान जग अशाश्वत आहे का?

= असे मी कधीही म्हटले नाही -

- जग अंतवान आहे का?

= असे मी कधीही म्हटले नाही -

- भगवन, जीव व शरीर एकच आहेत का?

= असे मी कधीही म्हटले नाही.

- भगवन जीव व शरीर निराळे आहेत का?

= असे मी कधीही म्हटले नाही.

- पण भगवन, तथागत मरणानंतर असतो का?

= पोट्टपादा, असे मी कधीही म्हटले नाही.

- पण भगवन, तथागत मरणानंतर नसतो का?

= पोट्टपादा, असे मी कधीही म्हटले नाही.

- पण भगवन, तथागत मरणानंतर असतोही आणि नसतोही असे होते का?

= पोट्टपादा असे मी कधीही म्हटले नाही

- पण भगवन, तथागत मरणानंतर असतो व नसतो असेही नाही असे का?

= पोट्टपादा! असे मी कधीही म्हटले नाही.

- भगवन, असे आपण का म्हटले नाही?

= पोट्टपादा, हे अर्थयुक्त नाही, धर्मयुक्त नाही, ब्रह्मचर्याला आवश्यक नाही व ते निर्विद, विराग, निरोध, उपशम, अभिज्ञा, संबोध, निर्वाण याप्रत नेत नाही म्हणून मी त्यावर चर्चा करीत नाही.

- मग भगवन, आपण काय सांगितले आहे?

= पोट्टपादा - हे दुःख आहे, दुःखाचे कारण आहे. अशा रितीने दुःखाचा परिहार होतो व दुःखपरिहाराचा हा मार्ग आहे कारण, तो निर्वाणाप्रत नेतो.

## मनाच्या सूप्त शक्ती

भिक्खूंना हे समजून सांगण्याची गरज बुद्धांना वाटली की, दोन बले महत्त्वाची आहेत. त्यातील एक विचारबल आणि भावनाबल. जसे भिक्खूचे शरीर घडवावे लागते तसे मनही घडवावे लागते. मनाच्या सूप्त शक्तींचा वापर दुःखनिवृत्तीसाठी करता येणे शक्य असते. तुम्ही असा विचार करता की शारीरिक दुष्कर्मांचा इहलोकात तसेच परलोकातही वाईट परिणाम होतो. पण मानसिक दुष्कर्मांचाही इहलोकात तसेच परलोकात वाईट परिणाम होतो. हा विचार करून भिक्खूंनो! तुम्ही शारीरिक दुष्कर्मांचा त्याग करुन, शारिरीक चांगल्या कर्मांचा अभ्यास करा. वाणीच्या चांगल्या कर्मांचा अभ्यास करा. मानसिक चांगल्या कर्मांचा अभ्यास करा. त्यामुळे तुमचे जीवन चांगले बनेल, शुद्ध बनेल. भिक्खूंनो याला विचार बल म्हणतात.

भिक्खूंनो, दुसऱ्या बलाला भावनाबल किंवा अभ्यासबल म्हणतात. साधक या बलाने लोभाचा त्याग करतो, द्वेषाचा त्याग करतो. मोह, अज्ञानाचा त्याग करतो. त्याचा परिणाम म्हणजे तो अकुशल कर्म करीत नाही. पाप कर्मापासून तो दूर (विरत) राहतो. याला अभ्यासबल म्हणतात.

विवेक, वैराग्य, निरोध नि त्याग यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

भिक्खूंनो! सत्पुरुष आणि असत्पुरुष समजून घ्या. सत्पुरुष कृतज्ञ असतो, केलेले उपकार जाणणारा असतो. ही कृतज्ञता म्हणजेच कृतवेदिता होय. ती संपूर्ण सत्पुरुष भूमी आहे.

## माता-पित्यांचे उपकार

बुद्ध म्हणाले, भिक्खूंनो! मात्र दोन माणसांच्या उपकारांची परतफेड शक्य नाही. कोणत्या दोघांची? मातेची आणि पित्याची. भिक्खूंनो, १०० वर्षापर्यंत एका खांद्यावर मातेला



बसवले आणि दुसऱ्या खांद्यावर पित्याला बसवले आणि तुम्ही त्यांना उटणे लावून, चोळून आंघोळ घालू लागला; तसेच हात, पाय चेपण्याची अशी सेवा करू लागला आणि ते सुद्धा तुमच्या खांद्यावरच मल-मूत्र करू लागले, तरीही भिक्खूंनो हा मातापित्यावर कोणताही उपकार होत नाही अथवा उपकाराची परतफेडही होत नाही. भिक्खूंनो ! जरी सात रत्नांची विपुलता असणारे या पृथ्वीचे ऐश्वर्य-राज्यसुद्धा माता-पित्यांना अर्पण केले तरीही त्यांचेवर ना उपकार होतो ना उपकाराची फेड! भिक्खूंनो! माता-पित्यांचे पुत्रावर फार उपकार असतात. ते त्यांचे पालन करणारे आहेत, पोषण करणारे आहेत. ते त्यांना या जगात आणणारे आहेत.

भिक्खूंनो! अश्रद्धावान माता-पित्यांना श्रद्धेने सन्मान द्या. दुराचारी माता-पित्यांना सदाचाराने सन्मान द्या. कंजूष माता-पित्यांना त्यागाने सन्मान द्या. दुष्प्रज्ञ माता-पित्यांना प्रज्ञेने सन्मान द्या. यामुळेच माता-पित्यावर उपकार होतो, उपकाराची परतफेड होते, तसेच अतिरिक्त उपकार होतात.''

## मी क्रियावादी की अक्रियावादी?

एक ब्राह्मण त्यांच्याजवळ आला नि त्याने वार्तालाप सुरू केला. त्याने विचारले तुमचे विचार कोणत्या मताचे आहेत असे मानले जाते?

- ''हे ब्राह्मणा! मी क्रियावादी आहे तसेच अक्रियावादी मताचा आहे?''

-''कोणत्या प्रकारे?''

''हे ब्राह्मणा! काही कर्मे करा म्हणूनही मी सांगतो. शारीरिक चांगली कर्मे, वाणीची, चांगली कर्मे, मनाची चांगली कर्मे, अनेक प्रकारची कुशल कर्मे करा अशी शिकवण देतो. त्यामुळे म्हटला तर मी अक्रियावाद शिकवतो आणि म्हटला तर क्रियावाद शिकवतो.''

यावर तो ब्राह्मण म्हणाला, ''छान! फारच छान, भंते! शरीरात प्राण असेतोपर्यंत मला आपला शरणागत उपासक असे समजावे.''

कपिलवस्तूमधील निग्रोधारामात बुद्ध नुकतेच आजारातून बरे झाले होते. त्यावेळी महानाम शाक्य तेथे पोहोचले. प्रणाम करून एका बाजूला बसले. ते म्हणाले...

''भंते! मी जाणतो की तुम्ही फार पूर्वीपासून असा उपदेश केलेला आहे की, एकाग्र चित्तालाच ज्ञान होत असते, अस्थिर चित्ताला नाही. भंते! आम्हाला प्रश्न पडतो की, समाधी आधी असते आणि नंतर ज्ञान असते, अथवा ज्ञान प्रथम असते आणि त्यानंतर समाधी प्राप्त होत असते?''

त्यावेळी आनंदने बुद्धांच्या शरीर स्वास्थ्याचा विचार करून महानाम शाक्याला विनंती केली की, मीच तुला काही उपदेश देतो. ते दोघे थोडे बाजूला गेले. गंभीर प्रश्नावरील

चर्चेमुळे बुद्धांना त्रास होऊ नये हा त्यामागचा त्याचा हेतू होता.

आनंद महानामाला म्हणाला, ''महानाम, भगवंतांनी शैक्ष्य शील, समाधी न प्रज्ञेचा उपदेश केला आहे. भिक्खू शीलवान असतो. शिक्षापदांच्या नियमांचे सम्यक पालन करणारा त्याला शैक्ष्य शील म्हणतात.''

कामभोगापासून अलिप्त आणि चतुर्थ ध्यान प्राप्त भिक्खूला, शैक्ष्य समाधी प्राप्त झाली असे म्हणतात.

जो भिक्खू हे दुःख आहे याला यथार्थ रूपाने जाणत असतो. ही शैक्ष्य प्रज्ञा म्हणतात.

असा भिक्खू, आर्यश्रावक शीलसंपन्न, समाधी संपन्न, प्रज्ञा संपन्न बनून आस्रवांचा क्षय करतो. अनास्रव, चित्त-विमुक्तीला, प्रज्ञा विमुक्तीला याच शरीरात, स्वतः जाणून अनुभव घेऊन, प्राप्त करून विहार करतो.

## पंसुधोवक सुत्तः निष्कलंक भिक्खू

बुद्धांनी भिक्खूंना संबोधित करताना सांगितले, 'भिक्खूंनो, सोन्यावर मोठे मोठे डाग असतात, मातीचे तसेच वाळूचे; माती धुणारा व त्याचा सहकारी चाळणीत घालून ते धुऊन काढीत असतो. चांगल्याप्रकारे धुऊन काढीत असतो. घासून-धुऊन काढीत असतो, कारण त्यामुळे त्या डागांचा, घाणीचा नाश व्हावा, ते डाग दूर व्हावेत.

लहानसहान डाग किंवा अत्यंत लहानसे डाग हेही दूर करावे लागतात. जेव्हा सोन्याचे कण शिल्लक राहतात तेव्हा ते मुशीत घालून तापवावे लागतात व स्वच्छ करावे लागतात. मगच ते सोने मृदु, कमनीय, चमकदार बनते. उपयोगात आणल्यानंतर ते मोडत नाही. जे जे दागिने सोनार बनवू पाहतो तो ते बनवू शकतो.

याप्रकारे भिक्खूंनो! श्रेष्ठतर चित्त प्राप्तीसाठी प्रयत्नशील असलेल्या भिक्खूवर मोठमोठे कलंक, दोष असतात. शारीरिक दुष्कृत्य, वाणीचे दुष्कृत्य, मनाचे दुष्कृत्य. काहींवर सामान्य कलंक असतात-काम-वितर्क, व्यापाद वितर्क, विहिंसा वितर्क.

काहींवर सूक्ष्म असे कलंक लागलेले असतात-जातिव्यवस्थेसंबंधी वितर्क, जनपदसंबंधी, अनवज्ञासंबंधी.

ज्ञानी पंडित भिक्खू त्यांना सोडत असतो, त्यांचा त्याग करीत असतो. त्यांचा नाश करीत असतो. तो त्यांचा लोप करण्यासाठी, त्यांचा नाश करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. त्यानंतर धर्म-वितर्क शिल्लक राहतात. त्यासमयी जी समाधी असते ती शांत नसते,



श्रेष्ठ नसते. त्याचा परिणाम म्हणजे शारीरिक शांती, एकाग्रतायुक्त नसते. तो संस्कार या ना त्या प्रकारे थांबवून प्राप्त केलेली अशी असते.

भिक्खूंनो! अशी वेळ येते की, जेव्हा ते चित्त स्वतःमध्येच स्थिर होत असते, शांत होत असते, एकाग्र होत असते, समाधी प्राप्त होत असते, त्यासमयी जी समाधी असते ती शांत असते, श्रेष्ठ असते. त्यातून शारीरिक शांतीही लाभते. तो साक्षात अनुभव असतो. प्रज्ञेच्या द्वारा मन त्या त्या धर्माकडे तो वळवतो. अनुभव प्राप्त करतो. प्रत्येक आयतानाला प्राप्त करतो. त्याला अनेक प्रकारच्या ऋद्धी-सिद्धींचा अनुभव घेता येतो. याच शरीरात प्रज्ञा-विमुक्तीला स्वतः जाणून, साक्षात अनुभवून, प्राप्त करून विहार करतो.''

## तीन धर्मभावना

भिक्खूंनो, लोभाला जाणण्यासाठी या तीन धर्माच्या भावनांचा अभ्यास केला पाहिजे. कोणत्या तीन? शून्य समाधीचा, अनिमित्त समाधीचा तसेच अप्रणिहित(इच्छारहित) समाधीचा अभ्यास केला पाहिजे.

भिक्खूंनो! द्वेषाच्या, मोहाच्या, क्रोधाच्या, वैराच्या, दुसऱ्याला हीन लेखण्याच्या, तिरस्काराच्या, ढोंगीपणाच्या, संतापाच्या, कंजूषपणाच्या, मायेच्या, निष्ठुरतेच्या, निर्विकारतेच्या, विवादाच्या, दुराभिमानाच्या, उन्मत्तपणाच्या, अहंकाराच्या, निष्काळजीपणाच्या नाशासाठी, संपूर्ण नाशासाठी, समूळ नाशासाठी, उच्चाटनासाठी, वैराग्यासाठी, निरोधासाठी, त्यागासाठी तसेच परित्यागासाठी तीन धर्मांचा अभ्यास (भावना) केला पाहिजे. सर्वसंगपरित्याग करून शेवटपर्यंत विनय आणि ब्रह्मचर्य पालनात अनेक भिक्खू मग्न झाले होते. त्यांचे अंतःकरण चित्त मलापासून मुक्त झाल्यामुळे ते आध्यात्मिक शांतीला प्राप्त झाले होते. त्यांच्या मनातील तृष्णा शांत झाली होती. हे बौद्धभिक्खू अतिज्ञानबुद्ध भिक्खू किंवा स्थवीर किंवा थेर असे समाजात ओळखले जाऊ लागले. त्यांना ज्ञानप्राप्तीनंतर आंतरिक आनंद मुक्तावस्थेत वाणीवाटे प्रकट होत. या हर्षोद्गारांना उदान किंवा गाथा म्हणत. अशा गाथा बुद्ध भिक्खू त्यांच्याप्रमाणेच भिक्खुणीही सहजस्फूर्त म्हणत. अंतःकरणातील विविध विचार व अनुभव, मानवी जीवनाचे अनुभव, निसर्ग, पशु-पक्षी, नद्या, ऋतुचक्र या साऱ्यांचे प्रतिबिंब त्यात उमटत असे.

एकदा एक स्थवीर उद्गारला,

परिचिण्णो मया सत्था। कतं बुद्धस्य शासनं।

ओहिंतो गरुको भारो । भवनेत्ती समूहता

(मी शास्त्या गुरूची सेवा केली आहे, बुद्धशासनाची पूर्ती केली आहे, अवजड ओझे उतरून खाली ठेवले आहे. जन्माला घालणारी तृष्णा समूळ नष्ट झाली आहे.)

विमुक्तिसुख आणि तृष्णानाशाच्या परमानंदावस्थेत सहज स्फुरलेल्या, ओठातून सहज प्रस्फुटित झालेल्या या गाथा तर्कबुद्धीच्या पलिकडच्या जगतातून मनाच्या पृष्ठभागावर अवतरतात.

या साऱ्याला निसर्गाचीही मोठी साथ मिळायची. भिक्खू संघाचे वास्तव्य गावापासून खूप जवळ किंवा खूप दूरही नसायचे. नदीकाठ, पर्वतशिखर, डोंगरमाथा, गुंफा, लेणीगुंफात ध्यानसाधना, समाधिभावना करीत विहरणारे अनेक स्थवीर निसर्गाच्या सान्निध्यात रममाण होत असतात. त्यांना तेथे सहज चितैकाग्रता साधता येते. रानावनात मुक्त संचार करणारे पशू, चिवचिवणारे पक्षी, झुळझुळणारे झरे, पाण्याने भरलेले काळेभोर मेघ, कडाडणाऱ्या व डोळे दिपवणाऱ्या विजांचा लखलखाट, जलवर्षातील संगीत, सृष्टीचे हे निरागस सौंदर्य हे भिक्खूंच्या चित्तवृत्ती प्रसन्न आणि पवित्र बनवतात.

एक स्थीवर म्हणतो, ''आकाशात मेघांची दुंदुभी गर्जत आहे. पक्ष्यांचा संपूर्ण मार्ग जलधारांनी भिजलेला आहे. नदीकाठावरील सुंदर झाडे चित्रविचित्र वनफुलांनी लगडलेली आहेत,.निर्जन जंगलामध्ये हत्तींचा चित्कार निनादतो आहे. रिमझिम रिमझिम पाऊस पडतो आहे. अशा रमणीय, वातावरणात नदीकाठावर व पर्वतगुहेमध्ये ध्यान करणाऱ्याला यापेक्षा परमानंदाचा दुसरा क्षण कोणता असू शकेल?''

एक वेळ ग्रीष्मात स्थवीर काळुदायी बुद्धांच्याकडे आला. त्याने झाडांचे सहजसरळ केलेले वर्णन पाहा. तो म्हणाला, ''भंते! आता सर्व झाडे पेटत्या निखाऱ्याप्रमाणे लाल भडक असणाऱ्या फुलांनी सजलेली आहेत. फळांच्या अपेक्षेत, पानांचा त्याग करून ती झाडे पेटत्या दीपशिखेप्रमाणे शोभून दिसतात.''

स्थवीर महाकश्यप रमणीय पर्वतांचे वर्णन कसे करतात पाहा; ''भंते! जेथे करेरी फुलांच्या माळा अंथरलेले भूप्रदेश आहेत. निळ्या मेघाप्रमाणे थंड आणि स्वच्छ जलाशय आहेत, इंद्रधनुष्यांनी आकाश व्यापलेले आहे. नाना विविध पक्षांच्या थव्यांनी वृक्ष गजबजलेले आहेत, हरणांच्या कळपाने भरलेले आहेत. हत्तीच्या चित्त्काराने आणि मोराच्या केकारण्याने पर्वतात पडसाद निनादत आहेत. अशा सृष्टीसौंदर्याने कोणीही वेडा होऊन जाईल.''

बुद्ध संघ म्हणजे समतावादी, मानवी प्रीतीचा सोहळाच होता. येथे माणसाच्या जन्मापेक्षा कर्माला अधिक महत्त्व दिले म्हणूनच भिक्षू संघात रावापासून रंकापर्यंत,



ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत सर्वांना 'शाक्यपुत्रिय श्रमण' हा एकमेव दर्जा प्राप्त झाला. म्हणूनच बुद्ध साऱ्यांना सांगत होते 'न जच्चा बसलो नि जच्चा होती ब्राह्मणो। कम्मंना वसलो होती कम्मुना होती ब्राह्मणो।' जन्माने नव्हे तर कर्माने मनुष्य ब्राह्मण, चांडाळ ठरत असतो. ज्याप्रमाणे अनेक वेगवेगळ्या नद्या सागराला मिळाल्या की त्या आपले नाव गाव सोडून सागरमय होतात; त्याप्रमाणे भिक्खू संघात आलेले सारे आपल्या आधीच नाव, गोत्र विसरून जातात. बुद्ध संघामध्ये भंगी, कुलीन, सुनीत, यसुज केवट पुत्र, धनीय कुंभार, सुपीय डोम, छन्नदासी पुत्र, चोराला दंड देणारा हेरंक कानी, क्रूरकर्मा, ब्राह्मणपुत्र, अंगुलीमाल, गौतमीपुत्र नंद, श्रेष्ठीपुत्र यश, राजपुत्र तीस, पुत्र राहुल, आम्रपाली गणिका, हे सारे आता एकाच संघाचे सदस्य बनले होते. उपाली तर सर्वश्रेष्ठ अधिकारी अर्हत ठरला. राजगृहातील गल्ली बोळ साफ करणारा भंगी भिक्षू संघात सामील झाल्यावर आपल्या आचरणाने खुद्द मगधादिराज बिंबिसाराच्या वंदनेला पात्र ठरला. यश, रट्टपाल आणि अनुरुद्धासारखे लक्ष्मीपुत्र वैभवाला कंटाळून बेचैन बनले होते. पंचपक्कान्ने, तलम रेशमी वस्त्रे, अलोट संपत्ती त्यांना चित्त शांती देऊ शकत नव्हती. स्थावीर रट्टपाल म्हणत असे, ''सागरापर्यंत पृथ्वीचे राज्य करणारा राजा. समुद्रापलीकडील राजाची ईच्छा बाळगूनही केवळ एका वस्त्रानिशी चितेवर जळून खाक होतो आणि आपल्या डोळ्यादेखत मृत्यूच्या जबड्यात जाणाऱ्या आप्तांना त्याचे बंधू-बांधव किंवा सगे-सोयरे वाचवू शकत नाहीत.''

अंगुलीमालसारखा क्रूरकर्मा भिक्खू झाल्यावर म्हणतो, ''काहीजण दंड अंकुश किंवा चाबकाने दमण करतात. पण श्रमण गौतमांनी दंड किंवा शस्त्राचा वापर न करता माझे दमण केले. पूर्वी मी अख्यात, पर्वतगुहेमध्ये चिंताग्रस्त जगत असे. पण आता मात्र मी सुखपूर्वक झोपतो व जगतो. माझ्या शत्रूंनी सुद्धा ही धर्मकथा ऐकावी आणि बुद्ध शासनाप्रमाणे वागावे.'' बुद्धांच्या दोन प्रमुख शिष्यांपैकी सारिपुत्त आणि मोंगलान यांच्याबद्दल भिक्खुवर्गात आदर व प्रेम होते. सारिपुत्त उपतिस्य गावातील ब्राह्मणांच्या कुटुंबातील आणि मोंगलानचा जन्म कोलित गावातील ब्राह्मणांच्या कुटुंबात झाला होता. लहानपणापासून ते दोघेही मित्र होते. एकदा दोघेही राजगृहामध्ये उत्सव पाहायला गेले. तेथे दोघांनाही वैराग्य उत्पन्न झाले. ते दोघेही संजय नावाच्या परिव्राजकाचे शिष्य बनले. परंतु त्यांच्या उपदेशाने त्यांना संतोष वाटला नाही म्हणून त्याचा निरोप घेऊन ते सत्याच्या शोधात निघाले. बुद्धांच्या पहिल्या पाच शिष्यांपैकी अस्वजीत नावाच्या भिक्षूकडून उपदेश ऐकून सारिपुत्त स्वतः अर्हतपदाला प्राप्त झाले. बुद्धांच्या प्रज्ञावान शिष्यांमध्ये ते दोघे सर्वश्रेष्ठ सिद्ध झाले म्हणून सारे त्यांना धर्मसेनापती म्हणत. त्यांनी अनेक उदाने धम्मचक्राला गती देणारी ठरली.

स्वतःच्या परिनिर्वाणाच्यावेळी सारिपुत्त स्थवीरानी उदान गायिले - ''अप्रमादासहित

आपले ध्येय प्राप्त करा हेच माझे अनुशासन आहे. मी सर्वच वासनापासून मुक्त झालो आहे. आता मी परिनिर्वाणाला प्राप्त होईन.''

## महाकश्यप

मगधातील महातीय गावातील ब्राह्मण कुळात महाकश्यप जन्मले. त्यांचे मूळ नाव पिप्पली मानवक असे होते. बालपणापासून त्याचे मन प्रबळ वैराग्य वृत्तीने भारले होते. एकदा त्यांनी आई-वडिलांना सांगितले, ''जोवर तुम्ही जिवंत आहात तोपर्यंत मी अविवाहित राहीन आणि तुमची सेवा करीन. त्यानंतर मात्र प्रव्रजित होईन.'' परंतु त्यांची आई मात्र त्यांना लग्नासाठी नेहमी हटकत असे. एकदा त्यांनी लग्न टाळण्याची युक्ती शोधून काढली. एक अतिशय सुंदर स्त्रीची सोन्याची मूर्ती बनवली आणि ती आईला दाखवीत म्हटले, ''अशी सुंदर मुलगी वधू मिळाली तरच लग्न करीन, अन्यथा करणार नाही.'' आईने ती मूर्ती घेऊन काही लोकांना वधूच्या शोधार्थ पाठविले. मध्य देशातील सागला नावाच्या गावात ते पोहोचले. तेथे नदीमध्ये त्यांनी एका सुंदर मुलीला आईबरोबर स्नान करताना पाहिले. तिचे सौंदर्य मूर्तीशी हुबेहूब जुळत होते. त्या मुलीचे नाव भद्रा कपिलानी असून ती त्या गावातील धनाढ्य ब्राह्मण कुळात जन्मली होती. त्या लोकांनी पिप्पली माणवका संबंधी आईला सांगितले. तिने मुलीच्या आई-वडिलांना कळविले. ते दोघेही लग्नाला तयार झाले. भद्रा कपिलांनीसुद्धा पिप्पली माणवकाच्याच स्वभावाची होती. विवाह ठरल्यावर वर आणि वधूमध्ये लग्न मोडण्याबाबत पत्रव्यवहार सुरू झाला. परंतु त्यांचे दूत मूळपत्र गहाळ करून दुसरेच पत्र लिहून नेत असत. शेवटी दोघांचे लग्न लागले. परंतु वैवाहिक जीवन न जगता ते ब्रह्मचर्यपालन करीत असत. आईवडिलांच्या मृत्यूनंतर पिप्पली माणवक भिक्षू संघात आणि भद्रा कपिलानी भिक्षुणी संघात दाखल झाली. पिप्पली माणवकाचे नाव महाकश्यप ठेवण्यात आले. प्रव्रज्याप्राप्तीनंतर आठच दिवसात ते अर्हत पदाला प्राप्त झाले.

महाकश्यप नेहमी म्हणत, ''कळपाच्या सोबत फिरू नये. त्यामुळे मन अप्रसन्न होते आणि समाधी लागणे कठीण होते. अनेक प्रकारच्या लोकांची संगत दुःखदायक असते हे पाहून समूहाची इच्छा करू नये. शक्यतोवर मुनींनी कुटुंबाच्या संपर्कात जाऊ नये. त्याच्याने मन अप्रसन्न होते आणि समाधीला कठीण होते. कुटुंबामध्ये मिळणारी वंदना आणि पूजा यांना ज्ञानी लोकांनी चिखलाची उपमा दिली आहे.

एकदा महाकश्यप भिक्षाटनासाठी नगरात गेले. तेथे भोजन करणाऱ्या कुष्ठरोग्याजवळ गेले. त्याने एक घास महाकश्यपना भिक्षा म्हणून टाकला. भिंतीच्या आडोशाला बसून ते



अन्न त्यांनी खाऊन टाकले. पण ते खात असताना किंवा खाल्ल्यानंतरही त्यांना घृणा वाटली नाही.

अनेकवेळा महाकश्यप जळणाऱ्या प्रेतांना पाहूनही शांतपणे ध्यान करीत असत. पर्वतावर चढून आसक्तीरहित होऊन भय व भीतीरहित होऊन कश्यप ध्यान करीत असत. ते बुद्धांचे वारस होते, ते ज्ञानी होते, स्मृतिमान होते आणि वृद्धिबलाने युक्त होते.

बाह्यकामात गुंतलेल्या सहब्रह्मचार्यांना ते सांगत की, वाईट लोकांची संगत सोडून द्यावी आणि त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करू नये. बाह्य कामे अधिक करू नये. जो गाठीभेटीत उत्सुक असतो आणि रसामध्ये आसक्त असतो तो सुखदायक अर्थापासून वंचित राहतो. केवळ पुटपुट, गुणगुण केल्याने कोणालाही आपले हित दिसू शकत नाही. ज्याच्या मनात पापकर्माबद्दल नेहमी लज्जा आणि भय हे चांगल्याप्रकारे विद्यमान असतात, त्यांचे ब्रह्मचर्य वृद्धीला प्राप्त होते आणि त्यांच्यासाठी पुनर्जन्म क्षीण झालेला असतो.

मोग्गलान प्रव्रजा प्राप्त केल्यावर एक आठवड्यामध्येच त्यांना अर्हत पदाला प्राप्त झाले. वृद्धिबल प्राप्त झालेल्या बुद्धांच्या शिष्यवर्गामध्ये त्यांचा समावेश होता. ते स्वतःविषयी म्हणत मी, समाधी आणि विद्येच्या निपुणतेमध्ये मन अनासक्त केले आहे. इंद्रियांवर संयम मिळविलेल्या मी, ज्याप्रमाणे हत्ती, जुनी पुराणी दोरी सहजच तोडतो, त्याप्रमाणे मी वासनांचा नायनाट केला आहे. ज्या उद्देशाच्या प्राप्तीसाठी मी घर सोडून बेघर झालो त्या अर्थाला आणि सर्वच बंधनांच्या नाशाला मी प्राप्त झालो आहे.

## हारित

श्रावस्ती नगरीतील ब्राह्मण कुळात जन्मलेला हारितने एका ब्राह्मणकन्येबरोबर विवाह केला होता. सर्पदंशाने जेव्हा पत्नीचा मृत्यू झाला तेव्हा हारिताला वैराग्य प्राप्त झाले. तो बुद्धांच्याकडे आला नि प्रव्रजित झाला. परंतु त्याचे मन विक्षिप्तावस्थेतच राहत असे. एक दिवस गावात भिक्षाटन करीत असताना, त्याने एका लोहाराला बाण बनवताना पाहिला. तेव्हा हारितच्या मनात असा विचार आला की, 'जर लोहार लोखंडाला हवा तसा आकार देऊ शकतो, निर्जीव वस्तू सरळ करू शकतो तर मग मी माझ्या मनाला हवा तसा आकार द्यावा का देऊ नये? का त्याला सरळ करू नये? नंतर त्या विषयाचे मनन करीत हारिताने आपल्या मनावर ताबा मिळवला. आपल्या मनोजयाला उद्देशून त्याने उत्स्फूर्तपणे गाथा म्हटली, 'ज्याप्रमाणे बाण बनविणारा बाण सरळ करतो, त्याप्रमाणे आपण आपल्या मनाला सरळ करावे. चित्ताला सरळ करून अविद्येचा नाश करावा.'

## सारिपुत्ताचे परिनिर्वाण

बुद्ध श्रावस्तीमध्ये अनाथ पिंडकाच्या आराम जेतवनात राहत होते. त्या दरम्यान मगधामध्ये नालक गावी सारिपुत्त रोगग्रस्त बनले होते. ते गाव म्हणजे सारिपुत्तांचे जन्मठिकाण होते. सारिपुत्त संघाचा धर्मसेनापती होता. या ठिकाणी परिनिर्वाणाच्या हेतूने आगमन झाले होते.

बुद्धचरण पकडून सारिपुत्त म्हणाले, ''भंते! हजारो सालापासून या चरणांची सेवा मी केली. आता त्याचे फळ म्हणजे निर्वाण. त्यामुळे यापुढे तुमच्याबरोबर एके ठिकाणी जन्म घेऊन सहवास घडणार नाही. जर माझे शरीर कर्म वा वाचिक कर्म भगवानांना रुचले नसेल तर मला क्षमा करावी. आता माझी जाण्याची वेळ जवळ आली आहे.''

बुद्ध म्हणाले, ''सारिपुत्त! मी तुला क्षमा करतो. पण तुझे कोणतेही कायिक वा वाचिक कर्म मला नापसंदत नव्हते. आता तू योग्य मार्गाने पुढे जा.''

सारिपुत्त मोठ्या निश्चयाने उभा राहिले. त्यांनी तीन वेळा प्रदक्षिणा घातली. ते म्हणाले, ''भगवान! हजारो सालापासून केलेली तुमच्या दर्शनाची प्रार्थना सफल झाली. तुम्हाला पाहिले ते तुमचे प्रथम दर्शन होते आणि आज हे शेवटचे दर्शन आहे. पुन्हा यापुढे दर्शन नाही!''

दाही बोटे जोडून वंदन करीत पाठ न दाखवता सारिपुत्त मागे मागे चालत गेले. स्वतः बुद्ध त्यांना आदरांजली म्हणून उठून उभा राहिले. साऱ्या भिक्षूंना सांगितले, ''ज्येष्ठ, धर्म सेनापतीला अभिवादन करा.''

सर्व भिक्षू-भिक्षूणी, उपासक-उपासिका, जेतवनातून निघाल्या. सारे शोकमग्न बनले होते.

सारिपुत्त ठिकठिकाणी उपदेश करीत नालक गावी सायंकाळी पोहोचले. प्रवेशद्वाराजवळच ते एका वटवृक्षाखाली उभे राहिले. त्यांच्या एका भाच्याने त्यांना तेथे पाहिले. त्याने सारिपुत्तांना वंदन केले?

सारिपुत्तांनी त्याला विचारले, ''तुझी आजी घरी आहे?''

''हो आहे!''

''जा आणि आजीला सांग मी आलो आहे. एक रात्र बाहेरच राहीन. तोपर्यंत जन्मस्थान साफ करा नि सोबतच्या पाचशे भिक्खूंची सोय करा.''

त्याने आजीला सांगितले, ''माझे मामा आले आहेत.'' सारिपुत्ताच्या आईने विचारले,



''पाचशे भिक्खू, त्यांची सोय, जन्मस्थळ, घर साफ करायला का सांगितले? काय सारिपुत्त पुन्हा गृहस्थी बनणार आहे?''

दुसऱ्या दिवशी सारिपुत्त आपल्या घरी आले. तेथे त्यांना रक्ताची हगवण सुरू झाली. त्यांच्या आईने विचार केला पुत्राची ही अवस्था काही ठीक नाही.

त्या ठिकाणी लोक, महात्मा, देवतांची आपल्या पुत्रांच्या दर्शनासाठीची गर्दी पाहून मातेला कळले की, माझ्या पुत्राचे हे सामर्थ्य आहे तर त्याचा शास्ता भगवान बुद्ध किती सामर्थ्यवान असेल? मग मला ती कल्पना आजपर्यंत का दिली नाही?

सारिपुत्ताने आपल्या सर्व भिक्खूंना निवेदन केले, ''जर माझ्या वागण्याने, बोलण्यामुळे मी कोणाला दुःख दिले असेल तर क्षमा करा.''

सारे भिक्खू म्हणाले, ''भंते! तुमच्या कृपेच्या छायेखाली आम्ही वावरलो. आम्ही काहीही वाईट पाहिले नाही. तुम्ही आम्हा सर्वांनाच क्षमा करा.''

यावर सारिपुत्त महाचीवर ओढून तोंड झाकून उजव्या कुशीवर झोपले. हळूहळू चौथ्या ध्यानावस्थेत जाऊन ते परिनिर्वाणास प्राप्त झाले.

इकडे आपला पुत्र काहीच का बोलत नाही, या शंकेने त्याच्या मातेने पाठ व पाय दाबून पाहिले नि जोराने ओरडली, परिनिर्वाण प्राप्त झाले. यापूर्वी आम्हाला का सांगितले नाही.''

सारिपुत्तांच्यावर अंत्यसंस्कार झाल्यावर त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या गावात आठवडाभर भजन-किर्तन झाले मग चुंद सारिपुत्तांच्या वस्तू घेऊन बुद्धांच्याकडे आला.

एका परिनिर्वाण प्राप्त धर्मसेनापतीच्या त्या पवित्र वस्तू होत्या. त्या पात्र व चीवर होत्या. त्या बुद्धांनी हातामध्ये घेतल्या. सारिपुत्त आता देहस्वरूपात आपल्याबरोबर नाही या जाणीवेने त्यांचे शरीर ढिले पडले. त्यांना काहीवेळ दिशाही समजेना, कोणती गोष्टही समजेना.

आनंदला त्यांनी विचारले, ''आनंद सारिपुत्त शीलस्कंध घेऊन परिनिवृत्त झाले का समाधि स्कंध घेऊन? का प्रज्ञास्कंध घेऊन? का विमुक्ती स्कंध घेऊन? का विमुक्ति ज्ञान दर्शन स्कंध घेऊन परिनिवृत्त झाले?'

यावर आनंदने स्पष्ट केले ''भंते! सारिपुत्त शीलस्कंध घेऊन परिनिवृत्त झाले. पण भंते! सारिपुत्र ज्ञात-अज्ञात वस्तूंचे जाणकार होते. प्रेरक, समुत्तेजक, सप्रशंसक होते. ब्रह्मचारी व्रत पाळणारे होते. तो त्यांचा सहज स्वभाव होता. या धर्मानुग्रहाचे आम्ही स्मरण करतो.''

बुद्ध म्हणाले, ''आनंद! मी यापूर्वीही तुम्हाला सांगितले की, सर्व प्रिय वस्तू आणि व्यक्तींचा वियोग आज ना उद्या होतच असतो. अविनाशी, अमरत्व हे भौतिक गोष्टींना शक्य

नसते. आत्मशरण, धर्मशरण, स्वावलंबी बनून जगा. माझ्या न राहण्यावेळीही तसेच राहा.''

सारिपुत्त नि मोग्गलान हे ज्येष्ठ साक्षात्कारी सहकारी बुद्ध संघाचे दोन आधार स्तंभ होते, जणू बुद्धांचे दोन सामर्थ्यशील पंखच होते. ते एकापाठोपाठ गळून पडले. वटवृक्ष खडा असताना दोन मोठ्या फांद्या मोडाव्यात तसे वाटले. तेही आता ७९ वयाचे झाले होते. त्या दोघांचे निर्वाण ही संघाची, धम्माची मोठी हानी होती. त्यानंतर वज्जी देशात, गंगेच्या पलीकडे उक्कावेल मध्ये परिषद भरली होती. सारिपुत्त व मोंगलायनाशिवाय ती सुनी-सुनी वाटत होते. सारे उपस्थित भिक्खू मौन पाळून होते. (सारिपुत्त कार्तिकमास पौर्णिमेला तर महामोंदगल्यायन त्यानंतर १५ दिवसांनी कृष्णपक्षातील, अमावस्येला परिनिर्वाण प्राप्त झाले.)

राजगृहातील गंधकूट पर्वतावर काही दिवस राहिल्यानंतर आनंदला बोलावले व म्हटले, ''आनंद! चल आपण अम्बलट्टिका (सध्याचे सिताव जि. पटना) येथे जाऊ.'' ते भिक्खू संघासह तेथे पोहोचले. राजागारक मध्ये त्यांचा मुक्काम होता. तेथे काही दिवस भिक्खूंना धर्मोपदेश केला नि आनंदला म्हटले, ''चला आपण नालंदाला जाऊ.'' तेथे सर्वजण पोहोचले. तेथे प्रावारिक आम्रवनात राहात होते. तेथून पाटलीपुत्राला आले.

त्यापूर्वी श्रावस्तीत धर्मसेनापती सारिपुत्तचा चैत्य व राजगृहात महामौगल्यायन यांचा चैत्य बनवला.

पाटलीपुत्रमध्ये त्यांच्याबरोबर भिक्खू होते. तेथल्या उपासकांना समजले की ते तेथे आहेत. ते भेटायला आले. त्यांनी विनंती केली, ''आम्ही बांधलेले आवसथागारचा (अतिथिशाला) आपण स्वीकार करावा.''

त्यांनी मौनातच त्यांच्या विनंतीचा स्वीकार केला. सायंकाळी सारेजण तेथे पोहोचले. ते एका खांबाजवळ पूर्वाभिमुख होऊन बसले नि भिक्खूंना दुराचाराचे, दुःशीलाचे दुष्परिणाम काय होतात हे त्यांनी समजावून सांगितले.

त्यावेळी मगधाचे महाअमात्य सुनीथ आणि वर्षकार नवे नगर बनवीत होते. अजातशत्रूचे लोक वरचेवर येऊन येथल्या नागरिकांना त्रास देत. त्यावेळी काही काळ त्यांच्या छळाला कंटाळून आपले घर सोडून लोक जात. त्यांची सोय म्हणून मगधाचे महा अमात्य नवे नगर, अतिथिगृह बनवीत होते.

बुद्धांनी आनंदला रात्री उठवून सांगितले, ''आनंद! मी दिव्य दृष्टीने पाहिले आहे की, अनेक देव-देवता पाटलीपुत्रात वास करीत आह. जेथे महाशक्तीशाली देवता वास करतात, तेथेच महाराजा, महाअमात्य नगर वसवतात.''

जेथे मध्यम व नीच देवता वास करतात, त्यानुसार तेथे मध्यम व नीच दर्जाचे राजे



राहतात.

महाअमात्य सुनीथ व वर्षाकारांनी त्यांना विनंती केली की आज भिक्खू संघाबरोबर आमचा भात (भोजन) स्वीकार करावा. बुद्धांनी होकार दिला.

उत्तम खाद्य-भोज्य त्यांनी बनवले. त्यांनी स्वतःच्या हातांनी साऱ्यांना वाढले. भोजन झाल्यावर महाअमात्य येऊन बसले. त्यांना बुद्धांनी एक गाथा ऐकवली -

''ज्या प्रदेशात पंडित पुरुष, शीलवान, संयमी, ब्रह्मचारित्र्यांना भोजन देऊन त्यांच्या निवासाची सोय करतो, तेथे वास करणाऱ्या देवतांना दक्षिणा दान भाग द्यायला हवा. त्या देवता पूजा ग्रहण करतात, प्रसन्न होतात. मग आपल्या मानलेल्या पुत्राप्रमाणे अनुकंपा करतात. देवतांचा कृपाशीर्वाद लाभल्याने पुरुष प्रसन्न बनतो.''

बुद्ध सर्व भिक्खूंसह दुसऱ्या दिवशी पुढे चालू लागले. त्यांच्या पाठोपाठ महाअमात्य येत होते. ते ज्या द्वारातून बाहेर पडले ते 'गौतम द्वार' असे त्यांनी त्वरीत नामकरण केले व ज्या तीर्थ घाटावरून गंगा नदी पार केली त्याला गौतम तीर्थ नाव दिले.

□□□

## निर्वाणाच्या वाटेवर....

### कोटिग्राम-नादिका-वैशालीकडे

महाभिक्षूसंघाबरोबर चालत चालत बुद्ध कोटिग्रामला पोहोचले. भिक्खूंना संबोधून त्यांनी सांगितले, ''हे भिक्खूगण, चार आर्य सत्ये खऱ्या अर्थाने समजली नसल्याने, अंगी बाणली नसल्यामुळे दीर्घकाळापासून आपली दौड चालू आहे.'' त्यामुळे पुन्हा एकदा नवोदित भिक्खूंसाठी त्यांनी चार आर्य सत्ये, दुःख, भवतृष्णा, तृष्णा क्षीण होणे याविषयी धर्मकथेद्वारे प्रबोधन केले. यानंतर ते नादिका येथे गेले. तेथून वैशालीला अम्बपानी वनात पोहोचले.

त्यांनी भिक्खू संघाला धर्मज्ञान देताना सांगितले, ''प्रत्येक कृती विचारपूर्वक, स्मृती जागृत ठेवून करा. हेच आमचे अनुशासन होय.'' वैशालीला ते आल्याची वार्ता सर्वत्र पोहोचली. अम्बपाली सुंदर रथातून भेटायला आली आणि तिने सर्वांना दुसऱ्या दिवशीच्या भोजनाचे निमंत्रण दिले. ते त्यांनी स्वीकारले.

वैशालीतील लिच्छवींना समजले की बुद्ध वैशालीत आले आहेत. ते बुद्धांना भेटायला निळ्या रंगाची वस्त्रे, निळ्या रंगाचे अलंकार घालून आले तर काही लिच्छवी पिवळ्या रंगाची वस्त्रे व अलंकार घालून आले.

वाटेत अम्बपालीची भेट झाली. अम्बपालीने त्यांना सांगितले. ''उद्याच माझ्याकडे भगवान व सर्व भिक्खू प्रसाद ग्रहण करतील.'' यावर लिच्छवींनी तिला तो मान आपल्याला देण्याची विनंती केली. त्यासाठी मोठा नजराणा देऊ केला. पण अम्बापालीने नकार दिला.

लिच्छवींनी बुद्धांना भेटून खुलासा करून घेतला. अम्बापालिने आपणाला हरवले. अशी त्यांची भावना झाली. अम्बापालीने स्वतःच्या हातांनी साऱ्यांना उत्तमोत्तम भोजन दिले. मग तिने तेथला विहार संघाला अर्पण केला. तेथे काही दिवस धर्मोपदेश करून सारे वेणुग्राम येथे पोहोचले.

### वेणु ग्राममध्ये

वेणू ग्राममध्ये भिक्षूंना आमंत्रित केले. त्यांनी सांगितले, ''भिक्खूंनो वैशालीच्या चारी दिशांना मित्र, परिचित पाहून वर्षावास करा. मी येथेच वर्षावास करीन.''

त्या वर्षावासात ते खूप आजारी पडले. मरणप्राय वेदना होऊ लागल्या. पण स्मृती



संप्रजन्याने दुःख न करता त्यांनी सहन केल्या. त्यावेळी त्याना जाणवले की, सेवकांना, भिक्षू संघाला विचारल्याशिवाय, त्यांना पूर्वकल्पना दिल्याशिवाय परिनिर्वाण करणे योग्य नाही. त्यासाठी मनोबलाने, प्राणशक्तीच्या अधिष्ठानाने व्याधीला दूर करून जीवनक्रम तात्पुरता चालू ठेवला.

बाहेर येऊन विहाराच्या सावलीत घातलेल्या आसनावर बसले. ते पाहून आनंदला खूप आनंद झाला. तो म्हणाला, ''भंते! तुम्ही स्वस्थ आहात हे पाहून बरे वाटले. तुम्ही गंभीर आजारी पडल्याने मला काहीच सुचत नव्हते. धर्म, संघ या गोष्टींचाही मला विसर पडला होता. एक मात्र तुमचे आश्वासन मनात जागे होते की तुम्ही साऱ्या भिक्षूसंघाला उपदेश केल्याखेरीज महानिर्वाण करणार नाही.''

बुद्धांनी आनंदला विचारले, ''आनंद भिक्खू संघाला काय उपदेश पाहिजे आहे? कारण आजपर्यंत मी आत-बाहेर असे काही केलेच नाही. कोणतेही धर्मरहस्य लपवलेले नाही. भिक्खू संघ माझा आहे असेही माझ्या मनात आले नाही. माझा-तुझा असा भेद असेल तर उपदेश संभवतो आणि शिवाय मी आता ऐंशी वर्षांचा जीर्ण, वृद्ध, वयस्क बनलो आहे. एखादा जीर्ण खटारा दोऱ्यांनी बांधून चालवावा त्याप्रमाणे तथागताचे शरीर बांध-बांधून चालत आहे.''

''आनंद! जेव्हा शरीर, मनापलीकडे मी समाधी अवस्थेत वावरतो त्यावेळी तथागताचे शरीर उत्तमच असते.''

दुसऱ्या दिवशी वैशाली नगरात भिक्षेनंतर ते आनंदला म्हटले, ''आनंद जेथे चापाल चैत्य आहे तेथे फिरून येऊ.'' आनंद आसन घेऊन त्यांच्या पाठोपाठ येऊ लागला. तेथे बसल्यावर आनंदला त्यानी म्हटले, ''आनंद, खरोखर वैशाली नगर रमणीय आहे. पण तुम्हाला अगोदरच मी सांगितले आहे की, प्रिय वस्तू, प्रिय जनांपासून एक ना एक दिवस आपणाला निरोप घ्यावा लागतो. मी आजपासून तीन महिन्यांनी परिनिर्वाण घेईन.''

महावन कुटागार शाळेला ते पोहोचले. तेथे वैशालीजवळ जेवढे भिक्खू आहेत त्यांना एकत्रित बोलवा, असा बुद्धांनी निरोप दिला.

सारे भिक्खू जमल्यावर त्यांना उपदेश करताना सांगितले, ''भिक्खूंनो! मी जो धर्मोपदेश केला आहे तो उत्तमरीत्या शिका, सेवन करा, भावना करा, तो अभ्यास वाढवा. त्या साऱ्या आचरणात ब्रह्मचर्य चिरस्थायी बनवा. त्याचा उपयोग बहुजन हितार्थ, बहुजन सुखार्थ, लोकानुकंपार्थ, देव-मनुष्यांच्या कामासाठी, हितासाठी, सुखासाठी करा.

मी तुम्हाला जो धर्म सांगितला आहे तो आठवा. त्यात (१) चार स्मृती प्रस्थान

(२) चार सम्यक प्रधान (३) चार ऋद्धिवाद (४) पाच इंद्रिय (५) पाच बल (६) सात बोध्यांग (७) आर्य अष्टांगमार्ग हे चांगल्या रितीने शिका, आत्मसात करा. सारे संस्कार नाशवंत आहेत. त्यामुळे प्रमादरहित आचरण करा. यानंतर तीन महिन्यांनी मी परिनिर्वाण घेईन.''

भोजनानंतर वैशाली नगराचे नागावलोकन (हत्तीप्रमाणे सर्व शरीर फिरवून) करून वैशालीकडे पाहून त्यानी आनंदला म्हटले, ''आनंद तथागताचे हे शेवटचे वैशाली दर्शन.'' वैशालीहून ते भंडग्राम, भोगनगर येथे पोहोचले. तेथे आनंद चैत्यामध्ये ते राहिले. तेथे साऱ्या भिक्खूंना एकत्र बोलावून त्यांना धर्मोपदेश करताना त्यांनी सांगितले.

''भिक्खूंनो! आज मी तुम्हाला चार महाप्रदेशांचा उपदेश करणार आहे.''

''ठीक आहे! भगवान.'' सारे भिक्खू एकसुरात म्हणाले.

''भिक्खूंनो! जर कोणी भिक्खू तुम्हाला म्हणाला की, मी ही गोष्ट भगवानांच्या तोंडातून स्वतः ऐकली, ते बोलताना ऐकली की हा धर्म आहे, हा नियम आहे, हे शास्त्ाचे शासन आहे, अशावेळी तुम्ही त्याच्या या बोलण्याबद्दल अभिनंदनही करू नका किंवा निंदाही करू नका. तो जे काय बोलला ते समजून घ्या व त्याची सूत्राशी तुलना करा. जे नियम घालून दिलेत त्याच्याशी पडताळून पाहा. जर त्यानंतर ते नियमात बसत नसतील, सूत्रानुसार जुळत नसतील तर निश्चित समजा की ते माझे वचन नाही. सांगणाऱ्या भिक्षूने चुकीची गोष्ट गृहीत धरली आहे.

पण जर सूत्राशी तुलना करताना ते जुळले व नियमाप्रमाणे दिसले तर ते माझे वचन आहे असे समजा. ते सुगृहीत होय. तो महाप्रदेश धारण करा.

जर कोणी भिक्खूने सांगितले की, आवुसो! या या आवासामध्ये स्थवीर युक्त प्रमुख संघ विहार करतो त्या संघाच्या मुखातून ऐकले की हा धर्म आहे, हा विनय आहे तर समजा की ते माझे वचन आहे सुगृहीत आहे. तो दुसरा महाप्रदेश धारण करा.

जर एखाद्या भिक्खूने सांगितले की, या विशिष्ट आवासामध्ये अनेक बहुश्रुत, आगमज्ञ, धर्मधर, विनयधर, मात्रिकाधर, स्थविर भिक्खू राहतात. त्यांच्या मुखातून हे ऐकले, ग्रहण केले आहे तर समजा तो धर्म आहे.

जर एखादा भिक्खू असे म्हणाला की, या विशिष्ट आवासात एक ज्येष्ठ, बहुश्रुत, स्थविर भिक्खू राहतो. त्याच्या मुखातून मी ऐकले की, हा धर्म आहे हा नियम आहे तर भिक्खूंनो या चौथ्या महाप्रदेशाला धारण करा. या चारीही महाप्रदेशांना धारण करा.

भोगनगरच्या वास्तव्यात बराच काळ भिक्खूंना धर्मकथा, उपदेश सांगण्यात निघून गेला.

□□□



# महानिर्वाण

तीन महिने वैशाली येथे तथागत भयंकर आजारी होते. त्यामुळे अंगात त्राण राहिले नव्हते. आता त्याना निर्वाणाचे वेध लागले होते. महाभिक्खू संघाबरोबर ते पावा येथे आले. तेथे चुंद लोहारच्या आमराईत ते उतरले. चुंदला ते तेथे आल्याचे समजल्यावर तो भेटायला आला. त्याच्या विनंतीवरून त्याला धर्मोपदेश केला. त्याने निरोप घेताना भिक्खूसंघाबरोबर दुसऱ्या दिवशीच्या भोजनाचे निमंत्रण स्वीकारण्याची विनंती केली. त्यानी मूकपणे ती स्वीकारली.

रात्र झाल्यावर चुंदने उत्तम पक्वान्ने बनवली होती. त्यात अधिकतर शूकर-मार्दव (सूकर महव) तयार केले. (वर्षाच्या आतल्या डुकराचे मांस मृदूही असते व स्निग्धही असते. ते जादा कोवळेही नाही व जूनही नाही अशा डुकराचे असते.) साऱ्यांनी भोजन घेतले नि विहारात परतले. त्या रात्री त्यांच्या पोटात जास्त दुखू लागले नि हगवण सुरू झाली. ती रक्ताची हगवण होती. त्यामुळे प्रचंड थकवा आला. ते वेदना मोठ्या धीराने सहन करीत होते. शरीर भोग, त्यात वार्धक्य हे कधीही दुःखकारकच असते, वेदनामय असते.

त्यांनी आनंदला बोलावणे पाठवले. तो आला. तोही आता काही तरूण राहिलेला नव्हता. त्यांची सेवा त्याने कितीतरी वर्षे केली होती, त्यांचे शरीरस्वास्थ्य त्याने खूप सांभाळले होते.

सकाळ झाली होती. ''आनंद, आपण पुढे कुशीनाराला जाऊ या. मला खूप थकवा आहे. वृक्षाखाली बैठक घाल. मी थोडा वेळ तेथे बसतो.'' बुद्ध म्हणाले.

ते बसलेले आहेत ही गोष्ट त्या वाटेने कुशीनारा ते पावा जाणाऱ्या, आलार कालामांचा शिष्य पुक्कस मतृ याने पाहिली. तो जवळ आला. अभिवादन करून त्याने विनंती केली की दीक्षा द्या. त्याला ही दीक्षा सहजच जाता जाता लाभली, त्यामुळे तो स्वतःला भाग्यवान समजत होता तो निघून गेला. बुद्धांनी आनंदला जवळ बोलावून त्याला क्षीण आवाजात म्हटले, ''आज रात्रीच्या पहिल्या प्रहरी, कुशीनारा (जिल्हा देवरिया) शालवृक्षाच्याखाली शेवटचा श्वास घेण्याची इच्छा आहे. चल, आनंद कुकुत्था (कुकुल्या) नदीच्या काठी जाऊ.

नदीत उतरून त्यांनी स्नान केले. आमराईत परतले. थोडी तरतरी वाटली. चुंद थांबला होता. त्याला अंथरूण घालायला सांगितले. ते थोडावेळ निवांत पडून राहिले.

बुद्धांनी पायावर पाय ठेवला नि चित्त उर्ध्वगामी केले. दृष्टी भूमध्यात केंद्रित केली. उजव्या कुशीवर सिंहशय्येत काही वेळ पडून राहिले. काही वेळानंतर आनंद जवळ आला. त्याला त्यांनी म्हटले, ''आनंद! ही काळजी घे की चुंदच्या भोजनामुळे मी आजारी झालो असे समजून कोणी चुंदवर क्रोधित होणार नाही. कोणीतरी त्याला रागावून म्हणेल की चुंद तुझे भोजन खाल्ल्याने परिनिर्वाण झाले. चुंदला कोणीही त्रास देऊ नका.'' वास्तविक माझ्या जीवनात दोन अन्नग्रहण महत्त्वाचे ठरले. एक जे अन्नग्रहण केल्यावर मला ज्ञानप्राप्ती झाली नि दुसऱ्यावेळी जे अन्नग्रहण केल्यावर मी शरीरबंधनातून मुक्त होत आहे. पहिल्यामुळे अनुत्तर सम्यक संबोधी लाभली. दुसऱ्यामुळे अन् उपाविशेष निर्वाण धातू (दुःख कारणरहित निर्वाण) लाभले.

दोन्हीही मुक्तता होत्या. स्वतंत्रता होत्या. एक अज्ञानापासून, आसक्तीपासून, दुःखापासून तर दुसरी मुक्तता होती - शरीर बंधापासून, जडाच्या आसक्तीपासून, दुःखापासून. हे सांगतानाही त्यांना थकवा तीव्रतेने जाणवत होता. त्यांनी आनंदला म्हटले, ''आनंद, जवळच हिरण्यवती नदी आहे. ती ओलांडली की, कुसीनारा लागतो. तेथे पूर्वेकडून उत्तरेला वळणारी शालवृक्षांची ओळ आहे तेथे चारपायी ठेवा त्यावर मी विश्रांती घेईन.''

आनंदने तेथे उत्तरदिशेला तोंड करून चार पायी ठेवली. त्यावर ते पहुडले.

तथागतांचा निरोप घेण्याची वेळ जवळ येत असल्याचे पाहून आनंदच्या मनातील थरकाप त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. पण धीर एकवटून त्याने खूप दिवस मनात कोंडून ठेवलेल्या व्यवहारी शंका विचारल्या,

- ''भंते! आम्ही स्त्रियांच्या बरोबर कशा तऱ्हेने वागावे?''

= ''आनंद! अदर्शन = आलाप! बोलणे करु नका.''

''जर बोलण्याचा प्रसंग आला तर बोलणाऱ्याने कसे वागावे?''

- ''स्मृति (मनाला) सांभाळून ठेवून बोलावे.''

''भंते! तुमच्या शरीराला कसे सांभाळावे? कोणते संस्कार करावेत?''

''हे आनंद! माझ्या शरीराची पूजा-अर्चा करण्याची गरज नाही. त्याची पर्वा करू नका. चैतन्याचा, ज्ञानाचा विचार करा. या शरीराला साधनभूत करून वावरणाऱ्या शक्तीचा विचार करा. खऱ्या अर्थाने सतत उद्योगी राहा, प्रयत्नशील राहा, चुका करू नका, आत्मसंयमी



बनून संचार करा, वावरा! त्यामुळे क्षत्रिय पंडित, ब्राह्मण पंडित, गृहस्थी, परिव्राजक साऱ्या तऱ्हेचे लोक या चैतन्याचे उपासक बनतील.''

- ''भंते! तुमचे शरीर कसे संस्कारीत करावे?''

= ''आनंद! जसे चक्रवर्ती राजाच्या शरीरावर संस्कार करतात तसे.''

- ''पण भंते! त्याविषयी काहीच माहिती नाही, ते कसे संस्कार करतात?''

- ''आनंद! चक्रवर्ती राजाचे शरीर नव्या वस्त्रात लपेटतात. त्यावर कापूस लावतात पुन्हा त्यावर रेशमी कापडी पट्ट्या बांधतात. मग लोखंडाच्या मोठ्या द्रोणात किंवा पेटीत, तेलात ते शरीर ठेवतात. दुसऱ्या द्रोणाने किंवा झाकणाने तो द्रोण, ती पेटी, बंद करतात. चंदनाच्या लाकडाची चिता रचून शरीराला अग्नी देतात. मग मोठ्या रस्त्यांच्या चौकात त्या अवशेषावर स्तूप बांधतात.''

तथागत हे सांगत असताना आनंदला अश्रू आवरेनात. तो रडत रडतच दूर गेला. विहारात जाऊन तो एका खुंटीला हाताने पकडून उभा राहिला नि आक्रोश करू लागला. बुद्धांनी इतर भिक्षूंना पाठवून त्याला जवळ बोलावले. त्याच्या डोक्यावरून हात फिरवून म्हटले,

''आनंद ! नाही ! तू शोक करू नको ! रडू नको. यापूर्वीच मी तुला व साऱ्यांना सांगितले आहे की, सर्व प्रिय माणसांचा वियोग होतो. जो जन्मला त्याला विनाश आहेच. कोणी अमर राहावा हे शक्य नाही. आनंद ! तू दीर्घकाळ पर्यंत माझी काळजी घेतलीस, माझे सुख, माझे हित सांभाळलेस, निरपेक्ष भावाने शरीराने सेवा केलीस. भावाप्रमाणे, सखा म्हणून वाचेनेही सेवा केलीस. ध्यानधारणेने,उपासनेने माझी मानसिक सेवाही मला पोहोचली. तू पुण्यवान आहेस. निर्वाण मार्गाने पुढे वाटचाल कर आणि मुक्त हो!''

आनंद त्यांना म्हणाला, ''भंते! या छोट्या, नगण्य, क्षुद्र अशा नगरात महानिर्वाण होण्याऐवजी महानगरे आहेत तेथे जाऊ. चम्पा, राजगृह, श्रावस्ती, साकेत, कौशाम्बी, वाराणसी तेथे तुम्ही महानिर्वाण घ्यावे. तेथे खूप श्रीमंत क्षत्रिय, श्रीमंत ब्राह्मण, गृहपती आहेत. ते तथागतांच्या शरीराची यथोचित पूजा करतील, सन्मान करतील.''

त्यांनी आनंदला समजावून सांगितले, ''आनंद, असे म्हणू नको. या कुशीनाराला क्षुद्र म्हणू नको. हे ठिकाण राजा सुदर्शनाची कुशावती नावाची राजधानी होती. येथे मल्ल समाजाचे लोक राहतात. त्यांना तू संबोधून सांग, 'श्रेष्ठ नागरिकांनो! तुमच्या गावातच आज रात्री पहिल्या प्रहरी तथागताचे महानिर्वाण होणार आहे. चला आताच चला. नंतर असे म्हणू नका की, आमच्या गावात तथागतांनी निर्वाण घेऊनही आम्हाला कोणीच कसे,

सांगितले नाही. त्यांची जिवंतपणी आमची भेट झाली असती!''

''ठीक आहे!'' असे सांगून मोठ्या कष्टाने आनंद चीवर घालून, पात्र घेऊन एकटाच कुशीनारा येथे गेला. तेथे सारे गाववासी लोक एका सभागृहात एकत्र आले होते. तेथे आनंदने साऱ्यांना सांगितले.

तो निरोप ऐकून कुसीनारातले आबालवृद्ध, स्त्रिया, पुरुष, सारेच आक्रोश करू लागले. सारेजण शालवनात लोटले. आता प्रत्येकाला परिचय करुन देणे शक्य नव्हते. त्यातच सारी रात्र निघून जाईल, म्हणून काही घराण्याचा परिचय करून दिला. सायंकाळी सहापासून रात्री दहापर्यंत हे काम चालूच होते.

कुसीनारात त्यावेळी सुभद्र नावाचा परिव्राजक राहत होता. तथागतांचा निर्वाण समय जवळ आल्याची वार्ता त्याच्या कानावर गेली. त्याने विचार केला की, अनेक वयोवृद्ध आचार्यांशी चर्चा करूनही माझ्या शंकांचे समाधान झालेले नाही. आजही सम्यक संबुद्ध जन्मतात असे त्यांच्या तोंडून ऐकले आहे. आज श्रमण गौतम कुसीनारात आहेत. ते कदाचित माझी शंका दूर करू शकतील. माझी त्यांच्या ज्ञानावर, तपस्येवर श्रद्धा आहे. ते मला धर्मोपदेश करु शकतात. अशा विचाराने प्रवृत्त बनून तो शालवनात जेथे आनंद उभे होते तेथे आला. त्याने आनंदला सांगितले की, श्रमण गौतमांचे दर्शन घेऊन त्यांच्या धर्मोपदेशाचा अभूतपूर्व असा लाभ घेऊ इच्छितो. त्यामुळे माझ्या शंका दूर होतील.

आनंदने त्याला शांतपणे समजून सांगितले, ''तथागतांना त्रास देऊ नका त्यांना खूप थकवा आला आहे.''

तरीपण सुभद्र दोन तीन वेळ विनंती करताना स्वतः तथागतांनी ऐकले. ते ऐकून हस्तक्षेप केला, ''आनंद! सुभद्रला नाही म्हणू नको. त्याला मला भेटू दे. तो जे काही विचारेल ते भौतिक गोष्टीसाठी असणार नाही. तो परमज्ञान प्राप्तीच्या उद्देशानेच विचारेल. मला त्रास देण्यासाठी नव्हे. त्याने विचारल्यावर मी जे सांगेन ते तो तत्काळ समजू शकेल.''

आनंदने सुभद्रला सांगितले, ''तुम्ही जा! तथागतांनी तुम्हाला भेटण्याची अनुमती दिली आहे.'' सुभद्रने अभिवादन करून निवेदन केले की पंडित, महापंडित, परिव्राजक उदा. पूर्ण कास्यप, मक्खली गायाल, अजित केशकंबल, पकुध कच्चायन, संजय वेलहिपुत्त, निगंठ नाथपुत्त हे आपापली मते मांडतात, कोण असे सांगते, कोण तसे सांगते.''

तथागत म्हणाले, ''सुभद्र! ते सोडून दे! प्रत्येकजण आपला दावा मांडतो. त्यापेक्षा मी धर्मोपदेश करतो ते नीट ऐक, त्याची मनात नोंद कर.

ज्या धर्मनियमात श्रेष्ठ असा अष्टांगिक मार्ग उपलब्ध होत नाही तेथे श्रमण निर्माण



होऊ शकत नाहीत. त्याला स्त्रोत आपन्न म्हणतात. द्वितीय श्रमण त्याला सकृदागामी देखील निर्माण होत नाही व तिसरा श्रमण (अनागामी) निर्माण होत नाही. चौथा श्रमण (अर्हत) निर्माण होत नाही. पण जेथे आर्य अष्टांगमार्गाचे पालन होते, तेथे त्या धर्माचरणात सर्व पायऱ्या पार करून श्रमण निब्बाण प्राप्त करतो. या व्यतिरिक्तचे वाद निरर्थक आहेत. सुभद्र! वयाच्या २९ व्या वर्षी मी परिव्राजक बनलो. त्यापासून आता एकावन्न वर्षे झाली. न्यायधर्म, आर्यधर्म, सत्यधर्म याशिवाय वेगळा कोणी पाहिलेला नाही.''

यावर सुभद्रने प्रार्थना केली. ''आश्चर्य! अद्‌भूत! भंते! मला तुमच्याकडून प्रव्रज्या मिळावी, उपसंपदा मिळावी.''

''सुभद्र! जर दुसऱ्या पंथाच्या धर्माचे आचरण करणारा असेल तर त्याने चार महिने परीक्षार्थी म्हणून राहावे. त्यानंतर आरब्ध चित्त भिक्खू त्याला प्रव्रजित करतात. भिक्खू बनण्यासाठी त्याची तयारी करून घेतात; मग प्रब्रजा घेऊ इच्छिणाऱ्याला ती मिळते असा येथला संघाचा नियम आहे, असे सांगून जवळच आनंद उभा होता त्याच्याकडे पाहून तथागत म्हणाले, आनंद, याला यथायोग्य वेळी प्रब्रजा दे.''

आनंद सुभद्रला म्हणाला, ''आवसू! धन्य आहेस. शास्ताच्या मुखातून कृपेचा, आशीर्वादाचा अभिषेकच तुझ्यावर झाला. भगवानने शेवटच्या शिष्यावर कृपा केली असा तू भाग्यवान ठरलास!'' त्यानंतर सुभद्र निघून गेला.

तथागत आनंदला म्हणाले, ''कदाचित तुला असे वाटेल की, निघून गेलेल्या गुरूचे हे शेवटचे प्रवचन होते. आता आमचा शास्ता राहिला नाही. आनंद! या दृष्टीने या गोष्टीकडे पाहू नको. मी जे नीतिनियम तुम्हाला घालून दिले, त्याचे तुमच्याकडून आचरण करून घेतले तो तुमचा गुरु असेल. शास्ता असेल. आज भिक्खू परस्परांना आवसू म्हणून संबोधतात. यापुढे त्यांनी तसे संबोधू नये. ज्येष्ठ भिक्खू, प्रव्रजा प्राप्त उपसंपदा प्राप्त भिक्खूने नवोदितांना आवसू म्हणून संबोधावे जर गरज वाटली तर अगदी किरकोळ भिक्खूनियमांना संघाने सोडले तरी चालेल. माझ्यानंतर काही गंभीर गोष्टी केलेल्या, अहितकारक गोष्टी करणाऱ्या भिक्खूंशी कोणी संभाषण करू नये, बोलू नये, उपदेशही करू नये.''

मग साऱ्या भिक्खूंना जवळ बोलावले आणि त्यांनी विचारले, ''भिक्खूहो! मी गेल्यानंतर पश्चाताप करू नका. शास्ता समोर असताना त्यांच्यासमोर आम्ही काही विचारू शकलो नाही असे व्हायला नको.''

यावर सारे भिक्खू गप्पच राहिले. पुन्हा दुसऱ्यांदा व तिसऱ्यावेळीही त्यांनी विचारले तरी ते गप्पच राहिले.

मग त्या सर्वांना त्यानी आशीर्वाद दिला. त्यांचे मन आता अंतर्लीन होत होते. शरीराचे भान हरपत चालले होते. प्रकाश आतबाहेर पसरला होता. शरीर कर्पूरासारखे हलके हलके बनले होते. चित्ताचा त्या प्रकाशसागरात लय होऊ लागला होता. एक करुणेची लाट अंतरंगातून बाहेर आली नि ती मनाच्या किनाऱ्यावर आपटून शब्दबद्ध झाली.

ते निर्वाणीचे शब्द होते, ''भिक्खूहो! शेवटचे सांगतो. सारे संस्कार नाशवंत आहेत. व्ययधर्मी आहेत.आळस न करता जीवनाचे ध्येय संपादन करा...''

अन्नमय कोश, मनोमय कोश, ज्ञानमय कोश, विज्ञानमय कोश, आनंदमय कोशातून चेतना निर्विकल्प समाधी अवस्थेकडे निघाली. हळूहळू आंतरज्योत उर्ध्वगामी होत शून्यात विलीन पावू लागली. शेवटी तेथे सांगणाराही राहिला नाही आणि ऐकणाराही.

राहिले ते सारे फक्त शून्य शून्य......

□□□



# संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | राहुल सांस्कृत्यायन | बुद्धचर्या |
| २. | धर्मानंद कोसंबी | भगवान बुद्ध |
| ३. | राजेश चंद्रा | बुद्ध का चक्रवर्ती साम्राज्य |
| ४. | ऊर्मिला पवार | उदान |
| ५. | अनु.मा.शं.मोरे | माज्झिम निकाय |
| ६. | सौ.विजया संचेती | विनय पिटिका, मर्म स्पर्श-खंड १,२,३. |
| ७. | अनु.चंद्रमणी भिक्खू | धम्मपद |
| ८. | Thich Nhat Hanh (Full Circle, New Delhi) | Old Path White Clouds |
| ९. | डी.टी.सावंत, (सुगावा, पुणे) | बौद्ध धम्माची पहिली संगिनी. |
| १०. | J.R. Sartiago | Sacred Mandala of Budhism |
| ११. | Archaeological Survey of India | Sanchi |
| १२. | धर्मानंद कोसंबी (रघुवंश प्रकाशन) | समाधिमार्ग |
| १३. | Sir Ediwin Arnold | Light of Asia and Indian song of songs |
| १४. | Van Hier Study Group | Glossory of Budhism |
| १५. | Lin Yutang | The Wisdom of China and India |
| १६ | के.टी. सराओ | प्राचीन भारतीय बौद्धधर्म |
| १७. | Archaeological Survey of India | Amaravati |
| १८. | Ministry of Tourism | Mystical Extravag |
| १९. | Foundation of Tibetian Budhism - Lama Anagritea Govinda | |

| | |
|---|---|
| २०. डॉ.आ.ह.साळुंखे | सर्वोत्तम भूमि पुत्र - गौतमबुद्ध |
| २१. बौद्ध ग्रंथमाला | दीघनिकाय |
| २२. प्रा.डॉ.भाऊ लोखंडे<br>प्रा.डॉ.रत्नमाला लोखंडे | थेर गाथा |
| २३. के.सच्चिदानंद मूर्ती<br>अनु.-आ.ह.साळुंखे | नॅशनल बुक हाउस - नागार्जुन |
| २४. The Peter Pauper press | Saying of Buddha |
| २५. शांतिस्वरूप बौद्ध<br>(भा.बौ.महासभा) | शांतिपथ |
| २६. भादंत आनंद कौसल | सच्च संगहो |
| २७. राजवाडे | दीघनिकाय १, २, ३ |
| २८. भिक्षू धर्मराधित सांस्कृतायन | माझ्मिम दीघनिकाय भाग १, २, ३ |
| २९. आनंद कौसल्यायन | अंगुत्तर निकाय भाग १, २ |
| ३०. डॉ.भगतसिंग उपाध्याय | ध्यान संप्रदाय |
| ३१. Hermann Hesse | Sidhartha |
| ३२. Dr.Bimalendu Mohanty | Gimpses of Buddhist Legary |
| ३३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर | बुद्ध और उनके धम्म का भविष्य |
| ३४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर | बुद्ध आणि धम्म |
| ३५. Hermann Oldenberg | Bhudha his life, Doctrine and Order |
| ३६. MERY FOWLER | Budhism- Religion Practices Bdiel |


□□□



# संदर्भ शोधण्यासाठी


| | |
|---|---|
| १. प्रस्तावना | - The pali writing as basis of Budhist tradition Herman old enborg, pg. 76 |
| २. प्रस्तावना (माराचा उल्लेख) | - |
| ३. प्रस्तावना (मॅक्सपीटरच्यामते) | - Maxmuller Chips from German Workshop pg.226 |
| ४. राहुलची दीक्षा | - ओल्ड पाथ व्हाईट क्लाउड - पृष्ठ ३३० |
| ५. राजा शुद्धोधन | - भगवान बुद्ध- धर्मानंद कोसंबी- पृष्ठ २१५ (माझ्यापूर्वीचे तीन बुद्ध वंशज) |
| ६. स्त्रियांना दीक्षा | - विनयपिटीका |
| ७. आजार (तीन चमचे औषध)<br>चीवराचा रंग | - महावग्ग विनयपिटीका २७८ ते ८० |
| ८. नवोदित भिक्खूंना पाहुणचार<br>(निर्दोष व्यक्तीस शिक्षा देणे अपराध) | - महावग्ग. पृष्ठ २९० |
| ९. नख, केस राखणे | - चुल्लवग्ग ४४० |
| १०. एकांतवास | - ओल्ड पाथ व्हाईट क्लाउड - पृष्ठ ३०४ |
| ११. अंध चक्षुपालाचा हिंसाचार | - धम्मपद (अनु.चंद्रमणी भिक्खू) |
| १२. एकांतवास आवडणारा थेर भिक्खू | - Our Appointment with life (Full Circle Publ.) |
| १३. अजातशत्रूला बहकवले | - चुल्लवग, पृष्ठ ४८४ |
| १४. सोमा भिक्षूणी | - भिक्खूणी संयुक्त सूत्र २ |
| १५.भारद्वाज ब्राह्मणाच्या शेतावर भगवान बुद्ध | - धर्मानंद कोसंबी पृष्ठ ११५ |
| १६. आत्मा नाही<br>(वाराणसी येथे ऋषिपत्रना) | - निदान संयुक्त, वग्ग २, सूत्र ५<br>- धर्मानंद कोसंबी, भगवान बुद्ध -पृष्ठ १४१-१४२ |
| १७. बलशाली कोण | - बुद्धा चक्रवर्ती साम्राज्य- राजेश चंद्रा पृ.१८२ |

| | | |
|---|---|---|
| १८. श्रेष्ठ कोण? | - | अस्सलायन सूत्र पृष्ठ १६७ |
| १९. खौंडाने बाहियाला मारले | - | उदान. ऊर्मिला पवार पान ९ |
| २०. डागाळलेले वस्त्र चांगला रंग चढत नाही | - | माज्झिम निकाय १ः७ पृष्ठ ३२ अनु. मोरे |
| २१. लोक परलोकाचा शास्ता (सुन्नखत) | - | महासीहनाद सूत्र (माज्झिम निकाय) पृष्ठ ५६-५७ |
| २२. अंतःस्फूर्त उत्तरे | - | अभय राजकुमार सुत्त (माज्झिम निकाय) पृ.३१२ |
| २३. निर्वाणाच्या वाटेवर कसे चालावे | - | माज्झिम निकायः ३, पृष्ठ ६२०- २३ |
| २४. स्तुती निंदा पलीकडे | - | दीघानिकाय ब्रह्मजाल सूत्र - चि.वै. राजवाडे भाग १- पान १७ |
| २५. आत्मसुखाचा जिवंत झरा | - | दिघानिकाय १ - सामंजस सूत्र पान नं. ७४-७५ |
| २६. मनाच्या सुप्त शक्ती | - | अधिकरणवग्ग- अंगुत्तर निकाय १ अनुवाद- मोरे- कांबळे- पान ६९ |
| २७. तीन धर्म भावना | - | १८ रागपेय्याल अंगुत्तर निकाय १ पान ३२७ |
| २८. महाकश्यप | - | सुत्तपिटकातील खुद्दक निकायमध्ये थेरगाथा- डॉ.लोखंडे |
| २९. सारिपुत्ताचे महानिर्वाण | - | बुद्धचर्चा राहुल सांखृत्यायन पान ४८२ |
| ३०. पाटलीपुत्र- दिव्यदृष्टीने | - | बुद्धचर्या, पान ४९२ |
| ३१. देवतांच्या कृपाशीर्वादाने | - | बुद्धचर्या, पान ४९२ (अम्ब लट्ठिकामध्ये) |

□□□